कांड ४

प्रपाठक १

१ सर्व कार्यांचा प्रेरक अशा परमेश्वराने 'अग्निचयन' विषयक विचार करण्याकरता प्रथम आपले मन एकाग्र केले. आणि अग्निचयनाची मांडणी कशी करावी? ती करण्यासाठी लागणाऱ्या विटा केवढ्या व कोणकोणत्या आकाराच्या असाव्या? इत्यादि गोष्टींचा आपल्या कुशाग्र बुध्दीने सविस्तर विचार केला. तेव्हा, आपण कल्पिल्याप्रमाणे मांडण्यात येणारा 'अग्निचयन' फलद्रूप होणाऱ्या सर्व कर्मांचे प्रकाशन करण्याला साधनभूत होईल असे त्याने निश्चित केले. आणि मग विशिष्ट अशा विटांच्या मांडणीने सिध्द होणाऱ्या त्या अग्नीला त्याने पृथ्वीवर आणून तो सर्वत्र प्रचलित केला. २ सर्वप्रेरक अशा परमेश्वराने स्वर्गलोकी जावयास मिळण्यासाठी झटत राहणाऱ्या आणि निरनिराळ्या आकाराच्या विटांची विशिष्ट पध्दतीने मांडणी केल्याने सिध्द होणाऱ्या अत्यत प्रौढ अशा त्या चयनाग्नीला आपल्या कल्पक बुध्दीने सर्वत्र प्रकाशित करण्यास चपलतेने उद्युक्त झालेल्या इंद्रियांचे इतर सर्व विषयांपासून आपल्या मनाने नियमन केले. आणि त्या सर्व इंद्रियांना अग्निचयन करण्याविषयी तीव्र प्रेरणा केली. ३ सर्व प्रेरक अशा सविता देवाची प्रेरणा झाल्यामुळेच आम्ही इतर विषयांपासून नियमन केलेल्या आमच्या मनाने स्वर्गलोकीं देव ज्याची कीर्ती गातात अशा चयनरूपी अग्नीचे संपादन करण्यास समर्थ झालो आहोत. ४ प्रभूत अशा अग्निचयनविषयक उद्योगामुळे ज्याच्या ज्ञानाची वाढ झाली आहे अशा विद्वान्‌ ब्राह्मण यजमानाचे निरलसपणाने हवन कार्य करणारे ब्राह्मण ऋत्विज प्रथमत: आपले मन इतर विषयांपासून आवरून एकाग्र व प्रशांत करतात. आणि नंतर आपल्या कल्पकतेने अग्निचयनाच्या मांडणीविषयी अवश्य अशा त्या त्या ज्ञानांचीही नीट जुळणी करतात. ऋत्विज व यजमान यांचे मनोगत बरोबर जाणणाऱ्या सर्वप्रेरक अशा एकट्या परमेश्वरानेच हे सारे जग निर्माण केले आहे. ५ हे यजमान आणि हे पत्नी, तुम्हा दोघांच्या साठीच पुरातन महर्षींनी अनुष्ठित केलेले ब्रह्म म्हणजे अत्यंत श्रेष्ठ असे जे अग्निचयनसंज्ञक कर्म, त्याचीच नमस्कारपूर्वक इष्टकांची मांडणी करून मी योजना करीत आहे. माझ्या हातून अग्नीचयनाची बरोबर मांडणी झाली

म्हणजे अंतरिक्षात असलेल्या देवांच्या मार्गावर सूर्याची किरणे जशी पसरतात, त्याप्रमाणे यजमानाच्या कीर्ती भूलोकावर सर्वत्र पसरत असतात. आणि अमर अशा प्रजापतीचे पुत्र जे देव स्वर्गलोकात देदीप्यमान अशा स्थानाना जाऊन पोचले आहेत ते सर्वदेव यजमानाच्या त्या कीर्ती ऐकतात. ६ ज्या सर्वप्रेरक सविता देवाचे प्रयाण होऊ लागले, म्हणजे तो कोठे जाण्याकरिता निघाला म्हणजे त्या देवाचे माहात्म्य पूज्य बुध्दीने गाणारे इतर सर्व त्याच्या मागोमाग जात असतात. ज्या सविता देवाने पृथ्वीच्या ठिकाणी असणाऱ्या धूलिकणांची बरोबर मोजणी केली, तोच सविता देव आपल्या ठिकाणच्या महत्त्वाने सर्व जग व्यापून राहिला आहे. ७ हे सवित्या देवा, तू यज्ञाला उत्कटतेने प्रेरणा कर आणि त्याप्रमाणे सौभाग्य मिळविण्यासाठी यज्ञ करण्याची यजमानालाही प्रेरणा कर. दुसऱ्याच्या चित्तात साठून राहिलेल्या ज्ञानाचे संशोधन करणारा, स्वर्गलोकनिवासी असा जो कोणी गंधर्व आहे, तो आमच्या चित्तामध्ये असलेल्या मनाची सर्व भ्रांती दूर करून त्याचे नीट रीतीने संशोधन करो. वाणीचा अधिपती असलेला बृहस्पतिदेव ह्या यज्ञकर्मामध्ये आमच्या मंत्ररूपी वाणीचे ठिकाणी आकर्षक अशी गोडी निर्माण करो. ८ हे सवित्या देवा, देवांच्यापाशी जाऊन त्यांच्यामध्ये मिसळणारा, आपल्या यजमानाला मित्रत्वाने वागविण्याचे ज्ञान असलेला, 'द्वादशाह' इत्यादि दीर्घकाळपर्यंत चालू राहणाऱ्या सत्रसंज्ञकांनाही वश करणारा, फलरूपी धनाचे संपादन करणारा आणि स्वर्गलोकही जिंकणारा म्हणजे फलरूपाने यजमानाला प्राप्त करून देणारा अशा आमच्या या यज्ञाला तू प्रवर्तित कर. ९ हे अग्निदेवा, सामाला आधारभूत असणाऱ्या ऋचेने स्तोमाला समृध्द कर. 'गायत्र' नामक सामासहवर्तमान 'रथंतर' सामाला समृध्द कर. आणि गायत्र सामाच्या मार्गाने 'बृहत्' सामाला समृध्द कर. १० हे अभ्रि, प्रेरक अशा सविता देवाची प्रेरणा झाल्यामुळे अश्विनीकुमारांच्या बाहूंनी, षूषा देवाच्या हातांनी, आणि गायत्री छंदाशी संयुक्त होऊन पूर्वी 'अंगिरस' ऋषींनी जशी उचलून घेतली, तशीच मी तुला उचलून घेतो. ११ हे अभ्रि, तू जमीन खणण्यासाठी बनविलेली लाकडी कुदळ आहेस, तू शत्रुरहित आहेस. पृथिवीच्या मांडीवर बसलेल्या शुष्क व मृदु मृत्कणरूपी अग्निदेवाला तू उचलून आण. 'त्रिष्टुप्'छंदाशी संयुक्त होऊन अंगिरसांच्या प्रमाणेच मी तुला उचलून घेतो. १२ हे अभ्रि, तू भूमीतील माती खणण्याचे कामात कुशल आहेस. तू शत्रुरहित आहेस. तुझ्या संचाराला लहानमोठे दगडही

अडथळा करीत नाहीत. तुला हाती धरल्यानेच पृथ्वीच्या आतील ब आसमंत भागातल्या बारीक व मृदु मातीच्या स्वरूपाने असणाऱ्या अग्नीला पृथ्वीतून खणून काढण्याला आम्ही समर्थ होऊ. जगती छंदाशी संयुक्त होऊन मी तुला उचलून घेतो. १३ सर्वप्रेरक अशा परमेश्वराने पूर्वी ज्या सुवर्णनिर्मित अभ्रीला हातात वागवून तिचे पोषण केले त्या सुवर्णमय अभ्रीशी समरस होऊन तू सर्वदा प्रकाशमान अशा मृद्रूपी अग्नीला खणीत असतेस. यास्तव, तू आमच्या करता चांगल्या जागेची माती खणून आण. 'अनुष्टुप्' छंदाशी संयुक्त होऊन मी तुला उचलून घेत आहे. (अनुवाक १)

१ विद्वान् ऋत्विजांना पूज्यता प्राप्त करून देणारे जे ज्योतिष्टोमादि यज्ञ आहेत, त्यांपैकी ज्या यज्ञात अश्वाच्या आगमनाचे ज्यावेळी कारण उत्पन्न झाले त्यावेळी प्राचीन महर्षींनी त्या अश्वाला बांधण्याकरता ही दोरी उचलून घेतली. कारण यज्ञाच्या प्रारंभापासून तो समाप्त होईपर्यंत त्याच्या ठिकाणी ऋत्विज आणि यजमान यांची मन:प्रवृत्ती स्थिर करणाऱ्या त्या दोरीच्या उपयोगानेच पूर्वीचे देव सोमयागाच्या समाप्तीला प्राप्त झाले होते. २ हे अश्वा, द्युलोकामध्ये तुझा उत्कृष्ट असा पहिला जन्म 'रोहित' या नांवाने झाला असून त्रैलोक्याच्या मध्यस्थानी असलेल्या अंतरिक्षात 'नियुत्' या नांवाने तुझा दुसरा जन्म झाला आहे. सांप्रतच्या तुझ्या तिसऱ्या जन्मात ह्या पृथ्वीवर तुझे निवासस्थान असल्याचे प्रत्यक्ष दिसत आहे. अशा प्रकारे थोर महिमा असणाऱ्या हे वेगवान् अश्वा, अग्निचयनाकरिता लागणाऱ्या विटांच्यासाठी लागणारी माती खणावयास योग्य अशा वरिष्ठ भूमीभागाचे ठिकाणी तू अत्यंत त्वरेने आमच्या बरोबर ये. ३ याग करून फलरूपी धनाचा वर्षाव करण्याला कारणभूत झालेल्या हे यजमान व यजमानपत्नी हो, खणून काढलेली माती वाहून आणण्याच्या ह्या प्रसंगी तुम्ही दोघे पतिपत्नी अग्निचयनाच्या विटांना लागणारी माती वाहण्यास समर्थ व आमच्या हिताची इच्छा करणाऱ्या ह्या गाढवाच्या गळ्याला दोरी बांधा. ४ निरनिराळ्या वेळी अनुष्ठित करण्यात येणाऱ्या त्या त्या कर्मांमध्ये बलवत्तर व इंद्रियसामर्थ्य देणाऱ्या ह्या अश्वाला परस्परांचे मित्र असलेले आम्ही ऋत्विज व यजमान आमचे रक्षण होण्यासाठी व आम्हाला अवश्य ते ते अन्न प्राप्त व्हावे म्हणून बोलावीत आहो. ५ हे अश्वा, आमच्या विरोधी शत्रूंचा व त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या आमच्या अपकीर्तीचा नाश करीत, त्याचप्रमाणे क्रूर अशा रुद्रदेवाच्या पशुसमूहावरील

आधिपत्यातून मोकळा होऊन आम्हाला सुखी करण्याच्या भावनेने प्रेरित होऊन आणि गाईंच्या कळपात सुखस्वास्थ्य राहील अशाप्रकारे व्याघ्रादि हिंस्रक पशूंच्याकडून होणाऱ्या भयाचा परिहार करीत करीतच तू आकाशाप्रमाणे मोकळ्या व विस्तीर्ण अशा मार्गावर दृष्टी ठेऊन आमच्या बरोबर ये. ६ हे अश्वा, दुसऱ्याला साहाय्य करण्याऱ्या व दुसऱ्याचे पोषण करणाऱ्या पूषादेवासह पृथ्वीच्या ज्या ठिकाणी आम्हाला पाहिजे आहे तशा प्रकारचा मृत्कणरूपी अग्नी जेथे प्राप्त होईल त्या ठिकाणी दृष्टी ठेऊन तेथे पोचण्यासाठी पूर्वी अंगिरसांच्या बरोबर गेला होतास तसाच आमच्या बरोबर चल. ७ उत्कृष्ट व मऊ अशा मातीच्या रूपाने असणाऱ्या अग्नीजवळ पूर्वी अंगिरस ऋषी गेले तसेच आम्ही जात आहोत. ८ आम्हाला अपेक्षित असलेल्या मातीच्या रूपाने असणाऱ्या अग्नीला अंगिरसांच्या प्रमाणेच आम्ही संपादन करणार आहोत. ९ आम्हाला हव्या असलेल्या उत्कृष्ट मातीच्या रूपाने असणाऱ्या अग्नीला अंगिरसांच्या प्रमाणेच आम्ही संपादन करून आणीत आहो. १० ह्या अग्नीने अनेक उषःकालांचा शेवट अनुक्रमाने प्रकाशित केला आहे. उत्पन्न झालेल्या अखिल जगाचे ज्ञान असलेल्या व देवसमुदायात पहिला मान मिळवणाऱ्या ह्या अग्नीने अनेक दिवसांना प्रकाशित केले आहे. सूर्याच्या ठिकाणी असणाऱ्या असंख्य किरणांनाही ह्या अग्नीने क्रमवार प्रकाशित केले आहे. आणि द्युलोक व पृथ्वी ह्या दोन्ही लोकांनाही ह्या अग्नीने अनुक्रमाने व्यापले आहे. ११ हा अश्व, योग्य अशा मार्गाने माती खणावयास योग्य अशा या स्थळी येऊन पोचल्यानंतर वाटेने झालेल्या सर्व परिश्रमांचे निवारण करतो. आम्हाला पाहिजेत तसे बारीक व मृदु असे मृत्कण जेथे सापडणार आहेत अशा त्या विस्तीर्ण स्थळावर दृष्टी ठेवून हा अश्व आमच्यासाठी मृत्तिकारूपी अग्नीचे संपादन करण्याची इच्छा करतो. १२ हे शीघ्रगामी अश्वा, ह्या ठिकाणच्या जमिनीला तू आपल्या पायाचा स्पर्श करून चयनरूपी अग्नीला योग्य अशी मृत्तिका कोठे आहे, या विषयीचा तू आपल्या मनाच्या अभिरूचीप्रमाणे निश्चय कर. आणि त्या जागेच्या भूभागाला आपल्या पायाचा स्पर्श करून हे स्थळ अग्निचयनाला उपयोगी अशी माती खणावयास योग्य आहे, असे आम्हाला खुणेने सांग. म्हणजे ज्या स्थळापासून आम्हाला पाहिजे तशी माती मिळेल त्या ठिकाणी आम्ही कुदळीने खणू. १३ हे अश्वा, द्युलोक हा तुझा पृष्ठभाग असून ही पृथ्वी तुझे अग्नीसह राहावयाचे ठिकाण आहे. अंतरिक्षलोक हा

तुझ्या शरीरातील जीवात्मा असून समुद्र ही तुझी जन्मभूमी आहे. हे अश्वा, अशा प्रकारे स्तविलेला तू आपल्या दृष्टीने 'उखा' नांवाची शेगडी तयार करण्यास योग्य अशी मृत्तिका कोठे आहे हे पहा. आणि त्या मातीमध्ये आमच्याशी युध्द करू पाहणारे राक्षस छपून राहिले असतील त्यांच्यावर तू आपला पाय देऊन त्यांचा नायनाट कर. १४ हे वेगवान् अश्वा, धनप्रद असा तू यजमानाचे महभ्दाग्य वृध्दिंगत करण्यासाठी ह्या माती खणावयाच्या स्थलापासून दूर हो. ह्या पृथ्वीच्या पृष्ठभागातून अग्निचयनाच्या हेतूने माती खणून काढणारे आम्ही, त्या पृथिवीमातेच्या अनुग्रहबुध्दीवर विश्वसून राहिलो आहो. १५ यज्ञाच्या द्वारा यजमानाला धन आणि अन्न मिळवून देणारा, शीघ्रगामी व गमनकुशल असा हा अश्व माती खणावयाच्या भूभागापासून दूर झाला आहे. आपल्या पदाक्रमणाने आमच्या विरोधी राक्षसादिकांचा नाश करून ह्या अश्वाने या भूभागावरील माती खणावयाचे हे स्थल उत्तम रीतीने निर्भय केले आहे. दुःखरहित व सौख्यप्रद अशा उत्कृष्ट स्वर्गलोकीचे ठिकाणी जाऊ इच्छिणारे आम्ही त्या स्वर्गलोकावर आरोहण करण्याकरताच अश्वाने दाखविलेल्या ह्या उत्कृष्ट जागी खणू आणि त्या ठिकाणी असलेला मृत्तिकारूप व सुमुख असा अग्नी संपादन करू. १६ प्रजांना आरोग्य प्राप्त होण्यासाठी मधुर व देदीप्यमान असे उदक मी ह्या माती खणण्याच्या जागी ओतीत आहे. उदक ओतलेल्या ह्या स्थलापासून उत्कृष्ट फलांनी लकटून जाणारे पुष्कळ वृक्ष उत्पन्न होवोत. १७ त्रिभुवनांत असलेल्या सर्व ठिकाणी राहून त्यांच्यावर दृष्टी ठेवणारा, अत्यंत रुंद अशा पुष्कळ प्रदेशांना व्यापून राहणारा, वयाने प्रौढ, आणि भक्ष्यभोज्यादि रूपानें अनेकविध आणि स्वादिष्ट असे अन्न शीघ्रत्वाने संपादन करणारा अशा अग्निदेवाचे मनात ध्यान करून त्याला मी आहुतिरूपी आज्याने प्रदीप्त करतो. १८ सर्व मनुष्यांनी आश्रयणीय, यजमानाकडून वाखाणण्यात येण्याजोगा सुखरूप, स्पर्श करावयास अशक्य आणि घृत प्राशन करून पुष्ट झालेल्या शरीराच्या योगाने सदैव आनंदित असणारा असा हा अग्निदेव आहे. वर्णन केलेल्या गुणाने युक्त अशा हे अग्निदेवा, मंत्ररूपी वाणीने व घृताने मी तुला सर्व बाजूंनी सिंचित करतो. क्रौर्यरहित चित्ताने ह्या घृताचे तू सेवन कर. १९ अन्नाचा पालक व त्रिकालज्ञ अशा ह्या अग्निदेवाने आपल्याला हविर्द्रव्ये अर्पण करणाऱ्या यजमानाला पुष्कळ रत्ने संपादन करून देऊन हविर्द्रव्यांचा सर्वतोपरी स्वीकार केला आहे. २० हे बलशाली अग्निदेवा, अपेक्षित

फलांची अनेकवार पूर्तता करणाऱ्या, शत्रूंना धडकी भरविणारे भयंकर स्वरूप धारण करणाऱ्या, प्रत्येक दिवशी पातकी व विघातक अशा राक्षसादिकांचा नायनाट करणाऱ्या आणि ब्राह्मणज्ञातीचा अभिमानी अशा तुझा आम्ही सर्वतोपरी स्वीकार करीत आहो. २१ सर्व मनुष्यांचे पालन करणाऱ्या अग्निदेवा, स्वर्गप्राप्तीला कारणभूत होणाऱ्या यज्ञानुष्ठानांनी निनादित होणाऱ्या यज्ञशालांच्या ठिकाणी तू उत्पन्न होतोस. पावसाने भिजलेल्या भूमीला सत्वर शुष्क करून तू उत्पन्न होतोस. पर्जन्याच्या धारांच्यापासून विद्युद्रूपाने तू उत्पन्न होतोस. दगडावर दगड आपटला गेला असता तू उत्पन्न होतोस. घनदाट अशा अरण्यांच्या पासून वणव्याच्या रूपाने तू जन्मतोस. वैद्यांनी बनविलेल्या वनस्पतींच्या औषधांपासूनही तू जन्मास येतोस. आणि तू घरोघरी त्या त्या घराला पवित्र करण्याच्या हेतूने जन्माला येत असतोस. (अनुवाक २).

१ सविता देवाची प्रेरणा झाल्यानंतर अश्विनीकुमारांच्या बाहूंनी व पूषा देवाच्या दोन्ही हातांनी पृथिवीवर असलेल्या या ठिकाणी बारीक मातीच्या रूपाने असणाऱ्या तुज अग्नीला पूर्वी अंगिरसांनी खणला त्या प्रमाणेच मी खणीत आहे. २ हे अग्निदेवा, ज्वालायुक्त, सुंदरमुख, निरंतर विद्यमान असणाऱ्या किरणसमूहाने प्रकाशित, स्वभावाने शांत व कोणाचीही हिंसा न करणाऱ्या मृत्कणरूपी अग्निदेवाला पृथ्वीच्या पृष्ठभागावर असलेल्या या जागेतून खणून काढतो. ३ हे कमलपत्रा, तू जणू उदकाचा पृष्ठभागच आहेस. तू चांगले विस्तीर्ण आहेस व त्यामुळेच अग्निचयनाला पुष्कळ बारीक माती भरून आणावयास तू समर्थ आहेस. तू केव्हाही नाश न पावणारा व उदकाच्या संगतीत राहण्याने दिवसानुदिवस वाढत राहणारा आहेस. तू निर्लेप असा असल्याने युक्तीने पूजनीय असून पुष्टिकारक आहेस. यास्तव, तू परिमाणाने आकाशापेक्षाही अधिक विस्ताराने आसमंतात पसरून रहा. ४ हे कृष्णाजिना, आणि हे कमलपत्रा, तुम्ही दोघेही सुखकर आणि कवचाप्रमाणे संरक्षक होत असता स्वर्गलोकाचा लाभ होण्याला साधनभूत होणारे व माती बांधून घेण्याला अत्यंत अनुकूल असे आहात. निरंतर प्रकाशयुक्त अशा मृत्तिकाकणरूपी अग्नीला आपल्या उदरात धारण करणारे तुम्ही उभयता निरपेक्षपणाने स्वतःचेच जणु हृदय असे तुम्ही मानलेल्या ह्या मृत्तिकारूप अग्नीला उत्कृष्ट रीतीने स्वतःच्या ठिकाणी आच्छादित करा. ५ खणावयास योग्य अशा हे भूप्रदेशा, तू बारीक अशा पुष्कळ मृत्कणांनी परिपूर्ण आणि खणावयास अत्यंत योग्य आहेस. उत्कृष्ट

अशा 'उखा' नामक शेगडीचे संपूर्ण स्वरूप धारण करण्यास तू समर्थ आहेस. ६ हे अग्निदेवा, 'अथर्वा' नांवाच्या ऋषीनेच सर्वांच्या आधी तुला अरणीने मंथन करून पूर्णपणे निर्माण केला. ७ हे अग्निदेवा, 'अथर्वा' नामक ऋषीने मस्तकाप्रमाणे प्रशस्त, व सर्व जगाचा निर्वाह करणाऱ्या कमलपत्रावर दोन अरणी घेऊन तुझे नि:शेषपणे मंथन केले व तुला निर्माण केले. ८ हे अग्निदेवा, अर्थव्याचा पुत्र असलेल्या 'दध्यङ्.' नांवाच्या ऋषीने वैऱ्यांना नाश करणाऱ्या व रुद्ररूप धारण करून असुरांच्या जित नगरांचा विध्वंस करणाऱ्या तुज अग्नीला प्रज्वलित केला. ९ हे अग्निदेवा, 'पाथ्य' नांवाच्या एका श्रेष्ठ ऋषीने चोरांचा पुरा धुव्वा उडविणाऱ्या व प्रत्येक रणसंग्रामात शत्रूंच्या धनाची लूट करणाऱ्या तुला उत्तम प्रकारे प्रज्वलित केला. १० होमनिष्पादका अग्निदेवा, अभिज्ञ असा तू उत्तरवेदीरूपी स्वकीय स्थानाच्या ठिकाणी येऊन बैस. आणि पुण्य कर्माला योग्य अशा स्थानी तू या यज्ञाला स्थापन कर. सदैव देवांची इच्छा करणारा तू हविर्द्रव्याच्या योगाने देवांचे पूजन करीत असतोस. हे अग्निदेवा, यजमानाच्या ठिकाणी तू दीर्घायुष्य स्थापन कर. ११ देवांना यज्ञाचे ठिकाणी बोलाविणारा, स्वत:च्या स्थानाचे महत्त्व जाणणारा, देदीप्यमान, देवांना हविर्द्रव्य देणारा, अत्यंत कुशल, चिरकाल टिकणाऱ्या व्रतरूप कर्माच्या ठिकाणी तीव्र बुध्दीने निष्ठा ठेवणारा, उपासकांची वस्ती सुखाची करणारा, हजारो हविर्द्रव्यांचे पोषण करणारा आणि पवित्र अर्थात् हवनयोग्य अशी ज्वालारूपी जिव्हा असलेला असा हा अग्निदेव, योग्य अशा उत्तरवेदीरूपी स्थानावर उत्तम रीतीने येऊन बसला आहे. १२ हे अग्निदेवा, तू ह्या कमलपत्रावर चांगला नीटनेटका बैस. तू अनेक यज्ञांना कारणभूत होणारा असल्यामुळे मोठा आहेस. देवांच्याकडे नेहमी जाण्याची इच्छा करणारा असा तू चांगला प्रदीप्त हो. यज्ञयोग्य अशा हे अग्निदेवा, प्रशस्त असा, उग्रतेने रहित आणि सुखाने पाहता येण्यास शक्य असा शांत धूर तू आपल्या ठिकाणी उत्पन्न कर. १३ हे अग्निदेवा, जयशील, जे जे देव किंवा ऋत्विज आणि यजमान तुझे हित करीत असतील, त्यांचे [illegible] तशाच प्रकारे हित करणारा, फलपुष्पांनी बहरलेल्या वृक्षांनी [illegible] [illegible]ल्या वनांच्या ठिकाणी वणव्याच्या रूपाने कधीही न [illegible] असा तू [illegible]वसाच्या प्रारंभी असणाऱ्या कालामध्ये उत्पन्न होत [illegible] यज्ञामध्ये [illegible] बोलावून त्यांचे सदैव यजन करणारा आणि रत्नाप्रमाणे [illegible]

ज्वालारूपी सात जिव्हा आपल्या मुखातून [illegible] असा हा अग्निदेव यजमानांच्या घरोघर जाऊन बसला आहे. (अनुवाक [illegible])

१ हे पृथ्वीमाते, वर मुख करून उताणी [illegible]लेल्या [illegible] जणु हृदयाच असे हे माती खणून काढलेले स्थळ माझ्या [illegible] थोडेसे विदीर्ण झालेले आहे. तथापि, ते मी त्याच्या ठिकाणी भरीत असलेल्या तृणादिकाने आणि त्यात ओतीत असलेल्या उदकाने, सर्व प्राणांच्या [illegible]यत्तांचे निरनिराळे विभाग करणाऱ्या आपल्या अंतरिक्षरूपी मातेच्या मांडीवर आडवा पडून खेळत राहणारा आणि देवांच्या ठिकाणी प्राणभावाने व्यवहार करणारा तो वायुदेव पूर्ववत् भरून काढो. हे देवी भूमाते, तुला आणि त्या वायुदेवाला हे तृणासहित उदक अर्पण असो. २ हे अग्ने, स्वतःच्या प्रकाशासह उत्कृष्ट प्रकारे उत्पन्न झालेला तू आहेस. त्याअर्थी तुला जेथे स्वर्गासारखे सुख वाटेल अशा त्या कृष्णाजिननिर्मित सुंदर गृहात तू येऊन पोच. उत्कृष्ट कांती हेच ज्याचे धन आहे अशा हे अग्निदेवा, निरनिराळ्या रंगांनी चित्रित असलेले हे कृष्णाजिनरूपी वस्त्र तू नीट रीतीने परिधान कर. ३ उत्कृष्ट रीतीने यज्ञानुष्ठानाचा निर्वाह करणाऱ्या हे अग्निदेवा, उठून उभा रहा. आणि खेळकर वृत्तीच्या तुझ्या कृपेने तू आमचे पालन कर. हे अग्निदेवा, अत्यंत प्रौढ अशा तेजाने युक्त अशा सुंदर किरणांचे आवरण धारण करणारा होऊन तू उत्कृष्ट अशा कीर्तीच्यासह सर्व प्राण्यांनी तुला पहावा म्हणून या ठिकाणी ये. ४ हे अग्निदेवा, सूर्य जसा सदैव उभा राहून आमचे रक्षण करतो, तसा तूही आमच्या रक्षणाकरता सदैव उभा रहा. आमच्या रक्षणार्थ खडा उभा राहिलेला तू, आम्हाला अन्न मिळवून देणारा हो. तुझ्या महत्त्वाचे सर्वतोपरी अभिव्यंजक अशा मंत्रांनी तुझ्याकडे हविर्द्रव्ये नेणाऱ्या ऋत्विजांच्या सह ज्या अर्थी आम्ही तुला परोपरीने बोलावीत आहो, त्या अर्थी तू आपच्या करिता सदैव उभाच रहा. ५ पूजनीय, भक्षण करण्यात येणाऱ्या अन्नरूपी औषधींच्या ठिकाणी जठराग्निरूपाने असतांना विशेषत्वाने पोसलेला, चित्रविचित्र रंगाच्या ज्वालांमुळे चित्रासारखा रूपाचा, नुकताच जन्मल्याने लहान बालकासारखा दिसणारा, व अंधकाराचा परिहार करण्यासाठीच प्रकट झालेला तू, [illegible]च्या [illegible] गर्भरूपाने काही काळ राहून आताच जन्माला आला [illegible] लहान मूल जसे मातेजवळ [illegible] आपल्या घरात फिरते तसा तू हविर्द्रव्यांच्या [illegible] आपल्या

मातांच्या अर्थात् ओषधींच्याकडे जाण्यासाठी मोठमोठ्याने शब्द करीतच चल. ६ शरीराने सुदृढ असणाऱ्या व अग्निचयनाला लागणाऱ्या मातीचे ओझे वाहणाऱ्या हे गर्दभा, गमनकुशल असा तू काही वेळ हालचाल न करता स्थिरपणे उभा रहा व आम्ही तुझ्या पाठीवर मातीचे ओझे नीटनेटके लादल्यावर तू वेगाने चालू लागून आमच्या अन्नप्राप्तीला कारणभूत हो. त्याचप्रमाणे सुंदर पाठ असलेला तू तुझ्यावर लादलेल्या मृत्तिकारूपी अग्नीला पालखीत बसल्यासारखे सौख्य उत्पन्न करणारा हो. ७ अंगिरा ऋषींनी प्रथम संपादित केलेल्या व सुंदर अवयवांनी युक्त असणाऱ्या हे अग्निदेवा, मानवी प्रजांना सुख होईल अशा प्रकारे तू शांत हो. द्युलोक व पृथ्वी यांना अनुलक्षून तू संतप्त होऊ नकोस. अंतरिक्षावर संतापू नकोस, आणि वनस्पतींच्यावरही संतापू नकोस. ८ वेगवान असा हा अश्व आनंदाने खिंकाळत असा सर्वांच्या पुढे चालो. आणि त्याच्या मागोमाग हा गर्दभही हर्षयुक्त होऊन मोठ्याने शब्द करीत चालो. दाहक शक्ती असलेल्या मृत्तिकारूपी अग्नीला जरी तो वाहून नेत असला तरी देखील आयुर्मर्यादा पूर्ण होण्यापूर्वी अपमृत्यूने मरण न पावो. ९ सेचनसमर्थ अशा हे अश्वगर्दभहो, तुम्हा दोघांपैकी हा गर्दभ हर्षातिरेकाने अत्यंत मोठ्याने शब्द करीतच रथसदृश अशा ह्या मातीच्या ओझ्याचे ठिकाणी उत्तम प्रकारे नियुक्त झाला आहे. (जुंपला गेला आहे.) तुम्हा दोघांपैकी माती वाहून नेणारा हा गर्दभ, राजाने कामगिरीवर पाठविलेला दूत जसा त्वरेने चालत जात असतो त्याप्रमाणे, शीघ्रगामी होऊन ह्या ठिकाणापासून मृत्तिकारूपी अग्नी वाहून नेवो. १० वीर्यसेचनाविषयी समर्थ असलेला हा गर्दभ, मेघांच्या ठिकाणी असणाऱ्या उदकांचा विद्युद्रूपी गर्भ, समुद्राच्या अंतर्भागी वडवाग्निरूपाने उत्पन्न होणारा, आणि उपासकाने इच्छिलेल्या फलांचा वर्षाव करण्यास समर्थ, अशा मृत्तिकारूपी अग्नीला वाहून नेवो. हे अग्निदेवा, पृथ्वीच्या ठिकाणी भरपूर धान्य उत्पन्न करण्यासाठी आणि स्वर्गलोकाचे ठिकाणी यजमानाला यज्ञकर्माचे फल मिळवून देण्यासाठी तू आमच्या बरोबर ये. ११ हे ओषधींनो, चोहोकडून बंदिस्त केलेल्या ह्या स्थलाचे ठिकाणी तुमच्याकडेच मुख करून येत असलेल्या शांत अशा ह्या अग्नीला प्रेमाने आपल्या जवळ घ्या. हा अग्नी तुमच्या ठिकाणी राहून आम्हाला शत्रूप्रमाणे सतत पीडा देणाऱ्या सर्व रोगजन्य बाधांचा परिहार करून आमच्या ठिकाणची प्रमादयुक्त किंवा आलस्ययुक्त अशी दुर्बुध्दीही दूर करो. १२ हे ओषधीहो, प्रशस्त अशा पुष्पांनी व उत्कृष्ट

अशा फलांनी गजबजून गेलेल्या तुम्ही ह्या मृत्तिकारूपी अग्नीला पाहून आनंदित व्हा. कारण, हा अग्नी त्या त्या ऋतुकालांत तुमच्या ठिकाणी गर्भरूपाने उपस्थित होऊन पुरातन अशा गर्भयोग्य स्थानी येऊन पोचला आहे. (अनुवाक ४).

१ हे अग्निदेवा, विस्तृत अशा बलाने प्रज्वलित झालेला तू आमच्याशी शत्रुत्व करणाऱ्या राक्षसांचा आणि विशेषत: आम्हाला पीडा देणाऱ्या रोगाचा परिहार कर. उत्कृष्ट व पुष्कळ सुख देणाऱ्या व सुखाने बोलाविण्यास शक्य अशा तुज अग्निदेवाच्या सेवेत राहिल्याने जे सुख मिळत असते, त्या सुखाच्या ठिकाणी मी सर्वदा निमग्न होऊन राहीन. २ हे उदकांनो, स्नानपानादिकांच्या योगाने तुम्ही लोकांच्या ठिकाणी निश्चितपणे सुख उत्पन्न करणारी आहात. तुमच्या ठिकाणच्या रसाचा अनुभव आम्हाला मिळावा म्हणून तो आमच्या ठिकाणी स्थापन करा. त्याचप्रमाणे महान रमणीय अशा परमात्मतत्त्वाचे दर्शन आम्हाला व्हावे म्हणून तुमचा रस तुम्ही आमच्या ठिकाणी धारण करा. ३ आपल्या वत्सांवर प्रेम करणाऱ्या गोमाता आपल्या वत्सांना आपल्या स्तनांतील दुग्धरसाचे पान करवितात, त्याचप्रमाणे तुम्ही तुमच्या ठिकाणी असलेल्या सुखसंपादनाला कारणभूत व अत्यंत शांत अशा रसाचे आम्हाला पान करवा. ४ हे उदकांनो, ज्या रसाचा निवास तुमच्या ठिकाणी असल्यामुळे तुम्ही सर्वदा संतुष्ट असता त्या रसाचा तुमच्याकडून लाभ मिळावा यासाठीच आम्ही तुमच्या निकटवर्ती येऊन पोचलो आहो. आणि हे उदकांनो, तुम्ही आम्हाला पुत्रपौत्रादि प्रजेचे उत्पादक करा. ५ सर्वांचा आप्त असलेल्या 'मित्र' नामक देवाने विस्तृत अशा ह्या मृत्तिकारूपी भूमीला तिच्या ठिकाणी घातले जाणारे उदक आणि तिला घट्टपणा व तजेला उत्पन्न होण्याकरता तिच्यात घातला जाणारा खापराची भुकी, कळकाच्या जिवंत कोळशाची पूड, भाताचा कोंडा इत्यादि 'ज्योति' शब्दाने उपलक्षित होणारा मसाला, यांच्याशी अगदी एकजीव केली आहे. आणि तिच्या ठिकाणी जणू काय जगात उत्पन्न झालेल्या सर्व प्राण्यांना जाणणारा, सर्व मनुष्यांच्यावर उपकार करणारा व सर्व घरांमध्ये व्यापून राहणारा अशा अग्नीलाच निर्माण केला आहे. ६ हे मृत्तिकारूपी अग्निदेवा सर्व प्रजांना आरोग्य प्राप्त व्हावयासाठीच मी तुला खापराची भुकी इत्यादि मसाल्याच्या पदार्थांच्याशी कालवून अगदी एकजीव करीत आहे. सर्व पुरुषांच्यावर उपकार करणारे सर्वदेव 'अनुष्टुप्' छंदरूपी सहकाऱ्यांसह, पूर्वी

...नी ... तुला कालवून एकजीव ..., ... त्याच्या ...
... तुला एकजीव करोत. ७ '...' ... तयार ...
...त्मक देवांनी ही माती ... करून आम्ही ... ही हातांनी ...
... दिला घट्टपणा आणला. आणि त्यामुळेच तिच्या ठिकाणी ...
...ने युक्त असलेल्या अग्नीचाच भास होईल असा चमकदार... त्यांनी
... केला. या मातीची उखा नांवाची शेगडी तयार झाल्यावर ...मध्ये
... केला जाणारा अग्नी प्रकाशाने त्याचे उत्पादक असलेल्या रुद्र व
... रेषांमध्ये आपल्या प्रकाशाने युक्त होऊन ... शोभून राहिलेला
... ८ अत्यंत बुध्दिमंत अशा वसूंनी आणि रुद्रांनी मसाल्याच्या ...च्याशी
कालवून एकजीव केलेल्या व 'उखा' नांवाची शेगडी तयार करण्याला योग्य
... द्या मृत्तिकेला, सिनीवाली देवी आपल्या दोन्ही हातांनी चिवडून चांगली
मऊ करो. ९ अखंडनीय व अत्यंत विस्तीर्ण अशा हे भूदेवी, आपल्या
मस्तकावरील केसांचा सुबकसा बुचडा बांधणारी, ! बिंदी बिजवराप्रमाणे शोभणारे
व रंगदार रेशमाच्या धाग्यांनी कुशलतेने विणलेले सुंदर जाळे आपल्या मस्तकावर
घालणारी आणि ज्या अवयवांच्यावर भार देऊन ती निजते त्या सुंदर व
रेखीव अवयवांनी युक्त असणारी ती सिनीवाली देवी 'उखा' नांवाची शेगडी
तयार करून तुझ्या दोन्ही हातात देवो. १० ही अदितिदेवी, आपल्या कुशल
बुध्दीने, कारागिरी करण्यात सराईत झालेल्या दोन्ही हातांनी व अवश्य त्या
शरीरशक्तीने ही उखा नांवाची शेगडी तयार करो. आणि माता आपल्या
लहान मुलाला मांडीवर घेते त्याप्रमाणे ही अदितिदेवी उखेत निर्माण केल्या
जाणाऱ्या अग्नीला कर्म समाप्त होईपर्यंत आपल्या मांडीवर घेवो. ११ हे
मृत्पिंडा, तू जणू यज्ञाचे मस्तकच आहेस. १२ हे कृष्णाजिना आणि हे
कमलपत्रा, तुम्ही उभयता यज्ञाचे जणू दोन पायच आहात. १३ हे उखे, पूर्वी
अंगिरसांच्या यज्ञात जशी तू तयार करण्यात आली होतीस तशीच आताही,
... देव गायत्रीछंदासह तुला तयार करोत. तू जणू पृथ्वीरूप आहेस. १४
... अंगिरसांच्या यज्ञात जशी पूर्वी तुला तयार केली ... त्रिष्टुप्
... देव आताही तुला तयार करोत. तू अं... आहेस. १५
... ...छंदासह पूर्वी आदित्यात्मक देवांनी अंगि... तुला
तयार केली. तशीच आताही ... करोत.
तू जणू द्युलोकरूपच आहेस. १६ हे उखे, सर्व ... उपकार

करणाऱ्या सर्व देवांनी अनुष्टुप् छंदाच्या सहकार्याने अंगिरसांच्या यज्ञात पूर्वी तुला तयार केली होती, तशीच ते आताही करोत. हे उखे, तू जणू दशदिशांचेच प्रतीक आहेस. आणि सतत टिकणारी आहेस. यास्तव, तू माझ्या ठिकाणी व माझ्यासाठीही प्रजा, भरपूर धन, पशूंचे स्वामित्व, उत्कृष्ट सामर्थ्य आणि सजातीय बांधव यांचे संपादन कर. १७ उखेच्या गळ्याभोवती निर्माण केलेल्या हे रेषे, तू जणू काय अखंडनीय अशा भूमातेच्या कमरेची मेखला किंवा कमरपट्टाच आहेस. १८ हे उखे, पूर्वी अंगिरसांच्या यज्ञात 'पंक्ति' छंदरूपी सहकाऱ्यांसह अखंडनीय अशा भूदेवीने तुझ्या अंतर्भागी योग्य अशी पोकळी केली तशीच आताही करो. १९ त्या अदितिसंज्ञक भूदेवीने योग्य तितकी विस्तीर्ण अशी मातीची 'उखा' नामक शेगडी तयार केली, आणि नंतर 'ही उखा आता चांगल्या रीतीने तुम्ही भाजून काढा', असे ह्मणून ती उखा तिने आपले जणू आज्ञाधारक पुत्रच अशा उखा भाजण्याचे कार्य करणाऱ्या कुशल पुरुषांच्या हाती दिली. (अनुवाक ५).

१ हे उखे, 'गायत्र' छंदरूपी सहकाऱ्यासह आठ वसूंनी अंगिरसांच्या यज्ञामध्ये तुला धुपविली, म्हणजे तुला घोड्याच्या लेंड्यांची धुरी दिली, तशीच आताही देवोत. २ हे उखे, पूर्वी अंगिरसांच्या यज्ञात त्रैष्टुभ् छंदासह अकरा रुद्रांनी तुला घोडयाच्या लेंड्यांची धुरी दिली तशीच आताही देवोत. ३ हे उखे, अंगिरसांच्या यज्ञात तुला धुपविली, त्याप्रमाणेच आमच्या ह्या यज्ञातही 'जागत' ह्मणजे 'जगती' छंदरूपी सहकाऱ्यासह बारा आदित्य तुला अश्वाच्या लेंड्यांची धुरी देऊन धुपवोत. ४ हे उखे, 'अनुष्टुप्' छंदरूपी सहकाऱ्यासह अखिल विश्वावर उपकार करणाऱ्या सर्व देवांनी पूर्वी अंगिरसांच्या यज्ञात तुला जशी अश्वाच्या लेंड्यांची धुरी देऊन धुपविली तशीच आताही धुपवोत. ५ अंगिरसांच्या यज्ञातल्याप्रमाणे आताही इंद्र तुला धुपवो. ६ अंगिरसांच्या यज्ञात तुला धुरी दिली तशीच या यज्ञातही विष्णू तुला धुरी देवो. ७ अंगिरसांच्या यज्ञात वरुणाने जशी तुला अश्वाच्या लेंड्यांचा धूर देऊन धुपविली तशीच आताही धुपवो. ८ हे अवट, सर्व देवांना योग्य असे उपचार किंवा भोग्य पदार्थ जिच्या ठिकाणी निर्माण होत असतात, अशा ह्या अदितिदेवीने पृथ्वीच्या पृष्ठभागी अंगिरसांच्या यज्ञात तुला खणले तशाच रीतीने याही यज्ञात तुला खणतो. ९ हे उखे, सर्व देवांना त्यांचे त्यांचे भोगोपचार पुरविणाऱ्या त्या त्या सर्व देवांच्या पत्न्यांनी पूर्वी अंगिरसांच्या यज्ञात तुला पृथ्वीच्या

पृष्ठभागी खालल्या, आणि पेटवणाचे पदार्थ पसरून ठेवलेल्या भट्टीमध्ये ठेवली तशीच या वेळीही त्या देवपत्न्या तुला या भट्टीमध्ये नीट ठेवोत. १० हे उखे, अंगिरसांच्या यज्ञात पृथ्वीच्या पृष्ठभागी तयार केलेल्या भट्टीत तुला ठेवून व तुझ्यावर पेटवणाचे पदार्थ रचून विश्वातील सर्व देवांच्यावर उपकार करणाऱ्या विद्येच्या अभिमानिनी देवतांनी जशी तुला सर्व बाजूंनी चांगली प्रज्वलित केली, तशीच आताही प्रज्वलित करोत. ११ हे उखे, विश्वातील सर्व देवतांना त्यांचे भोगोपचार पुरविणाऱ्या त्यांच्या अभिमानिनी 'ग्ना' नांवाच्या देवतांनी पृथ्वीच्या पृष्ठभागी तयार केलेल्या भट्टीत ठेवून अंगिरसांच्या यज्ञात जशी तुला चांगली भाजून काढली, तशीच आताही भाजून काढोत. १२ हे उखे, विश्वातील सर्व देवांना त्यांचे भोगोपचार पुरवून त्यांच्यावर उपकार करणाऱ्या व 'होत्रक' संज्ञेने उल्लेखिलेल्या होता, प्रशास्ता इत्यादि सात ऋत्विजांच्या अभिमानिनी अशा 'वरूत्री' नांवाच्या देवतानी पूर्वी अंगिरसांच्या यज्ञात पृथ्वीच्या पृष्ठभागी तयार केलेल्या भट्टीत तुला भाजून चांगल्या रीतीने परिपक्व केली, तशीच आताही चांगली भाजून परिपक्व करोत. १३ हे उखे, विश्वातील सर्व देवांना त्यांचे भोग्य पदार्थ देऊन उपकृत करणाऱ्या व 'जनयः' अशा नांवाने प्रसिध्द असलेल्या देवपत्न्यांनी अंगिरसांच्या यज्ञात पृथ्वीच्या पृष्ठभागी तयार केलेल्या भट्टीत घालून तुला चांगली भाजली आणि परिपक्व केली, तशीच आता करोत. १४ सर्व प्राण्यांचे हित करणाऱ्या 'मित्र' देवा, भट्टीत भाजली जाणारी ही उखा तू चांगल्या प्रकारे परिपक्व कर. पेटलेल्या जाळाच्या आंचीने ही उखा तू फुटू देऊ नकोस. ही उखा फुटू नये म्हणून मी तिला तुझ्या राखणीस देत आहे. १५ ज्याच्या कीर्तीचा विस्तार अतिशय मोठा आहे, असा 'मित्र' नांवाचा देव द्युलोकाप्रमाणे महत्त्व असलेल्या व पृथ्वीप्रमाणे कीर्तीने विस्तारलेल्या या उखेच्या भोंवती तिच्या संरक्षणार्थ फिरत राहिला आहे. १६ सर्व मनुष्यांचे धारण व पोषण करणाऱ्या मित्रनामक देवाचे श्रवणीय असे यश फार मोठे आहे. फलदानशील व धनप्रद म्हणून ज्याची आश्चर्यजनक कीर्ती सर्व जगभर पसरली आहे, अशा त्या मित्र देवाचे सर्व यश हा उखेच्या संरक्षणानेच सर्वांच्या प्रत्ययास येईल. मित्रदेव उखेचे सर्वतोपरी रक्षण करून तिला परिपक्व करो. १७ हे उखे, उत्कृष्ट अशा दोन बाहूंनी व प्रशस्त अशा हातांनी, सुंदर अशा हातांच्या अंगुलींनी युक्त असलेला सविता नामक देव हा आपल्या शक्तीने ही भाजून तयार

झालेली 'उखा' भट्टीतून बाहेर काढो. १८ हे उखे, या भूमीचे ठिकाणी पसरलेल्या वाळूवर ठेवण्यात येत असलेली तू 'अभंग' अशी झालेली आहेस. तर तू आता दश दिशांना व्यापून रहा. भट्टीतून बाहेर येऊन तू आता येथे उभी रहा, आणि चांगली प्रौढ हो. ऊर्ध्व दिशेस मुख करून तू या ठिकाणी निश्चल अशी उभी रहा. १९ हे उखे, पूर्वी अंगिरसांच्या यज्ञात 'गायत्र' छंदासह आठ वसूंनी तुझ्या अंगावर शेळीचे दूध शिंपले, तसेच यावेळीही शिंपोत. २० हे उखे, अंगिरसांच्या यज्ञातल्या प्रमाणेच 'त्रैष्टुभ्' छंदासह अकरा रुद्र तुझ्यावर शेळीचे दूध शिंपडोत. २१ हे उखे, अंगिरसांच्या यज्ञात 'जगती' छंदासह बारा आदित्यांनी जसे तुझ्यावर शेळीच्या दुधाचे सिंचन केले, तसेच आताही करोत. २२ अनुष्टुप् छंदाच्या साहाय्याने विश्वामधल्या सर्व पुरुषांवर उपकार करणाऱ्या सर्व देवांनी अंगिरसांच्या यज्ञात जशी शेळीचे दूध शिंपून तुला भिजविली तशीच आताही भिजवोत. (अनुवाक ६).

१ हे अग्निदेवा, संवत्सर, ऋतू, महिने व पंध्रवडे, तसेच मंत्रद्रष्टे ऋषी आणि त्यांच्या मुखांतून निघालेली वेदवाक्यरूपी सत्त्यवचने ही सारी तुला संवर्धित करोत. संवत्सरादिकांच्या कडून संवर्धित केला जाणारा तू द्युलोकातही पूजनीय ठरणाऱ्या तेजाने उत्कृष्ट प्रज्वलित हो आणि तुझ्या दीप्तीच्या योगाने पृथ्वीच्या भोवती असणाऱ्या सर्व दिशा व विदिशा यांना सर्वतोपरी प्रकाशित कर. २ हे अग्ने, तू स्वत: उत्कृष्ट प्रदीप्त हो, आणि ह्या यजमानाला कर्मानुष्ठानाची जाणीव करून दे. यजमानाला अत्यंत उत्कृष्ट असे भाग्य प्राप्त होण्याकरिता तू ऊठ आणि त्या उद्योगास लाग. हे अग्निदेवा, तुझा उपासक आणि सेवक यांना केव्हाही उपद्रव होऊ देऊ नकोस. सर्वस्वी तुझेच असलेले ऋत्विज आणि यजमान यशस्वी होवोत. आणि तुझ्या सेवेला विमुख होणारे असतील ते केव्हाही यशस्वी न होवोत. ३ हे अग्निदेवा, यज्ञातील ऋत्विज झालेले हे ब्राह्मण व यजमान तुझे आराधन करीत असतात. हे अग्ने, आमच्या हातून नकळत घडणाऱ्या अपराधांवर पांघरूण घालण्याची वेळ येईल तेव्हा तू शांत राहून आमचे अपराध झाकून टाक. आणि आमच्या वैऱ्यांचा व आमच्या अपजयासाठी टपून राहणारांचा तू नाश करणारा होऊन यज्ञशालारूपी स्वगृहात नि:शंकपणाने जागरूक राहून आमच्या कल्याणाचे चिंतन कर. ४ हे अग्निदेवा, ह्या यज्ञशालारूपी गृहात राहूनच तू धनाचे अधिक संपादन कर. आमच्या पूर्वीच्र चयनाची मांडणी करून त्यावर अग्नीचे प्रज्वलन

करणारे जे यजमान आमचे निराकरण करण्यास प्रवृत्त होत असतील ते आमच्याकडून मांडल्या जाणाऱ्या ह्या चयनरूपी अग्नीचे निराकरण करण्यास प्रवृत्त न होवोत. हे अग्निदेवा, तुझे बल सुस्थित होवो. तुझी सेवा करणारा उपासक कोणाकडून आणि कधीही हिंसित न होता वृध्दिंगत होवो. ५ हे अग्निदेवा, तू आपल्या बलाने आमचे आयुष्य कल्याणमय होईल अशाप्रकारे त्याचे संरक्षण करण्याविषयी सदैव जागरूक रहा. हे अग्निदेवा, आमच्या मित्रांची आमच्या ठिकाणी असलेली मैत्री अधिक दृढ होईल असा तू अनुग्रह युक्त चित्ताने प्रयत्न कर. स्वत:च्या बरोबर प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झालेल्या ब्राह्मणांच्या समुदायात तू मधोमध बसून रहा. हे अग्निदेवा, ह्या भूमीचे ठिकाणी अनेक राजांच्या विविध यज्ञांचा प्रवर्तक होऊन तू अत्यंत प्रदीप्त हो. ६ हे अग्निदेवा कुत्र्यासारख्या निकृष्ट पश्वादिकांचा जन्म प्राप्त करून देणारी जी पातके आमच्या हातून घडतील त्यांचा तू नाश कर. त्याचप्रमाणे आमचे शरीर शुष्क होण्याला कारणभूत अशा रोगांचाही तू नि:शेष परिहार कर. कर्मानुष्ठानाविषयी आमच्या ठिकाणी असणारे अज्ञान आणि आमच्या कर्मानुष्ठानाला विघ्न करणारा आमचा शत्रू यांचाही तू नाश कर. इतकेच नव्हे तर अनिष्टकारक अशा आमच्या सर्व पातकांना नष्ट करून तू आम्हाला शूर अशा पुत्रांच्यासह धन प्राप्त करून दे. ७ हे अग्निदेवा, आजपर्यंत व यापुढे कोणाकडूनही दबला न जाणारा, सर्व जगाचा अभिज्ञ, यापूर्वी किंवा यापुढे कोणाकडूनही पीडित न होणारा, अनेक रूपांनी शोभणारा आणि बलाचे धारण करणारा तू या यज्ञकर्मामध्ये प्रदीप्त हो. विशिष्ट असे आचरण करण्याकडे प्रवृत्ती करणाऱ्या आमच्या सर्व मनीषा आणि मनुष्यांच्या ठिकाणी संभवनीय अशा रोगादिविषयक भीती यांचे समूळ उच्चाटन करून शांत व अनुग्रहकारक दृष्टींनी युक्त होऊन आमच्या ह्या यज्ञकर्मात तू आमची अभिवृध्दी होईल अशा रीतीने आमचे सर्वतोपरी रक्षण कर. ८ हे अग्निदेवा, देवगुरू बृहस्पती व सर्वांना प्रेरणा करणारा सविता देव यांच्या इतकाच तू पूज्य आहेस. यास्तव, ह्या यजमानाला स्वकीय कर्माविषयी बुध्दिमंत कर. ह्या यजमानाच्या ठिकाणी पूर्वीच असलेली निरनिराळ्या प्रसंगरूपी कसोटीवर घासली गेल्यामुळे तीक्ष्ण झालेली बुध्दी आणखीही चांगल्या रीतीने तीक्ष्ण होईल अशा प्रकारे त्याला सुशिक्षित कर. महनीय अशा उत्कृष्ट भाग्याने ह्या यजमानाला वृध्दिंगत कर. सर्वदेव ह्या यजमानाला पाहून 'हा फार चांगला आहे' अशा अभिप्रायाने

हर्षित होवोत. ९ बृहस्पतितुल्य अशा हे अग्निदेवा, स्वर्गलोकाचे ठिकाणी आमचे चिरकाल वास्तव्य व्हावे म्हणून यमाच्याकडून आमच्यावर आरोपित केल्या जाणाऱ्या हिंसाविषयक पातकापासून तू आम्हाला आता मुक्त केले आहेस. आणि त्यामुळेच स्वर्गलोकप्राप्तीविषयी आम्हाला चिंता राहिलेली नाही. हे अग्निदेवा, देवांचे वैद्य असलेले उभयता अश्विनीकुमार आपल्या ठिकाणच्या शक्तींनी इहलोकी असलेल्या आमच्या यजामानाच्यावर धाड घालणाऱ्या अपमृत्यूला दूर करोत. १० अंधकाराचा नाश करणाऱ्या व उत्कृष्ट अशा अग्नीच्या प्रकाशाला सर्व बाजूंनी मोठ्या उत्कर्षाने पाहत असलेले आम्ही आता देवांच्या समुदायात सूर्यरूपाने तळपत राहणाऱ्या श्रेष्ठ अशा अग्निदेवाच्या परमोत्कृष्ट प्रकाशाच्या सन्निध येऊन पोचलो आहो. (अनुवाक ७).

१ सुंदरमुख व आपल्या उपासकाला पुत्राप्रमाणे मानून त्याचे हित करणाऱ्या अग्निदेवाच्याच विशिष्ट स्वरूपांनी असलेल्या 'समित्' नामक देवता आमच्या कल्याणासाठी उद्युक्त होवोत. आणि त्या उद्युक्त झाल्याची खूणच की काय, अशी अग्नीच्या ज्वालांची शुभ्रवर्ण, आणि अत्यंत देदीप्यमान स्वरूपे उन्नतावस्थेला प्राप्त होवोत. २ भक्तांचा प्राणदाता, अखिल विश्वाला जाणणारा, मनुष्यांनी पूजन करावयास योग्य, भक्तांचा शरीररक्षक आणि देवांमध्ये श्रेष्ठ असा 'तनूनपात्' नामक अग्निदेव स्वर्गसाधनाला मार्गभूत होणाऱ्या हविर्द्रव्यांना मधुर अशा घृताने भिजवून टाको. ३ हे अग्निदेवा, यज्ञानुष्ठानात उत्पन्न होणाऱ्या वैगुण्याचा परिहार करणारा, प्रकाशात्मक, यज्ञकर्माविषयी आम्हाला प्रेरणा करणारा, आणि सर्व पातकांचे निवारण करणारा तू मनुष्यांनी प्रशंसनीय अशा 'नराशंस' हे नांव धारण करून आम्ही अर्पिलेल्या मधुर घृताने तृप्त होतोस आणि आमचा यज्ञ पूर्णतेला नेतोस. ४ स्तुतिप्रिय अशा 'ईडान' नांवाचा अग्नी बलाने युक्त होऊन यज्ञाला येण्यासाठी निघतो. निरनिराळे यज्ञ आरंभिले गेले म्हणजे स्रुचांमध्ये भरून घेतलेल्या आज्याने आणि नमस्काराने आम्ही त्या अग्नीचे पूजन करितो. ५ 'बर्हि' नांवाचा एक अग्नी ह्या नेहमीच्या अग्नींच्या माहात्म्याला आदरपूर्वक मान देवो. 'बर्हि' नांवाच्या त्या अग्नीने ऋत्विजांच्या मुखांतून निघणाऱ्या हर्षजनक ऋचा श्रवण करण्याचा परिश्रम अनेकदा केला आहे. शिवाय हा 'बर्हि' संज्ञक अग्नी सर्व प्राण्यांची राहणी सुखाची करणारा, अत्यंत अभिज्ञ आणि यजमानासाठी पुष्कळ धन संपादन करणारा आहे. ६ अग्नीच्याच विशिष्ट रूपत्वाने अवतीर्ण झालेल्या प्रशस्त

गतीने युक्त व तेजस्वितेला प्राप्त झालेल्या 'द्वार' नामक देवता प्रथम अग्निसंबंधी व्रताचे आचरण करतात, आणि नंतर सर्व यजमान ह्या अग्नीशी संबंधित अशी व्रते करीत असतात. म्हणजे अग्नीला अनेकवार हवी प्रदान करतात. ७ उष:कालाच्या रूपाने व्यक्त होणारी 'उषासा' नांवाची व रात्रीच्या रूपाने व्यक्त होणारी 'नक्ता' नांवाची, अशा ह्या अग्नीच्या ज्या दोन मूर्ती आहेत, त्या या ठिकाणी आम्ही करीत असलेला यज्ञ हिंसारहित होईल अशाप्रकारे त्याचे रक्षण करोत. एकमेकींच्या खांद्याला खांदा लावून प्रेमाने बसलेल्या अग्नीच्या ह्या दोन मूर्ती पाहिल्या म्हणजे स्वर्गीय देवतांचीच ही जोडी अवतरली असल्याचा भास होतो. ८ देवांच्या यज्ञातील हे होते हो, अग्नीच्या ज्वालेला अनुलक्षून आम्ही चालू केलेल्या अत्यंत उच्च अशा आमच्या ह्या यज्ञाला तुम्ही दोघेही स्वमुखाने सर्वत्र प्रख्यात करा, आणि आमच्यावर कृपा करून आम्ही करीत असलेल्या इष्टीतील वैगुण्य दूर करून ती सुशोभित होईल असे करा. ९ अग्नीच्या इडा, सरस्वती व भारती या नांवाच्या तीन मूर्ती किंवा देवता असून यांपैकी प्रत्येक देवता यज्ञाचे महत्त्व विस्तृतपणे प्रख्यात करणारी आहे. या तिन्ही देवता आमच्या यज्ञासाठी ह्या पसरलेल्या बर्हीच्या (दर्भांच्या) वर येऊन बसोत. १० 'त्वष्टा' नांवाचा अग्नी आम्हाला सत्वर प्राप्त होणारे, गाई, अश्व इत्यादिकांच्या बहुत्वामुळे आश्चर्यजनक, पुष्कळ मनुष्यांच्या कडून प्रशंसिले जाणारे, पराक्रमी पुत्रांनी युक्त, भरपूर धनाने पुष्ट आणि रथाच्या चाकाला त्याचा तुंबा जसा आधारभूत असतो त्याप्रमाणे सर्व बांधवांना आश्रयभूत होणारे ऐश्वर्य आमच्या ठिकाणी पूर्णतेने उत्पन्न करो. ११ 'वनस्पती' नांवाच्या हे अग्निदेवा, तू दानशील होऊन आम्ही ज्या देवांचे यजन करणार आहो त्या देवांना आम्ही अर्पिलेले हविर्द्रव्य त्या देवांच्या ठिकाणी तू स्वत: नेऊन पोचते कर. आम्ही प्रार्थना केलेला हा 'वनस्पति' संज्ञक अग्निदेव आमच्या पातकांचे शमन करणारा होऊन आम्ही अर्पण केलेले हविर्द्रव्य देवांच्या ठिकाणी समर्पित करो. १२ स्वाहाकाराचा अभिमानी व जन्मजात ज्ञानी अशा हे अग्निदेवा, इंद्रासाठी आम्ही तुझ्या स्वाधीन केलेले हविर्द्रव्ये तू इंद्राला उत्तम प्रकारे समर्पण कर. सर्वही देव आम्ही त्यांना देऊ त्या त्या वेळी हविर्द्रव्यांचे सेवन करोत. १३ ब्रह्मांडरूपी हिरण्याचे ठिकाणी गर्भरूपाने राहणारा प्रजापतीच प्राणिमात्र उत्पन्न होण्यापूर्वी शरीर धारण करून उत्पन्न झाला आणि तोच पुढे उत्पन्न होणाऱ्या जगाचा एकमात्र अधिपती झाला.

त्यानेच अत्यंत विस्तीर्ण अशा द्युलोकाचे धारण केले असून ह्या भूमीलाही त्यानेच धारण केले आहे. अशा प्रकारच्या आदिपुरुष अशा प्रजापतिदेवाला हविर्द्रव्याच्या अर्पणाने संतुष्ट करून आम्ही त्याची सेवा करीत आहो. १४ जो प्रजापती देव स्वतःच्या महिम्याने श्वासोच्छ्वास करणाऱ्या आणि डोळ्यांची उघडझांप करणाऱ्या सर्व जगाचा एकमात्र असा राजा झाला आणि म्हणूनच जो द्विपाद अशी मनुष्ये व चतुष्पाद असे गाई, घोडे इत्यादि पशू यांचे नियमन करण्यास समर्थ झाला आहे त्या देवाला सोडून आम्ही कोणत्या बरे देवाला हविर्द्रव्याने संतुष्ट करावे? १५ जो प्रजापती शरीराच्या ठिकाणी जीवरूपाने स्वतःचा अंश निर्माण करून त्याला सर्व जीवनक्रम चालविण्याचे सामर्थ्य देतो आणि ज्या प्रजापती देवाच्या आज्ञेचे तत्परतेने पालन करण्यासाठी सर्व मनुष्ये त्याच्या जवळ उभी असतात, इतकेच काय, पण ज्याची आज्ञा देव देखील शिरसा वंद्य मानून त्याची उपासना करतात, व प्राणिमात्राचे मोक्षरूपी अमरत्व आणि मरण ही छायेप्रमाणे ज्याच्या स्वाधीन आहेत त्या प्रजापतिदेवाला आम्ही हवी अर्पण करून संतुष्ट करीत आहो. १६ हिमालयप्रभृति मोठमोठाले सर्व पर्वत ज्याच्या महत्त्वामुळे टिकून राहिले आहेत आणि रसवती अशा या भूमीसह असणारा समुद्रही ज्याच्या स्वाधीन आहे, असे विद्वान लोक म्हणत असतात; त्याचप्रमाणे, प्रशस्त अशा पूर्व इत्यादि सर्व दिशा ज्याच्या स्वाधीन असून धर्म व अधर्म हे ज्याचे दोन हातच आहेत असेही म्हणत असतात त्या प्रजापती देवाला आम्ही हविर्द्रव्य समर्पण करीत आहो. १७ ज्या प्रजापतीच्या रुदनापासून उत्पन्न झालेली ही द्युलोक आणि पृथिवी, देव आणि मनुष्ये यांच्या सुस्थितीसाठी निश्चलतेने उभी राहून प्रकाशित झाली आहेत व स्वतःच्या रक्षणाच्या आशेने ज्याच्याकडे एकाग्र मनाने पाहत राहिलेली आहेत, त्याचप्रमाणे ज्याच्या अधिष्ठानाच्या आधाराने सूर्य उदयाचलावर नियमित वेळी जात असतो, त्या प्रजापतिदेवाला आम्ही हविर्द्रव्य समर्पण करून त्याची सेवा करीत आहो. १८ ज्या प्रजापतिदेवाने पुण्यरहित अशा प्राण्यांना दुष्प्राप्य अशा द्युलोक आणि पृथ्वी ह्या दोघांना आपआपल्या जागी स्थिर केली आहेत, ज्याने पुण्यवंत प्राण्यांच्यासाठी स्वर्गलोक सुस्थित ठेवला आहे, आणि ब्रह्मज्ञानी पुरुषांच्या ठिकाणी दुःखरहित असा मोक्ष ज्याने स्तंभित केला आहे, त्याचप्रमाणे अंतरिक्षाचे ठिकाणी रजोगुणात्मक असे यक्षगंधर्वादि निर्माण केले आहेत त्या प्रजापतिदेवाचे आम्ही हविर्द्रव्याने पूजन करीत आहो.

१९ अग्निचयन करण्याविषयी प्रवृत्त होणाऱ्या कुशल यजमानाला उत्पन्न करणारी व प्रज्वलित करण्यास योग्य अशा अग्नीला उत्पन्न करणारी महनीय अशी उदके ज्या प्रजापतिदेवाच्या अनुग्रहाने विश्वाकार झाली आहेत व ज्या प्रजापती देवापासूनच सर्वांच्या जीवनाला कारणभूत असा एक प्राण निर्माण झाला आहे त्या प्रजापतिदेवाला हविर्द्रव्य समर्पण करून आम्ही त्याची सेवा करीत आहो. २० एकमात्र अशा ज्या प्रजापतिदेवाने अग्निचयनाचे अनुष्ठान करण्यात कुशल अशा यजमानाला जन्म देणारी व प्रज्वलित करण्यास योग्य अशा अग्नीचे उत्पादन करणारी उदके निर्माण करून त्यांच्या ठिकाणी विश्वाकाराने परिणत होण्याचे सामर्थ्य उत्पन्न होण्यासाठी त्यांच्याकडे कृपादृष्टीने पाहिले, आणि जो प्रजापती देव स्वतःच्या महिम्याने सर्व देवांमध्ये अधिक श्रेष्ठ झाला आहे, त्या प्रजापतिदेवाला हविर्द्रव्याने संतुष्ट करून आम्ही त्याची सेवा करीत आहो. (अनुवाक ८).

१ यज्ञानुष्ठानाविषयी संकल्प करण्याची मला प्रेरणा करणाऱ्या अग्निदेवाला ही आहुती समर्पण असो. २ पुढे करावयाच्या अनुष्ठानाचे स्मरण करून देणारे माझे मन व स्मरणाचे धारणसामर्थ्यरूपी माझी मेधा यांना प्रेरणा करणाऱ्या अग्निदेवाला ही आहुती समर्पण असो. ३ माहीत नसलेल्या अनुष्ठानाचे ज्ञान करून देणारे माझे चित्त आणि त्या ज्ञानाने मजकडून घडणारे अनुष्ठान यांना प्रेरणा करणाऱ्या अग्निदेवाला ही आहुती समर्पण असो. ४ मजकडून उच्चारल्या जाणाऱ्या मंत्ररूप वाणीचे धारण करणाऱ्या शक्तीला प्रेरणा करणाऱ्या अग्निदेवाला ही आहुती समर्पण असो. ५ सर्व मनुष्यांचा जनक असलेल्या प्रजापतीला ही आहुती समर्पण असो. ६ विश्वामधील सर्व मनुष्यांच्यावर अनुग्रह करणाऱ्या अग्निदेवाला ही आहुती समर्पण असो. ७ विश्वात्मक, म्हणजे सर्व जगाचा निर्वाह करणाऱ्या देवाच्या अनुग्रहाची यज्ञकर्ता यजमान होणारा मनुष्य सदैव याचना करीत असतो. यास्तव 'अखिल विश्वरूपी धनाचा तू नियंता आहेस' अशी त्या देवाची स्तुती करून यज्ञाचे पोषण करण्यासाठी त्या देवाजवळ धनाची याचना करावी. विश्वात्मक अशा देवाला ही आहुती समर्पण असो. ८ हे उखे, तू केव्हाही भेगाळू नकोस, व केव्हाही फुटू नकोस. तू चांगली घट्ट हो. तू आपले सर्व अवयव दृढ करून रहा. सहनशील व मातेसमान पूज्य असणाऱ्या हे उखे, तू वीराप्रमाणे वर्तन कर. तू आणि तुझ्या ठिकाणी स्थापित केला जाणारा अग्नी, दोघे मिळून आमचे यज्ञकर्म

सुरळितपणे चालवा. ९ हे पृथ्वीरूप उखे, मंत्राने निर्माण केलेल्या हे देवि, यजमानाच्या यज्ञकर्मासाठी तू दृढ हो. अन्नप्राप्तीला कारणभूत होणाऱ्या यागाची सिध्दी होण्यासाठीच शंबरादि असुरांच्या मायेप्रमाणे चमत्कारिक स्वरूप धारण करून तू निष्पन्न झाली आहेस. तुझ्या मुखापासून निष्पन्न होणारे हविर्द्रव्य देवांना प्रिय होवो. कोणाकडूनही पीडित न होता तू या यज्ञात अभ्युदयाला प्राप्त हो. १० हे मित्रदेवा, ही उखा चांगली तापीव. हिला फुटू देऊ नको. भंग न होता ही टिकून रहावी म्हणून हिला मी सर्वस्वी तुझ्या हाती देत आहे. ११ ह्या उखेमध्ये उत्पन्न होणारा अग्नी वृक्षरूपी अन्नाचे सेवन करणारा, आज्यरूपी आहार अध्यवर्यूकडून प्रक्षिप्त केला जाणारा, देवांना यज्ञामध्ये बोलावून आणणारा, पुरातन होता, पूजनीय, बलाचा पुत्र आणि अद्भुत असे रूप धारण करणारा असतो. १२ देवांची यज्ञरूपी सेवा जिच्यामध्ये केली जाते अशा परमोत्कृष्ट इष्टीचे जणू अधिष्ठानच असा तू येथे ये. आणि आम्हांवर येणाऱ्या लहानसान संकटांतूनही पार पाड. त्याचप्रमाणे ज्या बंधूंच्या सहवासात आम्ही राहतो, त्यांचे उत्तम प्रकारे रक्षण कर. १३ हे अग्निदेवा, तांबड्या रंगाच्या अश्वावर आरूढ होऊन अत्यंत दूर देशातून तू ह्या यज्ञामध्ये ये. उखेच्या निर्मितीला कारणभूत होणाऱ्या मृत्कणांना पूज्यता देणारा व यजमानांना अत्यंत प्रिय होणारा तू शत्रूंना तुडवीतच येथे येऊन पोच. १४ सर्व प्रकारच्या ज्ञानांचे संपादन करण्याचा उपाय जाणणाऱ्या हे अग्निदेवा, तू ह्या उरवारूपी मातेच्या मांडीवर येऊन बैस. तू आपल्या प्रखर दीप्तीने उखेला प्रदीप्त करू नको. त्याचप्रमाणे तू आपल्या ठिकाणच्या प्रखर उष्णतेनेही ह्या उखेला धगधगीत करू नकोस. निर्मल अशा प्रकाशाने शोभिवंत होऊन या उखेच्या मध्यस्थानी तू बसला रहा. १५ हे अग्ने, ह्या उखेच्या अंतर्भागी असणाऱ्या स्वकीय अशा स्थानी तू येऊन प्रदीप्त हो. अखिल जगाचे ज्ञान असणाऱ्या हे अग्निदेवा, आपल्या सारख्याच तेजाने प्रदीप्त करून या उखेला सुखप्रद हो. १६ हे अग्निदेवा, माझ्यासाठी तू शांत होऊन सर्वांच्यासाठीही शांत झालेला तू आपल्या भोवतालच्या सर्व दिशांना शांत करून स्वतःच्या सत्तेचे स्थान असलेल्या आपल्या उखारूपी मातेच्या मांडीवर येऊन बैस. (अनुवाक ९).

१ हे अग्निदेवा, तुला प्रज्वलित करण्याला योग्य अशी जी काही लहान लहान शुष्क काष्ठे मला अरण्यात सापडली, ती मी तुझ्यावर घालून

तुला प्रज्वलित करीत आहे. हे अत्यंत तरुण अशा अग्निदेवा, शुष्क काष्ठांच्या रूपाने जे खाद्य मी तुला अर्पण केले आहे, ते मला घृताप्रमाणे प्रिय होवो. २ हे अग्निदेवा, अरण्यातून आणलेली जी काष्ठे मी तुझ्यावर घातली, त्यामध्ये एखाद्या काष्ठाला वणव्याच्या लहानमोठ्या ज्वालांची झळ लागलेली असेल अथवा एखादे काष्ठ वाळवीने थोडेसे खाल्ले असेल. तथापि मी जे काही काष्ठरूपी खाद्य अर्पिले आहे ते सर्व तुला घृताप्रमाणे प्रिय होवो. ३ धनाचा भरपूर साठा आणि कुटुंबपोषणास पुरेसे होईल असे अन्न यांच्या विपुलतेने अत्यंत आनंदात असलेले आणि एक दिवस देखील खंड न पडू देता प्रत्येक रात्री तुझ्या सन्निध राहून आपल्या जागेत ठाणबंद करून ठेवलेल्या प्रौढ अश्वाला एकही दिवस न चुकविता घास दाणा खावयास देतात त्याप्रमाणे समिधांच्या रूपाने तुला घास देणारे आम्ही आमच्या शत्रूच्याकडून कधीही उपद्रवाला प्राप्त होणार नाही. ४ भरपूर अन्न व द्रव्य मिळावयासाठी समिधेच्या रूपाने मिळणाऱ्या अन्नाने हर्षित होणारा, मोठमोठ्या 'शस्त्रांनी' म्हणजे स्तवनीय अशा मंत्रसमूहांनी स्तविला जाणारा, यागाला कारणभूत होणारा, राक्षसांना जिंकणारा; रणमैदानावर सर्वांच्या पुढे चाल करून जाणारा आणि पृथ्वीचे जणू नाभिस्थानच अशा उखेच्या ठिकाणी उत्तम प्रकारे प्रदीप्त होणाऱ्या प्रौढ अशा अग्निदेवाला आम्ही बोलावीत आहो. ५ हे अग्निदेवा, उत्कृष्ट शूर व लढाऊ सैनिकांच्या अनेक तुकड्या ज्यात समाविष्ट झाल्या आहेत अशा ज्या शत्रुसेना आमच्या समोरून आमच्यावर चाल करून आम्हाला सर्वप्रकारे त्रास देत असतात आणि आमच्यावर गुप्तपणे किंवा उघडपणाने छापे घालणारे जे चोर असतील त्या सर्वांना मी तुझ्या विक्राळ मुखात ढकलून देतो. ६ हे भगवंता अग्निदेवा, आडरानातून असलेल्या मार्गाने जाणाऱ्या प्रवाशांवर धाड घालून त्यांच्याजवळची चीजवस्तू हिरावून पळून जाणारे, आणि गावांतील भररस्त्यावरून चालणाऱ्या माणसांवर धाडसाने हल्ला करून त्यांच्या जवळचे धन हिरावून पसार होणारे जे अतिघातकी चोर असतील त्यांना तू आपल्या मुखातील तीक्ष्ण दाढांखाली घालून त्यांचा चुराडा कर. उघडपणे चोऱ्या करणाऱ्या या दोन प्रकारच्या चोरांना तू आपल्या बाहेर दिसणाऱ्या दातांनी आणि गुप्तपणे चोऱ्या करणाऱ्यांना न दिसणाऱ्या आतल्या दातांनी चिरडून टाक. एवं च, ह्या तिन्ही प्रकारच्या चोरांना ते पुन्हा जिवंत होणार नाहीत अशा प्रकारे तू खाऊन टाक. ७ हे अग्निदेवा, गांवातून हिंडणाऱ्या

व आडरानातून प्रवास करणाऱ्या लोकांच्यावर धाड घालून त्यांची लूट करणारे पूर्वोक्त मलिम्लु, स्तेन व तिसरे तस्कर ह्या तीन प्रकारचे जे चोर असतील आणि गांवातल्या लहान लहान कक्षात म्हणजे गल्लीत राहून जाणाऱ्या येणाऱ्यांना जे पीडा देऊ इच्छित असतील त्या सर्वांना मी तुझ्या तीक्ष्ण दाढांच्या जबड्यात फेकून देतो. ८ हे अग्निदेवा, आमच्याकडून उसनवार घेतलेले द्रव्य जो परत करीत नाही, जो आमच्या कार्यात बिब्बा घालून ते बिघडवितो, जो आमच्यावर वेळी अवेळी तोंडसुख घेऊन आमची निंदा करतो आणि जो आमच्यावर हात टाकून आम्हाला चोपण्यासाठी टपलेला असतो अशा चार प्रकारच्या आमच्यां सर्व शत्रूंना तू आपल्या दातांनी चावून चावून त्यांचे चूर्ण कर. ९ माझे ब्राह्मण्य मी यथाशास्त्र वर्तनाच्या कसोटीवर घासून तीक्ष्ण केले असून मी आपल्या इंद्रियांची शक्ती व शरीरातील बल ही दोन्हीही स्वकार्यक्षम केली आहेत. ज्या राजाचा मी पुरोहित आहे त्या माझ्या राजाचे बल मी सर्वदा जयशाली होईल अशा प्रकारे तीक्ष्ण केले आहे. १० माझे स्वकीय असे जे ब्राह्मण व क्षत्रिय आहेत त्यांपैकी प्रत्येकाचे बाहू मी उत्कर्षाने उंच राखले आहेत. त्या सर्वांच्या शरीराची कांती आणि शारीरिक बल मी वाढविले आहे. माझ्या शत्रूंना मी आपल्या मंत्रसामर्थ्याने क्षीण करीन आणि माझ्या स्वकीय पुरुषांना मी उत्कर्षाला पोचवीन. ११ कोणाकडूनही तिरस्कृत न होणारे माझे जीवन ऐश्वर्याने प्रकाशित रहावे अशी इच्छा धरूनच जणु काय दर्शनीय व चतुष्कोणी पदकासारखा तयार केलेला हा 'रुक्म' नांवाचा सुवर्णालंकार अत्यंत दीप्तीने माझ्या कंठात चकाकून राहिला आहे. व त्याचप्रमाणे दर्शनीय व दीप्तीने चमकणारा हा अग्नी हविर्द्रव्यरूपी अन्नांनी अमर झाला आहे. कारण, द्युलोकवासी देवसमुदायानेच उत्कृष्ट वीर्यशाली होऊन त्याला उत्पन्न केला आहे. १२ त्रिकालज्ञ व श्रेष्ठ असा सवितादेव जगात दिसून येणाऱ्या सर्व स्वरूपांना आपल्या [illegible] प्रकाशित करीत असतो. त्यानेच मनुष्यांच्या व पशूंच्या ठिकाणी आपआपल्या [illegible] प्रकार [illegible] श्रेय संपादन करून ठेवले आहे. स्वर्गलोकाला तर त्याने विशेषच [illegible] केले आहे. अशाप्रकारचा श्रेष्ठ सवितादेव उषःकाल उलटून [illegible] नंतर [illegible] विशेषतेने प्रकाशित होत असतो. १३ कृष्णवर्ण रात्र व शुक्लवर्ण दिवस [illegible] परस्परविलक्षण रूप धारण करणारे स्त्रीपुरुष परस्परांशी [illegible] झाले असता अग्निरूपी एक लहान बालकाला प्रेमाने [illegible] असतात. [illegible]

यजमानांच्या करवी अग्नी प्रदीप्त करवून त्याला हवी प्रदान करवीत असतात. द्युलोक व भूलोक यांच्या मध्यवर्ती असलेल्या अंतरिक्षात हा अग्नी विशेषत्वाने प्रकाशतो. यजमानाच्या शरीराचे ठिकाणी विहार करणाऱ्या व यजमानाला धनरूपी फल मिळवून देणाऱ्या प्राणांनीच जणू काय ह्या अग्नीचे धारण केले आहे. १४ हे अग्निदेवा, उत्कृष्ट असे दोन पंख असलेला तू जणू काय गरुड पक्षीच आहेस 'बहिष्पवमान' संज्ञक स्तोत्रामध्ये योजण्यात येणारा 'त्रिवृत्' नांवाचा 'स्तोम' हे तुझे मस्तक असून 'गायत्र' नांवाचे साम हे तुझे नेत्र आहेत. 'पंचदश' स्तोम हा तुझा जीवात्मा असून 'वामदेव्य' संज्ञक साम हे तुझे शरीर आहे. बृहत् व रथंतर या नांवाची दोन सामे ही जणू काय तुझे दोन पंख आणि शेवटचे 'यज्ञायज्ञिय' नांवाचे साम हे तुझे शेपूट आहे. गायत्र्यादि छंद हे तुझ्या शरीराचे हृदयादि अवयव असून सौमिक वेदीत असलेली 'धिष्ण्य' संज्ञक सात स्थाने ही जणू काय तुझ्या पायांच्या नख्या आहेत. आणि 'यजुर्मंत्र' हे तुझ्या नांवाच्या ठिकाणी आहेत. १५ हे अग्निदेवा, उत्कृष्ट पंख धारण करणारा तू ज्या अर्थी गरुड पक्षीच आहेस त्या अर्थी तू आकाशात भरारी मार आणि स्वर्गलोकात जाऊन पोहोच. (अनुवाक १०).

१ हे अग्निदेवा, ज्या हिंसारहित यज्ञाला तू सर्वतोपरी व्यापून राहिलेला असतोस, तोच यज्ञ देवांच्या ठिकाणी जाऊन पोचतो. २ हे सोमदेवा, तुला हवी प्रदान करणाऱ्या यजमानाला सुख उत्पन्न करणारे जे तुझे रक्षणप्रकार आहेत त्या सर्व प्रकारांनी तू आमचे संरक्षण करणारा हो. ३ आदित्यरूपाने तळपत असलेला हा अग्नी द्युलोकाचे अत्यंत उंच असे जणू मस्तकच आहे. पृथ्वीचा पालक असलेला हा अग्नी उदकांच्या सारभूत रसापासून उत्पन्न झालेल्या स्थावर जंगम शरीरांना सुख देतो म्हणजे व्रिहियवादि धान्यांची समृध्दी करतो. ४ हा अग्नी, भूलोक, त्याच्या ठिकाणी होणारा यज्ञ व त्या यज्ञाच्या ठिकाणी आम्हाला प्रवृत्त करणारा आमचा स्वभावगुण या सर्वांचा नियंता आहे. हे अग्निदेवा, ज्या द्युलोकाच्या ठिकाणी सूर्याचे रूप धारण करून उत्कृष्ट असे घोडे जोडलेल्या रथात बसून तू येत असतोस त्या द्युलोकाच्या ठिकाणीच तू जणू काय स्वर्गलोकाला जाऊन भिडणाऱ्या अत्युच्च शिरोभागाचीच स्थिती धारण करीत असतोस. हे अग्निदेवा, या यज्ञाचे ठिकाणाच्या सन्निध जाऊन पोचणारी ज्वालारूपी जिव्हाही तूच निर्माण करतोस.

५ हे सोमराजा, आम्हाला उपद्रव देऊ इच्छिणाऱ्या सर्व पापसंघापासून आमचे तू रक्षण कर. तुझ्यासारख्या प्रभूची थोडी तरी मैत्री असलेला कोणीही मनुष्य तुझ्या अनुग्रहाने नाश पावत नाही. ६ हे सोमराजा, द्युलोकात तुझी जी स्थाने आहेत त्याचप्रमाणे पृथ्वी, पर्वत, ओषधी आणि उदके यांच्या ठिकाणी जी जी तुझी स्थाने आहेत त्या सर्व स्थानांनी युक्त असा तू प्रसन्नचित्त आणि क्रोधरहित होऊन आमच्या हविर्द्रव्यांचा स्वीकार कर. ७ जो आमच्या बुध्दींना प्रेरणा करतो त्या सविता देवाच्या श्रेष्ठ अशा तेजाचे आम्ही ध्यान करतो. ८ सर्वप्रेरका हे सवित्या देवा, पुरुषाच्या ठिकाणचे पौरुषत्व म्हणजे स्वकर्तृत्वाभिमान अनेक प्रकारचा असतो आणि तो असल्यामुळेच कर्तव्य काय व अकर्तव्य कोणते याविषयी ज्ञान नसल्यामुळे, विषयलंपट झाल्यामुळे दैन्यावस्थेला प्राप्त झालेल्या इंद्रियांच्या द्वारा आपआपल्या कर्तव्यात कुशल असलेल्या इंद्रियांनी युक्त अशा देवांच्या शरीरांविषयी आम्ही जे काही पाप केले असेल त्या देवविषयक आणि मनुष्यविषयक पापापासून मुक्त होऊन ह्या यज्ञकर्मामध्ये आम्ही जेणे करून निष्पाप होऊ अशी प्रेरणा तू आम्हाला कर. ९ कर्णमधुर अशी वाक्ये सुचविणाऱ्या आणि आमच्या कुशाग्र बुध्दींना चेतना देणाऱ्या सरस्वती नांवाच्या वाग्देवतेने आमच्या ह्या यज्ञाचे धारण केले आहे. १० वीर पुत्रांना प्रसविणारी, सौंदर्यसंपन्न, विचित्र असे जीवन असलेली, वीर पुरुषांचे पालन करणारी, आणि छंदोबध्द मंत्रांनी युक्त अशी वाग्देवता सरस्वती आमच्या यज्ञकर्माविषयी सावधानबुध्दी धारण करो. ती सरस्वती देवी यजमानाशी समानतेने प्रीती करणारी होऊन आपली स्तुती करणाऱ्या यजमानाला अखंड टिकणारे व दुसऱ्या कोणाकडून पराभूत न होणारे असे सुख देवो. ११ पूषादेव आमच्या संरक्षणासाठी आमच्या मागोमाग येवो. पूषादेव आमच्या अश्वांचे रक्षण करो. आणि तोच पूषा आम्हाला अन्न संपादन करून देवो. १२ हे पूषन्, तुझे शुध्द स्वरूप अनेक प्रकारचे आहे. ते उदयकाली रक्तवर्ण व मध्यान्हकाली शुभ्रवर्ण असते. तुझ्या पूजनाचे प्रकारही अनेक आहेत. सकाळच्या संध्येत 'मित्रस्य चर्षणी' इत्यादि मंत्रांनी तू पूजिला जातोस, तर माध्याम्ह संध्येत 'उद् वयं तमसस्परि' इत्यादि मंत्रांनी तुझी उपस्थानरूपी पूजा केली जाते. तुझ्यापासून निर्माण होणारी अहोरात्रेही परस्परभिन्न अशा स्वरूपाची आहेत. दिवस प्रकाशयुक्त असून रात्र अंधकारयुक्त असते. मात्र अशा प्रकारे जरी तुझ्या ठिकाणी स्वरूपभिन्नता असली, तरी तत्त्वतः

अकाशाप्रमाणे पक्षपातरहित, अर्थात् एकरूप असाच तू आहेस. आपल्या उपासकाच्या ठिकाणी असलेल्या पदार्थांची मोजणी करण्यास योग्य अशा चित्तवृत्ती, आणि 'स्वधा' ह्या शब्दाने उपलक्षित होणारे सर्व प्रकारचे अन्न यांचे तू रक्षण करतोस. हे पूषादेवा, ह्या यज्ञकर्मामध्ये तुझ्याकडून फलप्रदान चांगल्या प्रकारे होवो. १३ आपले बल सदैव आपल्या ठिकाणी स्थिर राखणारे 'मरुत्' नामक देव स्वतःच्या महत्त्वानेच वृध्दिंगत झाले आहेत. ज्या ठिकाणी दुःखाचा लेशही नसून निर्भेळ सुखच भरून राहिले आहे, अशा स्वर्गलोकी ते जाऊन पोचलेले आहेत. आपल्याला हवी प्रदान करणाऱ्या यजमानासाठी इच्छिलेल्या सुखांचा वर्षाव करणारे व आनंदरूपी रसाचा झरा सदैव वाहत असलेले स्थान त्यांनी स्वर्गलोकात निश्चित करून ठेवले आहे. मरुतांच्या ज्या अद्भुत कर्माचे विष्णूनेच परिपालन केले त्या स्वतःला प्रिय असलेल्या कर्माच्या ठिकाणीच अधिष्ठान करून, संध्याकाळी पक्षी आपल्या घरट्यात येऊन राहतात तसे, मरुत् राहत असतात. १४ हे ऋत्विग्यजमान हो, मरुतांच्या बलाने शत्रूंच्या बलांना पराभूत करणारे तुम्ही हविर्दानप्रसंगी स्तविले जाणाऱ्या, शीघ्रगामी व स्वाधीनबल अशा मरुत्समूहांचे विविध प्रकारे अर्चन करा. हे अग्निदेवा, मरुतांच्यासाठी केले जाणारे यज्ञ निर्विघ्नपणे कसे पूर्णतेस जातील? या चिंतेने पृथ्वी कशी कंपित होत असते ते तूच पहा. १५ यज्ञाची अभिवृध्दी करणारे त्या त्या ऋतूंच्या द्वारा उपलक्षित होणाऱ्या यज्ञकर्मांमध्ये हविर्द्रव्यांचा स्वीकार करण्यासाठी आलेले निमंत्रण ऐकणारे विश्वेदेव योग्य व दुधाप्रमाणे सारभूत असलेले हविर्द्रव्य सेवन करोत. १६ हे विश्वेदेव हो, माझे निमंत्रण श्रवण करा. जे तुम्ही अंतरिक्षात राहत असाल, जे पृथ्वीच्या सन्निध राहत असाल, जे द्युलोकात असाल, शिवाय जे अग्निरूपी जिव्हेने हविर्द्रव्याचा स्वीकार करणारे किंवा आणखी यजनीय असे जे देव असतील ते सर्व देव या यज्ञामध्ये येऊन बसा. आणि अर्पण करण्यात येणारे हविर्द्रव्य सेवन करून आनंदित व्हा आणि यजमानालाही आनंदित करा. १७ द्युलोक आणि पृथ्वी ही उभयता आज आम्ही करीत असलेला फलसाधक, स्वर्गलोकाला जाऊन भिडणारा यज्ञ देवांच्या ठिकाणी समर्पण करोत. १८ हे ऋत्विग्यजमान हो, प्रथम उत्पन्न झालेल्या आणि मातापितराप्रमाणे पूज्य असणाऱ्या द्यावापृथिवींची या यज्ञाचे ठिकाणी नवीन अशा मंत्ररूपी वाणींनी तुम्ही स्तुती करा. हे द्यावापृथिवी हो, देवांच्याशी संबध्द असलेल्या पुरुषसमूहासह तुम्ही आमच्याकडे

या. तुमच्या आगमनाने हे यज्ञगृह अधिक पूज्य होईल. १९ हे यजमान, तू प्रज्वलित करीत असलेल्या मरणरहित अशा 'स्विष्टकृत्' नामक अग्नीला स्तोत्राने संतुष्ट करून 'आमची ही हविर्द्रव्ये देवांच्या सन्निध नेऊन पोचव' अशी त्याला सूचना कर. २० देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेणारा, अमर, अनुग्रहपूर्वक आमची इच्छा करणारा, देवांचा दूत व आपली उपासना करणाऱ्या मनुष्यांचा हितचिंतक असा तो 'स्विष्टकृत्' नामक अग्नी करुणायुक्त चित्ताने येथे येऊन पोहोचो. २१ देवांना पूज्य मानणारे, अत्यंत लांबीचा पल्ला थोड्या वेळात चालून जाणारे व शीघ्रगामित्वामुळे उत्कृष्ट निगा राखण्यास पात्र असे हे अश्व सर्पासारखे व लांडग्यासारखे राक्षसांना दंश करीत व दाढांखाली चुरडीत चालले आहेत. आणि त्यांनी फारच थोड्या वेळात रोगांना आमच्यापासून दूर केले आहे. २२ हे अश्वहो, अन्न संपादन करण्याचा जो जो प्रसंग येईल, अथवा धन संपादन करण्याचा जो जो प्रसंग येईल त्या त्या सर्व प्रसंगी तुम्ही आमचे रक्षण करा. ब्राह्मणाप्रमाणे शुध्द, मरणरहित आणि जेथे जावयाचे आहे त्या प्रदेशाचे बरोबर ज्ञान असणाऱ्या हे अश्वाभिमानी देवहो, तुम्ही या नीवार धानाच्या भाताचा मधुर रस प्या आणि हर्षभरित व्हा. नंतर तृप्त झालेले तुम्ही, देव जातात त्या मार्गांनी ठरलेल्या मर्यादेपर्यंत धावत चला. (अनुवाक ११).

प्रपाठक २

१ मी प्रथमच पुढे ठेवलेल्या हे पाऊला, माझ्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या कुविचाररूपी शत्रूचा नाश करणारे तू जणू काय, भगवान् विष्णूचेच पाऊल आहेस. तू 'गायत्री' छंदाचे ठिकाणी आरूढ हो. म्हणजे तो आपणावर अनुग्रह करणारा आहे अशा बुध्दीने त्या छंदाचा स्वीकार कर, आणि भूदेवतारूपी पुढच्या प्रदेशात चालत जा. आम्ही ज्याचा द्वेष करतो, तो शत्रू या प्रदेशातून आता हाकलून दिला आहे. २ पुढे टाकलेल्या माझ्या दुसऱ्या पाऊला, माझ्यावर इतराकडून घेतल्या जाणाऱ्या खोट्या आळाचा नाश करणारे तू जणू काय भगवान् विष्णूचेच पाऊल आहेस. यास्तव तू 'त्रिष्टुप्' छंदावर अनुग्रह करणारा आहेस असे मानून त्याचा अंगीकार कर. आणि नंतर अंतरिक्ष लोकरूपी पुढच्या प्रदेशात प्रवेश कर. ज्याचा आम्ही द्वेष करतो,

तो शत्रू ह्या प्रदेशातून बाहेर घालवून दिला आहे. ३ पुढे टाकलेल्या माझ्या तिसऱ्या पाऊला, मला अवश्य दिली पाहिजे, अशी वस्तू जो मला देत नाही, त्याच्या नाश करणारे तू जणू सर्वव्यापक विष्णूचेच पाऊल आहेस. म्हणून तू जगती छंद हा आपला अनुग्राहक आहे, अशा भावनेने त्या छंदावर आरूढ हो. आणि पुढच्या द्युलोकरूपी प्रदेशाचे आक्रमण कर. ज्याचा आम्ही द्वेष करतो, तो आमचा शत्रू ह्या प्रदेशातून आता हाकलला गेला आहे. ४ पुढे टाकलेल्या माझ्या चौथ्या पाऊला, माझ्यावर शस्त्राचा प्रहार करून मला मारण्यास टपलेल्या शत्रूला ठार करणारे, असे तू जणू काय जगद्व्यापक भगवान विष्णूचेच पाऊल आहेस. 'अनुष्टुप्' छंदाचे म्हणजे त्याच्या अधिष्ठात्री देवतेचे आपणास आनुकूल्य असावे अशी बुध्दी ठेवून तू त्या छंदावर आरूढ हो म्हणजे त्याला आपलासा कर. आणि सर्व दिशांनी व्याप्त अशा पुढच्या प्रदेशात गमन कर. आम्ही ज्याचा द्वेष करतो, त्या आमच्या शत्रूला आता दशदिशांच्या बाहेर घालविला आहे. ५ शेतात पेरलेले धान्य पर्जन्याच्या अभावी करपून जाण्याची भीती नष्ट करण्याकरतां की काय, आकाशात मेघ जसा मोठ्याने गरजतो, त्याचप्रमाणे हा अग्नी त्याच्या दाहकतेमुळे माझ्या शरीरास लागणारी धग शांत करून आणि पुष्पांनी लहडलेल्या एखाद्या वेलीप्रमाणे माझ्या शरीराच्या ठिकाणी टवटवी निर्माण करून आमच्या अनिष्टांचे निवारण करण्यासाठी मोठ्याने गर्जना करो. कारण उत्पन्न होताक्षणीच हा अग्नी प्रदीप्त होऊन विविध अशा जगाला प्रकाशित करण्यासाठी द्युलोक व पृथ्वी यांच्या अंतर्भागी आपल्या उज्वल किरणांनी आसमंतात् प्रकाशून राहिला आहे. ६ उपासकावरील प्रेमामुळे त्याच्याकडे माघारा परतणाऱ्या हे अग्निदेवा, आम्हाला देण्याकरिता अपमृत्युरहित आयुष्य, शरीरकांती, जीवनाला पुरेल इतके धन, जवळ असलेल्या धनाचे आपल्या आप्तेष्टांना दान करण्याचे औदार्य, श्रवण केलेला ग्रंथ ध्यानात धरण्याची शक्ती व पुत्रपौत्रादि प्रजा ही बरोबर घेऊनच तू आमच्याकडे माघारी परत ये. ७ सर्वांगसुंदरा, हे अग्निदेवा, आमच्याकडे परत येणाऱ्या तुझ्या शेकडो खेपा होवोत. त्याचप्रमाणे तुझ्या सान्निध्यात राहणाऱ्या पुरुषांच्या, आणि आम्हाला देण्याकरिताच तुझ्याजवळ असणाऱ्या द्रव्यांच्या आमच्याकडे परत येण्याच्या खेपाही हजारो होवोत. अशा प्रकारच्या खेपांच्या समृध्दीहूनही अधिक समृध्दीने तू आमचे नष्ट झालेले धन पुन्हा आम्हाला मिळवून दे. आणि आजपर्यंत संपादित न झालेले धनही

तू आम्हास संपादन करून दे. ८ हे अग्निदेवा, दूध, दही इत्यादि रसांच्यासह तू पुन्हा आमच्याकडे परत ये. अन्न व आयुष्य यांच्यासह पुन्हा आमच्याकडे ये. आमच्या हातून वारंवार घडणाऱ्या अपराधांपासून तू आमचे सर्वतोपरी रक्षण कर. ९ हे अग्ने, धनासहवर्तमान तू आमच्याकडे माघारा ये. विश्वातील सर्व प्राण्यांना सेवनीय अशा वृष्टिधारेने तृणधान्यापासून मोठ्या वृक्षांपर्यंत सर्वांच्या ठिकाणी तू सिंचन कर. १० हे वरुणदेवा, माझ्या गळ्याशी जखडून राहिलेला तुझा पाश तू वरच्यावर काढून घे आणि परत तोडून टाक. माझ्या पायांना बांधलेला तुझा घट्ट पाश खालूनच काढून घेऊन नष्ट कर. त्याचप्रमाणे माझ्या कमरेला जखडलेला तुझा पाश तू तोडून टाक. आणि नंतर, हे आदित्यसदृश वरुणा, निष्पाप झालेले आम्ही तुझ्या विषयीच्या कर्तव्यकर्माच्या ठिकाणी अखंडितपणे तत्पर होऊन राहू. ११ हे अग्निदेवा, तुला मी येथे आणला आहे आणि तू ह्या उखेच्या अंतर्भागी विराजमान झाला आहेस. त्या अर्थी तू या ठिकाणी चलनरहित असा स्थिर रहा. सर्व प्रजा तुझी इच्छा करोत. आमच्या ह्या यजमानाच्या ठिकाणी आज आहे, यापेक्षा अधिक मोठे राष्ट्र स्थापन कर. १२ महनीय असा हा अग्नी उषःकालाच्या शेवटी अग्निहोत्र होमाच्या निमित्ताने उठून उभा राहिला असून आपल्या ठिकाणच्या तेजाने सर्व अंधकार त्याने दूर केला आहे. अंधकाराचा नाश करणाऱ्या तेजःकिरणांनी ज्याचे शरीर सौंदर्ययुक्त आहे, अशा ह्या अग्निदेवाने जन्मताक्षणीच आपल्या तेजाने सर्व ठिकाणे भरून टाकली आहेत. १३ हे अग्निदेवा, सर्व प्रकारच्या ज्ञान संपादनाचे उपाय जाणणारा तू या घडवंचीवर ठेवलेल्या व तुला मातेप्रमाणे असलेल्या उखेच्या मांडीवर सुखाने बैस. तू आपल्या दीप्तीने व प्रखर अशा उष्णतेने या उखेला अधिक तापवू नकोस. निर्मल अशा शुभ्र प्रकाशाने या उखेच्या अंतर्भागी तू विशेषतेने तळपत रहा. १४ हे अग्ने, ह्या उखेच्या अंतर्भागी असलेल्या स्वकीय अशा स्थानांमध्ये उत्कृष्ट दीप्तीने तू युक्त हो. उपजत ज्ञानी असलेल्या हे अग्निदेवा, स्वतःच्या तेजाने प्रदीप्त होऊन तू या उखेला सुखप्रद हो. १५ हे अग्ने माझ्याकरता तू शांत असा होऊन इतरांनाही शांत स्थितीत ठेवीत तू येथे बैस. सर्व दिशांना शांत करून स्वकीय स्थानच अशा ह्या उखेच्या ठिकाणी येऊन बैस. १६ आहवनीयादि अनेक ठिकाणी हंस पक्ष्याप्रमाणे संचार करणारा, यज्ञ कर्माच्या ठिकाणी बसून राहणारा, यजमानाची वस्ती सुखाची करणारा, धुराच्या व

ज्वालांच्या रूपाने अंतरिक्षात राहणारा, देवांना यज्ञासाठी बोलावणारा, वेदीमध्ये बसणारा, अतिथीप्रमाणे यजमानाच्या घरी जाऊन बसणारा, जठराग्निरूपाने सर्व मनुष्यांच्या ठिकाणी राहणारा, श्रेष्ठ अशा श्रोत्रियांच्या गृहात वास करणारा, यज्ञाच्या ठिकाणी त्याचा निष्पादक होऊन बसणारा, सूर्यरूपाने आकाशात राहणारा, पर्जन्यधारांच्या ठिकाणी विद्युद्रूपाने उत्पन्न होणारा, गोघृताच्या ठिकाणी उष्णतारूपाने उत्पन्न होणारा, यज्ञासाठीच उत्पन्न झालेला, आणि वणव्याच्या रूपाने पर्वताच्या ठिकाणी उत्पन्न होणारा हा अग्नी अत्यंत प्रौढ अशा अग्निचयनयुक्त यज्ञाचे निष्पादन करो. (अनुवाक १).

१ यजनशील अशा उपासकांच्या ठिकाणी अनुग्रहबुध्दी ठेवणारा हा अग्निच प्रथमत: द्युलोकाचे ठिकाणी सूर्यरूपाने उत्पन्न झाला. आणि आमच्या ह्या मनुष्यलोकावर वन्हिरूपाने तो दुसऱ्या जन्माला प्राप्त झाला. समुद्राच्या उदकांमध्ये वडवाग्निरूपाने त्याने तिसरा जन्म घेतला. अशा प्रकारच्या त्रैलोक्यनिवासी अग्निदेवाला पुरोडाशादि हविर्द्रव्यांनी प्रदीप्त करून समाधानचित्त झालेला यजनशील उपासक वृध्दापकाळ प्राप्त होईपर्यंत त्याची एकनिष्ठ सेवा करीत असतो. २ हे अग्निदेवा, द्युलोक, मनुष्यलोक व समुद्रोदक या तीन ठिकाणी असणारी तुझी तीन स्वरूपे जाणण्याची आम्ही इच्छा करीत आहो. गार्हपत्य, आहवनीय, दक्षिणाग्नी इत्यादि पुष्कळ ठिकाणी तू संपादन केलेले निवासस्थल जाणण्याची आम्ही इच्छा करीत आहो. वेदमंत्रांमध्ये प्रतिपादित झालेले अत्यंत उत्कृष्ट व गुप्त असे जे तुझे नांव आहे, ते जाणण्याची आम्ही इच्छा करीत आहो. आणि ज्या पर्जन्यवृष्टीच्या प्रपातापासून तू विद्युद्रूपाने आला आहेस तो प्रपातही जाणण्याची आम्ही इच्छा करीत आहो. ३ कर्मानुष्ठानतत्पर अशा ऋत्विजांच्या ठिकाणी मनाचे अनुसंधान ठेवणारा व वेदपारंगत अशा विद्वान लोकांमध्ये [illegible] विवेचन स्पष्टतेने करणारा मी यजमान समुद्रामध्ये [illegible] आणि [illegible] उदकांच्या ठिकाणी विद्युद्रूपाने राहणाऱ्या तुज [illegible] प्रदीप्त [illegible] तिसऱ्या स्थानावर असलेल्या द्युलोकामध्ये [illegible] [illegible] तेजोमंडलाचे ठिकाणी सूर्यरूपाने राहणाऱ्या [illegible] [illegible] यजमान यज्ञातील वेदीचे ठिकाणी संतोषचित्त [illegible] [illegible] पर्जन्याच्या अभावी करपून जाणारी [illegible] [illegible] आकाशात मेघ जसा मोठ्याने गरजतो, [illegible] हा अग्नी [illegible] दाहकतेने [illegible] शरीरास जाणारी [illegible]

लहडलेल्या एखाद्या वेलीप्रमाणे माझ्या शरीरास टवटवी उत्पन्न करण्याकरिता, आणि आमच्यावर येणाऱ्या अनिष्टाचे निवारण करण्यासाठी मोठ्याने गर्जना करो. कारण, उत्पन्न होताक्षणीच हा अग्नी प्रदीप्त होऊन विविध अशा जगातील वस्तू प्रकाशित करण्यासाठी द्युलोक व पृथ्वी यांच्या अंतर्भागी आपल्या उज्वल किरणांनी आसमंतात् प्रकाशून राहिला आहे. ५ अनुग्रहपूर्वक आमची इच्छा करणारा, उपासकाच्या चित्तवृत्तींना पवित्र करणारा, यागरहित अशा पुरुषांच्या विषयी प्रीती नसलेला, सेवकाचा अभिप्राय चटकन् ध्यानात घेणारा, व मरणरहित असा हा अग्नी परमात्म्याने मनुष्यांच्या कल्याणासाठी निर्माण करून ठेवला आहे. नेत्रांना उपद्रव न देणारा, धूर पुष्कळ धारण करणारा हा अग्नी त्या धुराला ऊर्ध्व गतीने पसरवीत असतो आणि निर्मल अशा आपल्या प्रभेने द्युलोकाला व्यापून टाकतो. ६ अखिल विश्वाचे ज्ञान असलेला व अंतरिक्षाचे अंतर्भागी राहणारा हा अग्नी जन्मताक्षणीच आपल्या तेजाने द्युलोक व पृथ्वी यांना सर्वतोपरी भरून टाकतो. यजमान व चौघे ऋत्विज असे पांचजण जेव्हा ह्या अग्नीचे यजन करतात, तेव्हा आहुतीरूपाने आदित्याच्याजवळ जाताना हा अग्नी पर्वताप्रमाणे अत्यंत दृढ अशा मेघाला विदीर्ण करीत असतो. ७ गाई, घोडे इत्यादि संपत्तीचा उदार दाता, धनांचे धारण करणारा, अपेक्षित अशी फले प्राप्त करून देणारा, सोमयागाचा रक्षक, सुखाने वसती करावयास कारणभूत होणाऱ्या अरणिमंथनविषयक बलाचा पुत्र, आणि वृष्टिरूपी उदकाचे ठिकाणी विद्युद्रूपाने चमकणारा हा अग्नी उषःकाल उलटून प्रातःकाल झाला म्हणजे अग्निहोत्री यजमानांच्याकडून प्रदीप्त केला जातो, व तेव्हा तो अतिशय सुंदर भासतो. ८ उपासकांच्या कल्याणासाठीच प्रदीप्त होणाऱ्या व अत्यंत तरुण अशा हे अग्निदेवा, तुला अर्पण करण्याच्या उद्देशाने आज जो यजमान घृताने उपस्तरण व अभिघारण केला जाणारा पुरोडाश करील, त्या देवभक्त अशा यजमानाकडे त्याला अपेक्षित असलेले व त्याची वस्ती अत्यंत सुखाची होण्याला कारणभूत असणारे धन भरपूर पोचते कर. ९ सत्कीर्तीला कारणभूत होणाऱ्या यज्ञकर्मामध्ये, 'निष्केवल्य,' 'प्रउग' इत्यादि तीं तीं शस्त्रे पठण केली जात असतांना देवभक्त अशा त्या यजमानाला सर्वतोपरी स्वकर्तव्यतत्पर कर. हा यजमान सूर्याचे ठिकाणी प्रिय होवो, व तुज अग्नीचे ठिकाणीही प्रिय होवो. उत्पन्न झालेल्या पुत्राकडून तो अभिवृध्दीला प्राप्त होवो, आणि पुढे उत्पन्न होणाऱ्या नातवापणत्वाकडूनही तो अभिवृध्दीला प्राप्त होवो.

१० हे अग्निदेवा, सर्व यजमान प्रत्येक दिवशी तुझ्याकडे धाव घेत असल्यानेच संपादनीय अशा सर्व प्रकारच्या धनांचे धारण करीत असतात. तुझ्या सन्निध राहणारे ते यजमान अधिक द्रव्य मिळविण्याची इच्छा करून धनसाध्य अशी कर्मे करण्याच्या आकांक्षेने पुष्कळ गाईंनी भरून गेलेल्या गोठ्यात येरझारा करू लागतात. ११ सुवर्णाप्रमाणे दर्शनीय असा हा अग्नी कोणाकडूनही तिरस्कृत न होणाऱ्या जीवनाचा आश्रय करावा अशी इच्छा धरून आपल्या महनीय दीप्तीने तळपून राहिला आहे. व तो हविर्द्रव्यरूपी अन्नांच्या योगाने अमर झाला आहे. ह्या अग्नीला द्युलोकवासी देवगणांनीच ज्या अर्थी निर्माण केला आहे त्या अर्थी तो अमर असणे युक्तच आहे. (अनुवाक २).

१ अन्नपालका, हे अग्निदेवा, रोगरहित व बलोत्पादक अशा अन्नाची प्राप्ती तू आम्हाला करून दे. तुला हवीप्रदान करणाऱ्या यजमानाला पापापासून पूर्णपणे मुक्त कर. आमच्या कुटुंबातील प्रत्येक मनुष्याला व पशूला बलवान कर. २ हे अग्निदेवा, शरीराच्या ठिकाणी प्राणरूपाने असणारे सर्व देव तुला उंच उचलून धरावयास आवश्यक अशा कुशल मनोवृत्तींनी तुला उचलून धरोत. प्राणरूपी देवांच्याकडून वर उचलला गेलेला तू आमच्यासाठी अत्यंत शांत व हसतमुख असा हो. आणि आपल्या प्रभेने आमची वस्ती सुखाची करणारा हो. ३ हे अग्निदेवा, शांत अशा ज्वालांनी प्रकाशित होऊन तू देवयजन प्रदेशाकडे चल. प्रौढ अशा आपल्या किरणांनी जगाला प्रकाशित करीत असलेला तू आपल्या दाहक शरीराने प्रजेला पीडा देऊन नकोस. ४ हे ऋत्विज यजमान हो, घृताने माखलेली समिध अर्पण करून तुम्ही या अग्नीची सेवा करा. घृत इत्यादि आवडते पदार्थ भोजनास घालण्यासाठी एखाद्या अतिथीस जागा करावा त्याप्रमाणे ह्या अग्नीला तुम्ही जागृत करा आणि घृतप्रधान अशी हविर्द्रव्ये समर्पण करून त्याला तृप्त करा. ५ हा अग्निदेव त्याला अर्पण करण्यासाठी हविर्द्रव्य घेऊन येणाऱ्या यजमानाचे आव्हान आदरपूर्वक ऐको. जो अग्नी सूर्याप्रमाणे भासमान होऊन अत्यंत तळपून राहत असतो व जो अग्नी रणसंग्रामाचे ठिकाणी स्वपक्षाला सर्वतोपरी भरपूर जय संपादन करवितो, तो देवांचा हितकारी व परममंगल असा अग्निदेव एखाद्या सन्मान्य अतिथीप्रमाणे आमच्या ह्या यज्ञामध्ये येवो. ६ हे उदकदेवतांनो, उख्याग्नीवर अपेक्षेबाहेर सांठून राहिलेले हे भस्म तुह्मी घ्या. ते सुखकर व सुगंधयुक्त अशा चांगल्या जागी नेऊन ठेवा. वरुणदेवाच्या सत्वशील पत्नी

व अग्नीच्या जननी असलेल्या उदकदेवतां अग्नीच्या संरक्षणासाठी सदैव विनम्र होऊन राहोत. देवतांनो, माता आपल्या बालकाचे पोषण करते त्याप्रमाणे तुह्मी ह्या अग्नीचे पोषण करा. ७ हे अग्ने तुझे बल भस्माच्या रूपाने उदकांत राहत असते, साळीचे भात, सातू इत्यादि धान्यांच्या ठिकाणी सत्त्वरूपाने तू बिलगून राहिलेला असतोस. आणि निबिड अशा अरण्याच्या ठिकाणी तूच वारंवार निर्माण होतोस ८ हे अग्ने, तू ओषधींचा गाभाच आहेस. पिंपळाच्या लाकडाच्या अरणीतून तू उत्पन्न झालेला दिसतोस. यावरून वनस्पतीचा म्हणजे वृक्षांचाही तूच गाभा आहेस. सर्व 'प्राणिमात्रांचा। जठराग्निरूप गर्भ तूच असून विद्युतरूपाने पर्जन्योदकाचा व वडवानलरूपाने समुद्रोदकाचाही पण गर्भ तूच आहेस. ९ हे अग्निदेवा, भस्मासह तुझे जन्मस्थानच अशा या पृथ्वीवर तू बैस आणि तुझ्या उत्पत्तीचे स्थान असलेल्या उदकांच्या ठिकाणीही तू जाऊन पोच. मातृरूप अशा पृथ्वीशी आणि उदकांच्याशी संलग्न झालेला तू अत्यंत देदीप्यमान होऊन पुन्हा स्वकीय स्थानच अशा ह्या उखेमध्ये येऊन बैस. १० हे अग्ने, स्वतःचे जणू घरच अशा उदकांच्या पृथ्वीच्या ठिकाणी जाऊन पुन्हा तू या उखेच्या अंतर्भागी मातेच्या मांडीवर तिचा बालक सुखाने निजलेला असतो तसाच अत्यंत शांतपणे निजला आहेस. ११ हे अग्निदेवा, दूध, दही इत्यादि रसांच्यासह तू पुन्हा आमच्याकडे परत ये. अन्न व आयुष्य आह्माला देण्यासाठी तू आपल्याबरोबर ते घेऊनच आमच्याकडे ये. आमच्या हातून वारंवार घडणाऱ्या अपराधापासून तू आमचे सर्वस्वी रक्षण कर. १२ हे अग्ने सर्व प्रकारच्या धनासह तू आमच्याकडे माघारा ये. विश्वात प्राण्यांना सेवनीय अशा वृष्टिधारेने तृणापासून वृक्षांपर्यंत सर्व ठिकाणी वर्षाव कर. १३ हे अग्निदेवा, आदित्य, रुद्र व वसू हे तुला पुन्हा प्रदीप्त करोत. आपल्याला धनप्राप्ती करून देणाऱ्या अग्ने, ऋत्विज म्हणून नियोजित झालेले कर्मकुशल ब्राह्मण यज्ञासंबंधी अनेक निमित्तांनी तुला उत्कृष्ट रीतीने पुन्हा प्रज्वलित करोत. तुला अर्पण करण्यात येणाऱ्या घृताने संतुष्ट होऊन तू आपल्या शरीराची सर्व अंगे वृध्दिंगत कर आणि तुझ्या संतुष्टतेच्या योगाने यजमानाच्या मनातील कामनाही सफल होवोत. १४ हे अग्निदेवा, 'स्वधा' असे म्हणून दिलेल्या हविर्द्रव्याने युक्त व तरुण असा तू अत्यंत अभिवृध्दीला कारणभूत होणाऱ्या व परम आदराने उच्चारल्या जाणाऱ्या आमच्या स्तुतिरूपी भाषणातील तात्पर्य नीट लक्षात घे. कारण, तुझी स्तुती करणारांपैकी

एखादा यजमान तुझी निदाव्यंजक व्याजस्तुती करील तर दुसरा एखादा औचित्याची मर्यादा सोडून अतिशयोक्तीने तुझी स्तुती करण्यास प्रवृत्त होईल. आणि कोणी एखादा यजमान तुला अनुकूल आणि उचित अशीही स्तुती करील. म्हणून आमच्या स्तुतिवाक्यांकडे तू नीट लक्ष दे. तुला अभिवादन करण्यास उत्सुक असलेला मी दर्शनीय अशा तुझ्या शरीराला वंदन करतो. १५ हे अग्निदेवा, विद्वान्, अन्नवान, धनप्रद व धनाचा अधिपती असलेला तू माझ्या मनातील अभिप्राय जाण आणि आमच्या शत्रूकडून आमच्याशी केला जाणारा द्वेष तू आमच्यापासून दूर कर. (अनुवाक ३).

१ हे यमभृत्यहो, या 'देवयजन' स्थलाच्या ठिकाणी पुरातन काळापासून जे कोणी तुम्ही राहत असाल आणि जे कोणी अलीकडेच राहू लागला असाल, ते तुम्ही सर्वजण ह्या स्थानातून निघून जा. हे ठिकाण सोडून अत्यंत दूर चालते व्हा. ह्या देवयजन स्थानातून बाहेर पडल्यानंतर या स्थानाच्या जवळपास या प्रदेशात देखील न राहतां ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे निरनिराळ्या ठिकाणी चालू लागा. पृथ्वीवर असणारे हे स्थान यमाने आम्हाला दिले आहे. पितरांनी देखील ह्या यजमानाच्या अग्निचयनासाठी हे स्थान निश्चित केले आहे. २ हे सिकते, तू अग्नीची प्रकाशक आहेस. तू अग्नी टिकविण्याला उपयोगी आहेस. ३ हे क्षारमृत्तिके, तू पशूंना नुसत्या वासावरून ओळखू न येणारी आहेस. यज्ञाच्या द्वारा तू कामनांचे धारण करणारी आहेस. तुझे कामना धारण करण्याचे सामर्थ्य माझ्या ठिकाणी राहो. ४ हे सिकते, आणि हे क्षारमृत्तिके, तुम्हा दोघींची प्रिय अशी शरीरे परस्परांच्याशी संमिश्र करा. तुम्हा दोघींची आवडती हृदये परस्परांच्याशी अगदी मिळून जावोत. तुम्हा दोघींना प्रिय असणारा आत्मा तुम्हाला अत्यंत प्रिय होवो. आणि तुम्हा दोघींची शरीरे मलाही अत्यंत प्रिय होवोत. ५ ज्या गार्हपत्य चितिरूपी अग्नीविषयी इच्छा करीत असलेला इंद्र सोमवल्ली कुटून तयार केलेला रस आपल्या उदरात साठवितो, तो गार्हपत्यचितिसंज्ञक अग्नीच विटांची विशिष्ट अशी रचना करून आता मांडला जात आहे. जगात उत्पन्न झालेल्या सर्व वस्तूंना जाणणाऱ्या हे अग्निदेवा, शीघ्र गतीने प्रवास करण्यास कुशल अशा अश्वाप्रमाणे असलेला तू हजाराने मोजता येणाऱ्या धनासह अन्न यजमानांना दिले आहेस. आणि म्हणूनच तू त्यांच्याकडून स्तविला जात असतोस. ६ हे इष्टकारूपी अग्ने, द्युलोकातून तू या पृथ्वीला अनुलक्षून पर्जन्यरूपाने उदक

पाठवीत असतोस. विशिष्ट अशा स्थानांचा आश्रय करून जे देव बसलेले असतात त्यांच्या समोर जाऊन त्यांना 'ह्या हविर्द्रव्याचा स्वीकार करा', असे तू म्हणत असतोस. सूर्याच्या दीप्तिरूपी मंडलाच्या ठिकाणी राहणारे, त्याचप्रमाणे उदकाच्या ऊर्ध्व प्रदेशात आणि उदकाच्या अधोभागी राहणारे जे देव आहेत ते सर्व देव तू बोलावलेस म्हणजे येथे येतील. ७ यागनिष्पादका, हे अग्निदेवा, द्युलोकाचे ठिकाणी तुझे जे तेज सूर्यरूपाने राहत असते, आणि पृथ्वीवर तुझे जे तेज अग्निज्वालारूपाने राहते, त्याचप्रमाणे ओषधींच्या ठिकाणी फलपरिपाककालाच्या रूपाने आणि समुद्रातील उदकांमध्ये वडवानलरूपाने जे तुझे तेज राहत असते, अथवा ज्या तुझ्या विद्युद्रूपी तेजाने विस्तीर्ण अशा आकाशाला तू सर्वतोपरी प्रकाशित करीत असतोस, त्याच तेजाने तू जणू काय आता प्रकाशित झाला आहेस. देदीप्यमान असा तू समुद्राप्रमाणे विस्तीर्ण असा भासणारा आणि मनुष्यांचे प्रख्यापन करणारा आहेस. ८ मृत्कणांच्या ठिकाणी निर्माण होणारे, अत्यंत भक्तिपूर्ण अशा मनोवृत्तीने परस्परांवर समान प्रीती करणारे, रोगरहित, अभीष्टप्राप्तीला कारणीभूत होणारे व अत्यंत प्रौढ असे अग्नी, आम्ही त्यांना अर्पण केलेले इष्टकारूपी हविर्द्रव्य सेवन करोत. ९ हे अग्निदेवा, तुझ्या ठिकाणी हवन करण्यास प्रवृत्त होणाऱ्या यजमानाला, सर्वांनी प्रशंसनीय, अनेक प्रकारांनी दर्शनीय, चिरकाल टिकणारे, आणि गाई, घोडे इत्यादि पशूंचा लाभ करवून देणारे धन संपादन करून दे. आणि मला पुष्कळ अपत्यांना जन्म देणारा असा औरस पुत्र दे. हे अग्निदेव, तुझी जी अनुग्रहबुध्दी आहे, ती आमच्या ठिकाणी सर्वदा असू दे. १० हे अग्निदेवा, हा इष्टकारूपी पदार्थ स्त्रीपुरुषांच्या ऋतुकालीन समागमाप्रमाणे तुझ्या उत्पत्तीला कारणभूत होवो. ज्या इष्टकारूपी स्थानातून उत्पन्न झालेला तू प्रकाशित होत आहेस, त्या इष्टकारूपी जन्मस्थानाला जाणूनच तू त्या ठिकाणी प्राप्त हो. आणि नंतर आमच्या धनाचे संवर्धन कर. ११ हे इष्टके, तू नानाविध भोगांचे संपादन करणारी आहेस. ज्या देवतेचा तू अभिमान धारण करीत आहेस त्या देवतेच्या अनुग्रहानेच तू अंगिरसांनी भाजलेल्या गार्हपत्य चितीच्या ठिकाणी जशी स्थिर होऊन राहिलीस त्याचप्रमाणे तू या ठिकाणी स्थिर होऊन रहा. १२ हे इष्टके, तू आसपासच्या सर्व प्रदेशांतून नानाविध भोगांचे संपादन करणारी आहेस. ज्या देवतेचा तू अभिमान बाळगतेस त्याच देवतेच्या अनुग्रहाने; पूर्वी अंगिरसांनी तुला ठेवल्या ठिकाणी जशी

स्थिर राहिलीस त्याचप्रमाणे मी मांडलेल्या ठिकाणी तू स्थिर होऊन रहा. १३ हे इष्टके, निरनिराळ्या विटांनी 'गार्हपत्य' संज्ञक चयन मांडतांना जी जागा रिकामी राहिली असेल ती तू भरून टाक. दोन विटांच्यामध्ये जी फट राहिली असेल तीही तू पूर्णपणे बुजवून टाक. मांडलेल्या ठिकाणी तू शांतपणे रहा. इंद्र, अग्नी व बृहस्पती ह्या तीन देवांनीच तुला ह्या ठिकाणी मांडून ठेवली आहे. १४ यजमानाच्या स्वर्गलोकाचे प्रकाशन करणाऱ्या, ह्या जन्माला कारणभूत होऊन देवांच्याच जणू प्रजा असलेल्या व अन्नाचे दोहन करणाऱ्या जणू गाईच अशा ह्या येथे मांडलेल्या इष्टका प्रातःसवन, माध्यंदिन सवन आणि तृतीय सवन ह्या तिन्ही वेळच्या अनुष्ठानप्रसंगी सोमाला परिपक्व करीत असतात. (अनुवाक ४).

१ हे अग्नी हो, एकमेकांवर प्रीती करणारे, देदीप्यमान, परस्परांच्या मनास सुखविणारे आणि अन्न व रस यांचे उत्कृष्ट संपादन करणारे तुम्ही उभयता परस्परांशी एकजीव होऊन जा. आणि यज्ञाचे उत्कृष्ट निष्पादन करा. तुमच्या दोघांच्या मनातील संकल्प मी एकरूप करतो. त्याचप्रमाणे तुम्हा दोघांची कर्मे आणि तद्विषयक ज्ञान यांचेही मी एकीकरण करतो. २ हे धूलिकणयुक्त अग्ने, दोन्ही स्वरूपे एक झालेला तू आमचे अधिकतेने पालन करणारा हो. तू यजमानासाठी अन्न आणि क्षीरादि रस संपादन कर. ३ हे संमिश्ररूपा अग्निदेवा, पात्रांतून हविर्द्रव्यरूपी अन्न समर्पण करण्यास योग्य असा तू धनवान आणि पुष्टिवान् आहेस. सर्व दिशांना शांत करून स्वकीय स्थानच अशा ह्या गार्हपत्य चितीचे ठिकाणी तू येऊन बैस. ४ पूर्वीच विद्यमान असलेल्या आणि आता उखेतून ओतलेल्या हे अग्निदेवहो, एकमेकांवर केव्हाही विसंगत न होण्याऱ्या मनोवृत्तीने सारखेच प्रेम करणारे, एकाच ठिकाणी वास करणारे आणि निष्पाप मनोवृत्ती असणारे तुम्ही दोघे यज्ञाची व यज्ञपती यजमानाची हिंसा करू नका. जन्मजात ज्ञानी असे तुम्ही उभयता आमच्या करिता शांत व्हा. ५ माता आपल्या बालकाचे पोषण करते, त्याप्रमाणे ही उखा स्वतःच्या गर्भस्थानी हविर्द्रव्यरूपी अन्न अर्पण करण्यास योग्य अशा या अग्नीचे पोषण करीत असते. अग्नीचे पालन करणाऱ्या ह्या उखेला सर्वदेव आणि सर्व ऋतू यांच्याशी ऐकमत्याला प्राप्त झालेला सृष्टिकर्ता प्रजापती देव शिंक्याच्या फासातून मोकळी करो. ६ धूलीकणाप्रमाणे भासणाऱ्या धुराच्या शेवटी ह्या अग्नीचा जो शुभ्र व निर्मल असा प्रकाश

निर्माण होत असतो, तो आमच्या द्वेष्ट्यांचे अतिक्रमण करून आम्हाला सुखी करो. विश्वामधील सर्व मनुष्यांच्या ठिकाणी जठाग्निरूपाने राहणाऱ्या हे उख्याग्ने, हे तुझे शिंके तुला समर्पण असो. ७ बहुविध रूपांनी युक्त आणि नैऋत्य दिशेच्या अभिमानिनी देवते, तुला नमस्कार असो. पोलादाच्या बेडीप्रमाणे कणखर व स्वर्गप्राप्तीला प्रतिबंधक अशी मज ठिकाणी असणारी पापबुध्दी तू नष्ट कर. आणि नंतर यम, अग्नी व पृथ्वी यांच्याशी एकमत झालेली तू ह्या यजमानाला दुःखाचा लेशही नसलेल्या व सर्वतोपरी सुखयुक्त अशा स्वर्गलोकावर आरूढ कर. ८ हे यजमान, तुझ्या मानेच्या सर्व भागांच्या ठिकाणी निर्ऋतिदेवीने कधीही न तुटणारा जो आपला पाश घट्ट आवळला होता, तो तुझ्या मानेचा फास मी आता मोकळा करतो. मी करीत असलेले हे पाशविमोचन तुझ्या आयुष्याच्या मध्यापर्यंतच नव्हे तर तुझ्या आयुष्याच्या पूर्णतेपर्यंत तुझ्या उपयोगी पडेल. तू आता चिरंजीव आणि सर्वप्रकारच्या प्रतिबंधांनी रहित होऊन सुखाने अन्न भक्षण कर. ९ हे निर्ऋतिदेवते, परलोकप्राप्तीला प्रतिबंधक होणाऱ्या यजमानाच्या पातकांचा नाश होण्यासाठी ज्या तुझ्या उग्र अशा मुखाच्या ठिकाणी आहुतीप्रमाणे ही इष्टका (वीट) मी ठेवीत आहे. आणि आपोआप भेगळल्या जाण्याच्या रूपाने, असलेल्या ज्या तुझ्या उग्र मुखाच्या ठिकाणी मी ही इष्टका मांडत आहे, त्या तुज निर्ऋतिदेवीला शास्त्रसंस्काररहित असे सामान्य लोक 'तू निर्ऋतिदेवी आहेस' हे न ओळखता केवळ 'भूमीचा एक भाग आहेस असेच समजतात. परंतु शास्त्राभिज्ञतेमुळे मी मात्र तुला 'तू निर्ऋतिदेवी आहेस' अशा प्रकारे सर्वकाळ ओळखीत आहे. १० हे निर्ऋतिदेवी, जो सोमयाग करीत नाही आणि दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, इत्यादि हविर्यज्ञही जो करीत नाही त्या यजमानाला घेरण्याची तू इच्छा कर. त्याचप्रमाणे गुप्तपणे व उघड रीतीने चोरी करणाऱ्यांच्याही मागे लागून तू त्यांना हुडकून काढ. सोमयाग करणाऱ्या व हविर्यज्ञांनी देवांचे यजन करणाऱ्या आम्हाला वगळून इतरांना घेरण्याची तू इच्छा कर. आम्हाला मात्र केव्हाही घेरू नकोस. कारण दुष्टांचे शासन करणे हे तुझे नित्यकृत्यच आहे. हे निर्ऋतिदेवी, तुला नमस्कार असो. ११ विदुषी अशी जी निर्ऋतिदेवी, सर्व जगात उत्पन्न होणाऱ्या चोर, चहाडखोर इत्यादि लोकांपैकी प्रत्येक मनुष्याचे मस्तक आपल्या हाताने हालवून, 'तू कोणता अपराध केला आहेस, हे मी जाणते', असे त्याला निक्षून बजावीत असते. खोडकर मुलाला त्याचा

पिता 'अरे बाळ, तू शहाणा ना? मग, असे वेड्यासारखे करू नकोस', अशा प्रकारच्या आर्जवी भाषणांनी जसा आपलासा करतो, त्याप्रमाणे निर्ऋतिदेवीला वंदन करणारा मी स्तुतिरूपी मधुर व आर्जवी भाषणांनी वश करून घेईन. १२ सूर्यदेव जसा सर्व स्वरूपांना प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे यजमानांना त्यांच्या त्यांच्या सुखात राहवून त्यांना नाना प्रकारच्या धनांचा मालक करून देणारा हा अग्नी स्वकीय शक्तीच्या योगाने विश्वांतील सर्व वस्तूंची स्वरूपे चोहीकडे प्रकाशित करतो. सत्य हाच ज्याचा स्वभावधर्म आहे व इंद्राप्रमाणे परमऐश्वर्यवान् असलेला हा अग्नी शत्रूच्याशी भिडण्याकरता स्वत: एक पाऊलही कधी पुढे टाकीत नाही. त्याच्या नुसत्या नांवाच्या दराऱ्यानेच शत्रू पळ काढतात. १३ नांगरट करणाऱ्या हे शेतकऱ्यांनो, नांगराच्या जोखडाला चामड्याच्या दोऱ्या नीट बांधा. बैलांना पाणी पिण्यासाठी ठिकठिकाणी दोण्या तयार करून ठेवा. शेतांना पाणी देण्यासाठी जिच्यामध्ये भरपूर पाणी साठून राहील, कोणत्याही दिवसांमध्ये भोंवतालच्या कडा न ढासळता जी अभंग राहील आणि उन्हाळ्यात देखील जी आटणार नाही अशा प्रकारची एक मोठी विहीर तळाशी पाण्याचे झरे लागेपर्यंत खोल खणून आम्ही तयार करीत आहो. १४ ज्यांच्या बुडाशी पाणी बाहेर जाण्यासाठी भोके ठेवली आहेत अशा लाकडी व दगडांच्या उंच उंच दोण्यांतील प्रत्येक खळग्यात मी पाणी भरून ठेवीत आहे. बुडाशी असलेली भोके बंद केल्यामुळे पाणी बाहेर गळून जाण्याचा संभव नसलेला प्रत्येक खळगा आता पाण्याने तुडुंब भरलेला असून त्यातून पाणी शेंदून काढण्यासाठी त्याच्या काठावर चामड्याचे दोर व शेजारी मातीचे लोटे ठेवलेले आहेत. १५ धीराने व निरलसपणाने काम करणारे व देवतांच्यावर भावना ठेवून त्यांच्याकडून सुख मिळवू इच्छिणारे कृषिकर्मकुशल शेतकरी नांगर जोडून तयार करोत. आणि त्या नांगराला एका पुढे एक अशी अवश्य तितकी जोखडे नियोजित करोत. १६ हे शेतकरीहो, नांगर जुंपा. त्याच्यापुढे अवश्य तितकी जोखडे जोडा. नांगरट केल्यामुळे योग्य झालेल्या जमिनीत आशीर्वादात्मक मंगलवाक्ये उच्चारून बी पेरा. त्या बियांपासून निष्पन्न होणारा प्रत्येक अंकुर योग्य रीतीने वाढून त्याला भरपूर दाणे असणारे कणीस उत्पन्न होवो. या जमीनीतले सर्व धान्य सत्वर परिपक्व होवो. आणि नंतर विळ्याने त्या पिकाची कापणी झाल्यानंतर त्यातील सर्व धान्य लौकर आमच्या पदरी पडो. १७ वज्राप्रमाणे अत्यंत कणखर फाळ असलेला, नांगरट करणारांच्या

कडून सुखाने जमीन नांगरणारा आणि अपेक्षेप्रमाणे जमीनीत खालीवर होऊन चालणारा, असा हा नांगर जमीनीतील मोठमोठी ढेकळे वर येतील अशा प्रकारे नांगरट करो. जमीनीची उत्तम रीतीने नांगरणी झाल्यामुळे तिच्या ठिकाणी भरपूर पीक येते व त्या योगाने यजमानाला पुष्ट अशी गाय, मेंढी, प्रथमवयस्क कन्या आणि इच्छेनुसार रथ ओढण्याला समर्थ असा अश्वही प्राप्त होतो. १८ नांगराचे फाळ जमीनीत खोलवर जाऊन तिची सुखाने नांगरणी करोत. नांगर हांकणारे लोक नांगर ओढणाऱ्या बैलांच्या बरोबर सुखाने चालोत. पर्जन्य मधुर रसाने युक्त अशा उदकांनी जमीनीवर सुखकारक वृष्टी करो. वायू आणि सूर्य हे दोघे देव आमच्या ठिकाणी सुखाची धारणा करोत. १९ कामधेनूप्रमाणे सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या नांगराने जमीनीवर उखडून काढलेल्या हे लंब रेषे, मित्र, वरुण, अग्नी, पूषा ओषधिदेवता व आमची प्रजा यांच्या तृप्तीसाठी तू आपल्या ठिकाणी अपेक्षित असे सर्व प्रकारचे धान्य पिकव. २० नांगराच्या योगाने जमीनीच्या ठिकाणी उमटलेली खोल व लांब रेषा मधुर अशा घृताने भिजविली आहे. आणि त्यामुळे ती विश्वेदेव व मरुत् यांनी पसंत केली आहे. उत्कृष्ट रसाने संपन्न अशा उदकाने पुष्ट झालेल्या हे लंब रेषे, अन्नरसाचा सर्वत्र पुरवठा करणारी होऊनच तू आमच्याकडे ये. (अनुवाक ५).

१ सृष्टीच्या आरंभी वर्षा, शरद् व वसंत ह्या तीन ऋतूंत देवांच्यापासून ज्या ओषधी उत्पन्न होतात, त्या प्राणिमात्राचे भरण पोषण करण्यास समर्थ अशा ओषधी पिकल्यानंतर पिवळट रंगाच्या होत असतात. त्या ओषधींच्या शेकडो जाती असून त्यांमध्ये विशेष प्रसिध्द अशा ग्राम्य व आरण्य संज्ञक धान्यांच्या सात सात जाती पाहून मला फार संतोष होत आहे. २ माते प्रमाणे पूज्य अशा हे ओषधींनो, तुमच्या शेकडो जाती असून तुमचे अंकुरही हजारो आहेत. शेकडो यज्ञकार्य पार पाडणाऱ्या हे ओषधींनो, तुम्ही माझ्या ह्या यजमानाला निरोगी करा. ३ तुमच्यापैकी काही ओषधी केवळ फुलेच येणाऱ्या असून काही फुले आणि फळेही येणाऱ्या आहेत. काही ओषधी फुले न येताच फळे येणाऱ्या आहेत. आणि फुले व फळे ही दोन्हीही न येणाऱ्या आहेत. काही ओषधी वेलाच्या रूपाने उत्पन्न होणाऱ्या व पुष्कळ वर्षे पार पडेपर्यंत टिकणाऱ्या आहेत. त्या सर्व प्रकारच्या ओषधी अश्वाप्रमाणे जयशाली आहेत. ४ परिपक्व अशी फळे धारण करणाऱ्या व देदीप्यमान

ओषधींनो, तुम्ही मातेप्रमाणे उपकारी आहात. यास्तव, तुमच्याजवळ मी अशी प्रार्थना करितो की, तुम्ही पापे व पापांच्यापासून होणारे दुःख यांचा नाश करणाऱ्या होऊन येथे येऊन पोचा. ५ हे ओषधिदेवतांनो, अश्वत्थाच्या वृक्षांवर मी तुमचे बसावयाचे स्थान केले असून पळसाच्या वृक्षांवर तुमचे वसतिस्थान तयार केले आहे. तुम्ही मनुष्यमात्राच्या पोषणाला उपयोगी पडता म्हणून ह्या भूमीचा तुम्ही दीर्घकाळ उपभोग घेत राहिल्या आहात. ६ पारध्यांनी पकडण्यापूर्वी त्याला नुसता पाहूनच भ्यालेला ससा ज्याप्रमाणे मेल्यासारखा होऊन जमीनीवर पडून राहतो त्याचप्रमाणे अन्न शिजविण्याच्या इच्छेने जेव्हा मी धान्यरूपी ओषधी हाती घेताक्षणीच अर्थात् भोजन करण्यापूर्वीच माझ्या क्षुधारूपी रोगाचे स्वरूप नष्टप्राय होत असते. ७ हे ओषधींनो, एखाद्या महासभेत निरनिराळ्या देशचे राजे एकत्र जमावेत त्याप्रमाणे निरनिराळ्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या तुम्ही ज्याच्या औषधालयात एकत्र झालेल्या असता तो ब्राह्मण, क्षुद्र व महाव्याधीचे निवारण करणारा वैद्य म्हणून लोकात गणला जातो. ८ हे ओषधींनो, क्षुधादि रोगांचे निवारण करण्याकरताच जणू काय मातेप्रमाणे उपकारक अशा तुमची उत्पत्ती झाली आहे. आणि म्हणूनच तुम्ही आपआपले कार्य उत्तम प्रकारे करण्यास समर्थ झाला आहात. क्षुधादिकांचे निवारण करणाऱ्या तुम्ही, पक्षी आपल्या घरट्यात माघारी येतात त्याप्रमाणे माझ्याजवळ परत या आणि रोगाप्रमाणे आम्हाला त्रास देणाऱ्या क्षुधादिकांचा नाश करा. ९ हे ओषधींनो, तुमच्यापैकी प्रत्येक ओषधी दुसऱ्या ओषधीचे रक्षण करो. रक्षित अशी औषधी आपले रक्षण करणाऱ्या दुसऱ्या ओषधीजवळ जाऊन तिचेही रक्षण करो. हे ओषधींनो, तुम्ही सर्वजणी परस्परांच्याशी एकमत होऊन माझे प्रार्थनारूप भाषण प्रयत्नपूर्वक रक्षण करा. वृथा होऊ देऊ नका. १० गाई आपल्या गोठ्यातून बाहेर पडून अरण्यात जातात, त्याप्रमाणे हे यज्ञपुरुषा, तुझ्या आत्म्याला हविर्द्रव्यरूपी धन अर्पण करण्याची इच्छा करणाऱ्या ओषधींच्या खोडातून जोमदार असे नवे नवे अंकुर बाहेर पडून सर्वत्र पसरत असतात. ११ एखादा चोर रात्रीच्या वेळी गोठ्यात शिरून गाय पळवून नेण्यासाठी सावधगिरीने गोठ्यात चोहीकडे वावरत असतो, त्याप्रमाणे शरीरावर लेपरूपाने चोळलेल्या सर्व ओषधी रोग्याच्या शरीरात घुसून सर्वत्र पसरतात आणि त्या रोग्याच्या शरीराचे ठिकाणी असलेल्या त्याच्या पापाचे जणू फलच अशा सर्व रोगांचे हरण करतात. १२ हे यजमान,

ज्या ओषधी तुझ्या शरीरात शिरून राहिल्या असतील आणि ज्या ओषधी तुझ्या शरीरातील सांध्यासांध्यांच्या ठिकाणी भिनून राहिल्या. असतील त्या सर्व ओषधी, युध्दाविषयी स्वभावत: उदासीन असलेला राजा आपल्यावर चाल करून येणाऱ्या शत्रूच्यावर रागाने तुटून पडतो, आणि त्यांचा संहार करतो, त्याप्रमाणे तुझ्या ठिकाणच्या सर्व रोगांवर तुटून पडून त्यांचा नाश करोत. १३ कंठामध्ये कफ दाटल्यामुळे माणसाला 'खो,खो' असा शब्द करावयास लावणारा, व श्येन पक्ष्याप्रमाणे अत्यंत तीव्र असा जो पित्तजन्य रोग अर्थात खोकला, त्याच्यासह हे राजयक्ष्म्या, तू अत्यंत त्वरेने नष्ट हो. ह्या वातरोगाच्या व्याधीसह नाहीसा हो, आणि 'हाय, हाय मेलो, मेलो' असा शब्द मला करावयास लावणाऱ्या पीडेसह तू सत्वर नष्ट हो. १४ ज्यांची समृध्दी झाली असता द्रव्याचा लाभ होऊन तद्वारा अश्वासारखे वाहन मिळविता येते, ज्यांची समृध्दी झाली असता सोमयाग करण्याची कुवत उत्पन्न होते, ज्या बलप्रद आहेत, आणि ज्या शरीराच्या ठिकाणी ओज उत्पन्न करतात त्या सर्व ओषधी माझ्या ह्या यजमानाला प्राणसंकटापासून मुक्त करोत. १५ ज्या ओषधी फलांनी गजबजलेल्या असतील, अथवा ज्या फलरहित असतील, त्याचप्रमाणे फुलेही नसलेल्या आणि पुष्पभाराने डवरलेल्या ज्या ओषधी असतील त्या सर्व ओषधी बृहस्पतीकडून प्रेरित होऊन आम्हाला पापापासून मुक्त करोत. १६ सोम ज्यांचा राजा आहे, अशा ज्या ओषधींची बीजरूपी धान्ये पृथ्वीच्या ठिकाणी पेरली गेली आहेत, त्या सर्वांमध्ये हे ओषधे, तुझे बीजरूप धान्य उत्कृष्ट आहे. यास्तव, आमच्या जीवनास अवश्य असलेल्या औषधाला आमच्या हाती येण्याविषयी प्रेरणा कर. १७ स्वर्गलोकातून वृष्टिबिंदुरूपाने भूमीवर पडलेल्या ओषधी असे म्हणतात की, ज्या पुरुषाच्या जीवात्म्याला आम्ही व्यापून राहू तो पुरुष आपल्या जीवाला मुकणार नाही. १८ ज्या ओषधिदेवता माझ्याजवळून माझी प्रार्थना ऐकतात, आणि ज्या ओषधिदेवता माझ्यापासून लांबच्या अंतरावर गेलेल्या असल्यामुळे माझी प्रार्थना किंचित् ऐकतात, त्या सर्व ओषधिदेवता या यज्ञकर्मात एकत्र होवात आणि ह्या माझ्या यजमानाला होणाऱ्या क्षुधा इत्यादि लहानमोठ्या व्याधींची उत्तम रीतीने चिकित्सा करोत. १९ हे ओषधींनो, एखादा माणूस एखाद्या रोग्याला औषधोपचार करण्यासाठी तुमचे मूळ खणून काढून घेईल त्याचा नाश न होवो. मी ज्या रोग्याला औषधोपचाराचे कामी उपयोग करण्यासाठी तुमचे

मूळ खणून काढून आणीन तो रोगीही नष्ट न होवो. किंबहुना, माझ्याशी आत्मीयता असलेला जो जो मनुष्य किंवा पशू असेल तो तो देखील रोगरहित होवो. २० ओषधींच्या अधिष्ठात्री देवता आपला स्वामी असलेल्या सोमराजाशी असा संवाद करीत असतात की, हे राजा, कोणीही वैद्य असलेला ब्राह्मण ज्या रोग्याला औषधोपचार करताना आमच्या मुळाचा उपयोग करील त्या रोगी मनुष्याला आम्ही सर्व व्याधीतून पार पाडू. त्याला निरोगी करू. (अनुवाक ६).

१ सत्याचे पालन करणे, हा ज्याचा स्वभावधर्म असून ह्या पृथ्वीचा जो उत्पादक आहे, अथवा ज्या प्रजापतीने द्युलोकाचेही उत्पादन केले आहे, त्याचप्रमाणे ज्याने चंद्राप्रमाणे आल्हादकारक अशी पुष्कळ उदके निर्माण केली, तो प्रजापती आमचा नाश न करो. 'क' हे नांव धारण करणाऱ्या त्या प्रजापतीचे आम्ही हविर्द्रव्याने यजन करतो. २ हे पृथिवि, अनुष्ठान करण्यास योग्य असा यज्ञ, व त्यापासून फलरूपाने मिळावयाचा दुग्धरस यांच्या सहवर्तमान तू आमच्याकडे मुख करून आमच्या सन्निध ये. स्वेच्छेने प्रेरित झालेला अग्नी वपेप्रमाणे स्वच्छ व मृदुल अशा तुझ्या ह्या प्रदेशात येऊन पोहचो. ३ चितिरूपी हे अग्निदेवा, प्रकाशमान, आल्हादकारक, शुध्द आणि यज्ञाला योग्य असे जे जे अंग असेल ते ते लोष्टरूपी सर्व अंग मी देवांच्यासाठी संपादन करीत आहे. ४ अमृताला कारणभूत होणाऱ्या ह्या यज्ञस्थलातून बाहेर पडलेले हे अन्नरूप आणि रसरूप असे मातीचे ढेकुळ मी उचलून घेतो. हे ढेकुळ आमच्या गाईंच्या कळपात व आम्ही साठविलेल्या निरनिराळ्या धान्यात प्रविष्ट होवो. अन्नरहित व रोगबीजयुक्त असा हा जमिनीचा भाग मी सोडून देतो. ५ हे अग्निदेवा, तुझ्या सत्तेचे जे अन्न आमच्या ऐकण्यात येते, ते अत्यंत श्रेष्ठ आहे. कीर्तिरूपी धनाने संपन्न असलेल्या हे अग्निदेवा, तुझ्या ज्वाला सर्वत्र प्रकाशत असतात. असंख्य किरणांनी युक्त व आमच्या मनांतील अभिप्राय जाणणाऱ्या अग्निदेवा, तुला हविर्द्रव्य समर्पण करणाऱ्या यजमानाला शस्त्रपठणाने युक्त अशा यज्ञाला योग्य असे अन्न तू आपल्या बळासह देतोस. ६ अमर अशा हे अग्निदेवा, तुला पुरोडाशादि हविर्द्रव्य समर्पण करणाऱ्या उपासकांच्या कडून तू प्रज्वलित होऊन आमच्या ठिकाणी धनांचा विस्तार कर. तू दर्शनीय अशा चित्यग्निरूपी शरीराच्या ठिकाणी विशेषच प्रज्वलित होऊन राहतोस. सत्पात्रांना पुष्कळदा दान करण्यास पुरेसे होईल

अशा द्रव्याचा आमच्याकरिता पुरवठा कर. ७ अन्नाचा नाश न करणाऱ्या अग्निदेवा, उपजत ज्ञानी असा तू प्रकाशमान अशा ज्वालांनी युक्त होऊन आम्ही केलेल्या स्तुतींनी हर्षित हो. अत्यंत सारभूत अशा अन्नरूपी आहुती आश्चर्यजनक अशा तुझ्या संरक्षणशक्तीने संरक्षिल्या गेलेल्या व पूज्य अशा प्रदेशांतील आणि कुलीन कुलात जन्मलेल्या यजमानांनी तुझ्या ठिकाणी समर्पण केल्या आहेत. ८ सर्व वस्तूंना शुध्द करणाऱ्या निर्मल व परिपूर्ण अशा प्रकाशाने तळपत राहणारा तू, स्वत:च्या तेजाने उत्कर्षाला प्राप्त होतोस. शास्त्रीय मार्गाने आचरण करणारा पुत्र आपल्या मातापितरांची सेवा करतो त्याप्रमाणे द्युलोक व पृथ्वी यांच्या ठिकाणी संचार करून तू त्यांच्याजवळ जातोस आणि त्यांचे रक्षण व पूजा करून त्यांची सेवा करीत असतोस. ९ सत्याचे अवलंबन करणारा, महनीय, सर्व मनुष्यांनी सेवा केलेला, उपासकांची प्रार्थना कान देऊन ऐकणारा व अत्यंत कीर्तिमान आणि देवांच्याकडून यज्ञामध्ये स्थापित केल्या गेलेल्या तुज अग्निदेवाला प्राचीन काली मानवसमाजातील अग्रणी अशा पुष्कळ ऋत्विग्यजमानांनी आपल्याला सुख प्राप्त व्हावे म्हणून येथे स्थापिले आहे. १० हे अग्निदेवा, तू यज्ञाचा निष्पादक, अत्यंत श्रध्दाळू, देवांना हविर्द्रव्याचे दान देण्यासाठीच येथे बसलेला, दक्षिणा देणारा, भृगुकुलोत्पन्न अशा महर्षींच्यामध्ये अत्यंत प्रिय झालेला तपस्वी, विद्वानाला शोभेल अशा प्रकारे यज्ञानुष्ठान करणारा, व दानशील अशा यजमानाला धनसंपन्न करतोस. ११ हे चुनखडीच्या लहान लहान खड्यांनो, तुम्ही अग्निचयन मांडलेल्या ह्या भूमीच्या ठिकाणी टाकले गेले आहा, अग्निचयनाच्या सभोवती टाकले गेले आहा आणि अग्निचयनाच्या पृष्ठभागावरही टाकले गेले आहात. यास्तव, ह्या चितिरूपी अग्नीची तुम्ही सेवा करा. तुमच्या पैकी ज्या ज्या खड्याची जी जी अधिष्ठात्री देवता असेल त्या त्या देवतेसह तुम्ही सर्वजण अंगिरसांच्या अग्निचयनस्थली स्थिर होऊन राहिलात तसेच या ठिकाणी स्थिर होऊन रहा. १२ हे सोमदेवा, तू सर्व बाजूंनी वाढत रहा. विश्वातील भूतमात्राची उत्पत्ती करण्यास समर्थ असे वीर्य तुझ्याकडे चालून येवो. निरनिराळ्या प्रकारचे अन्न आमच्यासाठी एकत्र जमविण्याला तू कारणभूत हो. १३ हे सोमा, पिण्याला योग्य असे दुग्धादि सर्वरस तुझ्याजवळ येवोत त्याचप्रमाणे सर्व प्रकारची अन्ने व सर्वप्रकारच्या प्रजोत्पादनशक्तीही तुजकडे चालत येवोत. हे सोमा, शत्रूंचा पराभव करणारा तू अन्न, रस व प्रजोत्पादनशक्ती यांच्या

योगाने वृध्दिंगत होऊन यजमानाला देवत्व प्राप्त होण्यासाठी द्युलोकाचे ठिकाणी श्रवणमनोहर आणि विविध प्रकारची उत्कृष्ट अन्ने संपादन करून ठेव. (अनुवाक ७).

१ अवश्य द्यावयास पाहिजे असलेला करभार न देणाऱ्या शत्रूंच्या सर्व सेनांना हा अश्व आपल्या पायांनी तुडवीत पुढे चालो. अशा प्रकारे शत्रुसैन्य तुडवीत पुढे जाण्याविषयी त्या अश्वाला अग्नी अनुमोदन देवो. सोम अनुमोदन देवो. बृहस्पती व सविता देखील माझ्याकरता त्या अश्वाला शत्रुसैन्य तुडवीत जाण्याविषयी संमती देवोत. पुण्यकर्माने प्राप्त होणाऱ्या स्वर्गलोकाच्या ठिकाणी पूषादेव मला स्थापन करो. २ हे अश्वा, ससाण्याचे पंख आणि हरणाचे पाय जसे सर्वांच्याकडून वाखाणले जातात, त्याचप्रमाणे समुद्राच्या उदकापासून किंवा अत्यंत शक्तिमान अशा अश्वापासून उत्पन्न होणाऱ्या व 'उपजताक्षणीच चितिरूपी अग्निचयनादि कर्मांचे मी मुख्य साधन आहे', असे मोठ्याने ओरडून सर्वांना सांगणाऱ्या तुज अश्वाचा जन्म सर्वांनी अत्यंत वाखाणलेला आहे. ३ हे कमलपत्रा, तू जणू काय उदकांचा पृष्ठभागच असून अग्नीचे जन्मस्थान आहेस. समुद्राप्रमाणे अगाध असलेल्या तलावातील उदकांवर प्रीती करणारा व दिवसेंदिवस वृध्दिंगत होणारा, निर्मलत्वामुळे पूजनीय, आणि अग्निनिष्पादनद्वारा सर्वांचे पोषण करणारा तू आकाशापेक्षाही अधिक विस्तृत हो. ४ पूर्व दिशेस उदय पावणारा स्पृहणीय सूर्य क्षितिजाच्या सर्व सीमेवर आपले उज्वल किरण पसरतो. कमलपत्रावर ठेवलेल्या ह्या 'रुक्म' संज्ञक सुवर्णालंकाराच्या तळाशी चिकटून असलेल्या पृथ्वीवरील सर्व वस्तूंनाही तो सूर्य आपल्या किरणांनी प्रकाशित करतो. घटपटादि मूर्त व 'मनुष्याचे शिंग' अशासारख्या अमूर्त वस्तूंचे जन्मस्थानच असे कल्पक मनुष्याचे मस्तकही तो सूर्य आपल्या प्रकाशाने व्याप्त करून टाकतो. अशा प्रकारच्या सूर्याप्रमाणेच प्रकाशमान व प्रथमतःच निर्माण झालेले हे सुवर्णरुक्मरूपी ब्रह्म अत्यंत श्रेष्ठ आहे. ५ ब्रह्मांडाच्या ठिकाणी गर्भरूपाने राहणारा प्रजापती आज दिसत असलेल्या प्राणिमात्राच्या उत्पत्तीपूर्वीच स्वतः शरीरधारी झाला. नंतर प्रथमोत्पन्न असा तो प्रजापतीच पुढे उत्पन्न होणाऱ्या सर्व जगाचा एकमेव पालक झाला. ज्या सृष्टिकर्त्या प्रजापतीने विस्तीर्ण अशा द्युलोकाचे व ह्या पृथ्वीचे धारण केले, त्या 'क' हे नांव धारण करणाऱ्या प्रजापतिदेवाचे आम्ही हविर्द्रव्याने यजन करतो. ६ हातोड्याच्या घावाने घडविलेल्या सुवर्णमय पुरुषाचा जो

अवयव भूमीवर पडतो, तो ह्या साऱ्या पृथ्वीवर, मग अंतरिक्षात, आणि त्यानंतर द्युलोकात संचार करतो. सुवर्णमय पुरुषाचा जो अवयव प्रथमतः पृथ्वीवर संचार केल्यानंतर अनुक्रमाने तिसरा असलेल्या द्युलोकाच्या ठिकाणी तळपत राहणाऱ्या सूर्याच्या ठिकाणी जाऊन पोचतो, त्या सुवर्णमय पुरुषाच्या अवयवाची मी पृथ्वीशिवाय सातही दिशांच्या ठिकाणी आहुती दिल्याची भावना करतो. ७ पृथ्वीच्या ठिकाणी संचार करीत असतील त्या सर्पांना नमस्कार असो. अंतरिक्षातील यक्षगंधर्वादिकांच्या प्रदेशात जे वावरत असतील त्या सर्पांना नमस्कार असो. त्याचप्रमाणे द्युलोकात वस्ती करून राहणारे जे सर्प असतील, त्यांनाही नमस्कार असो. ८ आकाशाला प्रकाशित करणाऱ्या ह्या सूर्यमंडलाच्या ठिकाणी जे वस्ती करून राहत असतील अथवा सूर्याच्या किरणांच्या ठिकाणी जे आश्रय करून राहत असतील त्या सर्पांना नमस्कार असो. ज्या सर्पांचे वसतिस्थान उदकामध्येच केले गेले आहे त्या सर्पांना देखील नमस्कार असो. ९ दुसऱ्यांना त्रास देणाऱ्या राक्षसांच्या बाणांची स्वरूपे धारण करून जे राहिले असतील, किंवा, जे चंदनासारख्या वृक्षांना वेढून राहिले असतील, अथवा आपआपल्या बिळात जे निजून राहिलेले असतील त्या सर्व सर्पांना माझा नमस्कार असो. (अनुवाक ८).

१ हे स्वयमातृण्णे, तू एका ठिकाणी स्थिर राहणारी, भूमिरूपाने सर्व विश्वाचे धारण करणारी, कोणाकडूनही हिंसित न होणारी व सृष्टिकर्त्या विश्वकर्म्याने उत्कृष्ट प्रकारे निर्माण केलेली आहेस. समुद्र तुला आपल्या उदरात बुडवून तुझा वध न करो. पक्षिराज गरुडही एखाद्या सर्पाबरोबर तुलाही उचलून घेऊन दूर कोठे फेकून न देवो. भयरहित अशी तू ह्या पृथ्वीला दृढ कर. ३ हे स्वयमातृण्णे, स्वभावतःच तू विस्तीर्ण असून अग्निचयनाच्या ठिकाणी मांडली गेल्यावर अधिक विस्तृत होतेस. ह्या अग्निचयनाचा जणू विस्तारच तू आहेस. पृथ्वीरूप, सुखोत्पादक, भूमीची अधिष्ठात्री देवता, अखंडनीय, विश्वाचे पोषण करणारी, आणि विश्वातील सर्व लोकांचे धारण करणारी अशी तू आहेस. विश्वातील प्राणिमात्राला प्राण, अपान, व्यान व उदान हे वायू अनुकूल व्हावेत, सर्वांची आपापल्या घरी सुस्थिती व्हावी, सर्वांच्या हातून यथाशास्त्र आचरण व्हावे यासाठी हा चितिरूपी अग्निदेव, महनीय अशा योगक्षेम संपत्तीने व अत्यंत सुखकारी अशा विशिष्ट दीप्तीने युक्त होऊन तुझे सर्वतोपरी रक्षण करो. हे स्वयमातृण्णे, तुझी स्वामिनी असलेल्या देवतेकडून अनुग्रह

संपादिलेली तू अंगिरसांच्या अग्निचयनाच्या अनुष्ठानप्रसंगी जशी ठेवल्या जागी स्थिर होऊन बसलीस तशीच येथेही बैस. ३ हे दूर्वारूपी इष्टके, कांडाकांडाच्या आणि त्यावरील पेऱ्यांच्या सभोवती जशी तू उत्पन्न होऊन वाढत राहतेस, त्याचप्रमाणे तू आमच्या वंशाचाही शेकड्याने व हजाराने विस्तार कर. ४ हे देवी इष्टके, शेकडो स्वरूपे धारण करणारी जी तू हजारो प्रकारच्या स्वरूपांनी वाढत राहतेस त्या तुज इष्टकेचे आम्ही हविर्द्रव्याने पूजन करतो. ५ तीन रेषांनी अंकित असणाऱ्या हे इष्टके, तू कोणाकडूनही पराभूत न होणारी व शत्रूंचा पराभव करणारी आहेस. आम्हाला देण्यास योग्य असे कोणतेही दान आम्हाला देत नसतील व यापुढेही जे आम्हास अवश्य ते दान न देण्याची इच्छा करतील त्या आमच्या सर्व हितशत्रूंचा तू पराभव कर. ६ हे इष्टके, तू आमच्या शत्रूंच्या सेनांचा पराभव कर. त्याचप्रमाणे आमच्याशी लढण्याकरता सैन्याची जे नवीन भरती करू इच्छित असतील त्या शत्रूंचाही तू पराभव कर. हजारो प्रकारच्या सामर्थ्यांनी संपन्न असलेली तू मला सर्वतोपरी संतुष्ट कर. ७ यज्ञ करण्याची इच्छा करीत असलेल्या यजमानासाठी वारे सुखाने वाहतात आणि समुद्रगामी अशा नद्याही गोड पाण्याने भरून वाहतात. आमच्यासाठी सर्व प्रकारच्या ओषधी मधुर रसाने युक्त होवोत. ८ रात्रीच्या वेळी आम्हाला आनंद होवो व आमचे दिवसही आनंदकारक होवोत. पृथ्वीतील प्रत्येक रज:कण आमच्या करता मधुर रसाने युक्त होवो. आम्हाला पित्याप्रमाणे पूज्य असलेला द्युलोकही आम्हाला सुखप्रद होवो. ९ प्रत्येक वनस्पती आमच्या करता मधुर रसाने युक्त असो. सूर्य आम्हाला आल्हादजनक असो. आणि सर्व गाई देखील आमच्याकरता मधुर अशा दुग्धरसाने परिपूर्ण असोत. १० अत्यंत विस्तीर्ण असा द्युलोक व पृथ्वी ही दोघेही आमच्या ह्या यज्ञाला अभिमत फलांच्या वृष्टीने सिंचित करण्याची इच्छा करोत. त्याचप्रमाणे आमचे पोषण करण्यास योग्य अशा सर्व प्रकारच्या शक्तींनी आम्हास परिपूर्ण करोत. ११ आवरणशून्य अशा आकाशाचे ठिकाणी नेत्राप्रमाणे व्याप्त झालेले भगवान् विष्णूचे ते परम श्रेष्ठ आदित्यमंडलात्मक स्वरूप वेदांतवेत्ते असे पुरुष सर्वदा पाहत असतात. १२ हे उखे, तू निश्चल अशी जणू पृथ्वीच आहेस. आमच्याशी युध्द करू इच्छिणाऱ्या शत्रूंना तू पराभूत कर. अमृताप्रमाणे मधुर अशा घृताने परिपूर्ण होऊन देवांच्यासह तू या ठिकाणी ये. १३ हे अग्निदेवा, सूर्यमंडळाशी एकरूप

होऊन जेव्हा तू उदयास येतोस तेव्हा तुझ्या निरनिराळ्या प्रकारच्या ज्या कांती किरणांच्या रूपाने द्युलोकाला व्यापून टाकतात, त्या सर्व कांतींनी आमच्या यजमानाला तू प्रकाशित कर. १४ हे इंद्राग्नी हो, हे बृहस्पते, आणि हे इतर देवांनो, तुम्ही आपल्या ज्या कांती सूर्यमंडळात समाविष्ट केल्या आहेत, आणि गाई, घोडे इत्यादि पशूंच्या ठिकाणी ज्या कांती तुम्ही निर्मित केल्या आहेत त्या सर्व कांतींनी एकवटलेला प्रकाश तुम्ही आमच्यासाठी संपादन करा. १५ ह्या विराट्संज्ञक रेत:सिक् इष्टकेने आमच्यासाठी विशिष्ट रीतीने शोभणारा प्रकाश धारण केला आहे. १६ ह्या सम्राट्संज्ञक रेत:सिक् इष्टकेने आमच्या करता उत्कृष्ट शोभणारा प्रकाश धारण केला आहे. १७ ह्या स्वराट्संज्ञक रेत:सिक् इष्टकेने आमच्यासाठी परम शोभिवंत असा प्रकाश धारण केला आहे. १८ हे अग्निदेवा, तुझ्या आज्ञेत तत्पर असणारे, अत्यंत शीघ्रगामी आणि रथाला सुखाने ओढून नेणारे असे जे तुझे अश्व असतील ते आपल्या रथाला जोड आणि येथे ये. १९ एखाद्या रथाचा अधिपती आपल्या रथाला जसे आपले आवडते अश्व जोडतो त्याप्रमाणेच देवांना अगत्यपूर्वक बोलावून आणणारे जणू दूतच असे आपले अश्व आपल्या रथाला जोड आणि येथे ये. आणि पुरातन काळी देवांच्या यज्ञातील होता नांवाचा ऋत्विज असलेला तू ह्या यज्ञमंडपात आम्ही करणार असलेल्या यज्ञाचा उत्पादकच होऊन बैस. २० हातोड्याच्या घावाने तुटून सोन्याचा जो लहान तुकडा भूमीवर पडतो, तोच आहुतिरूपाने अग्नीच्या ठिकाणी समर्पण केल्यानंतर ह्या साऱ्या पृथ्वीवर अंतरिक्षात आणि नंतर द्युलोकातही संचार करतो. जो सोन्याचा तुकडा प्रथमत: पृथ्वीवर संचार केल्यानंतर अनुक्रमाने तिसऱ्या असलेल्या द्युलोकस्थानात तळपत राहणाऱ्या सूर्याच्या ठिकाणी जाऊन पोचतो, त्या सोन्याच्या तुकड्याची पृथ्वीशिवाय करून सातही दिशांच्या ठिकाणी मी क्रमाने आहुती देतो. २१ हे हिरण्यशकल जगतात उत्पन्न झालेल्या भूतमात्राचे जणू अन्नच होऊन बसले आहे. इतकेच नव्हे तर जगातल्या सर्व स्त्रीपुरुषांचा स्वामी असलेल्या अग्नीचेही ते अन्न झालेले आहे. हा चितिरूपी अग्नी हिरण्याच्या प्रकाशामुळे स्वत: प्रकाशमान झाला आहे. मूळचाच कांतिमान असलेला हा अग्नी हिरण्याच्या कांतीने अधिकच कांतिमान झाला आहे. २२ हे हिरण्यशकल, स्त्रीरूपी ऋचेच्या संतोषासाठी मी तुला ह्या पुरुषमस्तकाच्या उजव्या डोळ्यातील बुबुळाच्या ठिकाणी ठेवीत आहे. २३ हे हिरण्यशकल, या पुरुषमस्तकाच्या

ठिकाणी कांती उत्पन्न होण्यासाठी मी तुला त्याच्या डाव्या डोळ्याच्या बुबळावर ठेवीत आहे. २४ पिण्याला योग्य असे दही, मध इत्यादि द्रव्यांच्या रसांचे निरनिराळ्या ठिकाणी असणारे अंश, नद्या जशा वाहतात त्याचप्रमाणे, पुरुषमस्तकाला अनुलक्षून वाहत राहतील आणि शरीराच्या अंतर्भागी असणाऱ्या हृदयरूपी कमलाच्या ठिकाणी निगडित असलेल्या अंत:करणाच्या द्वारा शुध्द झालेले हे दही, मध इत्यादि द्रव्याच्या रसांचे अंश घृतांच्या धारा संपादन करतील. त्या घृताच्या धारा कशा वाहत असतात हे स्वत:च्या अनुभवाने मी सर्वत्र प्रकट करीन. त्या घृतधारांच्या मध्ये डुबलेले आणि सुवर्णाप्रमाणे तेजस्वी असे हे पुरुषमस्तक, जलप्रवाहात वेढल्या गेलेल्या वेतस वृक्षाप्रमाणेच भासत आहे. २५ 'वेतस' वृक्षाप्रमाणे भासत असलेल्या पुरुषशिराच्या ठिकाणी हिरण्यशकलरूपी भुंगा राहिला असून उत्कृष्ट पंख असलेल्या ह्या भुंग्याने देवांना अर्पण करण्यासाठी मध साठविण्याकरता घरही पोखरले आहे. पुरुषशिररूपी भुंग्याजवळ असलेल्या स्वयमातृण्णेच्या ठिकाणी असणाऱ्या सात छिद्रांमध्येही ठिकठिकाणचा मध गोळा करून आणणारे सात भुंगे राहिले असून ते पुरुषशिराला अनुलक्षून स्वधाकाराने उपलक्षित अशा भोग्यवस्तुरूपी मधाच्या धारांचा स्राव करीत आहेत. (अनुवाक ९).

१ हे अग्निदेवा, विशिष्ट रीतीने विटांची रचना करून तुझी मांडणी केली जात असतांना, अदिती देवीचा जणू गर्भच असे हे मृत पुरुषाचे मस्तक तू आपणापासून सर्वथा दूर ठेव. आपल्या ज्वालारूपी तेजाने या पुरुषशिराला तू कदापि स्पर्श करू नकोस. तू आपल्या विस्ताराने आसपासचे सर्व स्थल व्यापीत असतांना देखील ह्या पुरुषशिराला धक्का लावू नकोस. इतकेच नव्हे तर हजारो पशुशिरांच्या तोलाचे आणि विशिष्ट रूपाने युक्त अशा ह्या अदितीच्या गर्भाला तू शतायुषी कर. २ ज्वालारूपी हजार नेत्रांनी युक्त आणि यज्ञाचा निष्पादक असणाऱ्या हे अग्निदेवा, विशिष्ट पध्दतीने विटांची रचना करून तुझी मांडणी करीत असतांना आणि तुझ्या सभोवती पशूंच्या मस्तकांनी वेढा दिला असतांना ग्राम्य आणि वन्य पशूंमध्ये पुरुषमस्तकरूपी दोन पायांच्या ग्राम्य पशूला जाळून तू मारू नकोस. तुला काहीतरी भक्ष्य पाहिजे असेल तर खाण्याकरता तुला ह्या पुरुषशिराच्या जवळच कृष्णवर्ण हरिणाचे हे मस्तक मी मांडून ठेवतो. ते खाऊन तू आपली ज्वालारूपी शरीरे पुष्ट करीत या ठिकाणी स्थिर बैस. ३ हे चितिरूपी अग्ने, वायूप्रमाणे

शीघ्रगतीने चालणारा, वस्त्राने झाकून नाभीला जपतात त्याप्रमाणे वरुणाने जपावयास योग्य, समुद्राच्या पाण्यात वडवाग्निरूपाने उत्पन्न होणारा, नद्यांचा पालक, आपल्यावर बसलेल्या पुरुषाला वाहून नेणारा, वाटेने जाता जाता जमिनीवरील लहान लहान पाषाणांचा आपल्या पायांनी चुराडा करीत गेल्याचे दिसणारा, अशा ह्या मृत अश्वाला तू आपल्या ज्वालेने जाळू नकोस. इतकेच नव्हे तर निरुपद्रवी व अत्यंत सुरक्षित अशा ठिकाणी त्याला ठेव. ४ प्रत्येक पायाला एकच खूर असलेल्या, मोठमोठ्याने खिंकाळणाऱ्या, आणि शीघ्रगामी अशा सर्व जनावरांत अत्यंत शीघ्रगामी अशा ह्या अश्वाचा तू नाश करू नकोस. वन्य पशूंतील सिंहाचे मस्तक तुला खावयासाठी तुझ्याजवळ मांडून ठेवतो. ते खाऊन तू आपली ज्वालारूपी शरीरे पुष्ट करीत या ठिकाणी स्वस्थ बैस. ५ निरंतर परमऐश्वर्याने युक्त, आपल्या भक्तांच्या अंतःकरणात घोळत असलेल्या गूढ अभिप्रायाच्या रचनेचा त्याच्या शत्रूंना थांग न लागू देता तिचे संरक्षण करणाऱ्या आणि प्राचीन महर्षींच्या बुध्दींमध्ये पूज्यत्वाने स्थिर झालेल्या ह्या चितिरूपी अग्नीचे मी नमस्कारपूर्वक स्तवन करतो. हा अग्निदेव आदित्यरूपाने द्युलोकात राहून पौर्णिमा, अमावास्या इत्यादि तिथींनी निष्पन्न होणाऱ्या त्या त्या ऋतूत उचित अशी सर्व कर्मे संपादन करीत असतो. हे चितिरूपी अग्ने, अखंडनीय व विशेषत्वाने शोभणाऱ्या ह्या वृषभशिराचा तू नाश करू नकोस. ६ चितिरूपा हे अग्निदेवा, समुद्राप्रमाणे उन्नत, स्वजातीय अशा गाईंच्या द्वारा निष्पन्न होणाऱ्या शेकडो दुग्धधारांनी युक्त, जलप्रवाहाप्रमाणे वाहणारे, सर्व जगात विद्यमान असणारे, गाईंच्याकडून दुग्धाच्या द्वारा निष्पन्न केल्या जाणाऱ्या घृताचे दोहन करणारे आणि अखंडनीय असे हे मृत वृषभाचे मस्तक यजमानाच्या इच्छेला मान देऊन तू नष्ट करू नकोस. इतकेच नव्हे तर ते अत्यंत सुरक्षित अशा ठिकाणी ठेऊन दे. तुला खावयाकरिता गाईसारखा दिसणारा हा वन्य पशू मी तुला दाखवून ठेवतो. त्याला तू खा आणि आपल्या ज्वालारूपी शरीराला पुष्ट करीत या ठिकाणी स्वस्थ रहा. ७ हे चितिरूपी अग्निदेवा, सर्व प्राण्यांची स्वरूपे निर्माण करणाऱ्या त्वष्ट्याच्या अनुग्रहाने आदरणीय अशा स्वरूपाची, अरिष्टांचा निवारक अशा तुज अग्नीचे जणू नाभिस्थान, रंजक अशा जगाच्या पलीकडे असणाऱ्या प्रजापतीच्या उरोभागापासून उत्पन्न झालेली, महनीय, हजारांच्या मोलाची आणि सुवर्भानु नांवाच्या असुराने निर्मिलेली जणू मायाच अशा ह्या मृत मेंढीला

तू नष्ट करू नकोस. इतकेच काय पण अत्यंत सुरक्षित अशा जागी हिला ठेव. ८ हे अग्निदेवा, अनिष्टनिवारक अशा तुज अग्नीची जणू माया, चतुष्पाद पशू व द्विपाद मनुष्यांच्या अंगावरील जणू त्वचा, त्वष्टयापासून उत्पन्न झालेल्या प्रजांच्यापैकी प्रथमचेच अपत्य, आणि जिच्या अंगावर पुष्कळ लोकर आहे त्या ह्या मस्तकरूपी मेंढीची तू हिंसा करू नकोस आणि तिला उत्कृष्ट अशा सुरक्षित ठिकाणी ठेव. तुझे खाद्य म्हणून आरण्य पशूंपैकी मस्तकरूपाने असलेला हा उंट मी तुझ्याजवळ ठेवीत आहे. त्याचे भक्षण करून तू आपली ज्वालारूपी शरीरे चांगली पुष्ट करीत या ठिकाणी स्वस्थ बैस. ९ सर्व देवांमध्ये अग्रणी असलेल्या प्रजापतीच्या संकल्परूपी तपापासून जो अग्नी उत्पन्न झाला, तोच सर्व पृथ्वीवर आणि द्युलोकावर स्वप्रकाशाने तळपत असतो. विश्वकर्मा प्रजापतीने ज्या बोकडाच्या द्वारा सर्व मनुष्यांना आणि चतुष्पाद पशूंना व्यापून टाकले त्या बोकडाला हे अग्निदेवा, तुझा क्रोध आपल्या तडाक्यातून वगळो, त्याचा नाश न करो. १० अग्नीच्या उदरापासून शेळी उत्पन्न झाली, हे प्रसिध्द आहे. पुढच्या जन्मी हीच शेळी प्रजापतीपासून जेव्हा जन्मास आली, तेव्हाच तिने आपल्या उत्पादकाला पाहिले. ज्या अर्थी शेळी इतकी प्रशस्त आहे, त्या अर्थी तिच्या योगाने यज्ञ करण्याला योग्य असे जे यजमान असतील ते जणू काय स्वर्गलोकाच्या अगदी जवळ जाऊन पोचले आहेत. कारण, आज जे देव झालेले आहेत त्यांनीं देखील मागील जन्मी या शेळीच्याच योगाने यज्ञकर्मांचे अनुष्ठान केले असल्यामुळेच आज ते देवत्वाला प्राप्त झालेले आहेत. सारांश, शेळीपासून उत्पन्न झालेल्या बोकडाच्या ह्या मस्तकाचा असा महिमा आहे. हे अग्निदेवा, वन्य पशूंपैकी सिंहाचाही घात करणारा शरभ नांवाचा अत्यंत क्रूर पशू तुला खावयासाठी तुझ्याजवळ मी ठेवीत आहे. त्याचे भक्षण कर आणि तू आपल्या ज्वालारूपी शरीरांना पुष्ट करीत या ठिकाणी बैस. (अनुवाक १०)

१ द्युलोकाला प्रकाशित करणाऱ्या हे इंद्राग्नी हो, हविर्द्रव्यरूपी अन्नांच्या ठिकाणचा आपआपला भाग स्वीकारण्यासाठी तुम्ही येथे येऊन पोचला आहात. यामुळेच तुमचे दोघांचे सामर्थ्य काय आहे, हे सर्व लोकांनी पूर्ण जाणले आहे. २ अनेक ठिकाणी वस्ती करून राहिलेल्या मोठ्या जनतेच्या ईश्वरत्वाला प्राप्त झालेले, स्वकीय बलाने परकीयांच्या बलाचा पराभव करणारे, हविर्द्रव्यरूपी अन्नाची इच्छा करणारे आणि यज्ञामध्ये एकाच वेळी बोलावण्यात येणाऱ्या

अशा इंद्र व अग्नी या देवांची जो यजमान सेवा करीत असतो, तो आपल्या शत्रूचा नाश करतो आणि तो सर्व लोकांना अन्नाचे दान करतो. ३ हे इंद्राग्नीहो, युध्दांमध्ये साहाय्य करावयासाठी रणांगणावर जाण्यात व यजमानांची बोलावणी असतील तेथे त्यांच्याकडून अर्पिल्या जाणाऱ्या हविर्द्रव्यांचा स्वीकार करण्याकरिता यज्ञाच्या ठिकाणी जाण्यात तुम्ही सर्व मनुष्यांच्याहून अत्यंत थोर आहात. पृथ्वी व द्युलोक यांच्याहून तुम्ही आपल्या ठिकाणच्या महिम्याने अत्यंत थोर आहा. सर्व समुद्रांपेक्षा आणि सर्व पर्वतांच्या पेक्षाही तुम्ही आपल्या माहात्म्याने अत्यंत वरिष्ठ आहात. इतकेच नव्हे तर अखिल विश्वात असणाऱ्या सर्व वस्तूंच्या पेक्षाही तुम्ही उभयतां अत्यंत मोठे आहात. ४ इतरांच्याहून विशेष तेजस्वी असणाऱ्या मरुतांनो, द्युलोकातून येणारे तुम्ही ज्या यजमानाच्या घरी राहून त्याचे रक्षण करता, तो यजमान इतर मनुष्यांचा उत्तम संरक्षक होतो. ५ हे मरुत् हो, तुम्ही यज्ञाचे निर्वाहक आहा. यज्ञाच्या निमित्तांनी अथवा विप्रवर्णीय अशा यजमानाच्या ठिकाणी तुमच्या विषयी असणाऱ्या सादर मनोवृत्तींच्यावर अनुग्रह करण्यासाठी माझे हे आव्हान नीट श्रवण करा. ६ हे मरुत् पूर्व दिशेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांचे रूप धारण करून सर्व प्राण्यांनी आपल्या जीवनासाठी आश्रय करण्यास योग्य अशा उदकाचा आश्रय करतात आणि अत्यंत चमकदार अशा सूर्यकिरणांच्याशी एकजीव होऊन मेघवृष्टीच्या द्वारा सर्व पृथ्वीला भिजवून चिंब करून टाकण्याची इच्छा करतात. याज्या-पुरोनुवाक्यारूपी ऋचांनी ऋत्विजांच्याकडून स्तविले गेले म्हणजे ते मरुत् सुमधुर अशा हविर्द्रव्यांचा आस्वाद ग्रहण करतात. मग उत्साहाच्या भरात आलेले ते मरुत् निरनिराळ्या प्रकारे शब्दघोष करीत करीत आपल्या घरी जातात. आपल्या कार्याला विघ्न करणाऱ्या असुरांच्यापासून निर्भय झालेले ते मरुत् मरुतांचे निवासस्थान म्हणून प्रसिध्द असलेल्या आपल्या आवडत्या स्थानाचा आनंदाने लाभ घेतात. ७ हे वरुणदेवा, तुझ्यासंबंधी आमच्याकडून घडणारे पाप आम्ही तुला घातलेल्या नमस्कारांनी शमन करू. त्याचप्रमाणे तुला अर्पण केलेल्या यज्ञसंबंधी हविर्द्रव्यांच्या योगाने शमन करू. शत्रुनिवारणसमर्था हे वरुणदेवा, उल्हसित चित्ताने शोभून राहणाऱ्या हे वरुणराजा, आमच्यावर अनुग्रह करण्यासाठी येथे राहून आम्हाकडून केली जाणारी पातके शिथिल कर. ८ हे वरुणा, आमच्या मस्तकाला जो तू फास घातला आहेस तो वरच्यावरच काढून घे. खाली पायाना जो फास घातला आहेस तो खालच्या

खालीच मोकळा कर आणि मध्येच कमरेला जो फास घातला आहेस तो तेथल्या तेथेच अगदी सैल करून टाक. नंतर, हे सूर्यसदृश वरुणदेवा, आम्ही निष्पाप होऊन तुझ्या आराधनरूप व्रताच्या ठिकाणी अखंड तत्पर राहण्यास योग्य होऊ. ९ प्रजापतीच्या संरक्षणशक्तीच्या योगानेच, सर्वदा वाढत राहणारा, मित्राप्रमाणे आम्हास प्रिय असलेला आणि आश्चर्यजनक असा हा यज्ञ आमच्याजवळ आला असून तो प्रजापतीच्या अत्यंत प्रबल अशा शक्तीने युक्त आहे. १० चालू असलेल्या यज्ञकर्माला योग्य, आपला अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करणारे, श्रवण करणाऱ्याच्या दु:खांचा परिहार करणारे, आमच्या मुखातच प्रविष्ट होऊन बसलेले, स्तुत्य अशा देवांना हृदयंगम वाटणारे आणि सुखकारक, आमच्या मुखातून उच्चारले जाणारे वाग्विशेष सृष्टिकर्ता प्रजापतिदेव यज्ञाच्या अगदी प्रारंभीच्या वेळेपासून आपल्या चित्तात नियोजित करीत असतो. ११ हे अग्ने, तू यज्ञकर्माचे फलरूपी धन आम्हास मिळावे म्हणून आम्हाला सन्मार्गाने ने. तू सर्व मार्ग जाणणारा आहेस. आमच्या कल्याणाच्या आड येणारे पाप आमच्यापासून दूर कर. नमस्कारपूर्वक अशा अनेक स्तोत्रांनी आम्ही तुझे पूजन करीत आहो. १२ जे यज्ञकर्म आम्ही करू शकू. ते सतत करण्यासाठी आम्ही त्याच देवांच्या मार्गावर पूर्णपणे आलो आहो. पथिकृत् नांवाचा अग्नी आमच्या हातून घडलेल्या प्रमादांचे क्षमापन कसे होईल हे जाणतो. तोच आमच्यासाठी यजन करतो. तो अग्नीच होता नामक ऋत्विज होऊन देवांना बोलावितो. तोच आमच्या हातून अंतरलेले यज्ञ परिपूर्ण करतो. आणि तोच आमच्याकडून उक्त अशा त्या त्या यज्ञातील विशिष्ट कालांचा झालेला अतिक्रमही व्यवस्थित करून घेतो. १३ देवांना पूज्य मानणारे, अत्यंत लांबीचा पल्ला थोड्या वेळात चालत जाणारे व शीघ्रगामित्वामुळे उत्कृष्ट निगा राखण्यास पात्र असे हे अश्व सर्पासारखे व लांडग्यासारखे राक्षसांना दंश करीत व दाढाखाली चुरडीत चालले आहेत आणि त्यांनी फारच थोड्या वेळात रोगांना आमच्यापासून दूर केले आहे. १४ हे अश्वहो, अन्न संपादन करण्याचा जो जो प्रसंग येईल अथवा धन संपादन करण्याचा जो जो प्रसंग येईल त्या त्या सर्व प्रसंगी तुम्ही आमचे रक्षण करा. ब्राह्मणाप्रमाणे शुद्ध, मरणरहित आणि जेथे जावयाचे आहे त्या प्रदेशाचे बरोबर ज्ञान असणाऱ्या हे अश्वाभिमानी देवहो, तुम्ही या नीवार धानाच्या भाताचा मधुर रस प्या आणि हर्षभरित व्हा. नंतर तृप्त झालेले तुम्ही, देव जातात त्या मार्गांनी

ठरलेल्या मर्यादेपर्यंत धावत चला. १५ हे अग्ने तुझे सर्व बल उदकात साठून राहिलेले असते. उदकांशी तादात्म्य करून तूच साळीचे भात, सातू इत्यादि धान्यांच्या ठिकाणी जाऊन पोचतोस व जठराग्रिरूपाने त्यांचा स्वीकार करतोस. अरणीच्या गर्भात दडी मारून बसलेला तू व्यक्त रूपाने पुन: पुन्हा जन्मास येतोस. १६ हे सोमदेव, उपासकांनी इच्छिलेल्या फलांचा तू वर्षाव करणारा आणि देदीप्यमान आहेस. तू पर्जन्यवृष्टी करणारा आहेस. कारण पर्जन्यवृष्टी करणे हे जणू तुझे व्रतच आहे. धर्म्य, अर्थात् पुण्यकारक अशा कर्मांचे तू इतरांनाही धारण करावयास लावणारा आहेस. १७ हे वरुणदेवा, माझे हे आव्हान म्हणजे निमंत्रण तू ऐक आणि आज आम्हाला सुखी कर. तुझ्याकडून माझ्या पालनाची इच्छा धारण करणारा मी तुझी गोड शब्दांनी दीर्घकाळ प्रार्थना करीत आहे. १८ हे वरुणदेवा, मला अपेक्षित असे ते रक्षण तुजकडून मिळविण्याकरता मंत्रपूर्वक नमस्कार करीतच मी तुझ्या सन्निध येत आहे. हा यजमान हविर्द्रव्याने तुझे आराधन करून अवश्य ते रक्षण मिळण्याकरता तुजजवळ याचना करीत आहे. हे वरुणदेवा, क्रोधरहित होऊन तू या यज्ञामध्ये आम्ही करीत असलेली विज्ञापना नीट लक्षात घे. पुष्कळांच्याकडून स्तविल्या जाणाऱ्या हे वरुणदेवा आमचे आयुष्य कमी करू नको. १९ हे अग्निदेवा, यागांचा निष्पादक, देवांची हविर्द्रव्ये अत्यंत निष्ठेने वाहून नेणारा व अत्यंत देदीप्यमान असा तू आमची तुझ्याविषयीची भक्ती जाणून आमच्यावर असलेला वरुणदेवाचा क्रोध पूर्णपणे नष्ट कर. त्याचप्रमाणे विरोधकांनी आमच्याविषयी केलेली द्वेषमूलक सर्व कृत्ये आमच्यापासून दूर कर. २० हे अग्निदेवा, हा उष:काल उलटल्यावर लागलीच होणाऱ्या प्रात:काळी आमच्याजवळ येणारा तू आपल्या रक्षणसामर्थ्याने आमचे रक्षण करणारा हो. वरुणाकडून केले जाणारे जितके त्रास आहेत ते सर्व नाहीसे कर. आमच्या यज्ञशालेत रमणात होऊन सुखाचे साधन असे आमचे हविर्द्रव्य भक्षण कर आणि नंतर सुखाने बोलाविणे करण्याला तू शक्य हो. (अनुवाक ११).

प्रपाठक ३

१ हे इष्टके, तुला मी उदकाच्या प्रवाहावर ठेवतो. २ हे इष्टके, उदकाच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या लाटा व तरंग यांच्या ठिकाणी मी तुला स्थापन करतो. ३ हे इष्टके, उदकाच्या ठिकाणी भासणाऱ्या शुभ्रवर्णावरच

मी तुला मांडून ठेवतो. ४ हे इष्टके, उदकाच्या ठिकाणी दिसणाऱ्या निर्मल प्रकाशाचे ठिकाणी मी तुला स्थापन करतो. '५ हे इष्टके, उदकाला आधारभूत होणाऱ्या नदी किंवा विहीर यामध्ये मी तुला ठेवतो. ६ हे इष्टके, उदकाच्या प्रौढतीररूपी गृहात तू बैस. ७ हे इष्टके, समुद्ररूपी घरात तू बसून रहा. ८ हे इष्टके, बांधून न काढलेला, पण वाहत येणाऱ्या उदकाला आधारभूत होणाऱ्या जमिनीच्या खळ्यात मी तुला ठेवीत आहे. ९ हे इष्टके, पाणी आटून शुष्क झालेल्या तलावातच जणू मी तुला मांडून ठेवतो. १० हे इष्टके, मेघामध्ये निष्पन्न होणाऱ्या पाषाणसदृश गारांच्या ठिकाणीच जणू मी तुला स्थापन करीत आहे. ११ हे इष्टके, उदकाचे जणू घरच अशा नदीच्या ठिकाणी मी तुला मांडून ठेवतो. १२ हे इष्टके, उदक आणि विद्युत ज्याच्या ठिकाणी राहतात त्या मेघावरच मी तुला स्थापन करतो. १३ हे इष्टके, उदकाच्या बुडाशी असलेल्या वाळूमध्ये मी तुला ठेवतो. १४ हे इष्टके, उदकाचे उत्पत्तिस्थान असलेल्या अग्नीच्या ठिकाणी मी तुला स्थापन करतो. १५ हे इष्टके, मेघांच्याकडून ज्या ज्या ठिकाणचे उदक आकर्षिले जाते अशा समुद्रांमध्ये मी तुला स्थापन करतो. १६ हे इष्टके, तू जणू गायत्री छंदच आहेस. १७ हे इष्टके, तू त्रिष्टुप्छंदस्वरूप आहेस. १८ हे इष्टके, तू जणू जगती छंद आहेस. १९ हे इष्टके, तू अनुष्टुप्छंदस्वरूप आहेस. २० हे इष्टके, तू जणू पंक्ति छंदच आहेस. (अनुवाक १).

१ ही इष्टका म्हणजे जणू काय ज्याच्या पासून जग उत्पन्न होते, असा पूर्व दिशेस राहणारा भुवनामक प्रजापतीच होय. 'भुव:' ह्या शब्दाने उपलक्षित असणाऱ्या प्रजापतीचे 'प्राण' हा अपत्य असून वसंत ऋतू हा त्या प्राणाचे अपत्य होय. 'गायत्री' छंद हा वसंतऋतुसंबध्द असून 'गायत्र' नांवाचे साम हे गायत्रीछंदसंबध्द आहे. 'गायत्र' सामापासूनच 'उपांशु' या नांवाचा सोमग्रह उत्पन्न होत असून 'उपांशु' ग्रहापासून 'त्रिवृत्' नामक 'स्तोम' उत्पन्न होत असतो. 'त्रिवृत्' स्तोमापासून 'रथंतर' साम, व 'रथंतर' सामापासूनच जणू 'वसिष्ठ' ऋषीची उत्पत्ती होते. हे इष्टके, प्रजापतीने स्वीकार केलेल्या तुज इष्टकेच्या मिषाने मी जणू काय सर्व प्रजांच्या प्राणांचाच या ठिकाणी संग्रह करीत आहे. २ मी येथे मांडीत असलेली इष्टका म्हणजे अखिल जगातील सर्व कर्मे ज्याच्या सत्तेने चालतात, अशा दक्षिण दिशेस राहणारा जणू काय 'विश्वकर्मा' नामक प्रजापतीच होय. जगातील सर्व कर्मांना प्रवृत्त

करणारे 'मन' हे त्या विश्वकर्मा प्रजापतीचेच अपत्य होय. ह्या मनापासून 'ग्रीष्म' ऋतू व ग्रीष्मऋतूपासून 'त्रिष्टुप्' छंदाची उत्पत्ती होत असते. 'त्रिष्टुप्' छंदापासून 'ऐड' या नांवाचे 'साम' व त्या 'ऐड' सामापासून 'अंतर्याम' नांवाचा 'सोमग्रह' उत्पन्न होतो. 'अंतर्याम' ग्रहापासून 'पंचदश' नामक स्तोम व पंचदश स्तोमापासून 'बृहत्' नामक 'साम' उत्पन्न होत असते. बृहत् सामापासून 'भरद्वाज' ऋषीची उत्पत्ती होते. हे इष्टके, प्रजापतीने आपुलकीने स्वीकृत केलेल्या तुज इष्टकेच्या रूपाने मी सर्व प्रजांचे मनच जणू येथे साठवीत आहे. ३ ही इष्टका म्हणजे पश्चिम दिशेस राहणारा व सर्व जगाला व्यापून राहणारा जणू 'विश्वव्यचा' नामक प्रजापतीच होय. विश्वव्यापक असे 'नेत्रेंद्रिय' हे त्या विश्वव्यापक प्रजापतीचेच अपत्य होय. ह्या नेत्रेंद्रियाचेच 'वर्षाऋतू' हे अपत्य असून वर्षाऋतूपासूनच 'जगती' छंद उत्पन्न झाला आहे. 'जगती' छंदापासून 'ऋक्ष' नांवाचे 'साम' उत्पन्न झाले असून त्या 'ऋक्ष' सामापासून 'शुक्र' नांवाचा 'सोमग्रह' उत्पन्न झाला आहे. शुक्र ग्रहापासून 'सप्तदश' स्तोम निर्माण झाला असून सप्तदश स्तोमापासून 'वैरूप' सामाची उत्पत्ती झाली आहे. 'वैरूप' सामापासून 'विश्वामित्र' ऋषी उत्पन्न झाला आहे. हे इष्टके, प्रजापतीने स्वीकार केलेल्या तुज इष्टकेच्या रूपाने मी जणू सर्व प्रजांचे चक्षुरिंद्रियच स्थापन करीत आहे. ४ ही इष्टका म्हणजे जणू काय सर्व जगाला प्रेरणा करणाऱ्या व उत्तर दिशेस राहणाऱ्या 'सुवः' नामक प्रजापतीचेच शरीर होय. ह्या 'सुव' नामक प्रजापतीचेच 'कर्णेंद्रिय' हे अपत्य होय. कर्णेंद्रियापासून 'शरद'ऋतू उत्पन्न होत असून त्या शरदृतूपासूनच 'अनुष्टुप्' छंदाची उत्पत्ती झालेली असते. 'अनुष्टुप्' छंदातून 'स्वार' नांवाचे 'साम' निष्पन्न होत असून 'स्वार' सामापासून 'मंथी' नांवाचा 'सोमग्रह' उत्पन्न झाला आहे. मंथिग्रहापासून 'एकविंश' नांवाचा स्तोम व त्या एकविंशस्तोमापासून 'वैराज' साम आणि 'वैराज' सामापासून 'जमदग्नी' ऋषीची उत्पत्ती होत असते. हे इष्टके, प्रजापतीने जिचा स्वीकार केला आहे, अशा तुज इष्टकेच्या रूपाने मी सर्व प्रजांचे 'श्रोत्रेंद्रियच' जणू या ठिकाणी ठेवीत आहे. ५ ही इष्टका म्हणजे जणू उर्ध्व दिशेस राहणारा व सर्व जग ज्याला जाणत आहे असा 'मति' नामक प्रजापतीच होय. 'मति' संज्ञक प्रजापतीचेच 'वाणी' हे इंद्रिय अपत्य असून 'वाणी' पासून 'हेमंत'ऋतू उत्पन्न झाला आहे. 'हेमंत' ऋतूपासून 'पंक्ति' नामक छंद व पंक्तिछंदापासून 'निधनवत्' नांवाचे

साम निष्पन्न होत असते. 'निधनवत्' सामापासून 'आग्रयण' संज्ञक 'सोमग्रह' उत्पन्न होत असून 'आग्रयणा'पासून 'त्रिणव' व 'त्रयस्त्रिंश' नांवाचे दोन 'सोम' उत्पन्न होत असतात. 'त्रिणव' व त्रयस्त्रिंश' ह्या दोन सोमांच्या पासूनच 'शक्कर' आणि 'रैवत' ह्या दोन सामांची निर्मिती होत असते. 'शाक्कर' व 'रैवत' ह्या दोन सामांपासून 'विश्वकर्मा' नामक ऋषी उत्पन्न झाला आहे. हे इष्टके, प्रजापतीने आपली म्हणून स्वीकारलेल्या तुज इष्टकेच्या रूपाने मी जणू काय सर्व प्रजांची वाणी म्हणजे वागिंद्रियच येथे स्थापन करीत आहे. (अनुवाक २).

१ हे इष्टके, दिशांमध्ये 'पूर्व', ऋतूंमध्ये 'वसंत' व देवतांमधील 'अग्नी' जणू तूच आहेस. संपादनीय अशा धनांमध्ये 'ब्राह्मण्य' रूपी धन तू आहेस. स्तोमांच्यापैकी 'त्रिवृत्' स्तोम तूच असून 'त्रिवृत्' स्तोम हाच 'पंचदश' नामक स्तोमाचा प्रवर्तक आहे. अनेकविध वयोमानांमध्ये 'त्र्यवि' संज्ञक दीडवर्षाचे वयोमान म्हणजे तूच होय. चार युगांपैकी 'कृत' नांवाचे 'युग', वाऱ्यांमध्ये पूर्व दिशेस वाहणारा वारा, आणि ऋषीगणांपैकी 'सानग' नांवाचा ऋषी देखील तूच आहेस. २ हे इष्टके, दशदिशांपैकी दक्षिण, ऋतूंतील 'ग्रीष्म' व देवतांमधील 'इंद्र' जणू तूच आहेस. क्षत्र किंवा क्षात्रतेज नामक संपादनीय धन तूच असून स्तोमांच्यापैकी 'पंचदश' स्तोम तूच आहेस. हाच 'पंचदश' स्तोम 'सप्तदश' स्तोमाचा प्रवर्तक आहे. वयोमानांमध्ये 'दित्यवाट्' नांवाचे द्विवर्षात्मक वयोमान म्हणजे तूच आहेस. युगांपैकी 'त्रेत्रा' युग तूच असून दक्षिण दिशेस वाहणारा वारा व सनातन, नांवाचा ऋषी सुध्दा तूच आहेस. ३ हे इष्टके, तू म्हणजे जणू काय, दिशांच्या पैकी 'पश्चिम दिशा', ऋतूंमधील 'वर्षाऋतू', देवगणांमधील 'विश्वेदेव' आणि संपादनीय अशा धनांमध्ये 'वैश्यवृत्ति' रूपी धन तूच आहेस. स्तोमांपैकी 'सप्तदश' नांवाचा 'स्तोम' तूच असून हा 'सप्तदश' स्तोमच 'एकविंश' नामक स्तोमाचा प्रवर्तक आहे. वयोमानामध्ये 'त्रिवत्स' संज्ञक तीन वर्षांचा काल आणि चार युगांपैकी 'द्वापर' नांवाचे युगही तूच आहेस. वाऱ्यांपैकी पश्चिमेकडील वारा आणि ऋषींच्या समुदायातील 'अहभून' नांवाचा ऋषी सुध्दा तूच आहेस. ४ हे इष्टके, दिशांमधली 'उत्तर' दिशा, ऋतूंमधला 'शरद्'ऋतू, देवांपैकी 'मित्रावरुण' नामक देव, संपादन करण्याला योग्य अशा धनांपैकी समाजाच्या उत्कर्षास पोषक असे 'सेवावृत्ती', रूपी धन, 'एकविंश' स्तोम त्याचप्रमाणे हा एकविंश स्तोमच ज्या 'त्रिणव' नामक

स्तोमाला प्रवर्तित करतो, तो 'त्रिणव' स्तोम, 'तुर्यवाट्' संज्ञक साडेतीन वर्षांचा काल, युगांपैकी धर्माचा सर्वत्र ऱ्हास करून सोडणारे 'कलि' युग, उत्तरेकडचा वारा आणि 'प्रत्न' नांवाचा ऋषी हे सर्व जणू तूच आहेस. ५ हे इष्टके, दिशांच्या पैकी ऊर्ध्वदिशा, ऋतूंमधील 'हेमंत' व 'शिशिर' हे दोन ऋतू, देवतांच्या मधली 'बृहस्पति' देवता, सर्वांच्यावर वर्चस्व राहील अशा प्रकारचे 'बलसंपादन' रूपी धन, 'त्रिणव' नांवाचा 'स्तोम', त्याच स्तोमापासून निष्पन्न होणारा 'त्रयस्त्रिंश' नामक स्तोम, पष्ठवाट् संज्ञक चतुर्वर्षात्मक काल, युगांपैकी कलियुगाचा धर्माला पूर्णपणे रसातळाला नेणारा 'अभिभू' नामक अंतकाल, निरनिराळ्या रीतीने स्वैर वाहणारा 'विष्वग्वात' नांवाचा वारा आणि 'सुपर्ण' नांवाचा ऋषी सुध्दा तूच आहेस. ६ हे पितर हो, हे पितामह , आणि हे प्रपितामहादि पूर्वज हो, त्याचप्रमाणे अलीकडील बंधुपुत्रादिकांनो, जे जे म्हणून तुम्ही आमचे आहा, त्या सर्वांनी आमच्या कर्मानुष्ठानाचे पालन करावे. आमचे जे पूर्वज आणि अलीकडील बंधुपुत्रादि असतील ते सर्व आमचे संरक्षण करोत. आज समाजात विद्यमान असणारी ब्राह्मण व क्षत्रिय जाती, अखिल समाजाच्या अंत:करणात असणारी उत्कृष्ट कामना, ब्राह्मणांच्या ठिकाणी असणारी राजपौरोहित्य वृत्ती, यावेळी चालू असलेले अग्निचयनरूप कर्म, आणि यजनासाठी देवतांना केले जाणारे आव्हान ह्या सर्वांच्या ठिकाणी हे इष्टके, मी तुला स्थापन करतो. (अनुवाक ३).

१ हे इष्टके, तू अखंड स्थिर अशा निवासभूमीवर मांडली जात आहेस, तुझ्या निर्मितीला कारणभूत होणारी मृत्तिका देखील विनाशरहित आहे. निरनिराळ्या मसाल्यांच्या मिश्रणाने कमावलेल्या मृत्तिकेने तुझी निर्मिती झाली असल्यामुळे तू स्वत: निरंतर टिकाऊ अशीच आहेस. आम्ही मांडून ठेवण्यास योग्य अशी तू अचल अशा ह्या अग्निचयन स्थलाच्या ठिकाणी येऊन बैस. तू जेथे मांडली जात आहेस, ते उखा नामक शेगडीत प्रज्वलित झालेल्या अग्नीची ओळख पटविणारे ठिकाण पूर्वीच तयार करून ठेवलेले आहे. यास्तव, पूर्व दिशेस असणाऱ्या या ठिकाणी देवांचे अध्वर्यू असलेले उभयता अश्विनीकुमार तुला स्थापन करोत. २ हे इष्टके, व्यवहारदक्ष अशा पुत्रांच्या घरी पिता राहतो, त्याप्रमाणे तू देवांच्यामध्ये स्वकीय शरीराने सुशोभित होऊन ह्या ठिकाणी बसून रहा. या ठिकाणची जमीन विस्तृत, रमणीय आणि निवासाला सुखकर अशी आहे. हे इष्टके, पुत्रासाठी पिता ज्याप्रमाणे

सर्वतोपरी सुखाने सेवा करण्यास शक्य होतो, त्याप्रमाणे सुखाने सेवा करण्या योग्य अशी हो. देवांचे अध्वर्यू असणारे अश्विनीकुमार तुला येथे स्थापन करोत. ३ हे इष्टके, तू आपल्या निवासस्थानी राहणारी व धनप्रद अशी आहेस. तू आम्हाला दीर्घायुष्य संपादन करून देणारी होऊन आमच्या करिता भरपूर धन व पराक्रमी असा उत्कृष्ट पुत्र संपादन कर. आमच्या बुध्दीच्या ठिकाणी असणारे मंदत्व, व पाप निःशेषपणे नष्ट करणारी अशी तू यजमानाला तो धनसमृध्दीने चांगला पुष्ट होईल इतके धन चोहोकडून संपादन करून देणारी हो. इतकेच नव्हे तर स्वर्गलोकाच्या ठिकाणी देखील यजमानासाठी सर्वप्रकारच्या सुखाचा परिपोष संपादन करून ठेव. देवांचे अध्वर्यू अश्विनीकुमार तुला या ठिकाणी स्थापन करोत. ४ हे इष्टके, देवांच्या जवळ जाऊन पोचणारी तू चितिरूपी अग्नीची पूरक अशी वस्तू आहेस. अशा प्रकारे उपयुक्त असणाऱ्या तुज इष्टकेची सर्व देव सर्व ठिकाणी कीर्ती गावोत. सर्व प्रकारच्या स्तोमांनी युक्त अशा पृष्ठसंज्ञक स्तोत्रांनी स्तविली जाणारी व आहुतिरूपाने दिल्या जाणाऱ्या घृताने युक्त अशी तू या ठिकाणी स्थिर हो. आणि आम्हाला पुत्रपौत्रासहित धन सर्व ठिकाणातून मिळवून दे. देवांचे अध्वर्यू अश्विनीकुमार तुला येथे स्थापन करोत. ५ हे इष्टके, तू जणू काय द्युलोकाचे मस्तक असलेला आदित्य, पृथ्वीचे नाभिस्थानच असलेले मेरू इत्यादि पर्वत, तसेच पूर्व इत्यादि दिशांना जागच्या जागी स्तंभित करणारी आणि सर्व भुवनांचे अधिकतेने पालन करणारी आहेस. त्याचप्रमाणे उदकाच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या लाटा व लहान लहान तरंग देखील तूच असत विश्वकर्मा प्रजापती हा तुझा द्रष्टा आहे. देवांचे अध्वर्यू असलेले अश्विनीकुमार तुला या ठिकाणी ठेवोत. हे इष्टके वसंतादिऋतू, विविध प्रकाराने जगाचे पोषण करणारे ब्रह्मादिक देव, वसू, रुद्र, आदित्य, विश्वेदेव व प्रसिध्द असे सर्व देव हे जशी तुझ्यावर प्रीती करतात, त्याचप्रमाणे तूही ह्या सर्वांच्याशी तितकीच प्रीती करणारी आहेस. आता सांगितलेले सर्वच देव आपल्या उपासकाला दीर्घायुष्य देणारे आहेत. अशा प्रकारच्या आयुष्यप्रद असणाऱ्या सर्व देवांच्याशी सारखेच प्रेम करणाऱ्या तुज इष्टकेला सर्व पुरुषांच्या ठिकाणी जठराग्नीरूपाने राहून त्यांचे हित करणाऱ्या 'वैश्वानर' संज्ञक अग्नीला संतुष्ट करण्यासाठी मी या ठिकाणी मांडून ठेवीत आहे. देवांचे अध्वर्यू असलेले अश्विनीकुमार मांडलेल्या ठिकाणी तुला सदैव अचल अशी स्थापन करोत.

हे इष्टके, माझ्या 'प्राण' वायूचे संरक्षण कर. माझ्या 'अपान' वायूचे संरक्षण कर. सर्वशरीरगत अशा माझ्या 'व्यान' वायूचे रक्षण कर. तू आपल्या विशाल दृष्टीच्या योगाने मलाही विशाल दृष्टी देऊन समर्थ कर. आणि नाना प्रकारचे वेदशास्त्रादि ग्रंथ यथार्थ समजतील अशा प्रकारची श्रवणशक्ती मला दे. हे इष्टके, सर्व ठिकाणच्या उदकांना तू वृध्दिंगत कर. सर्व ओषधींना तू प्रफुल्लित कर. मनुष्यमात्राच्या शरीराचे तू पालन कर. प्रत्येक चतुष्पाद पशूचे रक्षण कर. आणि द्युलोकातून सभोवतालच्या सर्व प्रदेशांत पर्जन्यवृष्टी होईल असे कर. (अनुवाक ४).

१ हे इष्टके, तीन षण्मासात्मक असा दीडवर्षाचा काल व 'त्रिष्टुप्' छंद जणू तूच आहेस. २ हे इष्टके, 'दित्यवाट्' संज्ञक दोन वर्षाचा काल व 'विराट्' छंद जणू तूच आहेस. ३ हे इष्टके, 'पंचावी' म्हणजे अडीचवर्षांचा काल व 'गायत्र' संज्ञक छंद तूच आहेस. ४ 'त्रिवत्स' किंवा तीन वर्षांचा काल व 'उष्णिक' किंवा 'उष्णिहा' नांवाचा छंद तूच आहेस. ५ हे इष्टके, 'तुर्यवाट्' संज्ञक साडेतीन वर्षांचा काल आणि 'अनुष्टुप्' नांवाचा छंदही पण तूच आहेस. ६ हे इष्टके, 'षष्ठवाट्' नामक चार वर्षांचा काल व 'बृहती' संज्ञक छंद तूच आहेस. ७ खोंड 'अंडिल' होण्यास लागणारा 'उक्षा' किंवा साडेचार वर्षांचा काल व 'सतोबृहती' नांवाचा छंद तूच आहेस. ८ कोणताही बैल कामास लावण्याच्या स्थितीत येण्यास जितका काळ लागतो, तितका काळ व 'ककुत्' नांवाचा छंद तूच आहेस. ९ गाय दूध देण्यास योग्य होण्याइतका काल व 'जगती' नांवाचा छंद तूच आहेस. १० हे इष्टके, बैल गाडी ओढण्यास योग्य असा होण्यास जितका काळ लागतो तितका काल व 'पंक्ति' नामक छंद तूंच आहेस. ११ बोकड वयात येण्यांला लागणारा काल व 'विवल' नांवाचा छंदही तूच आहेस. १२ हे इष्टके, मेंढा वयात येण्यास लागणारा काळ, व 'विशाल' नामक छंद तूच आहेस. १३ पुरुष तारुण्यात येण्यास लागणारा काळ व 'तंद्र' नांवाचा छंद तूच आहेस. १४ वाघ वयात येण्यास लागणारा काळ व 'अनाधृष्ट' नांवाचा छंद तूच आहेस. १५ सिंह वयात येण्यास लागणारा काळ व 'छदि' नामक छंद तूच आहेस. १६ सृष्टीची सुस्थिती होण्यास लागतो तितका काळ व 'अधिपति' नांवाचा छंद तूच आहेस. १७ हे इष्टके, ब्राह्मण समाजामधील ब्राह्मण्य प्रबल होण्यारा लागतो तितका काळ व 'मयन्द' नांवाचा छंद तूच आहेस. १८ विश्वकर्म्याच्या

आयुष्याइतका काळ व 'परमेष्ठी' नांवाचा छंद तू आहेस. १९ काळांचा शिरोभागच अशा द्युलोकाचे अस्तित्व जितक्या काळ असते तितका काळ व 'प्रजापति' नांवाचा छंद देखील तूच आहेस. (अनुवाक ५).

१ हे इंद्राग्नीहो, तुम्ही दोघे मी मांडीत असलेली 'स्वयमातृण्णा' नांवाची इष्टका ह्या ठिकाणी पक्की बसवा. ही इष्टका आपल्या पृष्ठभागाने पृथिवी, अंतरिक्ष व द्युलोक यांना व्यापून राहो. २ हे स्वयमातृण्णे, जगातील सर्व कर्मांचा निर्वाहक असा विश्वकर्मा नामक प्रजापती तुला अंतरिक्ष लोकाच्या पृष्ठभागी स्थापन करो. हे स्वयमातृण्णे, तू स्पष्ट दिसणाऱ्या अवयवांनी, विस्ताराने, प्रभेने व विद्वान् अशा ऋत्विंजांनी युक्त अशी आहेस. इतकेच नव्हे तर या ठिकाणी मांडलेली तू स्वयमातृण्णा म्हणजे द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वी सर्वतोपरी प्रकाशित करणारी आहेस. हे स्वयमातृण्णे, तू सर्व अंतरिक्ष, गंधर्व, अप्सरा इत्यादिकांना वस्ती करावयास योग्य करून दे. आणि त्यांचे धारण पोषण करून त्यांच्यावर नियंत्रण ठेव. अंतरिक्षाला निरुपद्रवी आणि स्थिर कर. त्या अंतरिक्षाचा नाश करू नको. अखिल विश्वातील प्राण्यांना, त्यांचे जीवन नीट होईल, अशाप्रकारे प्राण, अपान, व्यान व उदान ह्या चार वायूंच्या अनुकूल वृत्तीचा लाभ व्हावा, त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी आणि त्यांचे जीवनचरित्रही उज्वल व्हावे, म्हणून हे स्वयमातृण्णे, जगत्संचारी असा हा वायू महनीय अशा योगक्षेमरूपी संपत्तीने आणि सुखकर अशा विशिष्ट तेजस्वितेने त्या सर्व प्राण्यांचे सर्व बाजूंनी संरक्षण करो. तुझ्या ठिकाणी स्वामित्व करणारी जी देवता असेल, तिच्या अनुग्रहाने तू ह्या ठिकाणी स्थिर होऊन बैस. अंगिरसांच्या अग्निचयनामध्ये जशी तू त्यांनी ठेवलेल्या ठिकाणी स्थिर होऊन बसलीस, तशीच तू येथे बसून रहा. ३ हे इष्टके, तू जणू काय उज्वल प्रकाशमान अशी पूर्व दिशाच आहेस. ४ हे इष्टके, विविध रूपाने प्रकाशित होणारी तू दक्षिण दिशाच आहेस. ५ हे इष्टके, उत्कृष्ट तेजाने शोभायमान असणारी तू पश्चिम दिशा आहेस. ६ हे इष्टके, स्वयंप्रकाशाने तळपणारी तू उत्तर दिशाच आहेस. ७ हे इष्टके, अखिल जगाचे सर्वांपेक्षा अधिकतेने पालन करणारी तू जणू काय प्रौढ अशी ऊर्ध्व दिशाच आहेस. ८ हे इष्टके, तू माझ्या आयुष्याचे संरक्षण कर. ९ हे इष्टके, तू माझ्या प्राणवायूला सुरक्षित ठेव. १० हे इष्टके, तू माझ्या अपान वायूचे रक्षण कर. ११ हे इष्टके, तू माझ्या शरीरात असलेल्या व्यान वायूचे

संरक्षण कर. १२ तू माझ्या नेत्रेंद्रियाचे रक्षण कर. १३ हे इष्टके, तू माझ्या कर्णेंद्रियाचे रक्षण कर. १४ हे इष्टके, तू माझ्या मनाला समाधानात ठेव. १५ हे इष्टके, तू माझ्या वाणीला प्रौढपणा आण. १६ हे इष्टके, तू माझ्या जीवात्म्याचे संरक्षण कर. १७ हे इष्टके, तू मला प्रकाश दे. (अनुवाक ६).

१ हे इष्टके, तू 'मा' नांवाचा छंद म्हणजे 'वृत्त' आहेस. २ हे इष्टके, तू 'प्रमा' नांवाचा छंद आहेस. ३ हे इष्टके, तू 'प्रतिमा' नामक छंद आहेस. ४ हे इष्टके, तू 'अस्त्रीवि' नांवाचा छंद आहेस. ५ हे इष्टके, तू 'पंक्ति' नांवाचा छंद आहेस. ६ हे इष्टके तू 'उष्णिहा' नांवाचा छंद आहेस. ७ तू 'बृहती' छंदच आहेस. ८ हे इष्टके, तू जणू 'अनुष्टप्' छंदच आहेस. ९ हे इष्टके, तू जणू 'विराट्' छंद आहेस. १० हे इष्टके, तू 'गायत्री' छंद आहेस. ११ हे इष्टके तू 'त्रिष्टुप्' छंद आहेस. १२ हे इष्टके, तू 'जगती' छंद आहेस. १३ हे इष्टके, तू 'पृथिवी' छंद आहेस. १४ तू 'अंतरिक्ष' छंद आहेस. १५ तू 'द्यौ' नांवाचा छंद आहेस. १६ हे इष्टके, तू 'रूपा' नामक छंद आहेस. १७ हे इष्टके, तू 'नक्षत्र' नांवाचा छंद आहेस. १८ हे इष्टके, तू 'मन' नांवाचा छंद आहेस. १९ हे इष्टके, तू 'वाक्' नांवाचा छंद आहेस. २० हे इष्टके, तू 'कृषि' नामक छंद आहेस. २१ हे इष्टके तू 'हिरण्य' नांवाचा छंद आहेस. २२ हे इष्टके तू 'गौ' नांवाचा छंद आहेस. २३ हे इष्टके, तू 'अजा' नांवाचा छंद आहेस. २४ हे इष्टके, तू जणू काय 'अश्व' नांवाचा छंदच आहेस. २५ हे इष्टके, तू 'अग्नी' नांवाची देवता आहेस. २६ हे इष्टके, तू 'वायू' नांवाची देवता आहेस. २७ हे इष्टके, तू 'सूर्य' नामक देवता आहेस. २८ हे इष्टके, तू 'चंद्रमा' नांवाची देवता आहेस. २९ हे इष्टके, तू 'वसू' नांवाची देवता आहेस. ३० हे इष्टके, तू 'रुद्र' नांवाची देवता आहेस. ३१ हे इष्टके तू 'आदित्य' नांवाची देवता आहेस. ३२ हे इष्टके, तू 'विश्वेदेव' नांवाची देवता आहेस. ३३ हे इष्टके, तू 'मरुत्' नांवाची देवता आहेस. ३४ हे इष्टके, तू 'बृहस्पति' नामक देवता आहेस. ३५ हे इष्टके तू 'इंद्र' नांवाची देवता आहेस. ३६ हे इष्टके 'वरुण' नांवाची देवता जणू तूच आहेस. ३७ हे इष्टके, तू मस्तकाप्रमाणे उंच आहेस. ३८ हे इष्टके तू शोभणारी आहेस. ३९ हे इष्टके तू निश्चल राहणारी आहेस. ४० हे इष्टके तू जगाचे

धारण व्हावयास कारणभूत होणारी आहेस. ४१ हे इष्टके तू स्वत:वर नियंत्रण ठेवणारी आहेस. ४२ हे इष्टके, तू सर्वांचे नियमन करणारी आहेस. ४३ हे इष्टके आम्हाला अन्न, बल, कृषिसंपत्ती आणि प्राप्त झालेल्या सर्व वस्तूंची संरक्षणशक्ती प्राप्त व्हावी, म्हणून मी तुला या ठिकाणी स्थापन करीत आहे. ४४ हे इष्टके, तू नियमितपणे राहणारी आहेस. ४५ हे इष्टके, तू स्वत:च्या प्रभावाने शोभून राहणारी आहेस. ४६ हे इष्टके, तू सतत स्थिर राहणारी आहेस. ४७ हे इष्टके, तू सर्व जगाच्या धारणाला कारणभूत होणारी आहेस. ४८ हे इष्टके, तू सर्व जगाचे धारण करणारी आहेस. ४९ हे इष्टके, तू सर्वांना आधारभूत अशी भूमीच आहेस. ५० हे इष्टके, आम्हाला आयुष्य, उत्कृष्ट कांती, बलोत्पादक असा 'ओज' नामक आठवा धातू आणि कार्यक्षम असे बल प्राप्त व्हावे, म्हणून मी तुला या ठिकाणी स्थापन करतो. (अनुवाक ७).

१ हे इष्टके, स्वभावत: शीतल अर्थात् आल्हादकारक असा 'त्रिवृत्' नांवाचा स्तोम जणू काय तूच आहेस. २ हे इष्टके, स्वत:च्या स्वरूपाने भासमान होणारा 'पंचदश' नांवाचा स्तोम जणू तूच आहेस. ३ हे इष्टके, आकाशरूप असणारा 'सप्तदश' नामक स्तोम तूच आहेस. ४ हे इष्टके, अत्यंत त्वरित कार्य करणारा 'अष्टादश' नांवाचा स्तोम, जणू काय तूच आहेस. ५ हे इष्टके, तप:स्वरूप असा 'नवदश' नामक स्तोम तूच आहेस. ६ हे इष्टके, 'अभिवर्त' संज्ञक सामाधारभूत ऋचांचा वीस आवृत्तींनी सिध्द होणारा 'सविंश' नामक स्तोम तूच आहेस. ७ हे इष्टके, धारक असा 'एकविंश' नामक स्तोम तूच आहेस. ८ हे इष्टके, बलोत्पादक असा 'द्वाविंश' नांवाचा स्तोम जणू तूच आहेस. ९ हे इष्टके, उत्तमप्रकारे पोषण करणारा 'त्रयोविंश' नांवाचा स्तोम तूच आहेस. १० हे इष्टके, प्रजोत्पादक असा 'चतुर्विंश' स्तोम जणू तूच आहेस. ११ हे इष्टके, गर्भरूप असा 'पंचविंश' स्तोम जणू तूच आहेस. १२ हे इष्टके, शरीराच्या ठिकाणी बलोत्पादक असा 'ओज' नांवाचा आठवा धातू उत्पन्न करणारा 'त्रिणव' नांवाचा स्तोम तूच आहेस. १३ हे इष्टके, ज्योतिष्टोमादि पुरुष असणारा 'एकत्रिंश' नांवाचा स्तोम तूच आहेस १४ हे इष्टके, सुस्थितीला कारणभूत अशा प्रतिष्ठेला कारणभूत होणारा 'त्रयस्त्रिंश' नांवाचा स्तोम तूच आहेस. १५ हे इष्टके, आदित्याचे जणू निवासस्थानच असा 'चतुस्त्रिंश' नामक स्तोम तूच आहेस.

१६ हे इष्टके, स्वर्गलोकरूप असलेला 'षट्त्रिंश' नांवाचा स्तोम तूच आहेस. १७ हे इष्टके, विपरीतत्वाने वर्तणारा 'अष्टाचत्वारिंश' नामक स्तोम तूच आहेस. १८ हे इष्टके, सर्वांचे धारण करणारा 'चतुष्टोम' नांवाचा स्तोमही पण तूच आहेस. (अनुवाक ८).

१ हे इष्टके, अग्नीचा हविर्द्रव्यरूपी भाग, दीक्षा देवतेचे स्वामित्व, देवांना अत्यंत प्रिय असलेले मंत्रवाङ्मय आणि 'त्रिवृत्' संज्ञक 'स्तोम' जणू काय, तूच आहेस. २ हे इष्टके, इंद्राचा हविर्द्रव्यरूपी भाग, सर्वव्यापक अशा परमेश्वराचे आधिपत्य, सर्वांच्या प्रीतीला कारणभूत होणारे बल आणि 'पंचदश' नामक 'स्तोम' जणू तूच आहेस. ३ हे इष्टके, वेदाचा स्पष्ट उच्चार करणाऱ्या ऋत्विजादि ब्राह्मणांचा दक्षिणारूपी भाग, प्रजापतीचे आधिपत्य, सर्वांच्या ठिकाणी प्रीती उत्पन्न करणारे जननशील अन्न आणि 'सप्तदश' नांवाचा 'स्तोम' देखील जणू तूच आहेस. ४ हे इष्टके, 'मित्र' देवतेचा हविर्द्रव्यरूपी भाग, वरुणाचे स्वामित्व, द्युलोकातून होणारी पर्जन्यवृष्टी, सर्वांच्या प्रीतीला कारणभूत होणारे वारे आणि 'एकविंश' ह्या नांवाचा 'स्तोम' जणू तूच आहेस. ५ हे इष्टके, अदिती देवतेचा हविर्भाग, पूषादेवाचे आधिपत्य, सर्वांना प्रीतिजनक असणारे ओज व 'त्रिवृत्' नांवाचा 'स्तोमही तूच आहेस. ६ हे इष्टके, वसूंचा हविर्भाग, रुद्राचे पशुसमुदायावरील आधिपत्य, सर्वांना प्रीतिकारक असे चतुष्पाद पशू आणि 'चतुर्विंश' नांवाचा 'स्तोम' जणू तूच आहेस. ७ हे इष्टके, आदित्यांचा हविर्भाग, मरुतांचे आधिपत्य, मनुष्यांच्या व पशूंच्या उदराच्या ठिकाणी असणारे प्रीतिजनक गर्भ आणि 'पंचविंश' स्तोम जणू तूच आहेस. ८ हे इष्टके, सर्वप्रेरक अशा 'सविता' देवाचा हविर्भाग, बृहस्पतीचे आधिपत्य, उत्कृष्ट व सर्वांची प्रीती संपादन करणाऱ्या दिशा आणि 'चतुष्टोम' स्तोमही तूच आहेस. ९ हे इष्टके, शुक्लपक्ष व कृष्णपक्ष यांच्या मिश्रणाने बनणाऱ्या महिन्यांचा हविर्भाग, शुक्लकृष्णरूपाने मिश्रित नसलेल्या पंधरवड्यांचे आधिपत्य, प्रीतिजनक अशा पुत्रपौत्रादि प्रजा व 'चतुश्चत्वारिंश' नांवाचा 'स्तोम' जणू तूच आहेस. १० हे इष्टके, 'ऋभु' संज्ञक सर्व देवांचा हविर्भाग, 'विश्वेदेव' नांवाच्या देवगणाचे आधिपत्य, सर्वांनाच प्रीतिकारक असे बांधलेले घर आणि 'त्रयस्त्रिंश' नांवाचा स्तोम देखील जणू काय तूच आहेस. (अनुवाक ९).

१ पूर्वी महर्षींनी एकदा यज्ञाचे प्रसंगी सामाच्या एकाच ऋचेने देवतांचे

स्तवन केले. आणि त्याच्या प्रभावाने त्यांनी प्रजा निर्माण केल्या. तेव्हा त्या प्रजांचा 'प्रजापती' हा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'प्रजापती' जणू काय तूच आहेस. २ प्राचीन महर्षींनी यज्ञामध्ये एकदा सामासंबंधी तीन ऋचांनी देवतांची स्तुती केली व तिच्या प्रभावाने 'ब्राह्मण' जाती निर्माण केली. 'ब्रह्मणस्पति' हा त्या ब्राह्मण जातीचा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'ब्रह्मणस्पति' जणू तूच आहेस. ३ पूर्वकालीन ऋषींनी एका यज्ञामध्ये सामविषयक पांच ऋचांनी देवतांचे स्तवन केले. आणि पंचमहाभूते निर्माण केली. त्या वेळी, 'भूतांचा अधिपती' ह्या नांवाचा देव पृथिव्यादि पांच महाभूतांचा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'भूतांचा अधिपती' जणू काय तूच आहेस. ४ हे इष्टके, पूर्वीच्या ऋषींनी एकदा एका यज्ञात सात ऋचांनी देवतांचे स्तवन केले आणि त्या स्तवनाच्या प्रभावाने सात ऋषी निर्माण केले. तेव्हा 'धाता' नांवाचा देव त्या सप्तर्षींचा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'धाता' नामक देव जणू तूच आहेस. ५ हे इष्टके, पूर्वी ऋषींनी यज्ञामध्ये नऊ ऋचांचे गान करून देवांची स्तुती केली. व तिच्या प्रभावाने 'पितर' उत्पन्न केले. 'अदिती' ही त्या पितरांची स्वामिनी झाली. हे इष्टके, ती 'अदिती' म्हणजे जणू तूच आहेस. ६ हे इष्टके, एकदा ऋषींनी यज्ञाचे वेळी अकरा ऋचांनी सामगान करून देवतांची स्तुती करून त्यांना संतुष्ट केले. त्या स्तुतीच्या प्रभावाने त्यांनी वसंतादि सहा ऋतू निर्माण केले. मग 'आर्तव' नांवाचा देव त्या ऋतूंचा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'आर्तव' देव जणू तूच आहेस. ७ ऋषींनी एकदा एका यज्ञात सामसंबंधी 'तेरा' ऋचांनी देवांची स्तुती केली आणि तिच्या प्रभावाने 'महिने' निर्माण केले. तेव्हा 'संवत्सर' हा त्या महिन्यांचा अधिपती झाला. हे इष्टके, तू जणू काय तो 'संवत्सरच' आहेस. ८ प्राचीन काली ऋषींनी एका यज्ञात पंधरा ऋचांचे गायन करून देवांचे स्तवन केले आणि त्याच्या प्रभावाने त्यांनी 'क्षत्रिय' जाती निर्माण केली. 'इंद्र' हा त्या क्षत्रिय जातीचा अधिपती झाला. हे इष्टके, तो इंद्र जणू तूच आहेस. ९ हे इष्टके, एका यज्ञात ऋषींनी सतरा ऋचांनी देवांचे स्तवन केले. त्या स्तवनाने त्यांनी गाई, घोडे इत्यादि चतुष्पाद पशू उत्पन्न केले. बृहस्पती हा त्या पशूंचा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'बृहस्पती' जणू तूच आहेस. १० हे इष्टके, प्राचीन महर्षींनी एका यज्ञात एकोणीस ऋचांनी सामगान करून देवतांचे स्तवन केले. आणि त्याच्या प्रभावाने 'शूद्र'

आणि आर्य म्हणजे श्रेष्ठ असा वैश्यवर्ण निर्माण केला. दिवस आणि रात्र यांच्या अधिष्ठात्री देवता त्या वैश्य शूद्रांच्या स्वामिनी झाल्या. त्या अहोरात्राभिमानिनी दोन देवता म्हणजे जणू तूच आहेस. ११ हे इष्टके, एकवीस ऋचा गाऊन एकदा ऋषींनी यज्ञामध्ये देवांना स्तवन करून संतुष्ट केले. त्या स्तवनाच्या प्रभावाने त्यांनी घोड्यासारखे दर पायाला एकच खूर असणारे पशू निर्माण केले. मग त्या एकखुरी पशूंचा 'वरुण' हा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'वरुण' जणू तूच आहेस. १२ तेवीस ऋचांनी एकदा सामगान करून प्राचीन महर्षींनी देवांची स्तुती केली व तिच्या प्रभावाने उंदीर - मांजरासारखे क्षुद्र पशू त्यांनी निर्माण केले. तेव्हा त्या क्षुद्र पशूंचा 'पूषा' हा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'पूषा' म्हणजे जणू तूच आहेस. १३ पूर्वकालीन ऋषींनी एकदा पंचवीस ऋचांचे गान करून देवतांचे स्तवन केले. त्या स्तवनप्रभावापासून त्यांनी हरिण, वाघ इत्यादि अरण्यसंचारी असे पशू निर्माण केले. अरण्यनिवासी अशा त्या पशूंचा 'वायू' हा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'वायू' जणू तूच आहेस. १४ हे इष्टके सत्तावीस ऋचांनी सामाचे गायन करून एकदा एका यज्ञात ऋषींनी देवतांची स्तुती केली. त्या स्तुतीच्या सामर्थ्याने त्यांनी एकमेकांस चिकटून असलेल्या पृथ्वी व आकाश यांना एकमेकापासून 'अलग' केले. तेव्हा वसू, रुद्र व आदित्य हे एकत्र असलेले तीन देवसमुदाय परस्परांहून वेगळे झाले. द्युलोक व पृथ्वी ही दोघेही त्या वस्वादि देवगणांचे 'अधिपती' झाले. हे इष्टके, तो द्युलोक व पृथ्वी देखील जणू काय तूच आहेस. १५ एकोणतीस ऋचा गाऊन ऋषींनी यज्ञामध्ये देवांची स्तुती केली व तिच्या सामर्थ्याने त्यांनी सर्व प्रकारच्या 'वनस्पती' निर्माण केल्या. मग 'सोम' हा वनस्पतींचा अधिपती झाला. हे इष्टके, तो सोम म्हणजे जणू तूच आहेस. १६ प्राचीन काली महर्षींनी एका यज्ञात एकतीस ऋचांच्या आश्रयाने साम गाइले. आणि त्या सामगानाच्या प्रभावाने त्यांनी सर्व प्रजा निर्माण केल्या. महिने व पंध्रवडे यांच्या अधिष्ठात्री देवतांनी त्या सर्व प्रजांच्यावर 'आधिपत्य' केले. हे इष्टके, महिने व पंध्रवड्यांच्या त्या अधिष्ठात्री देवता जणू तूच आहेस. १७ पूर्वकालीन ऋषींनी एका यज्ञात तेहतीस ऋचांच्या आधारे सामगान करून देवांचे स्तवन केले. त्याच्या प्रभावाने त्यांनी सर्व प्राण्यांना उपद्रव रहित केले. सत्यलोकात राहणारा परमेष्ठीसंज्ञक प्रजापती हा त्या प्राण्यांचा अधिपती झाला. हे इष्टके, तो 'परमेष्ठी' नामक

प्रजापती देखील जणू काय तूच आहेस. (अनुवाक १०).

१ ही इष्टका म्हणजे जणू काय, सृष्टीच्या प्रारंभकाली विशेषतेने प्रकाशित होणारी जी पहिली पहाट तीच होय. सृष्टिकालीन अशी ती पहिली पहाट सूर्याशी संलग्न होऊन ह्या भूतलावर दररोज होणाऱ्या पहाटेच्या रूपाने संचार करीत असते. नवीन विवाह झालेली एखादी वधू ज्याप्रमाणे उत्तरोत्तर प्रजोत्पादन करीत असते, त्याप्रमाणे ही सृष्टिकालीन पहिली पहाट दैनंदिन प्रकाशित होणाऱ्या प्रभातकालांना उत्पन्न करीत असते. अत्यंत मोठेपणाला प्राप्त झालेले अग्नी, वायू सूर्य हे तीन् देव त्या सृष्टिकालीन पहिल्या पहाटेशी संबध्द होत असतात. सृष्टिकालीन पहिल्या पहाटेच्या रूपाने असलेली ही इष्टका मी येथे मांडतो. २ सृष्टिकालीन पहिली पहाट व दररोज प्रकाशित होणारी पहाट ह्या दोन्ही प्रभातसंज्ञक देवता भिन्न भिन्न रूपाने संचार करीत असतात. प्रलयकालरूपी रात्री अदृश्य झालेल्या जगाला दृश्य स्थितीत आणणाऱ्या दिवसाला प्रवर्तित करणारी एक पहाट असून रात्रीच्या अंधकाराला दूर करण्याचे कार्य दुसरी पहाट करीत असते. ह्या दोन्ही प्रभातसंज्ञक देवता छंदोयुक्त अशा वेदमंत्रांनी स्तविल्या जात असतात. त्या दोन्ही अत्यंत प्रकाशमान अशा असून कालाच्या सामान्य स्वरूपाच्या ठिकाणी संचार करीत असतात. म्हणजे सृष्टिकालीन महाप्रभात, अर्थात् मोठी पहाट व दैनंदिन प्रकाशित होणारी लहान पहाट ह्या दोघांचेही जन्मस्थान 'सामान्यकाल' हे एकच आहे. व ह्या जन्मस्थानास अनुसरूनच त्या दोन्ही प्रभातवेला वागत असतात. ह्या दोन्ही प्रभातवेला सूर्याच्या पत्नी असून स्वत: देवतारूपाने सर्वांना परिचित होत असतात. प्रकाशाच्या योगाने सर्व प्राण्यांना परस्परांच्या स्वरुपाचे ज्ञान उत्पन्न करून देणाऱ्या ह्या दोन्ही प्रभातवेला जरारहित आणि जगाच्या बहुविध व्यापाराला कारणभूत होत असतात. ह्या दोन प्रभातकालांचेच प्रतीक असलेली ही इष्टका मी या ठिकाणी स्थापन करतो. ३ यज्ञाच्या मार्गावर यज्ञाच्या संरक्षणासाठीच जणू काय तीन प्रभातवेला उदित झालेल्या दिसत आहेत. प्रकाशाच्या मूर्तीत असे अग्नी, वायू व आदित्य हे तीन देव सर्व जगाला आपल्या प्रकाशाचे दान करण्यासाठीच जणू काय यज्ञमार्गावर येऊन पोचले आहेत. प्रकाशमान अशा तीन प्रभातकालांमध्ये एक यजमानाची प्रजा रक्षण करते, दुसरी यजमानाच्या बलाचे संरक्षण करते आणि तिसरी देवांच्या अनुग्रहाची इच्छा करणाऱ्या अनेक यजमानांच्या कर्मानुष्ठानाचे संरक्षण करते. तिन्ही उष:कालाच्या

प्रतीकरूपाने असणारी ही इष्टका मी येथे मांडतो. ४ सृष्टीच्या प्रारंभी जी महान् अशी प्रभात (पहाट) प्रकाशित झाली ती वस्तुत: एकच असताना जगाच्या संरक्षणासाठी दिवसानुदिवस निरनिराळ्या रूपांनी प्रकाशित होत असल्यामुळे व्यवहारदृष्ट्या अनेक उषा उदित झालेल्या दिसतात. या अनेक उषांपैकी चवथी जी उषा तीच 'त्रिवृत्' इत्यादि चार 'स्तोमां' नी युक्त अशा 'अग्निष्टोम' यज्ञाच्या स्वरूपाला प्राप्त झाली आहे. हीच पहाट यज्ञरूपी पक्ष्याचे ठिकाणी त्याचे जणू दोन पंखच असे पूर्वापर भाव निर्माण करते. महान् अशी पहाटच यज्ञाचे निष्पादन करणारे ऋत्विज उत्पन्न करते. देवांच्या अर्चनात्मक योग्य असे अत्यंत प्रौढ 'स्तोम' जुळविते. गायत्री, त्रिष्टुप्, जगती व अनुष्टुभ् नांवाच्या चार छंदोभिमानी देवता, आणि स्वर्गप्राप्तिरूप फळ देणारे यज्ञकर्म यांचे सर्वतोपरी पोषणही करीत असते. चौथ्या पहाटेचे 'प्रतीक' च अशी ही इष्टका मी येथे मांडून ठेवतो. ५ दृश्यमान असलेल्या ह्या अखिल जगाला निर्माण करणाऱ्या प्रजापतीने पांच उष:कालाभिमानिनी देवतांच्या साहाय्यानेच हे जग निर्माण केले. याच पांच उषांना प्रत्येकी पांच पांच बहिणी उत्पन्न झाल्या. पहिल्या पांच 'उषा' आणि त्यांच्या मागून क्रमाने उत्पन्न झालेल्या त्यांच्या पंचवीस बहिणी, मिळून होणाऱ्या तीस [illegible] [illegible] [illegible] [illegible] सर्व अंगांना व्यापून राहणाऱ्या आहेत. सारांश, मुख्य अशा पांच [illegible] नाना प्रकारच्या रूपांना प्राप्त होत असतात. एक दररोजच्या 'अग्निहोत्र' होमाचे निष्पादन करते, दुसऱ्या दोन्ही दर्श व पूर्णमास नांवाचे दोन याग निर्माण करतात. चौथी सोमयागाच्या आधीच्या दिवशी होणाऱ्या अनुष्ठानाची निर्मिती करते आणि पांचवी सोमयागाच्या दिवशी होणाऱ्या अनुष्ठानाचे निष्पादन करते. ६ एका महिन्यामध्ये तिथींच्या रूपाने व्यक्त होणाऱ्या व परस्परांच्या बहिणी बहिणी असलेल्या तीस 'उषा' देवता अखंड चालू राहणाऱ्या अग्निहोत्रादि कर्माजवळ येऊन पोचतात. ह्या सर्व 'उषा'देवी एकाच तऱ्हेची प्रकाशरूपी कंचुकी धारण करणाऱ्या असून विद्वान अशा पुरुषाप्रमाणे त्या त्या दिवशी केल्या जाणाऱ्या प्रत्येक यज्ञकर्माचे स्वरूप मार्मिकतेने जाणत असतात. आपल्या पुन्हा पुन्हा प्रकाशण्याच्या योगाने ह्या 'उषा' वसंतादि ऋतूंचे संपादन करीत

असून ऋक्, यजु, साम अशा तीनही प्रकारच्या छंदोमंत्रांमध्ये विराजमान होणाऱ्या सूर्याच्या भोवती सर्व बाजूंना उदित होऊन प्रकाशत असतात. ७ ज्योतिरूपांनी चमकत राहणाऱ्या नक्षत्रांनी युक्त आणि सूर्योदय होण्याच्या पूर्वीच प्रकाशरूपाने व्यक्त झाली असल्यामुळे 'रात्र' ह्या संज्ञेस पात्र होणारी ही उषा सूर्याशी असलेला आपला अत्यंत निकट संबंध व्यक्त करण्यासाठीच जणू काय सूर्याच्या नियत कर्मांचे अनुकरण करून ह्याच्या किरणजालाप्रमाणेच भासमान होणारे किरणजाल कंचुकीप्रमाणे स्वत: धारण करते. अशा प्रकारच्या उषेच्या ठिकाणी गाई, म्हशी इत्यादि नाना रूपाचे व जातींचे पशू रात्रीच्या झोपेतून जागे व्हावे, त्याप्रमाणे जन्मास येताच आणि ह्या भूमातेच्या मांडीवर बसून नानाप्रकारचे लोकव्यवहार आपआपल्या नजरेने पाहत असतात. सूर्योदयापूर्वी प्रकाशमान होणाऱ्या नक्षत्रांनी युक्त अशा उषेच्या प्रतीकरूपाने असलेल्या या इष्टकेला मी या ठिकाणी मांडून ठेवतो. ८ माघ महिन्याच्या कृष्णपक्षातील 'एकाष्टका' संज्ञक अष्टमी तिथीच्या रूपाने प्रकाशित होणाऱ्या 'उषा' देवीने पुत्रप्राप्तीसाठी तप केले. आणि तपस्तेजाने तळपू लागलेल्या उषादेवीने स्वत:च्या उदरात गर्भरूपाने राहणाऱ्या इंद्राला उत्पन्न केले. त्या इंद्राने तस्करादिकांच्या रूपाने वावरणाऱ्या शत्रूंना व राक्षसांना आपल्या निरनिराळ्या शक्तींनी सर्वतोपरी पराभूत केले. एकाष्टका नामक तिथीच्या रूपाने असलेली ही इष्टका मी येथे मांडून ठेवतो. ९ हे 'एकाष्टका'देवींनो, पूर्वी यज्ञकर्मानुष्ठानशून्य अशा असलेल्या मज यजमानाला तुम्ही यज्ञकर्मानुष्ठानतत्पर केलेत. सत्य अशा धर्माचा तुम्ही सर्वांना उपदेश करीत असता. तुमच्या अनुग्रहाने सन्मार्गवर्ती झालेला मी तुम्हाला अशी प्रार्थना करतो की, हे एकाष्टका देवींनो, तुमचा पुत्र असलेल्या ह्या इंद्राच्या कल्याणासाठी जशा तुम्ही तत्पर असता, त्याचप्रमाणे मी देखील इंद्राचा अनुग्रह संपादन करण्याविषयी सर्वदा तत्पर असावे. तुम्हांपैकी कोणीही दुसरीच्या मनाविरुध्द न वागता परस्परांशी एकोप्याने वागता, त्याचप्रमाणे मी आपल्या ऋत्विजांच्याशी एकोप्याने वागत जाईन. 'एकाष्टका' देवींच्या प्रतीकरूपाने असलेली ही इष्टका मी येथे ठेवतो. १० मज यजमानाच्या भक्तियुक्त अशा बुध्दीचे ठिकाणीं सर्व जगाला जाणणारी एकाष्टका नामक उषादेवी सदैव प्रतिबिंबित होऊन राहिली असून माझ्यावर चिरकाल अनुग्रह करण्यासाठी ती सर्वदा निश्चलपणे उभीच आहे. हे 'एकाष्टका' संज्ञक उषा देवतांनो, तुमचा पुत्र असलेल्या ह्या इंद्राच्या कल्याणासाठी तुम्ही जशा तत्पर

असता, त्याचप्रमाणे मी देखील इंद्राचा अनुग्रह संपादन करण्याविषयी तत्पर राहीन. तुम्हा बहिणींच्या पैकी कोणीही एक दुसरीच्या मनाविरुध्द न वागता परस्परांशी एकोप्याने वागता, त्याचप्रमाणे मी देखील माझ्या ऋत्विजांच्याशी एकोप्याने वागत जाईन. एकाष्टकासंज्ञक प्रतीक म्हणून ही इष्टका येथे मांडतो. एकाष्टका देवीच्याच भावनेने ही इष्टका मी या ठिकाणी मांडून ठेवतो. ११ अग्निहोत्रादि कर्मांचे निष्पादन करणाऱ्या ज्या पांच मुख्य 'उषा' (प्रभातकाळ) पूर्वी वर्णित केल्या त्यांच्याच अनुरोधाने तमिस्रा, ज्योत्स्ना, प्रातःकाळचा संधी, सायंकाळचा संधी आणि दिवस हे पांच 'दोह' उत्पन्न झाले. वसंत ऋतूत 'पुष्पवती', ग्रीष्म ऋतूत 'तापवती', वर्षाऋतूत 'वृष्टिमती', शरदृतूत 'बलप्रसादवती' आणि हेमंत शिशिर ऋतूत 'शैत्यवती' अशी पांच नांवे धारण करणारी पृथ्वी पांच मुख्य उषांच्या मागोमाग निर्माण झाली. हेमंत व शिशिर हे दोन मिळून एकच ऋतू धरून वसंतादि पांच ऋतू याच पांच उषांच्या अनुरोधाने उत्पन्न झाले. पूर्व इत्यादि पांच दिशा आणि 'पंचदश' स्तोमाने ज्यांची जुळणी केली जाते अशा पांच प्रकारच्या 'स्तोत्रिय' संज्ञक ऋचा ह्या पांच उषांच्या अनुरोधानेच उत्पन्न झाल्या आहेत. ह्या पांचही उषा मस्तकाप्रमाणे सर्वोच्च असणाऱ्या एकाच प्रकारच्या प्रकाशाने प्रकाशित होत असतात. हे इष्टके, मुख्य अशा पांच उषांचे प्रतीकच मानून मी तुला या ठिकाणी मांडतो. १२ पांच मुख्य उषामधील पहिली उषा, म्हणजे जणू सत्याचा गाभाच असून ती सूर्याबरोबरच राहत असते. दुसरी 'उषा' म्हणजे पहाट सूर्यकिरणांशी एकजीव होऊन उदकांचा महिमा वाढविते. तिसरी उषा सूर्याचा जेथे जेथे प्रकाश पडला असेल, तेथे तेथे प्रकाशित होऊन संचार करीत असते. चौथी उषा अग्नीच्या प्रकाशातच आपला प्रकाश विलीन करून संचारत असते. आणि पांचव्या उषेला सूर्य दैनंदिन प्रकाश करणारी म्हणून नियोजित करतो. हे इष्टके, पहिल्या उषेच्या प्रतीकरूपाने मी तुला येथे मांडतो. १३ पांच मुख्य उषांपैकी ज्या पहिल्या उषेने आपल्या प्रकाशाच्या योगाने रात्रीच्या अंधकाराचा नाश केला, ती उषा यमाचे आधिपत्य असलेल्या लोकाचे ठिकाणी आपला प्रकाश पाडीत असल्याने एखाद्या दुधाळ गाईप्रमाणे सर्वांच्या प्रीतीला कारणभूत झाली. हे उषे, एखादी गाय ज्याप्रमाणे सर्वांना दूध देते त्याप्रमाणे तू पर्जन्योदकाने युक्त होऊन आमच्याकरता पुढे येत जाणाऱ्या प्रत्येक वर्षी आपल्या प्रकाशरूपी दुधाची धार देत जा. पांच उषांपैकी

पहिल्या उषेची प्रतीकभूत अशी ही इष्टका मी या ठिकाणी मांडून ठेवतो. १४ प्रकाशरूपाने चमकणाऱ्या नक्षत्रांमध्ये श्रेष्ठ असलेली ही 'उषा' आकाशात पसरणाऱ्या प्रकाशाने युक्त होऊन क्षितिजावर आली आहे. ही उषा प्रकाशनीय अशी सर्व रूपे धारण करणारी, सूर्योदयापूर्वी उदित झाल्यामुळे अंधकाराच्या छटेने किंचित् मिश्रवर्ण भासणारी, अग्निहोत्र्यांनी होमासाठी प्रज्वलित केलेले अग्निरूपी ध्वज उभारणारी, सूर्याप्रमाणेच अंधकार निवारणाचे कार्य करीत असल्याने त्याची सहकारिणी होणारी, आणि शुभ अशा यज्ञकर्मांची इच्छा करणारी आहे. वस्तुत: जरारहित अशा हे उषे, तुझ्या ठिकाणी जरेची चिन्हे जरी दिसत नसली, तरी सृष्टीच्या आरंभापासून तुझे चिरकाळ अस्तित्व असल्यामुळे तू कालदृष्ट्या वृध्दावस्थेला प्राप्त झाली आहेस. उषेचे प्रतीकच अशी ही इष्टका मी येथे ठेवतो. १५ दररोज प्रकाशित होऊन वसंतादि ऋतूंचे पालन करणारी, दिवसांचे निष्पादन करून त्यांचे नेतृत्व करणारी व प्रजांचे उत्पादन करणारी ही पहिली उषा (पहाट) आमच्या ह्या यज्ञकर्माच्या ठिकाणी आली आहे. हे उषे, वस्तुत: तू एकरूपच असताना दिनभेदाने अनेक रूपांना प्राप्त होऊन रात्रीच्या अंधकाराचे निवारण करीत असतेस. स्वत: तू जरारहित असलीस, तरी सर्व मनुष्यांच्या शरीरादिकांना तू जराग्रस्त करतेस. प्रथम उषेचे जणू प्रतीकच अशी ही इष्टका मी ह्या ठिकाणी मांडून ठेवतो. (अनुवाक ११).

१ हे अग्निदेवा, आज जे आमचे शत्रू असतील त्या सर्वांचा पूर्णपणे नाश कर. उपजत ज्ञानी अशा हे अग्ने, आमचा नाश करण्यास प्रवृत्त होणारे जे कोणी आमचे शत्रुत्व करणारे या पुढे उत्पन्न होणार असतील, त्यांना देखील आमच्याविषयी त्यांच्या मनात असलेल्या दुष्टबुध्दीपासून दूर कर. आमच्यावर अनुग्रह करण्याची मनोवृत्ती धारण करून आमच्यावर न रागावता प्राग्वंश, सद व हविर्धान रूपी तीन गृहांच्या आश्रयाने चालणाऱ्या यज्ञकर्माचा तू उत्पादक हो. आणि त्या कर्माविषयीचे पूर्ण ज्ञान तू आमच्या ठिकाणी प्रकाशित कर. तुझ्या प्रसादाने आम्ही सुखी होऊ. अग्निदेवतेचीच प्रतीकभूत असलेली ही इष्टका मी येथे स्थापन करतो. २ आपल्या ठिकाणच्या बलाच्या जोरावर जे आमच्याशी आज शत्रुत्व करीत आहेत, त्या शत्रूंचा तू नि:पात कर. आणि यापुढे जे आमचे शत्रू उत्पन्न होण्याचा संभव असेल त्यांनाही तू आमच्यापासून दूर कर. सुप्रसन्नचित्त असा होऊन तू आमच्याशी

बोल. तुझ्या अनुग्रहाने आम्ही अधिक सुखी होऊ. आमच्या शत्रुंना तू दूर हांकून लाव. हे इष्टके, तूच अग्नी आहेस असे समजून मी तुला या ठिकाणी मांडून ठेवतो. ३ हे इष्टके, ऋचांच्या चाळीस आवृत्तींनी निष्पन्न होणारा 'चतुश्चत्वारिंशत्' नांवाचा स्तोम आणि बलरूपी धन ही दोन्ही जणू तूच आहेस. ४ हे इष्टके, सामसंबंधी ऋचांच्या सोळा आवृत्तींची निर्माण होणारा 'षोडश' स्तोम व बलोत्पादक अशा शरीरांतील आठवा धातूही जणू तूच आहेस. ५ हे इष्टकारूपी अग्ने, तू चितिरूप असलेल्या ह्या पृथ्वीचा पूरकच आहेस तू कोणाचाही नाश करीत नाहीस. म्हणूनच तुझे 'अप्स' असे नांव रूढ झाले आहे. हे इष्टके तुला 'अप्स' नांवाचा अग्नी समजूनच मी येथे मांडीत आहे. ६ हे इष्टके, 'एव' नांवाचा छंद तूच आहेस. ७ हे इष्टके, 'वरिव' नांवाचा छंद तूच आहेस. ८ हे इष्टके, 'शंभू' नांवाचा छंद तू आहेस. ९ हे इष्टके, 'परिभू' नांवाचा छंद तूच आहेस. १० हे इष्टके, 'आच्छत्' नांवाचा छंद तूच आहेस. ११ हे इष्टके, 'मन' नांवाचा छंद तूच आहेस. १२ हे इष्टके, 'व्यच' नांवाचा छंद तूच आहेस. १३ हे इष्टके, 'सिंधु' नामक छंद तूच आहेस. १४ हे इष्टके, 'समुद्र' नांवाचा छंद तूच आहेस. १५ हे इष्टके, 'सलिल' नांवाचा छंद तूच आहेस. १६ हे इष्टके, 'संयत्' नांवाचा छंद तूच आहेस. १७ हे इष्टके, 'वियत्' नांवाचा छंद तूच आहेस. १८ हे इष्टके, 'बृहत्' नांवाचा छंद तू आहेस. १९ हे इष्टके, 'रथंतर' नांवाचा छंद तू आहेस. २० हे इष्टके, 'निकाय' नांवाचा छंद तू आहेस. २१ हे इष्टके 'विवध' नांवाचा छंद तूच आहेस. २२ हे इष्टके, 'गिर' नांवाचा छंद तू आहेस. २३ हे इष्टके 'भ्रज' नांवाचा छंद तू आहेस. २४ हे इष्टके 'सष्टुप्' नांवाचा छंद तू आहेस. २५ हे इष्टके 'अनुष्टुप्' नांवाचा छंद तूच आहेस. २६ हे इष्टके, 'ककुत्' नांवाचा छंद तूच आहेस. २७ हे इष्टके, 'त्रिककुत्' या नांवाचा छंद तूच आहेस. २८ हे इष्टके, 'काव्य' नांवाचा छंद तूच आहेस. २९ हे इष्टके, 'अंकुप' नांवाचा छंद तूच आहेस. ३० हे इष्टके, 'पदपंक्ति' नांवाचा छंद तूच आहेस. ३१ हे इष्टके, 'अक्षरपंक्ति' नांवाचा छंद तूच आहेस. ३२ हे इष्टके, 'विष्टारपंक्ती' नांवाचा छंद तूच आहेस. ३३ हे इष्टके, 'क्षुरोभृज्वान' नांवाचा छंद तूच आहेस. ३४ हे इष्टके, 'प्रच्छ' नांवाचा छंद तूच आहेस. ३५ हे इष्टके, 'पक्ष' नांवाचा छंद तूच आहेस. ३६ हे इष्टके 'एव' नांवाचा छंद तूच

आहेस. ३७ हे इष्टके, 'वरिव' नांवाचा छंद तूच आहेस. ३८ हे इष्टके, 'वयस्' नांवाचा छंद तूच आहेस. ३९ हे इष्टके, 'वयस्कृत्' नांवाचा छंद तूच आहेस. ४० हे इष्टके, 'विशाल' नांवाचा छंद तूच आहेस. ४१ हे इष्टके, 'विष्पर्धा' नांवाचा छंद तूच आहेस. ४२ हे इष्टके, 'छदि' नांवाचा छंद तूच आहेस. ४३ हे इष्टके, 'दूरोहण' नांवाचा छंद तूच आहेस. ४४ हे इष्टके, 'तंद्र' नामक छंद तूच आहेस. ४५ हे इष्टके, अंकांक नांवाचा छंद तूच आहेस. (अनुवाक १२).

१ कर्मानुष्ठानापासून आम्हाला दूर राहण्यास प्रवृत्त करणाऱ्या आमच्या पातकांचा नाश करणारा, आम्ही विशेष रीतीने केलेल्या स्तुतीने संतुष्ट होऊन आम्हाला द्रव्य देण्याची इच्छा बाळगणारा, उत्कृष्ट प्रज्वलित केलेला, शुभ्र प्रकाशाने तळपणारा आणि आज्याहुतीने आम्ही ज्याचे यजन केले आहे, असा अग्निदेव आमच्यावर सदैव अनुग्रह करो. २ हे सोमदेवा, उत्कृष्ट प्रकारे अनुष्ठित केलेल्या यज्ञकर्मांचा तू पालक आहेस. तू अत्यंत प्रकाशमान असून पापनाशक आहेस. तसेच मंगलरूप फल प्राप्त करून देणारा तू जणू काय मूर्तिमंत यज्ञच आहेस. ३ हे अग्निदेवा, उत्कृष्ट रीतीच्या सैन्याने तू सज्ज असतोस, तू आपले यजन करणाऱ्या उपासकांच्याकडे अनुग्रहदृष्टीने पाहतोस. तू उग्रस्वरूप धारण करून सतत धडधडत असणाऱ्या आपल्या अनेक ज्वालांनी अखिल विश्वात संचार करणारा आहेस. तुझा जो निर्मल प्रकाश आहे तो अंधकाराने कधीही झाकला जात नाही. विध्वंसाला नेहमी कारणभूत होणाऱ्या राक्षसांनी तुझ्या ज्वालारूपी शरीरावर झडप घालण्याचे पातकी साहस केव्हाच केले नाही. ४ हे बलशाली अग्ने, सूर्याप्रमाणेच भासमान होणाऱ्या तुज देवाचे कल्याणकारी असे ज्वालारूपी सैन्य तुझ्या सन्निध सदैव प्रकाशलेलेच असते. रात्रीच्या वेळी सर्प, विंचू इत्यादि हिंसक प्राणी कोठे वावरत असल्यास ते आम्हास दिसावयाचे कामी, किंवा रात्रीच्या भोजनाचे वेळी आम्हापुढे वाढलेल्या अन्नांवर बसणाऱ्या रूक्ष अशा माशा इत्यादि उपद्रवी प्राण्यांना बसू न देण्याचे कामी सर्वतोपरी रक्षणाकरताच की काय, तुझे ते ज्वालारूपी सैन्य रात्रीच्या गाढ अंधारात देखील तुझ्या सन्निध खडे उभे राहिलेले सर्वांच्या दृष्टीस पडते. ५ हे अग्निदेवा, ह्या ज्वालासमूहाने लोकांना सर्व वस्तूंचे उत्तम ज्ञान करून देणारा, आमच्या करता देवांना संतुष्ट करण्यासाठी यज्ञाची निष्पत्ती व निर्विघ्नपणे त्याची समाप्ती करणारा, कोणाकडूनही पीडा

करून न घेणारा, यज्ञाचा संरक्षक आणि आमचे अत्यंत पालन करणारा असा तू, दिसण्यात सुंदर व भरपूर धनाने युक्त असे घर व जमीन आम्हाला प्रकाशित कर. ६ हे अग्निदेवा, यज्ञानुष्ठान करण्यासाठी द्युलोकी व भूलोकी मला विघ्नरहित आणि संपूर्ण आयुष्य दे. स्वर्गलोकी उत्पन्न झालेल्या हे अग्निदेवा, ज्याचा आम्ही उत्कृष्ट रीतीने उपभोग घेऊ असे प्रशस्त आणि माणिकमोत्यासारख्या अनेक वस्तूंनी भरलेले असे घर आम्हाला मिळवून दे. ७ अरणींचे मंथन करताना व्यतीत होणाऱ्या ऋत्विजांच्या बलाचा जणू पुत्र व यज्ञासाठी देवांना बोलावून आणणाऱ्या हे अग्निदेवा, तू मनुष्यांच्यावर अनुग्रह करून जसे त्यांचे पालन करतोस, तसेच यज्ञाच्या योगाने देवांचे पूजनही तू करीत असतोस. आणि म्हणूनच आज चालू असलेल्या ह्या यज्ञकर्मातही देवांच्या मनाशी मन मिळवून राहणारा व त्यांच्याविषयी आस्था बाळगणारा तूच तुझ्याशी एकमताने वागणाऱ्या व तुझ्यावर प्रीती करू इच्छिणाऱ्या देवांचे यजन कर. ८ पूर्व दिशेस 'आहवनीय' या नांवाने स्थापन केला जाणारा, मी करणार असलेल्या यज्ञानुष्ठानातील दैवी ऋत्विज, प्रकाशमान, देवांना बोलावून आणणारा व नानाविध रत्नांचा संपादक अशा अग्निदेवाचे मी स्तवन करतो. ९ हे सोमदेवा, तू उपासकांनी इच्छिलेल्या फलांचा वर्षाव करणारा आणि स्वतः प्रकाशाने चमकणारा आहेस. हे देवा, ज्या अर्थी तू अभिमत फलांचा वर्षाव करतोस, त्या अर्थी तू अभिमत फलांची वृष्टी करण्याचे जणू व्रतच धारण केलेला दिसतोस. आणि अशा प्रकारे तू फलवृष्टी करणारा असल्यामुळेच पुण्यकर्मांचे धारण करतोस. १० हिंसक अशा शत्रूंचा निःपात करणाऱ्या व शत्रूंना अत्यंत ताप देणाऱ्या हे मरुतांनो, तुम्हाला होणाऱ्या क्षुधेची बाधा दूर करण्यासाठी आमच्याकडून तुम्हाला दिले जाणारे हे हविर्द्रव्य तुम्ही सेवन करा. ११ आमची सुखाने वस्ती होण्यास कारणभूत असणाऱ्या हे मरुतांनो, अत्यंत पापबुध्दीचा व क्रूर जो कोणी माणूस 'मी तुमचा केव्हाही नाश करणार नाही' अशा प्रकारे आम्हाला दिलेले शपथपूर्वक वचन मोडून आमचा घात करण्याची इच्छा करीत असेल, तो आमचा द्रोह करणारा माणूस तुमचा फास आपल्या गळ्याला बांधून घेवो. त्या द्रोही माणसाला हे मरुतांनो तुम्ही अत्यंत संताप देऊन ठार करा. १२ उपासकांनी यजमानाच्या योगाने एकवेळ आराधना केली असता वर्षभर त्यांचे संरक्षण करणारे, उत्तम प्रकारे अर्चन करण्याला योग्य, विस्तीर्ण घरात राहणारे,

सात गणांनी युक्त, शत्रूंना संतप्त करणारे, पण स्वत: आनंदित वृत्तीने राहणारे व आम्हालाही आनंद देणारे असे जे मरुत् आहेत, ते आमच्या गळ्यात अडकविलेले फास काढून आमच्याशी विरोध करणाऱ्या लोकांच्या गळ्यात खूप घट्ट बसतील असे अडकवोत. १३ हे अत्यंत तरुण अग्निदेवा, आम्ही ज्यांची इच्छा करावी, अशा देवांना तू अत्यंत संतुष्ट कर. सूर्याच्या रूपाने कालांचे पालन करणाऱ्या हे ऋतुपते, तू विशिष्ट अशा कालांचे स्वरूप जाणून वागत असतोस. यास्तव, यागाला योग्य अशा ह्या वेळी तू देवांचे यजन कर. हे अग्ने, देवांचे जे ऋत्विज आहेत त्यांच्यासह तू ह्या यजमानाच्या ऋत्विजांमध्ये सर्वश्रेष्ठ असा यजनकर्ता आहेस. १४ आपल्या भक्तांचे यजनकार्य उत्कृष्ट रीतीने सफल करणाऱ्या हे 'स्विष्टकृत्' अग्निदेवा, अनुष्ठित केलेल्या ज्या ह्या यज्ञात तू प्रविष्ट झाला आहेस, त्या यज्ञासंबंधी जे हविर्द्रव्य तुला अर्पण केले असेल, ते तू भक्षण कर. होमाचा कर्ता, सर्वांना शुध्द करणारा, आणि देदीप्यमान असा तू यागाचा कर्ता आहेस. आणि म्हणून आमच्या ह्या यज्ञात तू मोठ्या महिम्याने देवांचे पूजन करून त्यांना संतुष्ट करीत आहेस. म्हणूनच ज्या अर्थी तू योग्यतेने अत्यंत मोठा होत असतोस, त्या अर्थी हे तरुणश्रेष्ठा अग्निदेवा, आम्ही आज जी तुला हविर्द्रव्ये दिली आहेत त्यांचा तू स्वीकार कर. १५ अग्नीची उपासना जे जे करतात त्या सर्वांना अग्नीच्या कृपेने भरपूर, कीर्तिकर व पुत्रपौत्रादि संततियुक्त अशा प्रकारचे धन प्राप्त होते. आणि त्याचा केव्हाही ऱ्हास न होता दिवसानुदिवस त्याची वाढच होत जाते. १६ हे सोमदेवा, तू आमच्या घरांची वाढ करणारा, रोगांचा नाशक, धनलाभ करणारा, गाई, म्हशी, घोडे इत्यादि पशूंची वृध्दी करणारा आणि आमच्याशी मित्रभावाने वागणारा हो. १७ ज्यांच्यासाठी आमच्या घरी यज्ञ केला जातो, अशा हे मरुतांनो, आमच्या ह्या यज्ञकर्मांत तुम्ही अवश्य या, कधीही परत जाऊ नका. आमच्या हातून संभवनीय अशा पापासासून आम्हाला पूर्ण मुक्त करा. १८ हे मरुतांनो, अनादि कालापासून प्रवृत्त होणारे दिवस व अनंतावधी धान्याच्या समृध्दीमुळे महनीय ठरणाऱ्या शरदृतूंनी युक्त अशी उलटलेली हजारो वर्षे आम्ही यज्ञकर्ते यजमान वंशपरपंरेने ऋत्विजांच्या समुदायात बसून तुम्हाला हविर्द्रव्यांचे समर्पण करीत आलो आहोत. म्हणून आताही आमच्या ह्या यज्ञात तुम्ही हविर्द्रव्यांचा स्वीकार करावयास या. १९ हे मरुतांनो, अनादिकालापासून प्रवृत्त होणारी तुमची मूलभूत अशी

महनीय तेजे एकसारखी वाढत आहेत. प्रकृष्ट अशा यागांच्याशी नियुक्त होणाऱ्या मरुतांनो, गृहमेधी, मरुत् इत्यादि आपली नांवे तुम्ही प्रयत्नपूर्वक सर्व लोकांत प्रसिध्द करा. तुमच्यासाठी आमच्या घरी केल्या जाणाऱ्या यज्ञांतील हजारो वर्षे पूजनीय मानले गेलेले हे पुरोडाशरूपी हविर्द्रव्य तुम्ही सेवन करा. २० संपूर्ण हविर्द्रव्यांनी युक्त, घृताने पुष्ट आणि मंत्रसंयुक्त अशी ही आहुती रात्री आणि दिवसा ज्या अत्यंत कुशल अशा 'स्विष्टकृत्' नामक अग्नीच्या जवळ प्राप्त होत असते, त्या अग्नीच्या सन्निध धनाची इच्छा करणारा यजमान कधीही न चुकता आपले हविर्द्रव्य घेऊन जातो व त्याला अर्पण करतो. २१ हे अग्निदेवा, अत्यंत सुंदर अशी ही हविर्द्रव्ये तू मध्ये यत्किंचित् न थांबता थेट देवांच्या समुदायापर्यंत नेऊन पोचीव. अत्यंत चवदार व सुंगधयुक्त अशी, आम्ही अर्पिलेली हविर्द्रव्ये एकूणएक देव भक्षण करोत. २२ हे कण्वप्रभृति वेदाचार्य हो, तुमच्या क्रीडेला कारणभूत, शत्रूंकडून केव्हाही तिरस्कृत न झालेले आणि योध्यांच्या ठिकाणी समरांगणावर आपले रथ नेण्याविषयी प्रेरणा करावयास समर्थ असे मरुतांचे बल तुम्ही वैदिक मंत्रांच्या आश्रयाने केल्या जाणाऱ्या सामगानात सर्वप्रकारे मनापासून गा. २३ अश्वांच्या प्रमाणे सतत गमनशील, सुंदर चालीने चालणारे आणि श्रध्दाळू प्रेक्षक एखादा यज्ञ पाहण्यासाठी ज्या उत्सुकतेने जातात त्याच उत्सुकतेने येथे येऊन पोचलेले, राजवाड्याच्या गच्चीवर गोरे गोमटे लहान लहान राजकुमार संचार करतात त्याप्रमाणे पर्वतांच्या उच्च शिखरांवर चढून संचार करणारे, व लहान वासरांप्रमाणे इतस्ततः जलदीने धावणारे, शुभ्रवर्ण आणि मेघांना उत्पन्न करून त्यांच्या ठिकाणी जलांचे धारण करणारे असे जे जितके मरुत आहेत, ते तितके सारे आपापल्या संचाराने सर्व जगाला अलंकृत करीत असतात. २४ नेहमी खिलाडू वृत्तीचे, सतत चालत राहणारे, विद्युद्रूपी चमकणाऱ्या दृष्टीचे आणि शत्रूंना थरथर कापावयास लावणारे जे मरुत् आहेत, तेच उदकांना अडवून धरणाऱ्या मेघांच्या ठिकाणी उदकांचा साठा करून आपले माहात्म्य सर्वांना प्रदर्शित करतात. पालकाच्या अभावी एखादी विधवा स्त्री जशी थरथरा कांपत असते, त्याचप्रमाणे हे मरुत् इकडून तिकडे धावू लागले म्हणजे खालची जमीन थरथरा कांपत असते. २५ हे मरुतांनो, पक्ष्यांच्या प्रमाणे एखाद्या मार्गाने उडत येऊन ताडण करण्यास योग्य, अशा अर्थात् उदकाने तुडुंब भरलेल्या मेघांच्यावर धाडकन् उडी घालता, तेव्हा धनाने भरलेल्या कोशागाराप्रमाणे भासणारे उदकपूर्ण

मेघ तुमचे रथ त्यांच्याजवळ येऊन पोचताक्षणीच उदकांचा वर्षाव करतात. आणि मग तुम्ही देखील यजमानासाठी मधुररसाने युक्त व घृतासमान असलेल्या उदकाचा आसमंतातील प्रदेशांत सडा घालता. २६ प्रजांचे पालन करणाऱ्या, देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेणाऱ्या, आणि अनेक यजमानांच्या प्रीतीला कारणभूत होणाऱ्या त्या त्या यागातील 'स्विष्टकृत्' नामक अग्नीला आव्हानपर अशा आदरयुक्त मंत्रवाक्यांनी यजमान नेहमी बोलावीत असतात. २७ निरंतर यज्ञानुष्ठानात गढून गेलेले ऋत्विज, घृताचा स्राव होत असलेल्या स्त्रुचा हाती घेऊन देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेण्यासाठी अग्निदेवाला स्तवनाने आळवीत असतात. २८ द्युलोकाला प्रकाशित करणाऱ्या हे इन्द्राग्नीहो, हविर्द्रव्यरूपी अन्नांच्या ठिकाणचा आपआपला भाग स्विकारण्यासाठी तुम्ही येथे येऊन पोचला आहात. यामुळेच तुमचे दोघांचे सामर्थ्य काय आहे हे सर्व लोकांनी पूर्ण जाणले आहे. २९ अनेक ठिकाणी वस्ती करून राहिलेल्या मोठ्या जनतेच्या ईश्वरत्वाला प्राप्त झालेले, स्वकीयबलाने परकीयांच्या बलाचा पराभव करणारे, हविर्द्रव्यरूपी अन्नाची इच्छा कररारे आणि यज्ञामध्ये एकाच वेळी बोलाविण्यात येणाऱ्या अशा इन्द्र व अग्नी या देवांची जो यजमान सेवा करीत असतो, तो आपल्या शत्रूचा नाश करतो आणि तो सर्व लोकाना अन्नाचे दान करतो. ३० हे ऋत्विज आणि यजमान हो, तुमच्या पुत्रपौत्रादि जनांच्या कार्यसिध्दीसाठी सर्व जगाच्यावर उत्कृष्टत्वाने स्थित असणाऱ्या इन्द्रदेवाला आम्ही बोलावीत आहो. तो इन्द्र इतरांच्याहून आम्हालाच अधिक प्रिय मानणारा असो. ३१ अग्निचयनाचे अनुष्ठान करणारे यजमान अग्न्यादिदेवांच्याबरोबर अर्ध्या हविर्भागाचे धारण करण्याकरिता इन्द्राला बोलावीत असतात. ज्या अर्थी विटांची विशेष रीतीने मांडणी करून त्यावर स्थापित केलेल्या अग्नीचे ठिकाणी अग्निष्टोमादि सोमयागांचे अनुष्ठान पार पाडण्यास समर्थ असलेले यजमान तद्विषयक अशा आपल्या बुध्दी एकाग्र करतात त्या अर्थी त्यांनी इतर देवांच्या बरोबर अर्धा हविर्भाग सेवन करण्याकरिता इन्द्राला बोलाविणे साहजिकच आहे. हे इन्द्रा तू शूर, मनुष्यांना धन देणारा व आमच्या बलाचे संवर्धन करणारा होऊन आम्हाला गाई, म्हशी, बैल, इ. पशूंनी गजबजलेल्या संघाच्या ठिकाणी प्रामुख्याने स्थापन कर. ३२ हे विश्वकर्मन्, मी अर्पण केलेल्या हविर्द्रव्याने स्वत:चे शरीर वृध्दिंगत करणारा तू स्वत:च यजन कर. आमच्याखेरीज आमच्या भोवताली असणारे आमचे हितशत्रू या यज्ञकर्माविषयी मोहित होऊन जावोत. अन्नसमृध्दीने युक्त

व विद्वान असा पुत्र आम्हाला प्राप्त होवो. ३३ अखिल विश्व निर्माण करणाऱ्या हे परमात्मन्, मी अर्पण केलेल्या हविर्द्रव्याच्या सेवनाने होणाऱ्या हर्षाने वृध्दिंगत होणारा तू, माझ्या या यजमानाला परम आश्चर्ययुक्त, इतरांचा संरक्षक आणि कोणाकडूनही अवध्य असा कर. त्याच्यापेक्षा वयोवृध्द, अर्थात् जुने असे सर्व लोक त्याला नमून असोत. जेणेकरून माझा हा यजमान तीक्ष्ण अशा शस्त्राने युक्त, कोणाकडूनही पराभूत न होणारा आणि अनेक याग करण्याला पात्र होईल असे कर. (अनुवाक १३).

प्रपाठक ४.

१ हे इष्टके, तू सूर्याच्या किरणांसारखी आहेस. आमच्या घरी आमची वसती सुखाची व्हावी, म्हणून मी तुला येथे मांडतो. आमची वस्ती सुखाची होईल, असे घर आमच्या करिता संपादन कर. २ हे इष्टके, तू प्रगतिरूप आहेस. विहितकर्माचे अनुष्ठान मजकडून घडावे, म्हणून मी तुला येथे मांडतो. विहितकर्माचरणरूपी धर्म माझ्या हातून घडवून तू मला सुखी कर. ३ हे इष्टके, तू अनुकूलतेने मजकडे येणारी आहेस. स्वर्ग प्राप्त व्हावयासाठी मी तुला येथे मांडून ठेवतो. तर, मला तू स्वर्गलोक प्राप्त करून दे. ४ हे इष्टके, द्युलोक व पृथ्वी यांच्यामध्ये असणारा प्रदेशच जणू तू आहेस. यास्तव, गंधर्वादि लोक ज्या भागात राहतात ते अंतरिक्षस्थल मला तू प्राप्त करून दे. ५ हे इष्टके, तू ह्या भूलोकाचाच जणू एक भाग आहेस. पृथ्वीला संतुष्ट करण्याकरिता मी तुला येथे मांडीत आहे. यास्तव, पृथ्वीशी समरस होऊन तू तिला संतुष्ट कर. ६ हे इष्टके, तू जणू काय पाण्याने तुडुंब भरलेला मेघच आहेस. पर्जन्यवृष्टी व्हावयासाठी मी तुला येथे ठेवीत आहे. तरी पर्जन्यवृष्टी करून तू मला सुखी कर. ७ हे इष्टके, सूर्योदयाच्या आधी येणारा असा तू जणू उष:कालच आहेस. यास्तव, दिवसाचा उगम व्हावा म्हणून मी तुला या ठिकाणी मांडीत आहे. यास्तव, दिवसाचा उदय करून तू मला सुखी कर. ८ हे इष्टके, सूर्यास्तानंतर संचार करणारी तू जणू सायंसंध्या आहेस. आमची रात्र सुखाची जावी म्हणून मी तुला येथे मांडीत आहे. यास्तव, आमची रात्र सुखाची जाईल असे कर. ९ हे इष्टके, अष्ट वसूंनी तुझी इच्छा करावी अशा योग्यतेची तू आहेस. म्हणून वसूंच्या प्रीतीसाठीच मी तुला येथे मांडतो. तू अष्टवसूंना संतुष्ट कर. १० हे इष्टके, तू हुबेहूब

रुद्राची मूर्तीच आहेस. रुद्रांच्या संतोषासाठीच मी तुला येथे स्थापन करतो. तू रुद्रांना संतुष्ट कर. ११ हे इष्टके, तू उत्कृष्ट दीप्तिमान् आहेस. आदित्याच्या प्रीत्यर्थ मी तुला येथे मांडतो. तू आदित्यांना संतुष्ट कर. १२ हे इष्टके, तू जणू काय पितरांचे अनुग्रहसामर्थ्यच आहेस. पितरांच्या तृप्तीकरताच मी येथे तुझी स्थापना करीत आहे. यास्तव, तू पितरांना संतुष्ट कर. १३ हे इष्टके, पुत्रपौत्रादिकांच्या रूपाने असणारा तू जणू काय तंतूच आहेस. प्रजांच्या संतोषासाठी मी तुला येथे ठेवतो. तू पुत्रपौत्रादि प्रजांना संतुष्ट कर. १४ हे इष्टके, तू परकीयांच्या सैन्याचा पराभव करणारी आहेस. पशूंच्या संतोषासाठी मी तुला येथे स्थापन करतो. सर्व पशूंना तू संतुष्ट कर. १५ हे इष्टके, तू इतरांशी एकरूपतेने मिळून जाणारी आहेस. औषधींच्या योगाने साध्य होणारे जीवनरूपी धनच जणू तू आहेस. ओषधींच्या प्रीतीसाठी मी तुला येथे ठेवतो. सर्व ओषधींना तू संतोषित कर. १६ हे इष्टके, तू शत्रूंचा सर्वस्वी पराभव करणारी आहेस. त्याचप्रमाणे दगडासारखे कठिण असे वज्र आपल्या हातात धारण करणारा तू जणू इंद्रच आहेस. इंद्राच्या संतोषासाठी मी तुला येथे ठेवतो. इंद्राला तू संतुष्ट कर. १७ हे इष्टके, तू जणू काय श्वासरूपाने व्यक्त होणारा प्राणवायूच आहेस. प्राणाच्या संतोषासाठी मी तुला येथे ठेवतो. यास्तव, माझ्या प्राणवायूला तू संतुष्ट कर. १८ हे इष्टके, श्वासरूपाने बाहेर जाणाऱ्या प्राणांचे नियंत्रण करून त्याला पुन्हा शरीरात प्रविष्ट करणारा जणू तू अपान वायूच आहेस. अपान वायूच्या संतोषाकरिता मी तुला येथे ठेवतो. माझ्या अपान वायूला तू संतुष्ट कर. १९ हे इष्टके, अग्निचयनरूपी धनाचा स्वीकार करण्याकडे प्रबलतेने वळणारी माझी जणू दृष्टीच तू आहेस. नेत्रांच्या संतुष्टतेकरता मी तुला येथे ठेवतो. यास्तव, माझ्या नेत्रांना तू संतुष्ट कर. २० हे इष्टके, श्रवणीय अशा कोणत्याही भाषणाच्या ठिकाणी एखाद्या पक्ष्याप्रमाणे धावत जाणारी माझी श्रवणशक्तीच जणू तूच आहेस. कर्णेंद्रियाला संतोष व्हावा म्हणून मी तुला येथे ठेवतो. माझ्या दोन्ही कानांना तू संतोषित कर. २१ हे इष्टके, तू जणू काय स्त्री, पुरुष व त्यांचा संयोग अशा तीन अवयवांचा एक गटच आहेस. २२ हे इष्टके, स्त्रीपुरुषांचा परस्परसंबंध झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी उत्पन्न होणारी तू मूर्तिमंत प्रवृत्तीच आहेस. २३ हे इष्टके, स्त्रीपुरुषांच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या प्रवृत्तीतूनच निष्पन्न होणारी मूर्तिमंत हालचालच तू आहेस.

२४ हे इष्टके, स्त्रीपुरुषांच्या प्रवृत्तिमूलक हालचालीपासून त्यांना परावृत्त करणारी वृत्ती जणू तूच आहेस. २५ हे इष्टके, स्त्रीपुरुषांच्या संभोगानंतर स्त्रीरूपी क्षेत्राच्या ठिकाणी पेरले जाणारे गर्भरूपी बीज जणू तूच आहेस. २६ हे इष्टके, स्त्रीरूपी क्षेत्रात पेरल्या गेलेल्या गर्भरूपी बीजाची सर्व गर्भाशयात होणारी वाढ जणू तूच आहेस. २७ हे इष्टके, गर्भाशयाच्या ठिकाणी व्यापून राहिलेल्या गर्भरूपी बीजाला प्राप्त होणारा शरीराचा आकार जणू तूच आहेस. २८ हे इष्टके, परिणत झालेल्या शरीरापासून पुत्रपौत्रादि रूपाने होणारा विस्तारही पण तूच आहेस. २९ हे इष्टके, तू जणू काय धनसंपन्न असा पुत्रच आहेस. ३० हे इष्टके, तू प्राप्त झालेल्या धनाची अभिवृध्दी करणारी आहेस. ३१ हे इष्टके, तू धनाच्या अभिवृध्दीने आपला जीवनक्रम चालविणारी आहेस. (अनुवाक १).

१ हे इष्टके, शोभायमान अशी तू जणू पूर्वदिशाच आहेस. वसू नांवाचे आठ देव तुझे पालन करणारे अधिपती होत. तुला उपद्रव करणाऱ्या शत्रूंच्या आयुधांचे अग्नी निराकरण करीत असतो. 'त्रिवृत्' नांवाचा 'स्तोम' तुला पृथ्वीच्या ठिकाणी स्थापन करो. 'प्र वो देवायाग्नये' ह्या ऋचेने आरंभिले जाणारे 'आज्य' नामक 'शस्त्र' तुला किंचितही पीडा न करता ठेवलेल्या ठिकाणी स्थिर करो. 'रथंतर' साम तुझ्या चिरकाल प्रतिष्ठेला कारणभूत होवो. २ हे इष्टके, विशिष्ट रीतीने शोभणारी तू जणू दक्षिण दिशाच आहेस. रुद्र नांवाचे अकरा देव तुझा प्रतिपाल करीत असून तुला उपद्रव करणाऱ्या परकीयांच्या शस्त्रांचा प्रतिकार इंद्र करीत असतो. 'पंचदश' नांवाचा 'स्तोम' तुला पृथ्वीवर स्थापन करो, आणि 'वायुरग्रेगा. यज्ञप्रीः' या ऋचेने प्रारंभ केले जाणारे 'प्रयुग' नांवाचे 'शस्त्र' तुला व्यथित न करता ठेवल्याजागी पक्की बसवो. 'बृहत्' नांवाचे साम तुझ्या अखंड स्थिरतेला कारणभूत होवो. ३ हे इष्टके, उत्कृष्ट रीतीने सुशोभित अशी तू पश्चिम दिशाच आहेस. आदित्यसंज्ञक बारा देव तुझे पालनकर्ते असून, तुला त्रास देणाऱ्या शत्रूंच्या आयुधांचे निराकरण सोम करीत असतो. 'सप्तदश' संज्ञक 'स्तोम' तुला ह्या भूमीवर स्थापन करो. व 'आ त्वा रथं यथोतये' ह्या ऋचेपासून ज्याचा प्रारंभ होतो, ते 'मरुत्त्वतीय' नामक 'शस्त्र' तुला कसलाही त्रास न देता ठेवलेल्या ठिकाणी सदैव दृढ करो. 'वैरूप' नांवाचे साम तुझ्या प्रतिष्ठेला कारण होवो. ४ हे इष्टके, स्वतःच्या महत्त्वाने शोभून राहणारी तू जणू

उत्तर दिशाच आहेस. सर्व देव तुझे अधिपती असून तुला उपद्रव करणाऱ्या शत्रूंच्या आयुधांचा प्रतिकार वरुण करीत असतो. 'एकविंश' नांवाचा 'स्तोम' तुला ह्या भूमीचे ठिकाणी स्थापित करो. आणि 'अभि त्वा शूर नोनुमः' या ऋचेने प्रारंभिले जाणारे 'निष्केवल्य' नामक 'शस्त्र' तुला व्यथा न करता ठेवलेल्या जागी पक्केपणी स्थिर करो. 'वैराज' नांवाचे 'साम' तुझ्या चिरप्रतिष्ठेला कारणभूत होवो. ५ हे इष्टके, अधिकतेने सर्वांचे पालन करणारी तू जणू, अत्यंत मोठी अशी ऊर्ध्व दिशाच आहेस. 'मरुत्' नांवाचे देव तुझे पालनकर्ते होत. तुला त्रास देणाऱ्या शत्रूंच्या शस्त्रांचा बृहस्पती हा प्रतिकार करणारा आहे. 'त्रिणव' व 'त्रयस्त्रिंश' या नांवाचे दोन 'स्तोम' तुला या पृथ्वीच्या ठिकाणी स्थापन करोत. 'तत्सवितुर्वृणीमहे' ह्या ऋचेपासून आरंभिले जाणारे 'वैश्वदेव' आणि 'वैश्वानराय पृथुपाजसे' ह्या ऋचेपासून प्रारंभ होणारे 'आग्निमारुत' ही दोन 'शस्त्रे' तुला यत्किंचितही त्रास न होईल अशा प्रकारे ठेवल्या ठिकाणी घट्ट बसवोत. 'शाक्वर' व 'रैवत' ही दोन सामे तुझ्या प्रतिष्ठेला कारणभूत होवोत. ६ हे इष्टके, तू आकाशाला व्यापून टाकावेस म्हणून देवसमाजात प्रथमतः जे नारदादि ऋषी उत्पन्न झाले ते सारे महर्षी, तुम्हा इष्टकांना निर्माण करणारा आणि तुमचे पालन करणारा, हे सर्व एकमताने, परम विस्तीर्ण अशा आकाशाइतकीच तुला विस्तीर्ण करोत. इतकेच नव्हे तर एकमत झालेले ते महर्षी आणि देव स्वर्गलोकसदृश अशा ह्या अग्निचयनक्षेत्राच्या पृष्ठभागी तुला स्थापन करोत आणि यजमानालाही स्वर्गलोकाचे ठिकाणी स्थापन करोत. (अनुवाक २).

१ ह्या ठिकाणी मांडली जात असलेली इष्टका हा जणू पूर्वदिशेस राहणारा, ज्याचे ज्वालारूपी केश सुवर्णाप्रमाणे पीतवर्ण असून सूर्यकिरणांसारखीच ज्याची किरणे आहेत असा अग्नीच आहे. युध्दासाठी परराज्यात सैन्य घेऊन जाणारा व रथामध्ये बसण्यात शाहणा असा 'रथगृत्स' नांवाचा 'सेनानी' आणि परराज्यातील गांव स्वराज्यात अंतर्भूत करणारा व रथामध्ये बसल्यावर अधिक बलवान् होणारा 'रथौजा' नांवाचा 'ग्रामणी' हे दोघे ह्या अग्नीचे सेवक असून 'पुंजिकस्थला' व 'कृतस्थला' नांवाच्या दोन अप्सरा ह्या अग्नीच्या सेविका आहेत. स्वभावाने क्रूर असणारे 'यातुधान' संज्ञक एका जातीचे राक्षस हे जणू ह्या अग्नीचे तीक्ष्ण आयुध असून अतिक्रूर असे राक्षस म्हणजे ह्या अग्नीचे तीक्ष्ण असे आयुध होय. २ ही इष्टका म्हणजे जणू काय

अग्निहोत्रहोमादि सर्व यज्ञकर्मे ज्या अग्नीचे ठिकाणी संपादिली जातात, तो दक्षिण दिशेस राहणारा अग्नीच होय. 'रथस्वन' हा त्याचा सेनानी असून 'रथेचित्र' हा त्या अग्नीचा 'ग्रामणी' आहे. 'मेनका' व 'सहजन्या' या नांवाच्या दोन अप्सरा त्याच्या परिचारिका आहेत. आपल्या तीक्ष्ण दातांनी दंश करणारे सिंह, वाघ इत्यादि हिंस्र पशू हे त्या अग्नीचे तीक्ष्ण आयुध असून युध्दात होणारा पुरुषवध हेच त्याचे अत्यंत तीक्ष्ण असे आयुध आहे. ३ ही इष्टका म्हणजेच जणू पश्चिम दिशेस राहणारा विश्वव्यापी असा अग्नी होय. 'रथप्रोत' व 'असमरथ' हे त्या अग्नीचे अनुक्रमे 'सेनानी' व 'ग्रामणी' असून 'प्रम्लोचंती' व 'अनुम्लोचंती' नांवाच्या दोन अप्सरा त्याच्या सेविका आहेत. सर्प हे त्या अग्नीचे तीक्ष्ण शस्त्र असून वाघ हे त्याचे अतितीक्ष्ण शस्त्र होय. ४ ही इष्टका जणू उत्तर दिशेस वास्तव्य करणारा धनसंपादक अग्नीच होय. 'सेनाजित्' हा त्याचा सेनानी असून 'सुषेण' हा त्या अग्नीचा ग्रामणी आहे. 'विश्वांची' व 'घृताची' ह्या दोन अप्सरा त्याच्या परिचारिका असून उदक हे त्या अग्नीचे तीक्ष्ण आयुध व वायू हे त्याचे परमतीक्ष्ण आयुध आहे. ५ ही इष्टका म्हणजे मेघापासून अधोमुख होऊन भूमीवर उडी घेणारा व ऊर्ध्व दिशेस वास्तव्य करणारा 'वैद्युत' संज्ञक अग्नीच होय. 'तार्क्ष्य' हा त्याचा 'सेनानी' व 'अरिष्टनेमि' हा त्या अग्नीचा ग्रामणी आहे. 'उर्वशी' व 'पूर्वचित्ति' ह्या दोन अप्सरा त्याच्या परिचारिका आहेत. भय उत्पन्न करणारा विद्युत्प्रकाश हे त्याचे तीक्ष्ण आयुध असून कडाडणारी अशी प्राणघातक वीज हे त्या अग्नीचे अतितीक्ष्ण आयुध आहे.

त्या त्या दिशेस वास्तव्य करणारा अग्नी, त्याचे सेनानी व ग्रामणी, त्याच्या परिचारिका असणाऱ्या अप्सरा आणि त्याचे तीक्ष्ण व अतितीक्ष्ण अशी आयुधे ह्या सर्वांना नमस्कार असो. ते सारे आमचे रक्षण करोत. हे अग्न्यादिकहो, तुमच्याकडून अनुग्रहित झालेला मी ज्या शत्रूचा आम्ही द्वेष करतो व जो वैरी आमचा द्वेष करतो त्या वैऱ्याला तुमच्या मुखाच्या पसरलेल्या जबड्यात ढकलून देतो.

६ हे इष्टके, जगत्संचारी व जगद्रक्षक अशा आदित्याच्या थंड छायेच्या ह्या ठिकाणी मी तुला स्थापन करतो. समुद्राप्रमाणे विस्तीर्ण अशा आदित्याला नमस्कार असो. समुद्राला प्रकाशित करणाऱ्या आदित्याला नमस्कार असो. ७ हे इष्टके, स्पष्ट दिसणारी, विस्तीर्ण, नानाप्रकारची उत्पादनशक्ती निर्माण

करणारी, प्रभुत्वशक्तिसंपन्न व शत्रुसैन्याचा पराभव करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या तुला उत्कृष्ट अशा सत्यलोकी राहणारा ब्रह्मा स्वर्गलोकाच्या पृष्ठभागी स्थापन करो. स्वर्गलोकातील भोग यजमानाच्या आधीन व्हावयासाठी तू आधी द्युलोकात जा. त्या ठिकाणचा उपभोग दृढ कर. द्युलोकातील त्या भोगाचा नाश करू नको. विश्वातील सर्व मानवांना प्राण, अपान, व्यान व उदान ह्या वायूंची अनुकूल वृत्ती लाभावी, सर्वांची स्वगृहांमध्ये सुस्थिती व्हावी, व सर्वांच्या हातून शास्त्रीय आचरण घडावे, यास्तव, हा सूर्य आपल्या ठिकाणच्या महनीय अशा योगक्षेमसंपत्तीने आणि सुखकर अशा विशिष्ट दीप्तीने तुझे चोहो बाजूंनी संरक्षण करो. तुझ्यावर स्वामित्व करणाऱ्या देवतेच्या अनुग्रहाने अंगिरसांच्या चयनानुष्ठानाचे वेळी जशी त्यांनी मांडलेल्या जागी तू अचल होऊन राहिलीस त्याचप्रमाणे या वेळीही मी तुला जेथे मांडीत आहे त्या ठिकाणी स्थिर हो. ८ विशाल अशा अश्वशाळेतून जेव्हा एखादा अश्व मोकळा होऊन बाहेर पडून रानात चरावयास निघतो, तेव्हा तो जसा मोठमोठ्याने फुरफुरतो, त्याचप्रमाणे हा अग्नी जेव्हा प्रज्वलित केला जातो, तेव्हा मोठ्यामोठ्याने फुरफुरू लागतो. नंतर त्या अग्नीच्या दीप्तीला अनुसरून वारा वाहू लागतो. [illegible]

[illegible]

[illegible]

१ द्युलोकाचे जणू उच्च मस्तकच अशा आदित्याच्या रूपाने हा अग्नीच तळपत असून पृथ्वीचे पालन करणारा देखील हा अग्नीच आहे. उदकांचीच कार्ये असलेल्या स्थावर जंगम शरीराचे पोषण जाठराग्निरूपाने हा अग्नीच करीत असतो. २ हे अग्निदेवा, मस्तकाप्रमाणे प्रशस्त व अग्निमंथन, यज्ञनिष्पादन इत्यादिकांच्या योगाने जगाचा निर्वाह करणाऱ्या कमलपत्राच्या ठिकाणी अथर्वा नांवाच्या ऋषीने अरणींचे मंथन करून तुला निर्माण केले. ३ प्रज्वलित करण्यात येत असलेला हा अग्नी शेकडो, हजारो प्रकारच्या अन्नांचा पालक आहे. मस्तकाप्रमाणे उत्तम, व विद्वान् असणारा हा अग्नी आम्हाला अनेक धनांची प्राप्ती करून देणारा होवो. ४ हा अग्नी, भूलोक, त्याच्या ठिकाणी होणारा यज्ञ व त्या यज्ञाच्या ठिकाणी आम्हास प्रवृत्त करणारा आमचा स्वभावगुण या सर्वांचा नियंता आहे. हे अग्निदेवा ज्या द्युलोकाच्या ठिकाणी

सूर्याचे रूप धारण करून उत्कृष्ट असे घोडे जोडलेल्या रथात बसून तू येत असतोस, त्या द्युलोकाच्या ठिकाणीच तू जणू काय स्वर्गलोकाला जाऊन भिडणाऱ्या अत्युच्च शिरोभागाचीच स्थिती धारण करीत असतोस. हे अग्निदेवा, ह्या यज्ञाचे ठिकाणीच्या सन्निध जाऊन पोचणारी ज्वालारूपी जिव्हाही तूच निर्माण करतोस. ५ उष:काल प्राप्त होताच धार देण्यासाठी एखादी गाय जशी झोपेतून जागी होऊन उठते, त्याचप्रमाणे ऋत्विजांनी अर्पिलेल्या समिधांच्याशी सान्निध्य होताच हा अग्नी प्रज्वलित झाला आहे. पक्षिसमुदायापैकी मोठमोठे गगनगामी पक्षी जशी प्रचंड वेगाने भरारी मारतांना आपले पंख पसरतात, त्याप्रमाणे प्रज्वलित झालेल्या ह्या अग्नीच्या प्रकाशाचे किरण प्रचंड वेगाने गगनाला भिडावयास जाताना पसरत असतात. ६ दूरदर्शी असा विद्वान, यज्ञयोग्य, श्रेष्ठ, अभिमत फलांची वृष्टि करणारा आणि भूमीवर स्थिरपणे राहणारा अशा ह्या अग्निदेवाला उद्देशून आम्ही अग्निविषयक नमस्काराने युक्त आणि म्हणूनच वंदनभावाला व्यक्त करणारे असे स्तोत्र उच्चारीत आहो. द्युलोकामध्ये प्रकाशमान होणाऱ्या व ज्याची गती विस्तीर्ण आहे अशा आदित्य देवाला संध्यावंदनादि निमित्तांच्या प्रसंगी ब्राह्मणांनी उच्चारलेले नमस्कारयुक्त स्तोत्र अर्थात् स्तुतिरूपी भाषण जसे त्या आदित्याचा आश्रय करते, त्याच्या कानी जाते, तसेच आम्ही उच्चारीत असलेले नमस्कारयुक्त स्तुतिवाक्य अग्निदेवाच्या कानी जावो. ७ सर्व प्राण्यांचे रक्षण करणारा, अत्यंत कुशल, स्वत:च्या कर्माविषयी सदैव सावध, व मुखाला नेहमी तूप माखलेला हा अग्निदेव उत्कृष्ट प्रकाशित व स्तुतियुक्त अशा यज्ञकर्माच्या सिध्दीसाठीच उत्पन्न झाला आहे. द्युलोकाला स्पर्श करणाऱ्या उंच ज्वालांच्या समूहाने प्रकाशमान झालेला हा अग्नी अत्यंत पवित्र असून भरणकुशल अशा यजमानांच्यासाठीच विशेषत: प्रदीप्त होत असतो. ८ हे अग्निदेवा, गुप्त जागी दडी देऊन बसलेल्या व निरनिराळ्या वनांच्या ठिकाणी वणव्याच्या रूपाने राहणाऱ्या तुला अंगिरस कुलातील महर्षींनीच प्रथम हुडकून काढले. अत्यंत बल खर्चून केल्या जाणाऱ्या अरणिमंथनाने तू उत्पन्न होत असतोस. सुंदर अंगांनी युक्त अशा हे अग्निदेवा, मननशील असे ऋषी तुला 'बलाचा पुत्र' असे म्हणत असतात. ९ यज्ञकर्माचा ज्ञाता असलेल्या, यागाच्या प्रारंभीच येऊन पोचणाऱ्या व पूर्व दिशेस बसणाऱ्या अशा ज्या अग्निदेवाला गार्हपत्य, दक्षिणाग्नी व आहवनीय या तीन स्थानांनी युक्त असलेल्या यज्ञशाळेत ऋत्विज प्रदीप्त करीत असतात, तो कल्याणकारी

अशा यज्ञाचा प्रवर्तक अग्निदेव यागाची सिध्दी होण्याकरता देवांना बोलावणारा 'होता' नामक ऋत्विज होऊन निरनिराळे देव, इंद्र व त्यांचे रथ यांच्या सहवर्तमान ह्या यज्ञामध्ये येऊन बसला आहे. १० अनेक प्रकारच्या कीर्तींनी प्रसिध्द व अत्यंत लोकप्रिय अशा हे अग्निदेवा, मानवसमाजात यज्ञशील असलेले उपासक ज्वालारूपी केश मस्तकावर धारण करणाऱ्या तुज अग्नीला देवांच्याकडे हविर्द्रव्ये पोचविण्यासाठी बोलावीत असतात. ११ परस्परांचे मित्र असलेल्या हे ऋत्विग्यजमान हो, रक्षण करणाऱ्यांमध्ये अत्यंत जुना संरक्षक, आपल्या उपासकाच्या बलाचा नाश न होऊ देणारा, व स्वत: अतिशय बलवान् अशा अग्निदेवासाठी तुम्ही उत्कृष्ट असे हविर्द्रव्यरूपी अन्न तयार करा आणि त्याला उद्देशून उत्कृष्ट असे स्तोत्र पठण करा. तो अग्निदेव तुम्हाला मिष्टान्न संपादन करून देवो. १२ इच्छित फलांचा वर्षाव करणाऱ्या हे अग्निदेवा, सर्व प्रकारची फले एकत्र जमा करून ती तू यजमानाच्या जवळ आणून ठेवतोस. सर्वमान्य असा तू पृथ्वीरूप अशा ह्या उत्तरवेदीच्या ठिकाणी उत्कृष्ट प्रकारे प्रज्वलित होत असतोस. महानुभाव असा तू नाना प्रकारची धने जमा करून आम्हास आणून दे. १३ हे ऋत्विग्यजमान हो, अन्नाचा केव्हाही नाश न करणारा, यजमानांची प्रीती संपादन करण्यास कारणभूत होणारा, सत्कार्याविषयी कार्यकर्त्याला अतिशय चेतना उत्पन्न करणारा ज्ञाता, विसावा न घेता सतत उद्यम करणारा, यज्ञाचा उत्कृष्ट निष्पादक, अखिल जगाची वार्ता देवांपर्यंत पोचविणारा दूत आणि अमर अशा तुमच्या अग्निदेवाला मी ह्या नमस्काराने बोलावीत आहे. १४ यजमानाविषयी स्नेहार्द्रचित्त असा अग्निदेवच प्रस्तुत चालू असलेल्या यज्ञकर्माची योजना करतो. दहनशक्तीने सर्व विश्वाचे भोजन करणारा, ऋत्विजांच्या कडून यज्ञकर्मामध्ये अत्यंत आदराने बोलाविला जाणारा, यज्ञमंडपात उत्कृष्ट रीतीने शोभणारा 'ब्रह्मा' नामक ऋत्विज, यजनाला योग्य व पापाचे निर्मूलन करणारा असा तो अग्निदेव सुखाने वस्ती करू इच्छिणाऱ्या प्राण्यांचा जीवनक्रम नीट चालण्यास कारणभूत होणारे अन्न संपादन करो. १५ होमाचा सर्वतोपरी निष्पादक व आहुतींच्या द्वारा संतुष्ट होऊन पर्जन्यवृष्टीचे सिंचन करणाऱ्या अग्निदेवाचा प्रकाश ज्या योगाने उन्नत होईल, त्याच्या ठिकाणच्या धुराचे प्रवाह समीपवर्ती असणाऱ्या ऋत्विजांच्या नेत्रादि इंद्रियांना उपद्रव न देता आकाशास स्पर्श करण्यासारखे जेणे करून उन्नत होतील, अशाप्रकारे ऋत्विज व यजमान अग्नीला प्रज्वलित करीत

असतात. १६ बलाचा पुत्र, जन्मजात ज्ञानी व गाईंनी युक्त अशा अन्नाचा स्वामी असणाऱ्या हे अग्निदेवा, तू आमच्या ठिकाणी महनीय अशा प्रकारची कीर्ती संपादन कर. १७ भरपूर सैन्य जवळ बाळगणाऱ्या हे अग्निदेवा, ऋत्विजांनी प्रज्वलित केलेला, सुखाने वस्ती व्हावयास कारणभूत होणारा, विद्वान, यज्ञाचा पहिला प्रवर्तक आणि मंत्ररूप वाणीने स्तुत्य असा तू धनाने युक्त असे गृह व क्षेत्र आम्हाला दे. १८ हे अग्निदेवा, सर्व दिवसांत आणि सर्व उष:कालांत आम्हाला उपद्रव देणाऱ्या राक्षसांना तू हाकून लाव. हे देदीप्यमान अग्निदेवा, आपल्या सैन्याकडूनच केवळ राक्षसांचा नाश न करता तू स्वत: देखील राक्षसांचा विनाश कर. ज्वालारूपाने विशाल व भयानक असा जबडा पसरून बसलेला तू राक्षसांना जाळून भस्म कर. १९ हे अग्निदेवा, जरारहित व स्वभावत:च प्रकाशयुक्त असणाऱ्या तुला, मी सर्व बाजूंनी प्रज्वलित करतो. ज्या अर्थी स्तुतिपूर्वक अर्पण केली जाणारी अचेतन समिधा सुध्दा तुला प्रत्येक दिवशी प्रज्वलित करू शकते, त्या अर्थी सचेतन असणारे आम्ही उपासक तुला प्रज्वलित करतो, हे काय सांगावयास पाहिजे ? तुझे स्तवन करणाऱ्या आम्हा ऋत्विजांच्या करता तू अन्न संपादन कर. २० शुध्द अशा ज्योतींचा पालक, चंद्राप्रमाणे उत्कृष्ट आल्हादकारक, पापांचा नाशक, प्रजांचा पालनकर्ता व देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेणाऱ्या हे अग्निदेवा, तुझ्या संबंधाच्याच स्तुतियुक्त अशा मंत्राने तुला आहुती देऊन तू सर्वतोपरी संतुष्ट केला जात असतोस. यास्तव, तुझे स्तवन करणाऱ्या आम्हा उपासकांच्या करता तू अन्न संपादन कर. २१ चंद्राप्रमाणे आल्हाद देणाऱ्या हे अग्निदेवा, तू आपल्या मुखाच्या ठिकाणी तुपाने माखलेल्या जणू दोन पळ्याच अशा हनुवटी धारण करतोस. बलाचा अधिपती असणाऱ्या हे अग्निदेवा, शस्त्रांचे पठण ज्यामध्ये केले जाते, अशा सर्व यज्ञांमध्ये तू आम्हाला अत्यंत उत्कर्षाला प्राप्त कर आणि तुझी स्तुती करणाऱ्या यजमानाच्यासाठी अन्नही संपादन कर. २२ हे अग्निदेवा, आमच्या हृदयामध्ये सर्वदा प्रेमाने संचारून राहिलेल्या तुला आम्ही आजच्या ह्या यज्ञकर्मात, हरबऱ्यांची चंदी देऊन घोड्याला समृध्द करतात किंवा अनुष्ठानाच्या योगाने ज्योतिष्टोमादि यज्ञाला समृध्द करतात त्याप्रमाणे, समूहरूपाने असणाऱ्या तुझ्या स्तोत्रांनी समृध्द करणार आहो. २३ हे अग्निदेवा, आम्ही तुझी स्तुती केल्यानंतर आम्ही करणार असलेल्या कल्याणरूप, इच्छितफलदानसमर्थ, सुसाध्य, अमोघबलसंपन्न व प्रौढ अशा

यज्ञकर्माचा तू सारथी हो. अर्थात् आमचे यज्ञकर्म उत्तम प्रकारे तडीस लावणारा हो. २४ हे अग्निदेवा, ह्या यज्ञकर्मामध्ये मंत्ररूपी अनेक वाक्यांनी तुझे स्तवन करीत असतानाच आम्ही तुला हविर्द्रव्य अर्पण करीत आहो. द्युलोकातील मेघ गरजतात त्याप्रमाणे तुझ्या प्रबल अशा ज्वाला तुला गर्जावयास लावतात. २५ हे अग्निदेवा, आपल्या सर्व सैन्यांच्यासह समाधान स्थितीला प्राप्त झालेला तू आमच्या ह्या पूजनीय स्तुतिमंत्रांनी संतुष्ट हो आणि स्वर्गलोकाचाच जणू प्रकाश असा आदित्य जसा आमच्या जवळ येतो, तसाच तू आमच्या जवळ ये. २६ धनाचा दाता, बलाचा पुत्र, उपजतज्ञानी, ब्राह्मण कुलात उत्पन्न झालेला आणि जो जन्मापासून ज्ञानी समजला जातो, अशा ह्या अग्निदेवाला मी यज्ञासाठी देवांना बोलाऊन आणणारा होताच समजतो. जो अग्निदेव देवांच्यापर्यंत पोचण्याइतक्या उंच ज्वालेने आमच्या ह्या यज्ञाचा उत्कृष्ट निष्पादक होतो, तो अग्निदेव शुध्दप्रकाशयुक्त होत्साता सर्व बाजूंनी आहुतीरूपाने ओतलेल्या व अग्निकुंडात वाहत राहिलेल्या घृताच्या विशिष्ट अशा दीप्तीला मागे टाकून अधिकतेने प्रकाशत असतो. २७ हे अग्निदेवा, तू सर्वदा आमचा निकटवर्ती हो. तूच आमचा रक्षणकर्ता हो. आणि तू ह्या यज्ञशालारूपी गृहात नेहमी आमच्या सान्निध्यात राहणारा हो. २८ अत्यंत शुध्द अशा प्रकाशाने युक्त अशा हे अग्निदेवा, तुझ्याशी सख्य करणाऱ्या आम्हा उपासकांना तुझ्याकडून सुख मिळावे म्हणूनच खरोखर आम्ही जवळ आलो आहोत. २९ ज्याची कीर्ती वसू, रुद्र, आदित्य इत्यादि देवांनी आदरपूर्वक ऐकली आहे, असा हा धनवान् अग्निदेव अत्यंत देदीप्यमान आणि भक्तांना धन देणारा आहे. हे अग्निदेवा, तू आमच्याकडे मुख करून आमच्या अगदी जवळ येऊन बैस. (अनुवाक ४).

१ हे इष्टके, इंद्राग्नीच्याशी तुझा संयोग घडवून आणणाऱ्या संबंधाच्या योगानेच मी तुझी ह्या अग्निचयनरूप क्षेत्राचे ठिकाणी योजना करीत आहे. २ हे इष्टके, आघारसंज्ञक आहुतींच्याशी जो तुझा संबंध घडून आला, त्या संबंधाच्या योगानेच मी तुझी येथे योजना करीत आहे. ३ हे इष्टके, शरीरकांतीशी तुझा संयोग ज्या संबंधामुळे झाला त्या संबंधाच्या दृष्टीनेच मी तुला या ठिकाणी नियुक्त करीत आहे. ४ हे इष्टके, धनाशी तुझा संयोग घडविणाऱ्या संबंधाच्या योगानेच तुला मी या ठिकाणी नियोजित करीत आहे. ५ हे इष्टके, होत्रक पठण करीत असलेल्या शास्त्रांच्या बरोबर तुझा

संयोग ज्याने घडविला, त्या संबंधाच्या आधारानेच मी तुला ह्या ठिकाणी योजिले आहे. ६ हे इष्टके, सामांच्या अनेक आवृत्तींनी सिध्द होणाऱ्या स्तोमांच्याशी तुझा संयोग घडवून आणणाऱ्या संबंधाच्या योगानेच तुझी मी या ठिकाणी योजना करीत आहे. ७ हे इष्टके, गायत्र्यादि छंदांच्याशी तुला संयुक्त करणाऱ्या संबंधाच्या दृष्टीनेच तुला मी या अग्निचयन क्षेत्राच्या ठिकाणी नियुक्त करीत आहे. ८ हे इष्टके, धन, पुष्टी व ज्ञातीमध्ये प्रमुखत्वाचे स्थान यांचा लाभ मला व्हावा म्हणून माझ्याशी तुझा संयोग ज्या आत्मीय संबंधाने घडविला त्या संबंधाच्या योगानेच मी ह्या चयनक्षेत्राच्या ठिकाणी तुला नियुक्त करीत आहे. ९ हे इष्टके, कृत्तिका नक्षत्रांतील सात तारकांपैकी 'अंबा' नांवाची तारकाच जणू तू आहेस. १० हे इष्टके, 'दुला' नावाची तारका जणू तूच आहेस. ११ हे इष्टके, तू जणू काय 'नितत्नि' संज्ञक तारका आहेस. १२ हे इष्टके, 'अभ्रयंती' नांव धारण करणारी तारका जणू तूच आहेस. १३ हे इष्टके, 'मेघयंती' नामक तारका जणू तू आहेस. १४ हे इष्टके, 'वर्षयन्ती' नांवाची तारका जणू तूच आहेस. १५ हे इष्टके, तू 'चुपुणीका' हे नांव धारण करणारी कृत्तिकापुंजापैकी सातवी तारका आहेस. प्रजापती देवाने माझ्या ठिकाणी प्रेरित केलेल्या सर्व प्रकारच्या बुध्दींनी मी तुला या ठिकाणी मांडून ठेवीत आहे. १६ हे मंडलेष्टके, अन्नाने परिपूर्ण अशी पृथ्वी, उदकाने परिपूर्ण असलेले नगर व त्या नगरात राहणारी मनुष्ये तुझी संरक्षक आहेत. ज्या ह्या पृथ्वीच्या संरक्षणासाठी अग्नीने अतीशय प्रयत्न केला त्या पृथ्वीच्या रूपानेच तुज इष्टकेजवळ मी आलो आहे. मी ह्या ठिकाणी मांडीत असलेली ही इष्टका मज यजमानाला राहत्या घराप्रमाणेच उपयुक्त होवो. आणि माझ्या रक्षणाच्या कामी मला कवचासारखी उपयोगी पडो. १७ हे मंडलेष्टके, बुध्दीने प्रौढ अशा जनसमूहाने युक्त आणि उपयुक्ततेच्या दृष्टीने द्युलोकापेक्षाही अधिक असलेले अंतरिक्ष हेच तुझे राहण्याचे नगर असून मरुत् हे तुझे संरक्षक आहेत. ज्या ह्या पृथ्वीच्या संरक्षणासाठी वायूने विशेष प्रयत्न केला त्या पृथ्वीच्या रूपानेच असणाऱ्या तुज इष्टकेच्या सन्निध मी आलो आहे. मी येथे मांडून ठेवत असलेली ही इष्टका मला राहत्या घरासारखी व माझ्या संरक्षणाच्या कामी कवचासारखी उपयोगी पडणारी असो. १८ हे मंडलेष्टके, अमृताने परिपूर्ण असे तू राहत असलेले द्युलोक नांवाचे नगर कोणाकडूही पराजित होणारे नाही. बारा आदित्य हे तुझे संरक्षक

आहेत. ज्या ह्या पृथ्वीच्या संरक्षणासाठी सूर्याने विशेषत: प्रयत्न केला, त्या पृथ्वीच्या रूपानेच असणाऱ्या तुज इष्टकेच्या समीप मी आलो आहे. मी या ठिकाणी मांडून ठेवीत असलेली ही इष्टका मला माझ्या राहत्या घरासारखी उपयुक्त आणि माझ्या रक्षणाच्या कामी कवचाप्रमाणे उपयोगी पडणारी असो. (अनुवाक ५).

१ हे इष्टके, सर्वच प्राण्यांना प्राण व अपान ह्या दोन्ही वायूंची अनुकूलता लाभण्यासाठी उत्कृष्ट प्रकाशाने युक्त अशा तुज इष्टकेला बृहस्पतिदेव पृथ्वीच्या पृष्ठभागी स्थापन करो. हे इष्टके, संपूर्णतेने स्वर्गाला प्रकाशित करणारी ज्योत आमच्यासाठी तेवत ठेव. अग्नी हा तुझा पालक आहे. २ हे इष्टके, अखिल विश्वाला प्राण व अपान या वायूंचे आनुकूल्य प्राप्त होण्यासाठी उज्वल प्रकाशाने तळपणाऱ्या तुज इष्टकेला विश्वकर्मा अंतरिक्षाच्या पृष्ठभागावर स्थापन करो. सर्वच स्वर्गलोक आम्हाला दिसू लागेल अशी ज्योती तू आम्हासाठी अखंड तेवत ठेव. वायू हा तुझा पालन करणारा आहे. ३ हे इष्टके, सर्व जगाला प्राणापान वायूंची अनुकूल गती प्राप्त व्हावी म्हणून सुप्रकाशित अशा तुज इष्टकेला सृष्टिकर्ता प्रजापतीच द्युलोकाच्या ठिकाणी स्थापन करो. स्वर्गलोकाचे संपूर्ण दर्शन आम्हाला घडावे अशा प्रकारची उज्वल ज्योती तू आम्हाला दे. परमेष्ठी देव तुझा पालनकर्ता आहे. ४ हे इष्टके, तू पूर्वेकडील वारा आम्हाला मिळवून देणारी आहेस. ५ हे इष्टके, तू योग्य वेळी अभ्रे उत्पन्न करण्याचीच देणगी आम्हाला देणारी आहेस. ६ हे इष्टके, तू आकाशात वीज उत्पन्न करणारी आहेस. ७ हे इष्टके, तू मेघगर्जना निर्माण करणारी आहेस. ८ हे इष्टके, आम्हाला तू पर्जन्यवृष्टीचा लाभ करून देणारी आहेस. ९ हे इष्टके, आम्ही मांडणार असलेल्या चितिरूपी अग्नीची तू आम्हाला प्राप्ती करून देणारी आहेस. १० हे इष्टके, तू देवांनाही चितिरूपी अग्नीची प्राप्ती करून देणारी आहेस. ११ हे इष्टके, तू यजमानाला वायूची प्राप्ती करून देणारी आहेस. १२ हे इष्टके, तू देवांनाही वायूची प्राप्ती करून देणारी आहेस. १३ हे इष्टके, तू यजमानाला अंतरिक्षाची प्राप्ती करून देणारी आहेस. १४ देवांनाही अंतरिक्षाची प्राप्ती करून देणारी तूच आहेस. १५ हे इष्टके, तू अंतरिक्षरूपच आहेस. १६ हे इष्टके, अंतरिक्षाच्या प्रीतीकरताच मी तुला येथे मांडून ठेवतो. १७ एखादी वस्तू आत पडताच ज्याच्या तळाशी खोल जाऊन दिसेनाशी होते, अशा भरपूर उदकाच्या प्राप्तीकरता

मी तुला येथे ठेवतो. १८ हे इष्टके, प्रवाहरूपाने वाहणाऱ्या उदकाच्या लाभासाठी मी तुला येथे ठेवतो. १९ हे इष्टके, एकाच ठिकाणी साठून राहणाऱ्या जलासाठी मी तुला या ठिकाणी मांडून ठेवतो. २० हे इष्टके, आम्हाला ज्ञान प्राप्त होण्याकरता तुला मी येथे स्थापन करतो. २१ हे इष्टके, प्रभूत असे ज्ञान मिळावे, म्हणून मी तुला येथे मांडतो. २२ हे इष्टके, सूर्यप्रकाशाच्या लाभासाठी मी तुला या ठिकाणी स्थापन करतो. २३ हे इष्टके, द्युलोकातील नक्षत्रादिकांचा प्रकाश मिळावा म्हणून मी तुला येथे ठेवतो. २४ हे इष्टके, प्रसिध्द अशा बारा आदित्यांच्यासाठी मी तुला या ठिकाणी ठेवतो. २५ हे इष्टके, पादबध्द अशा मंत्रांनी साध्य होणाऱ्या स्तुतीसाठी मी तुला येथे ठेवतो. २६ हे इष्टके, सूर्याचा प्रकाश मिळावा म्हणून मी तुझी येथे स्थापना करतो. २७ हे इष्टके, चंद्राचा प्रकाश मिळावा म्हणून मी तुला येथे ठेवतो. २८ हे इष्टके, अग्नीच्या प्रकाशाचा लाभ व्हावयासाठी मी तुला या ठिकाणी मांडून ठेवतो. २९ हे इष्टके, नक्षत्रांच्या प्रकाशाची प्राप्ती व्हावी याकरिता मी तुला या ठिकाणी ठेवतो. ३० हे इष्टके, यश:प्रद अशा तुज इष्टकेला यश:प्राप्तीच्या निमित्ताने येथे मी स्थापन करतो. ३१ हे इष्टके, तू दुधाची प्राप्ती करून देणारी आहेस. आम्हास दूध भरपूर प्राप्त व्हावे म्हणून मी तुला येथे ठेवतो. ३२ हे इष्टके, तू शरीरकांती देणारी आहेस. शरीरकांती मिळावयासाठीच मी तुला येथे ठेवतो. ३३ हे इष्टके, तू बलप्रद आहेस. म्हणून बलप्राप्तीच्या निमित्ताने तुला या ठिकाणी मांडतो. ३४ हे इष्टके, तू धनप्रद असल्यामुळे, धनप्राप्तीच्या हेतूने मी तुला येथे ठेवतो. तुला जाणणारा ऋषी, तुझे प्रतिपादन करणारे मंत्रवाक्य आणि तुझी अभिमानिनी देवता यांच्यासह तुला मी येथे स्थापन करतो. पूर्वी अंगिरसांनी तुला मांडल्या ठिकाणी तू जशी स्थिर झालीस, त्याचप्रमाणे ह्या ठिकाणीही स्थिरतेने रहा. (अनुवाक ६).

१ हे इष्टके, तू सर्व वस्तूंची वाढ करणारी आहेस. २ हे इष्टके, तू भूमीला पूज्यत्व प्राप्त करून देणारी आहेस. ३ हे इष्टके, तू जणू पूर्व दिशाच आहेस. ४ हे इष्टके, तू अंतरिक्षात राहणारी आहेस. ५ हे इष्टके, अंतरिक्ष समजून तू या ठिकाणी रहा. ६ हे इष्टके, तू उदकांच्या ठिकाणी राहणारी आहेस. ७ हे इष्टके, तू श्येन पक्ष्यावर आरूढ होणारी आहेस. ८ हे इष्टके, तू गृध्रनामक पक्ष्यावर आरूढ होणारी आहेस. ९ हे इष्टके, तू गरुड पक्ष्यावर बसून संचार करणारी आहेस. १० हे इष्टके, दु:खरहित

अशा स्वर्गलोकात तू राहणारी आहेस. ११ हे इष्टके, पृथ्वीवर असणाऱ्या सर्व धनांच्याच ठिकाणी मी जणू तुझी स्थापना करतो. १२ हे इष्टके, अंतरिक्षात असणाऱ्या सर्व धनांच्याच ठिकाणी मी तुझी स्थापना करतो. १३ हे इष्टके, द्युलोकामध्ये असलेल्या धनांच्या ठिकाणी मी तुला मांडून ठेवतो. १४ हे इष्टके, दिशांच्या ठिकाणी असणाऱ्या धनांच्या ठिकाणीच मी तुला स्थापन करतो. १५ हे इष्टके, तू धनप्रद आहेस. यास्तव, सर्व प्रकारच्या धनांच्या ठिकाणी मी तुला मांडून ठेवतो. १६ हे इष्टके, तू माझ्या प्राणवायूचे रक्षण कर. १७ हे इष्टके, तू माझ्या अपानवायूचे रक्षण कर. १८ हे इष्टके, तू माझ्या शरीरातील 'व्यान' वायूचे रक्षण कर. १९ हे इष्टके, तू माझ्या आयुष्याचे रक्षण कर. २० हे इष्टके, तू माझ्या संपूर्ण आयुष्याचे रक्षण कर. २१ हे इष्टके, तू माझ्या कुटुंबातील सर्वांच्या आयुष्याचे रक्षण कर. २२ हे चितिरूपी अग्ने, अनिष्ट अशा पातकाचे हरण करणारे असे जे तुझे परमश्रेष्ठ 'हृत्' नांव आहे, त्या नांवाने युक्त होऊनच तू मजजवळ ये. तू व मी परस्परांची संगत करू. हे अग्ने, एकावर एक रचलेल्या विटांच्या पांचही थरांच्या ठिकाणी तू अधिष्ठित होऊन रहा. २३ हे इष्टके, तू जणू वसंत ऋतूच आहेस. २४ हे इष्टके, तू जणू ग्रीष्म ऋतूच आहेस. २५ हे इष्टके, तू जणू वर्षा ऋतूच आहेस. २६ हे इष्टके, तू जणू शरद् ऋतूच आहेस. २७ हे इष्टके, तू जणू काय हेमंत ऋतूच आहेस. २८ हे इष्टके, तू जणू शिशिर ऋतूच आहेस. २९ हे इष्टके, तू जणू काय संवत्सररूपच आहेस. (अनुवाक ७).

१ हे इष्टके, अग्नीसहवर्तमान अखिल विश्वाचे पालन करण्याविषयी झटणारा इंद्र जणू तूच आहेस. २ हे इष्टके, सूर्यासह स्वतःच्या तेजाने शोभणारा इंद्र जणू काय तूच आहेस. ३ हे इष्टके, ज्योतिष्टोमासारख्या प्रौढ यज्ञकर्मासह 'शची' देवीचा पती इंद्र जणू तूच आहेस. ४ हे इष्टके, अभिमत फलाची वृष्टी करणाऱ्या धर्मासहवर्तमान असणारा व प्राणिमात्रांच्या ठिकाणी निरनिराळी रूपे निर्माण करणारा इंद्र जणू तूच आहेस. ५ हे इष्टके, पाकयज्ञासारख्या लहान लहान यज्ञांसह असणारा व अन्नांचा साठा जवळ बाळगणारा इंद्र जणू तूच आहेस. ६ हे इष्टके, गाई इत्यादि रूपाने असणाऱ्या दक्षिणा द्रव्यासह स्वर्गलोकात्मक इंद्र तूच आहेस. ७ हे इष्टके, अत्यंत क्रोधाने वृत्रासुराचा वध करणारा इंद्र तूच आहेस. ८ हे इष्टके, अत्यंत स्नेहाने

शरीर धारण करणारा इंद्र तूच आहेस. ९ हे इष्टके, अन्नाने भरलेल्या घराच्या रूपाने असणारा इंद्र जणू तूच आहेस. १० हे इष्टके, पृथ्वीसह वर्तमान अशा द्रव्यादिकांचे दान केलेला इंद्र तूच आहेस. ११ हे इष्टके, पादबध्द अशा मंत्रांच्या सह असणारा व हविद्रर्व्यरूपी अन्नाचा भोक्ता असलेला इंद्र जणू तूच आहेस. १२ हे इष्टके, हवि:प्रदानाला कारणभूत होणाऱ्या वषट्कारासह समृध्द असणारा इंद्र तूच आहेस. १३ हे इष्टके, उद्गात्यांनी गाइलेल्या सामासह असणारा व शरीराचे पालन करणारा तूच आहेस. १४ हे इष्टके, दहा अक्षरी चरणांनी युक्त असलेल्या 'विराट्' छंदासह प्रकाशमान होणारा इंद्र तूच आहेस. १५ हे इष्टके, प्रमुख अशा ऋत्विजांसह सोमपान करणारा इंद्र तूच आहेस. १६ हे इष्टके, गाई इत्यादि दक्षिणाद्रव्यांच्या सह यज्ञाचे धारण करणारा इंद्र तूच आहेस. १७ हे इष्टके, राजासहवर्तमान सर्व मनुष्यांचे धारण करणारा इंद्र तूच आहेस. १८ हे इष्टके, अश्व व रथ यांच्यासह असणारा वज्रधारी इंद्र तूच आहेस. १९ हे इष्टके, वसंतादि ऋतूंच्यासह यज्ञाचे फल देण्यास समर्थ असणारा इंद्र तूच आहेस. २० हे इष्टके, 'संवत्सर' संज्ञक कालासह सर्व ठिकाणी व्यापून राहणारा इंद्र तूच आहेस. २१ हे इष्टके, उपोषण, अन्नदान इत्यादि प्रकारच्या तपाच्या योगाने कोणाकडूनही तिरस्कृत न झालेला इंद्र तूच आहेस. २२ हे इष्टके; बारा प्रकारची स्वरूपे धारण करून सूर्यरूपाने व्यक्त होणारा इंद्र देखील तूच आहेस. (अनुवाक ८).

१ हे इष्टके, अन्नाची प्राप्ती व्हावयाच्या इच्छेने यजमानाकडून संकल्पित अशा यज्ञस्वरूपाने असणारा प्रजापती जणू तूच आहेस. २ हे इष्टके, यजमानाने दीक्षा ग्रहण केल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाच्या स्वरूपाने असणारा 'धाता' तूच आहेस. ३ हे इष्टके, यज्ञासाठी धनिकांच्याकडे द्रव्याची याचना केली जात असतांना यज्ञस्वरूपाने असलेला 'सविता' जणू तूच आहेस. ४ हे इष्टके, सोमवल्ली विकत घ्यावयासाठी किंमत म्हणून देण्यात येणारी गाय घेऊन यजमान जाण्याच्या स्थितीत असणाऱ्या यज्ञाचे रूप धारण करणारा 'पूषा' देव जणू तूच आहेस. ५ हे इष्टके, वल्लीरूपी सोमराजा वस्त्रात बांधून घेतल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञरूपाने असणारा 'वरुण' तूच आहेस. ६ सोमराजा विकत घेण्याच्या वेळच्या स्थितीतील यज्ञरूपाने असणारा व असुरांचे प्राण हरण करणारा इंद्र तूच आहेस. ७ हे इष्टके, वल्लीरूपी सोमराजा

विकत घेतल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाच्या स्वरूपाने असणारा 'मित्र' नामक देव तूच आहेस. ८ हे इष्टके, सोमराजा गाठोड्यात बांधून यजमानाच्या मांडीवर दिल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा 'शिपिविष्ट' नामक विष्णू तूच आहेस. ९ हे इष्टके, 'प्राग्वंश' नामक मंडपात सोमराजा नेण्याच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा अग्निसदृश असा 'नरंधिष' तूच आहेस. १० हे इष्टके, प्राग्वंश मंडपात येऊन सोमराजा घडवंचीवर आरोहण करून बसल्यानंतरच्या स्थितीत असणाऱ्या यज्ञाचे रूप धारण करणारा 'अधिपति' संज्ञक देव जणू तूच आहेस. ११ हे इष्टके, सोमराजाला प्राग्वंश मंडपातून आग्नीध्रीय मंडपात नेण्याच्या वेळच्या स्थितीतील यज्ञस्वरूप असा प्रजापती जणू तूच आहेस. १२ हे इष्टके, सोमराजा आग्नीध्रीय मंडपात येऊन पोचल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा अग्नी तूच आहेस. १३ हे इष्टके, आग्नीध्रीय मंडपातून सोमराजाला 'हविर्धान' मंडपात नेण्याच्या वेळच्या स्थितीतील यज्ञरूपधारी बृहस्पती म्हणजे जणू तूच आहेस. १४ हे इष्टके, सोमराजा हविर्धान मंडपात प्रविष्ट झाल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा इंद्र तूच आहेस. १५ हे इष्टके, सोमराजाला हविर्धान मंडपातील घडवंचीवर ठेवल्यावरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारी 'अदिती' देवी देखील तूच आहेस. १६ हे इष्टके, घडवंचीवरून खाली उतरवून 'अधिषवण' नांवाच्या दोन फळ्यांवर ठेवलेल्या वरवंट्याच्या ठिकाणी सोमराजा ठेवल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा विष्णू जणू तूच आहेस. १७ हे इष्टके, वसतीवरी नामक घागरीतील उदक वल्लीरूपी सोमराजावर सिंचित केल्याच्या स्थितीतील यज्ञाचे रूप धारण करणारा अथर्वा नामक ऋषी जणू तूच आहेस. १८ हे इष्टके, सोमराजा वरवंट्यांनी कुटला गेल्यावरच्या स्थितीतील यज्ञाचे रूप धारण करणारा यम तूच आहेस. १९ हे इष्टके, 'अदाभ्य' नांवाच्या ग्रहपात्रात सोमवल्ली ढवळीत असल्याच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा व अपवित्र अशा स्थलांनाही शुध्द करणारा आदित्य जणू तूच आहेस. २० हे इष्टके, सोमवल्ली कुटून काढलेला रस 'दशापवित्र' नांवाच्या गाळण्यातून गाळला जाण्याच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा 'वायू' जणू तूच आहेस. २१ हे इष्टके, 'मैत्रावरुण' नामक ग्रहपात्रात दुग्धमिश्र असा सोमरस भरलेल्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा मित्र नामक देव तूच आहेस. २२ हे इष्टके,

'मंथी' नांवाच्या ग्रहपात्रात भरून घेतलेल्या सोमरसात सातूंचे पीठ मिश्रित केल्यानंतरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप घेणारा मंथिनामक देवही तूच आहेस. २३ हे इष्टके, चमस नांवाच्या सर्व लाकडी पाळयांमध्ये सोमरस ओतप्रोत भरलेल्या स्थितीच्या वेळचे यज्ञरूप धारण करणारा 'विश्वेदेव' नांवाचा देव तूच आहेस. २४ हे इष्टके, सोमरस अग्नीमध्ये आहुतीरूपाने दिला गेल्या नंतरच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा 'रुद्र' जणू तूच आहेस. २५ हे इष्टके, ऋत्विजांनी भक्षण करावा म्हणून ग्रहपात्रात व चमसपात्रात हुतशेषरूपाने उरलेला सोमरस 'सद्' नामक मंडपात नेण्याच्या स्थितीत असलेल्या यज्ञाचे स्वरूप धारण करणारा वायू तूच आहेस. २६ हे इष्टके, भक्षण करण्याच्या दृष्टीने ऋत्विजांनी अवलोकन करण्याच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा मनुष्यदृष्टीसदृश 'नृचक्षा' नांवाचा देव तूच आहेस. २७ हे इष्टके, ऋत्विजांच्या मुखात सोमरस प्रविष्ट झाल्याच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा 'भक्ष' नांवाचा वैश्वानर अग्नी जणू तूच आहेस. २८ हे इष्टके, प्राशन करून पात्रात उरलेल्या सोमरसात वसतीवरी नामक घागरीतील उदक भरून ठेवलेल्या स्थितीत पितरांचे स्वरूप धारण करणारा यज्ञ देखील तूच आहेस. २९ हे इष्टके, अवभृतासाठी जलप्रवाहावर जातांना ऋत्विजांनी सोमराजा आपल्या बरोबर घेतल्याच्या वेळचे यज्ञाचे स्वरूप घेणारा 'असु' म्हणजे 'प्राण' नांवाचा देवही तूच आहेस. ३० हे इष्टके, अवभृतासाठी जलप्रवाहावर जाण्याच्या मार्गावर सोमराजा असलेल्या स्थितीतील यज्ञाचे रूप धारण करणारा 'सिंधु' नामक देव तूच आहेस. ३१ हे इष्टके, 'अवभृत' संज्ञक कर्म जेथे करावयाचे त्या जलप्रवाहासन्निध सोमराजा जाऊन पोचल्याच्या स्थितीतील यज्ञाचे स्वरूप धारण करणारा 'समुद्र' नामक देव तूच आहेस. ३२ हे इष्टके, सोमराजा जलप्रवाहात टाकल्यावरच्या वेळच्या यज्ञाचे स्वरूप धारण करणारी 'सलिल' नांवाची जलदेवता तूच आहेस. ३३ हे इष्टके, समाप्तिरूपाला प्राप्त झालेल्या यज्ञाप्रमाणे स्वरूप धारण करणारा स्वर्गनिवासी देवही जणू तूच आहेस. (अनुवाक ९).

१ अंबा, दुला, नितत्नि इत्यादि सात तारकांच्या समुदायास मिळून 'कृत्तिका' नक्षत्र ही संज्ञा असून 'अग्नी' ही देवता ह्या नक्षत्राची स्वामिनी आहे. 'कृत्तिका' हे नांव धारण करणाऱ्या हे सप्त तारकांनो, तुम्ही प्रजापती, धाता आणि सोम ह्यांच्याच प्रभा आहात. ह्या चारही देवतांच्या प्रतीक रूपाने

असणाऱ्या हे इष्टके, स्तुतिरूप मंत्र, शरीरकांती व अग्नीची प्रभा यांची सिद्धी प्राप्त होण्यासाठी मी तुला येथे स्थापन करतो. २ हे इष्टके, रोहिणी नक्षत्र आणि त्याची स्वामिनी 'प्रजापति' देवता जणू तूच आहेस. ३ हे इष्टके, मृगशीर्ष नक्षत्र आणि त्याची स्वामिनी 'सोम' देवता म्हणजे तूच आहेस. ४ हे इष्टके, आर्द्रा नक्षत्र व त्याची अधिदेवता 'रुद्र' ही जणू तूच आहेस. ५ हे इष्टके, पुनर्वसू नक्षत्र व त्याची अभिमानिनी देवता अदिती ही जणू तूच आहेस. ६ हे इष्टके, पुष्य नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री बृहस्पती ही देवता जणू काय तूच आहेस. ७ हे इष्टके, आश्लेषा नक्षत्र आणि त्याच्या स्वामिनी असलेल्या 'सर्प' देवता जणू तूच आहेस. ८ हे इष्टके, मघा नक्षत्र व त्याच्या स्वामिनी असणाऱ्या 'पितर' देवता तूच आहेस. ९ हे इष्टके, पूर्वा नक्षत्र व त्याची स्वामिनी 'अर्यमा' देवता जणू काय तूच आहेस. १० हे इष्टके, उत्तरा नक्षत्र व त्याची स्वामिनी 'भग' ही देवता तूच आहेस. ११ हे इष्टके, हस्त नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री 'सविता' ही देवता जणू तूच आहेस. १२ हे इष्टके, चित्रा नक्षत्र व त्याची अभिमानिनी 'इंद्र' ही देवता जणू तूच आहेस. १३ हे इष्टके स्वाती नक्षत्र व त्याची स्वामिनी असणारी 'वायू' देवताही तूच आहेस. १४ हे इष्टके, विशाखा नक्षत्र व त्याची अभिमानिनी 'इंद्राग्नी' देवता देखील तूच आहेस. १५ हे इष्टके, अनुराधा नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री 'मित्र' ही देवता तूच आहेस. १६ हे इष्टके ज्येष्ठा नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री देवता 'इंद्र' तूच आहेस. १७ हे इष्टके, मूळ नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री असणारी पितरशब्दोपलक्षित निर्ऋती देवता तूच आहेस. १८ हे इष्टके, पूर्वाषाढा नक्षत्र व त्याच्या स्वामिनी असलेल्या उदकदेवता तूच आहेस. १९ हे इष्टके, उत्तराषाढा नक्षत्र आणि त्याच्या आधिष्ठात्री 'विश्वेदेव' देवता ह्या देखील तूच आहेस. २० हे इष्टके, श्रवण नक्षत्र व तयाची अधिष्ठात्री 'विष्णू' ही देवता तूच आहेस. २१ हे इष्टके, धनिष्ठा नक्षत्र व त्याच्या अधिष्ठात्री 'वसु' नामक देवता जणू तूच आहेस. २२ हे इष्टके, शततारका नक्षत्र व त्याची स्वामिनी 'इंद्र' देवता जणू तूच आहेस. २३ हे इष्टके, पूर्वाभाद्रपदा नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री 'अज एकपात्' देवता जणू तूच आहेस. २४ हे इष्टके, उत्तराभाद्रपदा नक्षत्र व त्याची स्वामिनी 'अहिर्बुध्निय' देवता जणू तूच आहेस. २५ हे इष्टके, रेवती नक्षत्र व त्याची अधिष्ठात्री 'पूषा' देवता ही जणू तूच आहेस.

२६ हे इष्टके, अश्विनी नक्षत्र व त्याची स्वामिनी 'अश्विनीकुमार' देवता जणू तूच आहेस. २७ हे इष्टके, भरणी नक्षत्र व त्याची स्वामिनी 'यम' ही देवता देखील जणू तूच आहेस. २८ पंधराही चंद्रकलांनी परिपूर्ण होणारी पौर्णमासी किंवा पूर्णिमा ही तिथी यज्ञभूमीच्या पश्चिम आणि पूर्व या दोनही दिशांच्या ठिकाणी विजयी झाली आहे. इतकेच नव्हे तर पूर्व व पश्चिम यांच्या मध्यप्रदेशातही तिने उत्कृष्ट विजय संपादन केला आहे. दिग्विजयी अशा त्या पूर्णिमेच्या सान्निध्यात राहून आमच्या या यज्ञात मनःपूर्वक उपस्थित होणारे सर्व देव उत्कृष्ट व भोगविपुल अशा स्वर्गलोकामध्ये आम्ही गेल्यावर आम्हाला आनंद देवोत. २९ हे अमावास्ये, ज्या अर्थी तुझ्या महिम्याच्या आश्रयाने राहणाऱ्या देवांनी यज्ञामध्ये हविर्भाग मिळविला, त्या अर्थी सर्व अनिष्टांचा परिहार करणारी तू आमचा हा यज्ञ पूर्ण कर. हे भाग्यशाली अमावास्ये, तू आम्हाला धन व उत्कृष्ट पुत्र प्राप्त करून दे. (अनुवाक १०).

१-२ हे दोन इष्टकांनो, वसंतऋतूचे अवयव असणारे चैत्र व वैशाख हे दोन महिनेच जणू तुम्ही दोघी आहात. ३-४ हे इष्टकांनो, ग्रीष्म ऋतूचे अवयवच असे ज्येष्ठ व आषाढ हे दोन महिने जणू तुम्ही दोघी आहा. ५-६ हे इष्टकांनो, श्रावण व भाद्रपाद हे वर्षाऋतूचे दोन अवयव जणू तुम्ही दोघी आहा. ७-८ हे इष्टकांनो, शरद् ऋतूचे आश्विन व कार्तिक हे दोन अवयव जणू काय तुम्हीच आहा. ९-१० हे इष्टकांनो, हेमंत ऋतूचे अवयव असलेले मार्गशीर्ष व पौष हे महिने जणू तुम्हीच आहा. ११-१२ हे इष्टकांनो, शिशिर ऋतूचे माघ व फाल्गुन हे दोन अवयव जणू तुम्ही दोघी आहा. १३ हे ऋतो, मी मांडीत असलेल्या ह्या चितिरूपी अग्नीला दृढपणा आणण्यासाठी तू त्याच्या अंतर्भागी शिरून बसलेला आहेस. चितिरूपी अग्नीची मांडणी करणाऱ्या मज यजमानाचा उत्कर्ष व्हावयासाठी द्युलोक व पृथ्वी ही दोघेही जे करणे अवश्य असेल ते करोत. उपासकाचे कल्याण करणे, हे एकच व्रत चालविणाऱ्या उदके व ओषधी यांच्या अधिष्ठात्री देवता आणि आहवनीयादि अग्नी, हे आपापल्या परीने मज यजमानाच्या कल्याणासाठी जे जे करणे उचित असेल ते ते करोत. द्युलोक व पृथ्वी यांच्या अंतर्भागी एकाच प्रकारच्या मनोवृत्तीने राहणारे आणि वसंत व ग्रीष्म, वर्षा व शरद् आणि हेमंत व शिशिर अशा दोन दोन ऋतूंच्या ठिकाणी चैत्रादि मासरूपी

अवयवांची सर्वप्रकारे निष्पती करणारे जे असतील ते सारे अग्नी देखील, देव इंद्राजवळ राहून त्याची सेवा करतात, त्याप्रमाणे ह्या अग्निचयनरूपी कर्माचे संपादन करीत राहोत. १४ हे इष्टके, अग्नी, सोम व सूर्य यांच्यामध्ये एकीकरण आणि आमच्या ठिकाणी ज्ञानाच्या प्रकाशाची निर्मिती ह्या दोहोंना कारणीभूत होणारी तूच आहेस. १५ हे इष्टके, पितर, यम आणि इंद्र यांच्या ठिकाणी दिसून येणारी उग्र व भयंकर अशा दोन प्रकारची शक्ती जणू तूच आहेस. १६ हे इष्टके, सर्वांच्या अंतर्यामी प्रेरणा करणारा सविता देव, मरुत् व वरुण या तिघांच्या ठिकाणी असणारी स्थिर व विशाल अशी दोन प्रकारची कार्यशक्ती जणू तूच आहेस. १७ हे इष्टके, मित्रावरुण, मित्र व धाता ह्या तीन देवांच्या ठिकाणी विद्यमान असलेली, सर्वांचे धारण करविण्याची व इतरांच्या कडूनही धारण करविण्याची अशी दोन्ही प्रकारची शक्ती म्हणजे जणू तूच आहेस. १८ हे इष्टके, वसू, रुद्र व आदित्य या देवांच्या ठिकाणी असणारी पूर्व दिशेस राहणाऱ्या व पश्चिमेकडे राहणाऱ्या सर्व प्राण्यांना आज्ञा करण्याची द्विविध शक्ती जणू तूच आहेस. १९ हे इष्टके, तुझ्यावर आधिपत्य करणारे अग्नी, सोम, इत्यादि जे जे असतील त्या त्या सर्व देवांना नमस्कार असो. ते सर्व देव आम्हाला सुखी करोत. हे अग्न्यादि देवहो, आम्ही ज्याचा द्वेष करतो आणि जो आमचा द्वेष करतो त्या मनुष्याला मी तुमच्या दाढांच्या जबड्यात ढकलून देतो. २० हे इष्टके, पूर्व दिशेस स्थापन केलेली तू हजार इष्टकांची बरोबरी करणारी आहेस. हे इष्टके, दक्षिण दिशेस ठेवलेली तू हजार इष्टकांचीच जणू प्रतिमा आहेस. २१ हे इष्टके, पश्चिम दिशेस स्थापन करण्यात आलेली तू हजार इष्टकांच्या बरोबरीची आहेस. हे इष्टके, उत्तर दिशेस ठेवलेली तू हजार इष्टकांच्याशी तुलना करण्यास योग्य अशी आहेस. २२ हे इष्टके सहस्रसंख्याक फलप्राप्तीसाठी सहस्त्रसंख्याक असलेल्या तुला मी प्रोक्षण करतो २३ हे चितिरूपी अग्रे, तुझ्या ठिकाणी मांडलेल्या ह्या इष्टका, गाय आपल्या वासरावर प्रीती करते त्याप्रमाणे, मजवर प्रीती करोत. ह्या चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी मांडलेल्या इष्टका एक, शंभर, हजार, अयुत, नियुत, प्रयुत, अर्बुद, न्यर्बुद, समुद्र, मध्य, अंत आणि परार्ध अशा प्रकारे उत्तरोत्तर दशगुणित संख्येने युक्त अशा होऊन कामधेनूप्रमाणे आमच्यावर प्रीती करणाऱ्या होवोत. हे इष्टकांनो, तुम्ही, साठ, हजार, दहाहजार, अशा संख्यांनी मोजता येण्याजोग्या, क्षयरहित आणि यज्ञाला अनुलक्षून वर्तन करणाऱ्या

आहात. यास्तव, तुम्ही यज्ञाचे संवर्धन करणाऱ्या व्हा. हे चितिरूपी अग्ने, घृताचा स्राव करणाऱ्या, मधुर अशा रसाचे पाझर वाहविणाऱ्या, बलवान् आणि भरपूर अन्नानें संपन्न अशा ज्या ज्या इष्टका असतील त्या त्या सर्व इष्टका मला कामधेनूसारख्या उपकारक होवोत. इतकेच नव्हे, तर त्या सर्व इष्टका इहलोकी आणि परलोकी विविध प्रकारे शोभणाऱ्या आणि यजमानांच्यावर अभिमत फलांचा वर्षाव करणाऱ्या होवोत. (अनुवाक ११).

१ सर्व दिशांमध्ये स्वर्गलोकी राहणाऱ्या आदित्याचा लाभ करून देणारी व होमासाठी अग्नीला प्रज्वलित करण्यास कारणभूत होणारी पूर्व दिशा आम्हाला असलेली धन इत्यादि प्राप्त होण्याविषयीची आशा पूर्ण करून आमचे रक्षण करो. चैत्र व त्याहीपेक्षा उष्णतेने अधिक असणारा वैशाख हे दोन्ही महिनेही उष्णतेच्या तापापासून आमचे रक्षण करोत. पांघरलेल्या वस्त्राप्रमाणे आम्हास दुःखाने सदैव वेढून टाकणाऱ्या शत्रूपासून कोणाकडूनही दबला जाण्यास अशक्य असा अग्निदेव आमचे व आमच्या ठिकाणच्या बलाचे संरक्षण करो. २ इतर सामांच्यासह 'रथंतर' साम आमचे रक्षण करो. छंदांच्यापैकी नानाप्रकारच्या भेदरूपाने निष्पादित होणारा 'गायत्री' नामक छंद आमचे रक्षण करो. एकदिनसाध्य व अनेकदिनसाध्य अशा अहर्गणसंज्ञक सोमयागांच्या ठिकाणी निरनिराळ्या मांडणीने उपयोगात आणला जाणारा 'त्रिवृत्' संज्ञक स्तोम आमचे रक्षण करो. 'समुद्र' हे नांव धारण करणारा वायू आमच्या ठिकाणी असलेल्या बलाचे रक्षण करो. ३ दशदिशांच्यापैकी पापांचा पराभव करणारी आणि उग्र स्वभाव असणारी दक्षिण दिशा आयुर्मर्यादा संपल्यानंतर मृत झालेल्या पुरुषांना यमलोकी नेऊन ठेवीत असते. ज्येष्ठ मास उष्णता जनक असतो. अर्थात् ज्येष्ठ मासाचे दिवस फार उकाड्याचे असतात. पण त्याहीपेक्षा आषाढ मासातील उष्णतेचे मान अधिक प्रखर असल्याने तो उष्णतेच्या दृष्टीने अधिकच बलिष्ठ भासतो. परम ऐश्वर्याने युक्त अशा हे इंद्रदेवा, उग्र स्वभावाच्या दक्षिण दिशेचा आणि ज्येष्ठ व आषाढ ह्या दोन महिन्यांचा तूच अधिपती आहेस. यासाठी दक्षिण दिशा व ज्येष्ठ आणि आषाढ या महिन्यांपासून आम्हास होणाऱ्या उष्णतेच्या तापापासून आमचे संरक्षण कर. आणि सर्वांपेक्षाही श्रेष्ठ असे बल आमच्या ठिकाणी संपादन कर. ४ बलाची धारणा करणारे, पुरुषत्वाने उत्थित झालेले, बलप्रद, शोभायमान व तीव्र बुध्दीचा पुत्र प्राप्त करून देणारे 'बृहत्' साम 'त्रिष्टुप्' छंदासहवर्तमान आमचे पालन करो. हे इंद्रा

'पंचदश' नांवाचा 'स्तोम' व 'सगर' संज्ञक वायू यांच्यासहवर्तमान तू गतकाळ व भविष्यकाळ यांच्या मध्य स्थितीत असणाऱ्या माझ्या शरीराचे पालन कर. ५ आम्ही आमच्या ठिकाणी संपादन करणार असलेल्या यशासहवर्तमान असून स्वत: यशस्वी असलेली, स्वर्गलोकी निवास करणारी आणि अस्तकालीन सूर्याशी संयुक्त असणारी, त्याचप्रमाणे सर्वदेव, वर्षाऋतू आणि त्या ऋतूतील दिवसांच्या समूहासहवर्तमान असलेली दशदिशांच्या पैकी पश्चिम दिशा आमचे रक्षण करो. माझे संरक्षण करणारे हे राजशरीर कोणाही वैऱ्याकडून आक्रमण केले जाण्यास अशक्य असो. माझे बल कोणाकडूनही तिरस्कृत न होईल असे असो. त्याचप्रमाणे माझे निवासस्थान हजारो माणसांना राहण्यास योग्य व प्रबल असे असो. ६ वैरूप सामाच्या ठिकाणी आश्रय करून राहिलेले आम्ही ह्या यज्ञकर्मासंबंधी आम्हास अपेक्षित असेल ते फल संपादन करण्यास समर्थ होऊ. 'जगती' छंदाच्या अभिमानिनी देवतेच्या अनुग्रहाने युक्त असलेले आम्ही आमच्या यजमानाला प्रजांच्या ठिकाणी अधिपती या नात्याने स्थापन करू. हे विश्वेदेवहो, 'सप्तदश' नामक स्तोमाच्या व तुमच्या अनुग्रहाने संपन्न झालेले व माझे परिपालन करणारे हे राजशरीर तेजस्वी आणि म्हणून ते वैऱ्यांचा प्रतिकार करण्यास समर्थ असे होवो. ७ धनादिकाच्या प्राप्तीविषयी असलेल्या माझ्या आशा पूर्ण होण्यासाठी मी सेवा करण्यास योग्य व दशदिशांपैकी आमचे धारण करणाऱ्या उत्तर दिशेनेच माझे परिपालन करणाऱ्या माझ्या क्षात्रशरीराचे पोषण केले आहे. त्या उत्तर दिशेच्या प्रसादाने माझे बल अनेक मित्रांच्याशी संयुक्त होवो. हे मित्रावरुणहो, शरदृतू व त्या ऋतूतील दिवस यांचे यथार्थ ज्ञान असणारे तुम्ही आज माझ्या आधिपत्याखाली असलेल्या राष्ट्राला महनीय असे सुख प्राप्त करून द्या. ८ माझी बुध्दी 'वैराज' सामाच्या ठिकाणी आश्रित होवो. माझ्या शरीराच्या ठिकाणी असणारे व्यवहारसामर्थ्य व वैऱ्यांना दूर हटविणारे माझे बल छंदांच्या अभिमानिनी देवतेकडून संपादित झालेले असो. हे मित्रावरुण हो, माझे हे राजशरीर अनेक मित्रांच्याशी जेणे करून संयुक्त होईल आणि उदकपूर्ण अशा क्षेत्रादिकांचे सत्पात्री दान करण्यास ज्याप्रकारे प्रवृत्त होईल त्याप्रकारे त्याला आधिपत्यादिकांची प्राप्ती करून देऊन तुम्ही त्याचे रक्षण करा. ९ उत्कृष्ट रीतीने शोभणारी, सामांच्यासहित असणारी व बलशाली आणि सर्व दिशांमध्ये उच्च अशी ऊर्ध्व दिशा आमचे पालन करो. हेमंत ऋतू हा आपल्या विशिष्ट अशा स्थितीने आमचे पालन करो.

सर्व दिशांना वाहणारे वारे ज्यांचे संरक्षक आहेत आणि 'शाक्कर' नांवाच्या सामाला ज्या आधारभूत होत असतात त्या 'बृहती' छंदातील ऋचा देखील घृताहुतींनी संयुक्त होऊन आमच्या ह्या यज्ञाचे रक्षण करोत. १० सर्व दिशांची स्वामिनी, स्वर्गलोक प्राप्त करून देणारी, कामधेनूप्रमाणे उत्कृष्ट दोहनशील, दुग्धादिरसांनी परिपूर्ण आणि घृताच्या सन्निध जाऊन पोचणारी ऊर्ध्व दिशारूपी देवी आमचे रक्षण करो. हे बृहस्पते, तू आमच्या पुरोभागी जाऊन आमचे रक्षण करणारा व आमच्या पाठीमागे राहूनही आमचे संरक्षण करणारा तू स्वैरगतीने इतस्तत: धावणाऱ्या इंद्रियांचे आम्हाला संयमन करता येईल अशा प्रकारची उपदेशात्मक वाणी तू आमच्या कानांवर घाल. ११ प्रीतीला कारणभूत होणारी, पर्जन्यवृष्टीच्या द्वारा आमच्यासाठी धान्यादिकांचे संपादन करणारी आणि दिशांच्यामध्ये सर्वश्रेष्ठ अशी ही ऊर्ध्व दिशा आम्हाला सुखप्रद होवो. दिवसांच्या समूहाने परिपूर्ण होणाऱ्या संवत्सरासह सवितादेव आम्हाला सुख देवो. 'रैवत' नांवाचे साम, अतिच्छंदाने घटित अशी ऋचा व त्या ऋचेच्या ठिकाणी अधिष्ठित असणारी छंदोदेवता या सर्वांचा समूह आम्हाला शत्रू उत्पन्नच न होईल असे करो. १२ त्रयस्त्रिंश नामक सोमाशी संबध्द असणाऱ्या हे ऊर्ध्वदिशे, तू भूतमात्राची पालक असून 'विवस्वत्' नांवाचा वायू तुझ्या आश्रयाने वाहत असतो. हे ऊर्ध्वदिशे तू आम्हाला आमचे हित होईल असा उपदेश कर. हे सवितृदेवा, ही ऊर्ध्वदिशा आम्हाला पुष्कळ दुग्ध व घृत संपादन करून देणारी, अधिक पालनशक्तींनी आम्हाला युक्त करणारी आणि प्रीतीला कारणभूत होणारी असो. १३ सर्व दिशांमध्ये स्थिर, अर्थात् विभागरहित, विष्णूची पत्नी, शान्तस्वरूप, सर्वप्रकारच्या बलाचे नियमन करणारी व आमच्या धनाने पूजित अशी जी ऊर्ध्व दिशा, त्याचप्रमाणे बृहस्पती, 'मातरिश्वा' नांवाचा मुख्य वायू आणि इतरत्र वाहणारे दुसरे वारे हे सर्व आम्हाला हितोपदेश करोत. १४ द्युलोकाला आधारभूत असणारी, भूमीचे धारण करणारी, दृश्य अशा ह्या जगाची स्वामिनी, सर्वव्यापी अशा विष्णूची पत्नी, जगाला व्यापून राहणारी, अन्न निर्माण करणारी, उत्कृष्ट ऐश्वर्याने युक्त आणि अखंडनीय अशी अदितिदेवी आपल्या मांडीवर उपस्थित असणाऱ्या आम्हा बालकांना सुखदायक होवो. १५ सर्व मनुष्यांवर उपकार करणारा अग्निदेव आमच्या रक्षणाच्या साधनांसह लांबच्या प्रदेशातून सुध्दा एकदम आमच्याजवळ येऊन पोचण्याइतके उड्डाण करून आमच्याजवळ सत्वर येऊन

पोहोचो. १६ हा अग्नी आदित्यरूपाने द्युलोकाला स्पर्श करून राहिला असून दाह, पाक, प्रकाश इ. कार्य करणारा होऊन पृथ्वीला स्पर्श करून राहिला आहे. त्याचप्रमाणे फळांना परिपक्क करणारा होऊन सर्व ओषधी व वनस्पतींनाही तो स्पर्श करून राहिला आहे. अशाप्रकारे जो वैश्वानरनामक अग्री स्वत:च्या बलाने सर्वत्र स्पर्श करून राहिला आहे तो आमचे दिवसा व तोच रात्री देखील आमचे पापापासून रक्षण करो. १७ अनुमती नांवाची ही देवता आज आमच्या या यज्ञाची देवांच्यापुढे प्रशंसा करो. यजमानाने अर्पिलेली हविर्द्रव्ये देवांच्याकडे वाहून नेणारा अग्निदेवही हविप्रदान करणाऱ्या यजमानाला सुखी करो. १८ हे अनुमते, माझ्या यज्ञाला तू सर्वस्वी अनुमती दे आणि आम्हाला सुखी कर आणि समृध्द अशा या आमच्या यज्ञाच्या ठिकाणी प्रीती करणारी हो आणि आम्हाला चिरकाल सुखाने जाणारे आयुष्य संपादन करून दे. १९ प्रजापतीच्या संरक्षणशक्तीच्या योगानेच सर्वदा वाढत राहणारा, मित्राप्रमाणे आम्हास प्रिय असलेला आणि आश्चर्यजनक असा हा यज्ञ आमच्याजवळ आला असून तो प्रजापतीच्या अत्यंत प्रबल अशा शक्तीने युक्त आहे. २० चालू असलेल्या यज्ञकर्माला योग्य, आपला अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करणारे, श्रवण करणाऱ्याच्या दु:खाचा परिहार करणारे, आमच्या मुखातच प्रविष्ट होऊन बसलेले, स्तुत्य अशा देवांना हृदयंगम वाटणारे आणि सुखकारक, आमच्या मुखांतून उच्चारले जाणारे वाग्विशेष सृष्टिकर्ता प्रजापती देव यज्ञाच्या अगदी प्रारंभाच्या वेळेपासून आमच्या चित्तात नियोजित करीत असतो. (अनुवाक १२).

प्रपाठक ५

१ हे रुद्रदेवा, तुझ्या कोपाला नमस्कार असो. त्याचप्रमाणे तुझ्या बाणालाही नमस्कार असो. तुझ्या धनुष्याला नमस्कार असो व धनुर्बाणयुक्त अशा तुझ्या हातांनाही नमस्कार असो. २ हे रुद्रदेव, अत्यंत शांत झालेला तुझा बाण, शांत झालेले तुझे धनुष्य आणि शांत झालेला तुझा भाता यांच्या योगाने तू आम्हाला सुख दे. ३ हे रुद्रदेवा, अभयप्रद, अहिंसक व ज्याच्या ठिकाणी पापदृष्टी पडत नाही, असे जे तुझे शरीर आहे, त्या सुखकर अशा शरीराने प्रकट होऊन तू आम्हाला सुख दे. तू कैलास लोकात राहून प्राणिमात्राचे कल्याण करतोस. ४ कैलास पर्वतावर राहून प्राणिमात्राचे

कल्याण करणाऱ्या रुद्रदेवा, शत्रूवर टाकण्यासाठी जो बाण तू आपल्या हातात घेतला आहेस, त्याला आमच्याविषयी शांत कर. कैलास पर्वताचे पालन करणाऱ्या रुद्रदेवा, आमच्या मनुष्याला व गाय म्हैस इत्यादि आमच्या पशूादि प्राण्यांनाही तू मारू नकोस. ५ कैलास पर्वतावर राहणाऱ्या रुद्रदेवा, तुला राग न येईल अशा मधुर भाषणाने आम्ही तुझी प्रार्थना करतो. जेणे करून आमची सर्व मनुष्ये व गाई वगैरे पशू निरोगी आणि सुखी होतील असे कर. ६ देवांमध्ये प्रमुख, अलौलिक असे ज्ञान असलेला पहिला वैद्य व अधिकारयुक्त वाणीने बोलणारा रुद्रदेव सर्व सर्पांचा व सर्व राक्षस जातींचा संहार करीत मला सर्वांपेक्षा श्रेष्ठ म्हणो. ७ सूर्यरूपाने व्यक्त होणारा व उपासकाचे कल्याण करणारा हा रुद्र केव्हा तांबडा, केव्हा अतिशय लाल, तर केव्हा पिंगट वर्णाचा असतो. त्या रुद्राचा आणि ह्या भूमीच्या आरपार चारी दिशांना किरणांच्या रूपाने पसरून राहिलेले जे हजारो रुद्र आहेत, त्या सर्वांचा क्रोध आम्ही निवारण करतो. ८ नीलकंठ असा जो रुद्र तोच हा लाल रंगाचा सूर्य होऊन उगवला आहे. सूर्यरूपधारी या रुद्राला गुराखी आणि पाणी आणणाऱ्या स्त्रियाही पाहतात. इतकेच नव्हे तर इतर सर्व प्राणीही त्याला पाहत असतात. सूर्यरूपधारी असा तो रुद्र आमच्या दृष्टीस पडून आम्हाला सुखी करो. ९ नीलकंठ, सहस्रनयन व पर्जन्यवृष्टी करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. त्याचप्रमाणे ह्या रुद्राचे जे सेवक असतील त्यानाही मी नमस्कार करतो. १० सर्वैश्वर्यसंपन्न रुद्रदेवा, तू आपल्या धनुष्याच्या दोन्ही टोकांना जी दोरी लावलेली आहेस, ती सोडून टाक आणि तुझ्या हातात असलेले बाणही तू टाकून दे. ११ हे सहस्रनेत्र रुद्रा, बाणांनी भरलेले शेकडो भाते तुझ्याजवळ असतात. धनुष्याची दोरी सोडून व बाणाची टोके भात्यांमध्ये पालथी घालून ठेऊन तू आमच्यावर सुप्रसन्न व शांत हो. १२ जटाधारी अशा रुद्राचे धनुष्य प्रत्यंचारहित असो. त्याचप्रमाणे बाण ठेवण्याचा त्याचा भाताही रिकामा असो. किंवा त्या भात्यात बाण ठेवलेच असतील, तर ते बोथट होऊन जावोत. तसेच, म्यानात असलेल्या त्याच्या तरवारीची गतीही कुंठित होवो. १३ भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या रुद्रदेवा, तुझ्या हातात जे शस्त्र व जे धनुष्य आहे, त्या निरुपद्रवी शस्त्राने व धनुष्याने तू आमचे सर्व बाजूंनी कल्याण कर. १४ हे रुद्रदेवा, शत्रूचा वध करण्यास समर्थ परंतु धनुष्यावर न चढविलेल्या तुझ्या बाणरूपी आयुधाला

नमस्कार असो. त्याचप्रमाणे तुझ्या दोन्ही हातांनाही नमस्कार असो. १५ हे रुद्रदेवा, तुझ्या धनुष्याला तू जे बाणरूप आयुध लावले आहेस, त्याची आम्हाला कोणत्याही प्रकारे बाधा न होवो. आणि बाणांनी भरलेला तुझा भाता तू आमच्यापासून दूर ठेव. (अनुवाक १).

१ सोन्याची बाहुभूषणे घातलेल्या व सेनानायक अशा रुद्राला नमस्कार असो. आणि दिशांचा अधिपती असलेल्या रुद्राला नमस्कार असो. २ वृक्षांखाली राहणाऱ्या व पिवळट रंगाचे केश असलेल्या रुद्रांना नमस्कार असो. तसेच पशूंचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ३ कोमल तृणाप्रमाणे तांबूस रंगाची झांक असलेल्या पिवळट रंगाचा व तेजस्वी अशा रुद्राला नमस्कार असो. आणि मार्गरक्षक रुद्रालाही नमस्कार असो. ४ वृषभावर आरूढ होणाऱ्या व शत्रूंचा विशेष संहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. आणि अन्नांचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ५ नीलवर्ण केश असलेल्या व यज्ञोपवीत धारण केलेल्या रुद्राला नमस्कार असो. त्याचप्रमाणे गुणांनी परिपूर्ण असलेल्या लोकांचा प्रतिपाल करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ६ संसाररूप वृक्षाचे छेदन करणारे जणू आयुधच, अशा रुद्राला नमस्कार असो व जगत्पालक रुद्रालाही नमस्कार असो. ७ सज्ज केलेल्या धनुष्याने भक्ताचे रक्षण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. त्याचप्रमाणे क्षेत्राचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ८ सारथी व शत्रूंना अवध्य असलेल्या रुद्राला नमस्कार असो आणि अरण्यपालक अशा रुद्राला नमस्कार असो. ९ ताम्रवर्ण व प्रभू अशा रुद्राला नमस्कार असो. वृक्षांचे पालन करणाऱ्या रुद्रालाही नमस्कार असो. १० उत्कृष्ट सल्लागार व व्यापारी लोकांचा अधिपती अशा रुद्राला नमस्कार असो. तसेच गहन प्रदेशांचे रक्षण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ११ भूमीचा विस्तार करणाऱ्या व धनोत्पादक अशा रुद्राला नमस्कार असो. आणि ग्राम्य व वन्य औषधींचे पालन करणाऱ्या रुद्रालाही नमस्कार असो. १२ उंच आवाज असलेल्या व शत्रूंना रडविणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. व पायदलातील शिपायांचा अधिपती असलेल्या रुद्राला नमस्कार असो. १३ शत्रूंच्या सर्व सैन्याला वेढा देणाऱ्या व पाठलाग करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. आणि सत्त्वशील अशा लोकांचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. (अनुवाक २).

१ विरोध करणारांचा पराभव करणाऱ्या व त्यांना सडकून चोप देणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. आणि सर्व बाजूंनी शत्रूंवर हल्ला चढविणाऱ्या सैन्यांचे पालन करणाऱ्या रुद्रालाही नमस्कार असो. २ प्रमुख व खड्गधारी अशा रुद्राला नमस्कार असो. आणि गुप्तपणाने चोरी करणारांचा पालक असणाऱ्या रुद्रालाही नमस्कार असो. ३ धनुष्याला लावण्यासाठी बाण हातात घेतलेला व पाठीला बाणांचा भाता बांधलेला जो रुद्र त्याला नमस्कार असो. आणि अरण्यात राहून लुटारूपणा करणाऱ्यांचा पालक असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ४ प्रसंगविशेषी फसवेगिरी करणाऱ्या व सर्वदा फसवेगिरी करीत असलेल्या रुद्राला नमस्कार असो. तसेच सभ्यासारखा वेष करून चोरी करणारांचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ५ संधी साधून चोरी करण्याच्या बुध्दीने घरात वावरणाऱ्या व प्रसंगविशेषी भर रस्त्यावर चोरी करण्याच्या बुध्दीने घिरट्या घालणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. आणि जंगलात राहून प्रवासी लोकांना लुटणाऱ्यांचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ६ स्वत:च्या रक्षणासाठी हातात शस्त्र घेणाऱ्या व निष्ठुरपणाने लोकांना ठार मारणाऱ्या रुद्रांना नमस्कार असो. आणि शेतकरी होऊन मालकाचे धान्य चोरणाऱ्या लोकांचा पालक असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ७ हत्यारबंद होऊन काळोख्या रात्री चोऱ्या करण्यासाठी घिरट्या घालणाऱ्या रुद्रांना नमस्कार असो व दुसऱ्याला ठार मारून त्याच्या द्रव्याचा अपहार करणारांचा पालक असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ८ डोक्याला पागोटे घालून सभ्यपणाचा आव आणणाऱ्या व वाटसरूंना लुबाडण्याच्या इच्छेने पर्वतावर हिंडत राहणाऱ्या रुद्रांना नमस्कार असो आणि दुसऱ्याची जमीन बळकावणाऱ्या लोकांचा पालक असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ९ लोकांना भय वाटावे म्हणून हातात धनुष्य घेतलेल्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. हातात बाण घेतलेल्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १० धनुष्याला दोरी चढविणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो आणि दोरी चढविलेल्या धनुष्याला बाण लावणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. ११ धनुष्याची दोरी खेंचणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो व शत्रूंवर बाण सोडणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. १२ सोडलेला बाण शत्रूच्या शरीरापर्यंत भिडविणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो आणि शत्रुशरीरापर्यंत येऊन पोचलेला बाण त्याच्या शरीरात घुसविणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. १३ एका जागी बसून राहणाऱ्या

रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि जमिनीवर आडवे पडून राहणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. १४ झोप घेत असलेल्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो त्याचप्रमाणे जागे असलेल्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १५ उभे राहणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि एकसारखे धावत राहणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. १६ संघ करून बसलेल्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. तसेच संघांचे नियामक असणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. १७ अश्वरूप धारण केलेल्या रुद्रांनो तुम्हाला नमस्कार असो. आणि अश्वांचे पालक असलेल्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. (अनुवाक ३).

१ परकीयांच्यावर सर्व बाजूंनी हल्ला चढविण्यास समर्थ असलेल्या रुद्रस्त्रियांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि शत्रूंच्यावर विशिष्ट दिशेने हल्ला करण्यास समर्थ असणाऱ्या रुद्रस्त्रियांनो तुम्हालाही नमस्कार असो. २ उत्कृष्ट अशा देवसमुदायाने युक्त अशा रुद्रदेवतांनो, तुम्हाला नमस्कार असो. व शत्रुसंहारक अशा रुद्रदेवतांनो तुम्हालाही नमस्कार असो. ३ बुध्दिमान अशा रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि बुध्दिमान लोकांचे पालन करणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. ४ निरनिराळ्या जातींच्या संघरूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि निरनिराळ्या जातींच्या संघाचे पालन करणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. ५ देवसेवक अशा भूतगणांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. तसेच भूतगणांचे पालन करणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. ६ विकृत रूप धारण करणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि अश्वगर्दभादि सर्व प्रकारचे रूप धारण करणाऱ्या रुद्रसेवकांनो, तुम्हालाही नमस्कार असो. ७ ऐश्वर्यसंपन्नतेमुळे थोर गणल्या जाणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि ऐश्वर्यहीनतेमुळे क्षुद्र गणल्या जाणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. ८ रथारूढ झालेल्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि त्यांत न बसता पायांनीच चालणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. ९ रथरूपाने व्यक्त होणाऱ्या रुद्रांनो तुम्हाला नमस्कार असो. आणि रथपती असलेल्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. १० सैन्यरूपाने वावरणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो.त्याचप्रमाणे रणांगणावर सैन्य नेणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. ११ रथ चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो व रथाला जोडलेल्या घोड्यांचे

दोर हातात धरणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १२ लाकूड तासणाऱ्या सुतारांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो तुम्हाला नमस्कार असो. आणि रथ तयार करणाऱ्या सुतारांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १३ कुंभाराच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो तुम्हाला नमस्कार असो आणि लोहारांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १४ फासेपारध्याच्या रूपाने पाखरे मारणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. तसेच मासे मारणाऱ्या धीवरांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १५ धनुष्य तयार करणाऱ्या घिसाड्यांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि बाण तयार करणाऱ्या शिकलगारांच्या रूपाने असणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १६ हरिणांच्या मागे धावणाऱ्या पारध्यांचे रूप धारण करणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. आणि कुत्री बाळगणाऱ्या भटक्या लोकांच्या रूपाने वावरणाऱ्या रुद्रांनो, तुम्हालाही नमस्कार असो. १७ कुत्र्यांचे रूप धारण करणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो व कुत्र्यांचे पालन करणाऱ्या लोकांच्या रूपाने व्यक्त होणाऱ्या रुद्रांनो तुम्हालाही नमस्कार असो. (अनुवाक ४).

१ ज्याच्यापासून सर्व घाणी उत्पन्न होतात आणि रोदनाला कारणभूत होणाऱ्या दुःखाचा जो नाश करतो त्या रुद्राला नमस्कार असो. २ पापनाशक व पशूंचे पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ३ कालकूट विष प्याल्यामुळे ज्याच्या गळ्याचा काही भाग निळ्या रंगाचा व काही भाग पांढऱ्या रंगाचा झाला आहे त्या रुद्राला नमस्कार असो. ४ केव्हा केव्हा मस्तकावर जटाजूट धारण करणाऱ्या, व केव्हा केव्हा केशांचे मुंडण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो.. ५ सहस्रनेत्र व शेकडो धनुष्ये हातात घेणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ६ कैलास पर्वतावर शयन करणाऱ्या व विष्णुरूपधारी रुद्राला नमस्कार असो. ७ मेघरूपाने अत्यंत वृष्टी करणाऱ्या व हातात बाण घेतलेल्या रुद्राला नमस्कार असो ८ शरीराने ठेंगणा असून ज्याचे अवयव संकुचित आहेत, अशा रुद्राला नमस्कार असो. ९ शरीराने उंच व ज्ञानाने श्रेष्ठ अशा रुद्राला नमस्कार असो. १० वयाने वृध्द व उत्तम स्तुतींनी वाढलेल्या रुद्राला नमस्कार असो. ११ जगाच्या पूर्वी असलेल्या व सभेमध्ये प्रमुख असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १२ व्यापक व चालण्यात निपुण अशा रुद्राला नमस्कार असो. १३ जलद चालणाऱ्या व जलप्रवाहाचे ठिकाणी राहणाऱ्या

रुद्राला नमस्कार असो. १४ लाटा येत असलेल्या व स्थिर अशा जलाच्या ठिकाणी राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १५ उदकप्रवाहात व चोहीकडून पाण्याने वेढलेल्या जमिनीवर राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. (अनुवाक ५).

१ वयोवृध्द व अत्यंत तरुण अशा रुद्राला नमस्कार असो. २ जगाची उत्पत्ती होण्यापूर्वी हिरण्यगर्भरूपाने व जगाचा अंत होताना कालाग्निरूपाने उत्पन्न होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ३ जगाच्या मध्यकाली देवादिकांच्या रूपाने उत्पन्न होणाऱ्या व ज्याच्या अवयवांची वाढ पूर्ण झाली नाही, अशा बालरूपी रुद्राला नमस्कार असो. ४ जनावरांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे राहणाऱ्या व वृक्षांच्या बुडांतून शाखारूपाने उत्पन्न होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ५ पुण्य व पाप ही दोन्ही जेथे असतात अशा मनुष्यलोकात उत्पन्न होणाऱ्या आणि मंतरलेला गंडा हातात बांधावयास योग्य असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ६ यमलोकामध्ये पापी जनांना शासन करणारा व मुमुक्षूला मोक्ष देण्यास पात्र असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ७ सर्व प्रकारच्या धान्यांनी भरलेल्या जमिनीत धान्यरूपाने राहणाऱ्या व धान्यांची मळणी जेथे करतात त्या खळ्यांमध्ये 'तिवडा' वगैरेच्या रूपाने राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ८ मंत्रप्रतिपाद्य व वेदांत प्रतिपाद्य अशा रुद्राला नमस्कार असो. ९ अरण्यामध्ये वृक्षरूपाने व अरण्यांच्या कडेला लतारूपाने उत्पन्न होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १० शब्दरूपाने व प्रतिध्वनिरूपाने व्यक्त होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ११ ज्याची सेना जलद चालते व ज्याचा रथही जलद चालतो त्या रुद्राला नमस्कार असो. १२ धैर्याने लढणाऱ्या व शत्रूंचा चुराडा करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १३ चिलखत घालणाऱ्या व रथ हांकणाऱ्या सारथ्याच्या जागी बसणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १४ अंगात कवच व मस्तकावर जिरेटोप (शिरस्त्राण) घातलेल्या रुद्राला नमस्कार असो. १५ जगत्प्रसिध्द व ज्याच्या सैन्याची सर्व जगात ख्याती आहे, अशा रुद्राला नमस्कार असो. (अनुवाक ६).

१ नौबतीतून निघणाऱ्या ध्वनीच्या व नौबत वाजविण्याचे साधन असलेल्या टिपरीच्या रूपाने व्यक्त होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. २ शत्रूंवर धैर्याने चाल करून जाणाऱ्या व शत्रूंकडील बातमी काढण्यात कुशल अशा रुद्राला

नमस्कार असो. ३ शत्रुसैन्यातील बातमी आपल्या सेनापतीला पोचविण्याचे काम करणारा दूत व निकडीच्या कामासाठी मालकाने पाठविलेला नोकर होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ४ हातात तरवार घेतलेल्या व पाठीशी बाणांचा भाता बांधलेल्या रुद्राला नमस्कार असो. ५ हातात तीक्ष्ण बाण घेतलेल्या व आयुधधारी रुद्राला नमस्कार असो. ६ ज्याने आपल्या हातात सुंदर त्रिशूल व उत्कृष्ट धनुष्य घेतले आहे त्या रुद्राला नमस्कार असो. ७ पाऊलवाटेने व गाड्या, घोडी जातील अशा मोठ्या रस्त्याने जाणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ८ लहानशा पाटातून वाहणाऱ्या व डोंगराच्या माथ्यावरून खाली वाहणाऱ्या पाण्याचे रूप धारण केलेल्या रुद्राला नमस्कार असो. ९ डोहामध्ये व तलावाच्या ठिकाणी उदकरूपाने राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १० नदी व लहानसे तळे यांच्या ठिकाणी जलरूपाने राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ११ विहिरीत व डबक्यात उदकरूपाने राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १२ पावसाच्या व समुद्राच्या पाण्याचे स्वरूप धारण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १३ मेघाच्या ठिकाणी राहणाऱ्या व विजेबरोबर संचार करणाऱ्या उदकरूप रुद्राला नमस्कार असो. १४ शरदृतूतील शुष्क अभ्र व ऊन असताना पडणारा पाऊस यांच्या रूपाने व्यक्त होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १५ सोसाट्याच्या वाऱ्यासह आणि गारांच्यासह पडणाऱ्या पावसाचे स्वरूप धारण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १६ वसती करण्याला योग्य अशा घरात राहणाऱ्या व वसती असलेल्या घराचे संरक्षण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. (अनुवाक ७).

१ उमेसह असणाऱ्या व संसारासंबंधी दु:खाचा नाश करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. २ उदयकाळी अतिशय लाल व उदयानंतर तांबूस वर्ण असणाऱ्या सूर्यरूपी रुद्राला नमस्कार असो. ३ सुखप्रद व पशुपालक अशा रुद्राला नमस्कार असो. ४ कोपयुक्त व भयंकर अशा रुद्राला नमस्कार असो. ५ समोर उभे राहून शत्रूचा वध करणाऱ्या आणि लांबीच्या पल्ल्यावरून शत्रूला ठार मारणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ६ प्रयासावाचून शत्रूचा वध करणाऱ्या आणि शत्रूचा अतिशय संहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ७ केसासारखी बारीक व हिरव्या रंगाची पाने असलेल्या वृक्षांचे स्वरूप धारण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ८ भवसागरातून तारणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ९ सुखोत्पादक व सुखाचेच चिंतन करणाऱ्या रुद्राला नमस्कार

असो. १० ऐहिक व पारलौकिक सुखाची प्राप्ती करून देणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ११ निर्मल आणि कल्याणरूप अशा रुद्राला नमस्कार असो. १२ तीर्थक्षेत्रामध्ये व नदीच्या तीरावर लिंगरूपाने प्रतिष्ठित होणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १३ विषयवासनांचा पूर्णपणे त्याग केलेल्या मुमुक्षूंच्या दृष्टीने संसारसागराच्या पलीकडील तीरावर व विषयवासनांचा अंश राहिलेल्या मुमुक्षूंच्या दृष्टीने संसारसागराच्या अलीकडील तीरावर राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १४ पातकांपासून तारणारा व संसारसागरातून पार पाडणारा अशा रुद्रदेवाला नमस्कार असो. १५ संसारसागरात परत येण्याला व कर्मांचे फल भोगण्याला पात्र अशा मनुष्याच्या रूपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १६ दर्भासारख्या लहान लहान तृणावर व नदीच्या फेसावर प्रेम करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १७ नदीच्या वाळवंटात व प्रवाहासन्निध वास्तव्य करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. (अनुवाक ८).

१ ओसाड जमिनीवर व रहदारीच्या मार्गावर असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. २ लहान लहान गोटे किंवा गारगोट्या असलेल्या प्रदेशात वस्ती करून राहण्याला योग्य अशा ठिकाणी राहत असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ३ 'कपर्द' नांवाचा जटाजूट बांधलेला व भक्तांच्या पुढे उभा राहणारा अशा रुद्राला नमस्कार असो. ४ गाईंच्या गोठ्यात व घरात राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ५ पलंगावर शयन करणाऱ्या व भव्य अशा वाड्यात राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ६ काटेरी झुडपे वगैरे असल्यामुळे प्रवेश करण्यास अवघड अशा प्रदेशामध्ये व पर्वतावरील अवघड जागी असणाऱ्या गुहेत राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ७ डोहामध्ये व धुक्याच्या ठिकाणी उदकरूपाने राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ८ डोळ्यांना अदृश्य अशा परमाणूंमध्ये व स्पष्ट दिसणाऱ्या धुळीमध्ये राहत असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ९ वाळलेल्या व ओल्या लाकडांच्या ठिकाणी राहणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १० गवत देखील उगवत नाही अशा जागी, व जेथे गवत वगैरे उगवते अशा ठिकाणी राहत असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ११ पृथ्वीवर आणि जिच्यामध्ये सुंदरशा लाटा आहेत अशा नदीच्या ठिकाणी जो राहतो त्या रुद्राला नमस्कार असो. १२ ओल्या पानांच्या ठिकाणी आणि वाळलेल्या पानांच्या ढिगावर जो राहतो, त्या रुद्राला नमस्कार असो. १३ हत्यार उपसलेल्या व शत्रूवर प्रहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १४ अपराधाच्या

मानाने किंचित् अथवा पुष्कळ दु:ख देणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १५ उपासकांना धन देणाऱ्या व प्रेमातिशयामुळे देवांच्या हृदयात वास करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. १६ क्षयरहित अशा रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. १७ अपेक्षित असलेली वस्तू देणाऱ्या रुद्रांनो, तुम्हाला नमस्कार असो. १८ सर्व बाजूंनी पातकाचा नाश ज्यांनी केला आहे, अशा रुद्रांना नमस्कार असो. १९ चोहोबाजूंनी विस्तार पावणाऱ्या रुद्रांना नमस्कार असो. (अनुवाक ९).

१ अभक्ताला कष्टमय अशा स्थितीला नेणारा, अन्नांचा पालक, विरक्त आणि कंठाचे ठिकाणी नील आणि इतरत्र रक्तवर्ण असणाऱ्या रुद्रदेवा, माझ्या मुलाबाळांना, माझ्या ह्या पुत्रपौत्रादिकांना, व माझ्या ह्या गाई, म्हशी इत्यादि पशूंना तू भय दाखवू नकोस. माझ्या ह्या पुत्रपौत्रांपैकी अथवा माझ्या ह्या गाई, म्हशी इत्यादि पशूंपैकी कोणीही न मरो व कोणीही रोगग्रस्त न होवो. २ हे रुद्रदेवा, कोणत्याही दिवसामध्ये दारिद्र्य, रोग इत्यादिकांचा औषधाप्रमाणे नाश करणारी व भवरोग निवारण करणारी जणू काय औषधीच, अशी जी तुझी शांत तनू आहे, तिने तू आम्हाला जगविण्यासाठी सुख दे. ३ जेणे करून आमच्या मनुष्यांना व पशूंना सुख होईल, आणि या गावातील सर्व प्राणी जेणेकरून पूर्ण सुखी व उपद्रवरहित होतील अशा प्रकारे बलवान्, जटाजूट बांधलेल्या व शत्रुपक्षाकडील वीरांचा नाश करणाऱ्या रुद्रदेवाची आम्ही एकसारखी स्तुती करीत आहो. ४ हे रुद्रदेवा, इहलोकी तू आम्हाला सुख दे. आणि परलोकीही तू आम्हाला सुखी कर. आमच्या पातकांचा नाश करणाऱ्या तुला आम्ही नमस्कार करीत आहो. हे रुद्रदेवा, तुझी आमच्या ठिकाणी अतिशय प्रीती आहे, म्हणूनच प्रजापालक मनूने आम्हाला जे सुख व जो आनंद दिला आहे, त्याचा आम्ही उपभोग घेत आहो. ५ हे रुद्रदेवा, आमच्या घरात असणाऱ्या वृध्द, तरुण, बाल व गर्भस्थ असलेले मूल यांचा आणि आमच्या मातापितरांचा तू घात करू नकोस. आम्हाला प्रिय असलेल्या शरीरांना तू पीडा करू नकोस. ६ हे रुद्रदेवा, आमच्या मुलाबाळांची, विशेषत: आमच्या पुत्राची तू हिंसा करू नकोस.आमच्या आयुष्याचा क्षय करू नकोस. आमच्या गाईंना व घोड्यांना तू मारू नकोस. त्याचप्रमाणे क्रुध्द होऊन आमच्या नोकरमाणसांचा तू वध करू नकोस. हविर्द्रव्याने युक्त होऊन आम्ही नमस्कारपूर्वक तुझी सेवा करू. ७ गाई, बैल इत्यादि जनावरांचा,

पुत्रपौत्रादि पुरुषांचा व चाकरलोकांचा नाश करणाऱ्या हे रुद्रदेवा, तुझे उग्ररूप तू आमच्यापासून दूर ठेव आणि तुझे सुखकर स्वरूप आमच्याजवळ असू दे. सर्व बाजूंनी तू आमचे संरक्षण कर. तसेच परस्परभिन्न अशा दोन पक्षांच्या ठिकाणी समदृष्टी ठेवणाऱ्या हे रुद्रदेवा, तू आम्हाला सुख दे. ८ हे माझ्या वाचे, हृदयाच्या अंतर्भागी राहणाऱ्या, अत्यंत तरुण सिंहाप्रमाणे भयंकर, व जगाचा संहार करण्यासाठी उग्र स्वरूप धारण करणाऱ्या सर्वप्रसिध्द रुद्राची तू स्तुती कर. हे रुद्रदेवा, माझ्या वाचेने तुझे स्तवन केले जात असतांना दररोज क्षीण होत असलेल्या माझ्या शरीराचे ठिकाणी तू सुख उत्पन्न कर. तुझे सैनिक मला वगळून दुसऱ्या कोणावरही हल्ला करोत. ९ रुद्राच्या आयुधाचा प्रहार आमच्यावर कधीही न होवो. क्रोधाने जळफळणाऱ्या पापी लोकांवर संकट आणणाऱ्या व प्रहाररूप पातक करू इच्छिणाऱ्या रुद्राची उग्र मनोवृत्ती आम्हाला कधीही बाधक न होवो. हे रुद्रा, विरोधकांचा नाश करण्यासाठी अनावर झालेली तुझी मनोवृत्ती हविर्द्रव्यरूप अन्नाने युक्त अशा आम्हापासून दूर कर. आणि हे मनोरथपूरका, तू आमच्या पुत्राला व त्याच्या मुलालाही सुख दे. १० मनोरथपूरक व अत्यंत शांत असणाऱ्या रुद्रदेवा, तू आमच्यावर सुप्रसन्न आणि शांत हो. तू आपल्या हातातील त्रिशूल नांवाचे आयुध उंच अशा एखाद्या वृक्षावर ठेव आणि केवळ शोभेसाठी वाघाचे कातडे पांघरून व पिनाक नांवाचे धनुष्य हातात घेऊन तू आमच्याकडे ये. ११ भक्तांना विशेष द्रव्य देणाऱ्या, शुभ्रवर्ण व षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा हे रुद्रदेवा, तुला नमस्कार असो. तुझी जी हजारो आयुधे आहेत, ती आमच्या खेरीज इतरांचा नाश करोत. १२ हे रुद्रदेवा, तुझ्या दोन्ही हातात हजारो प्रकारची आयुधे आहेत. हे षड्गुणैश्वर्यसंपन्न रुद्रदेवा, तुझ्या त्या आयुधांना आपल्या ताब्यात ठेवण्याला तू समर्थ आहेस. यासाठी, तुझ्या हातातील आयुधांची टोके आमच्याकडे न होतील अशा रीतीने तू मुरडून घे. (अनुवाक १०).

१ भूमीवर रुद्रांच्या हजारो जाती असून, प्रत्येक जातीत जे हजारो रुद्र आहेत, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्या पासून हजार योजने दूर ठेवीत आहो. २ महासागराप्रमाणे विस्तीर्ण अशा या आकाशाचा आश्रय करून जे रुद्र राहत आहेत, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजार योजने अंतर असलेल्या ठिकाणी ठेवीत आहो.

३ ज्यांच्या गळ्याचा काही भाग निळ्या रंगाचा व काही भाग पांढऱ्या रंगाचा आहे, जे अभक्तांना मारतात आणि भूमीखालच्या भागात जे वावरत असतात, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजारो योजने दूर ठेवीत आहोत. ४ नीलग्रीव व शितिकंठ आणि स्वर्गलोकासमीप राहणारे जे रुद्र आहेत, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्या पासून हजार योजने दूर ठेवीत आहो. ५ वृक्षांच्या ठिकाणी राहणाऱ्या रुद्रांपैकी, काही कोमल तृणाप्रमाणे केशरी रंगाचे, व काही कंठाशी निळा रंग असलेले आणि काही लालभडक रंगाचे जे रुद्र आहेत, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजार योजने दूर ठेवीत आहोत. ६ अदृश्य असे शरीर धारण करून मनुष्यांना उपद्रव देणाऱ्या प्राण्यांचे अधिपती असे जे रुद्र आहेत, त्यांपैकी काहींना मुळीच शेंडी नसून काहींनी आपल्या जटा मुकुटासारख्या बांधल्या आहेत. त्या सर्व रुद्रांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजार योजने दूर ठेवीत आहो. ७ अन्नांच्या ठिकाणी सूक्ष्म अशा जतूंच्या रूपाने राहून जे रुद्र ते अन्न सेवन करणारांना अत्यंत पीडा करतात आणि दुधासारख्या पेय पदार्थांनी भरलेल्या भांड्यामध्ये सूक्ष्म अशा किड्यांच्या रूपाने उत्पन्न होऊन जे रुद्र त्या भांड्यातील दूध वगैरे पिणारांना अतिशय पीडा देतात, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजार योजने दूर अंतरावर ठेवीत आहोत. ८ शास्त्रीय व लौकिक मार्गांचे किंबहुना सर्व मार्गांचे संरक्षक व त्या मार्गांनी जाणाऱ्या लोकांना अन्न देऊन त्यांचे पोषण करणारे, आणि शत्रूंशी लढणारे जे रुद्र आहेत, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजार योजने दूर ठेवीत आहो. ९ काशीसारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी काही हातात सुऱ्या घेतलेले व काही हातात तलवारी घेतलेले जे रुद्र लोकांचे संरक्षण करण्यासाठी हिंडत असतात, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्यापासून हजार योजने दूर ठेवीत आहोत. १० आतापर्यंत वर्णन केलेले, व त्याहून अधिक असलेले जे असंख्य रुद्र सर्व दिशांच्या ठिकाणी प्रवेश करून राहिले आहेत, त्या सर्वांची धनुष्ये प्रत्यंचारहित करून आम्ही आमच्या पासून हजार योजने दूर अंतरावर ठेवीत आहोत. ११ पृथ्वीवर जे रुद्र राहतात आणि त्यांपैकी ज्या रुद्रांचे अन्न हेच बाण आहेत, म्हणजे अपथ्यकारक अशा अन्नाच्या भक्षणाची प्रवृत्ती

करून जे रुद्र अभक्तांचा नाश करतात, तसेच, १२ अंतरिक्षात जे रुद्र राहत असून त्यापैकी ज्या रुद्रांचे तीव्र असा वारा हेच बाण आहेत, म्हणजे तीव्र अशा वाऱ्याचा मारा करून अभक्तांच्या ठिकाणी रोगाची उत्पत्ती करून तद्वारा जे रुद्र अभक्तांचा नाश करतात, आणि १३ द्युलोकात जे रुद्र राहत असून त्यापैकी ज्या रुद्रांचे असह्य अशी पर्जन्यवृष्टी हेच बाण आहेत, म्हणजे असह्य अशा पर्जन्यवृष्टीच्या माऱ्याने घायाळ करून जे रुद्र अभक्तांचा नाश करतात अथवा अनावृष्टीमुळे उपासमारीचा प्रसंग आणून अभक्तांचा जे नाश करतात, त्या सर्व रुद्रांना आमचा नमस्कार असो. १४ आतापर्यंत वर्णन केलेल्या सर्व रुद्रांना पूर्वाभिमुख अंजुलीने दहा, दक्षिणाभिमुख अंजुलीने दहा, पश्चिमाभिमुख अंजुलीने दहा, उत्तराभिमुख अंजुलीने दहा आणि ऊर्ध्वदिशाभिमुख अंजुलीने दहा नमस्कार असोत. ते सर्व रुद्र आम्हाला सुख देवोत. आमच्या नमस्काराच्या योगाने आम्हावर सुप्रसन्न झालेले ते सर्व रुद्र ज्या वैऱ्याचा आम्ही द्वेष करतो आणि जो वैरी आमचा द्वेष करतो त्याचा नाश करोत. हे रुद्र हो, आम्ही ज्याचा द्वेष करतो, आणि जो आमचा द्वेष करतो त्या वैऱ्याला मी तुमच्या पसरलेल्या मुखात ढकलतो. (अनुवाक ११).

प्रपाठक ६

१ हे मरुत् हो, उत्कृष्ट दानशील असे तुम्ही, खडकावर मुळवा धरून राहिलेले, पर्वताच्या पठारावरील जमिनीचा आश्रय करून निसर्गतःच पिकलेले, प्रचंड वायूच्या आघातातूनही तगून राहिलेले, पर्जन्यवृष्टीसमर्थ अशा मेघांच्या छायेत वाढीस लागलेले, वरुणाचे जणू मूर्तिमंत बलच अशा अगाध जलात निर्माण झालेले, आणि आमच्या ठिकाणी बलाची उत्पत्ती करणारे जे धान्यरूपी अन्न असेल, आणि उदक, साळी, सातू इत्यादि धान्ये, उंबर, वड, पिंपळ इत्यादि वनस्पती यांच्या ठिकाणी साठून राहिलेला जो सारभूत रस असेल तो तुम्ही आम्हाला संपादन करून द्या. २ विटांची विशिष्ट रीतीने मांडणी करून निष्पन्न झालेल्या व पाषाणाप्रमाणे दृढ असलेल्या हे अग्निदेवा, तुला पीडा देणाऱ्या क्षुधेची व त्यामुळे तुझ्या ठिकाणी होणाऱ्या क्रोधाची धाड आम्ही ज्याचा द्वेष करतो, त्या माणसावर जाऊन पडो. ३ हे चितिरूपी अग्ने, समुद्राच्या उदकावर उत्पन्न झालेल्या शेवाळाने मी तुला झांकून टाकतो.

तू मला पवित्र करणारा व शांत असा हो. ४ बर्फाप्रमाणे थंड अशा उदकरूपी गर्भाला वेष्टून असणारा जणू जारच अशा ह्या शेवाळाने मी तुला आच्छादित करतो. तू मला पवित्र करणारा आणि कल्याणप्रद हो. ५ हे अग्निदेवा, तू पृथ्वीचा आश्रय घेऊन राहतोस. वंजुल (पाणवेत) वृक्षांवरही तुझी वस्ती असते. त्याचप्रमाणे नद्यांच्या उदकांच्या ठिकाणीही अगदी राखणदारासारखा तू जवळ बसून राहत असतोस. हे अग्ने, तू जणू उदकांचे तेजच आहेस. ६ हे मंडूकी, चितिरूपी अग्नीवरून तुला फिरविताना म्हटल्या जाणाऱ्या ऋचांच्यासह तू ये. आणि आमच्या यज्ञाला अग्नीप्रमाणे तेज:पुंज व कल्याणप्रद होईल, असा शांत कर. ७ हे मंडूकी, सर्वांना पवित्र करणाऱ्या ह्या चितिरूपी अग्नीविषयी आस्था बाळगून सामर्थ्ययुक्त अशा कृपेसह तू येथे ये. उष:कालचा प्रकाश येताक्षणी सर्व वस्तू प्रकाशित होतात, त्याप्रमाणे तू सन्निध येताक्षणी हा चितिरूपी अग्नी पृथ्वीच्या ठिकाणी प्रकाशित झाला आहे. ८ शीघ्रगामी व कुशल अशा अश्वाला हाती धरलेल्या लगामाने खेचीत समरभूमीवर शत्रुसैन्याला तुडवीत जाणाऱ्या वीराप्रमाणे जो अग्नी सर्वत्र प्रकाशित झालेला असतो, तो जरेने केव्हाही थकत नाही व तृष्णेनेही व्याकुल होत नाही. ९ सर्वांना शुध्द करणाऱ्या हे अग्निदेवा, दीप्तिमान् व सुंदर अशा आपल्या ज्वालारूपी वाणीने तू देवांना बोलावून आण आणि त्यांचे यजन कर. १० सर्वशोधका, हे अग्निदेवा, देदीप्यमान असा तू ह्या यज्ञामध्ये देवांना बोलावून आण आणि आमचा हा यज्ञ व त्यात तयार केलेले हविर्द्रव्य देवांच्याजवळ नेऊन दे. ११ चितिरूपी अग्नीचे हे स्थान म्हणजे यज्ञाच्या द्वारा उदके येऊन पोचण्याचे निश्चित स्थळच असून समुद्राप्रमाणे अगाध अशा उदकाचे जणू निवासगृहच आहे. हे अग्निदेवा, तुझी आयुधे मला वगळून माझ्याशी विरोध करणाऱ्या अन्य मनुष्याला त्रास देवोत. आमच्याकरता, सर्व शोधक असा तू कल्याणप्रद व शांत असा हो. १२ उदकांतील रसांचे हरण करणाऱ्या व उदकस्थळांना शुष्क करणाऱ्या तुज तेजोमूर्तीला माझा नमस्कार असो. तुझी आयुधे मला पीडा न देता माझ्या विरुध्द असलेल्या मनुष्याला पीडा देवोत. आमच्याकरिता तू कल्याणप्रद व शांत हो. १३ मनुष्यांच्या ठिकाणी जठराग्निरूपाने राहणाऱ्या अग्नीला हविर्द्रव्य अर्पण केले आहे. १४ समुद्राच्या उदकात वडवाग्निरूपाने राहणाऱ्या अग्नीला हविर्द्रव्य अर्पण केले आहे. १५ अरण्यांच्या ठिकाणी वणव्याच्या रूपाने राहणाऱ्या अग्नीला हविर्द्रव्य अर्पण केले आहे. १६ यज्ञभूमीमध्ये आहवनीयादि

रूपाने येऊन बसणाऱ्या अग्नीला हविर्द्रव्य अर्पण केले आहे. १७ आदित्यरूपाने स्वर्गलोकात जाऊन पोचलेल्या अग्नीलाही हविर्द्रव्य समर्पण केले आहे. १८ यज्ञार्ह अशा देवांमध्ये यज्ञयोग्य असे जे इंद्रादि देव वर्षाच्या शेवटी केल्या जाणाऱ्या यज्ञातील हविर्भागाचे सेवन करतात आणि जे पंचप्राणरूपी देव हवन करण्यात न येणाऱ्या पदार्थांचे भक्षण करतात, ते सर्व देव ह्या यज्ञामध्ये मधुर अशा घृताचा हविर्भाग आपण होऊन सेवन करोत. १९ जे प्राणरूपी देव इंद्रादि देवांमध्ये अधिष्ठित होऊन देवत्वाला प्राप्त झाले, आणि जे या जीवरूपी ब्रह्माच्या अग्रभागी वावरत असतात, इतकेच नव्हे तर, ज्या प्राणरूपी देवांच्या खेरीज कोणाचेही शरीर हालचाल करू शकत नाही, ते पंचप्राणरूपी देव पृथ्वीवर किंवा द्युलोकाच्या पृष्ठभागी राहत नसून चक्षुरादि इंद्रियांच्या ठिकाणीच राहत असतात. २० हे चितिरूपी अग्निदेवा, तू यजमानाला प्राणदान करणारा, त्याच्या अपान वायूला अनुकूल गती देणारा, त्याच्या व्यान वायूला योग्य अशी स्थिती देणारा, त्याच्या नेत्रांना तीक्ष्ण अशी अवलोकनशक्ती देणारा, त्याला बल देणारा आणि समाजामध्ये त्याला पूज्यता प्राप्त करून देणारा आहेस. तुझी आयुधे मला पीडा न देता माझ्या बरोबर शत्रुत्व करणाऱ्या इतर मनुष्याला पीडा देवोत. आम्हाला पवित्र करणारा तू आमच्यासाठी शांत हो. २१ विटांच्या विशिष्ट रचनेने मांडला जाणारा अग्नी आपल्या ठिकाणच्या प्रखर ज्वालेने आमच्याशी विरोध करणाऱ्या व आम्हाला बाधक होणाऱ्या सर्व राक्षसादिकांचा नाश करो. आणि आमच्यासाठी धन संपादन करण्याची इच्छा करो. २२ आपल्या ठिकाणच्या ज्वालासमूहाने आपल्या भक्तांच्या मनोवृत्ती जाणणारा, आमच्याकरता देवांना उद्देशून यज्ञाचे निष्पादन करणारा, निर्विघ्नपणे यज्ञ शेवटास नेणारा, कोणाकडून दबला न जाणारा, वेदमंत्रांचे रक्षण करणारा आणि आमचे अत्यंत पालन करणारा अशा हे अग्निदेवा, तू लोकांच्या नजरेत भरणारे, भरपूर धनाने परिपूर्ण असे घर व शेत आम्हाला मिळवून दे. (अनुवाक १).

१ अतीन्द्रिय द्रष्टा, जगाचे संहाररूप हवन करणारा, आम्हा सर्वांचा उत्पादक आणि पालक आणि विद्यमान असलेल्या सर्व प्राण्यांचा प्रलयकाली संहार करून स्वतः एकटाच उरणारा जो विश्वव्यापी परमेश्वर, तोच पुन्हा सृष्टीच्या आरंभी जगदुत्पत्ती करण्याच्या अभिलाषेने प्रेरित होऊन जगाच्या उपभोगरूपी धनाची इच्छा करीत असताना इतर शरीरे निर्माण करून त्यांच्या

ठिकाणी जीवरूपाने समाविष्ट होऊन राहिला. २ केवळ मनाच्या संकल्पाने अखिल जगाचे उत्पादन, पोषण आणि संहार करणारा जो परमात्मा, तोच सर्वदर्शी, अर्थात् सर्वज्ञ असा आहे. ज्या परमेश्वराचे ठिकाणी आज दिसत असलेले मरीचि इत्यादि सात ऋषी सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी एकत्र अंतर्भूत झालेले होते, असे वेदान्तपारग थोर पुरुष म्हणत असतात, तो परमेश्वर आपण निर्माण केलेल्या त्या सप्तर्षींना अपेक्षित असलेली स्थाने प्राप्त करून देतो व त्यामुळे ते महर्षी आनंदित होतात. ३ जो आम्हा सर्वांना उत्पन्न करून आमचे पालन करतो, इतकेच काय, पण सर्व जगाला उत्पन्न करून त्याचे धारण पोषण करतो, त्याच परमेश्वराने आम्हालाच नव्हे, तर सर्व जगाला जे जे भोग्य असेल, ते ते सारे स्वतःच्या शरीरापासूनच निर्माण केले आहे. जो परमात्मा वस्तुतः एकच असताना, इंद्र, मित्र, वरुण इत्यादि देवांची नांवे धारण करतो, त्या एका परमेश्वराखेरीज त्रिभुवनात आज दिसून येणाऱ्या सर्व सजीव आणि निर्जीव वस्तू प्रलयकाळाच्या वेळी त्या एका परमेश्वराच्या ठिकाणीच विलीन होऊन जातात आणि मग ईश्वर कोणता व त्रिभुवनातल्या वस्तू कोणत्या हे ठरविण्याविषयी तत्त्वानभिज्ञ लोकांच्या ठिकाणी मोठा प्रश्नच उद्भवण्याची स्थिती उत्पन्न होते. ४ आताच वर्णिलेल्या विश्वकर्त्याने प्रथमतः उत्पन्न केलेल्या ज्या सृष्टिकर्त्यांनी जगातले सर्व प्राणी जेव्हा व्यवस्थितपणे उत्पन्न केले, तेव्हाच त्या आदिसृष्टिकर्त्यांनी उत्पन्न केलेल्या जगाच्या निर्वाहासाठी उपभोग्यवस्तुरूपी धनही उत्कृष्ट प्रकारे संपादन करून ठेवले. अतींद्रियदर्शी, सर्वज्ञ व स्वतःच्या महत्त्वाने कधीही जीर्ण न होणाऱ्या पूर्व महर्षींनीच जगातल्या सर्व प्राण्यांना त्यांच्या त्यांच्या अधिकाराच्या प्रमाणात आपआपल्या कर्मानुसार वर्तण्याची प्रेरणा केली आहे. ५ ज्या विश्वकर्म्या परमेश्वराने हे जगत् निर्माण केले त्या परमेश्वराला त्याच्याच पासून उत्पन्न झालेल्या हे जीवांनो, तुम्ही मुळीच जाणीत नाही. अहंप्रत्ययगम्याहून दूर असलेले सर्ववेदांतवेद्य असे ईश्वरतत्त्व प्रत्येकाच्या अंतर्यामी वास करीत असूनही अज्ञानरूपी धुक्याने आच्छादित झालेल्या ज्ञानदृष्टीने लोक त्याला जाणू शकत नाहीत. इहलोकी कोणीकडून तरी आपल्या प्राणांचे पोषण करण्यात व परलोकातही भोग मिळवण्याच्या इच्छेनेच यज्ञामध्ये देवांची स्तुती करण्यात धन्यता मानणारे तुमच्यासारखे अज्ञानी व मिथ्याज्ञानी यांच्या आधीन झालेले लोक अंतर्यामी असलेले ईश्वरतत्त्व तर जाणत नाहीतच, पण मी देव आहे, मी मनुष्य आहे, हे

माझे घर, ही माझी जमीन अशा प्रकारची व्यर्थ बडबड मात्र करीत फिरतात. ६ जे ईश्वरतत्त्व हृदयरूपी कमळाच्या ठिकाणी गूढ होऊन राहिले आहे, ते अत्यंत दूर असलेल्या द्युलोकाच्या पलीकडचे आहे. ह्या पृथ्वीच्याही पलीकडचे आहे. इतकेच नव्हे तर देव व असुर यांच्याही पलीकडचे, अर्थात् सर्वांहून विलक्षण असे आहे. ज्या गर्भाचे ठिकाणी सर्वही देव एकत्र समाविष्ट झालेले असतात, त्या गर्भाला उदकांनी प्रथम धारण केला. पण तो गर्भ कोणता? हेच खरोखर कळत नाही. ज्या जगाच्या आधारावर आम्ही राहतो, त्या स्थूल जगाचे जेथे आम्हाला यथार्थ ज्ञान होत नाही तेथे अत्यंत सूक्ष्म अशा ईश्वरतत्त्वाचे ज्ञान आम्हा अज्ञान्यांना होणे नाही, हे काय सांगावे? ७ ज्या ब्रह्मांडरूपी गर्भात सर्वदेव सामावून राहिलेले असतात तो गर्भ प्रथम उदकांनी धारण केला. जन्मरहित अशा परमेश्वराच्या नाभिस्थानी ज्यामध्ये हे सर्व जगत् अधिकत्वाने भरून राहिले आहे, असे एक बीज यदृच्छेने निर्माण झाले. ८ ब्रह्मांडामध्ये देव, मानव, पशू इत्यादि निर्माण करणारा सत्यलोकनिवासी व चतुर्मुख असा ब्रह्मदेव प्रथम निर्माण झाला. नंतर गंधर्व उत्पन्न झाला. तिसऱ्या खेपेस सर्व ओषधींचा उत्पादक सोम उत्पन्न झाला. अशाप्रकारे उदकांच्या ठिकाणच्या ब्रह्मांडरूपी गर्भाला परमेश्वराने विविध रूपाने व्यक्त केले. ९ चक्षुरादि इंद्रियांचा उत्पादक व धैर्यवान् अशा परमात्म्याने आपल्या इच्छेनुसार प्राण्यांना घृताप्रमाणे उपभोगाचे साधनच आणि परस्परांशी अनुकूलतेने राहणारी द्युलोक व पृथ्वी ही निर्माण केली. पूर्वी ज्या वेळी चलनवलनक्षम अशा इंद्रियशक्ती परमेश्वरसत्तेने स्थिर झाल्या, त्या वेळी त्यानंतर द्युलोक व पृथ्वी ही दोघेही विस्तार पावली. १० सर्व बाजूंना डोळे असलेला, सर्व बाजूंना मुखे असलेला, सर्व बाजूंना हात असलेला, व सर्व बाजूंना पाय असलेला एक आदिदेव परमात्माच द्युलोक व पृथ्वी यांना निर्माण करून अनित्य अशा धर्म व अधर्मरूपी आपल्या दोन बाजूंनी सर्व जग आपल्या स्वाधीन करून घेतो. ११ द्युलोक व पृथ्वी यांना उत्पन्न करतेवेळी परमेश्वराचे निवासस्थान कोठे आणि कसे असेल? त्याचप्रमाणे, द्युलोक व पृथ्वी उत्पन्न करण्यासाठी परमेश्वराने उपयोगात आणलेले साधन तरी कोणते व कसे असेल? सर्वजगद्द्रष्टा व अखिल जगाचा उत्पादक अशा परमेश्वराने जेव्हा ही भूमी निर्माण केली, तेव्हाच त्याने कोणत्याही अन्य साधनाचा उपयोग न करता स्वतःच्या महनीय सामर्थ्यानेच द्युलोकही निर्माण केला

आणि त्यांच्या ठिकाणी तो स्वत: व्यापून राहिला. १२ ज्या वनातील लाकडे आणून व ती तासून द्युलोक व पृथ्वीरूपी इमारती परमात्म्याने निर्माण केल्या, ते वन कोणते? आणि त्या वनात द्युलोक व पृथ्वीसारख्या टोलेजंग इमारती उभारण्यास लागणारी लाकडे पुरविणारा असा मोठा वृक्ष तरी कोणता असेल? मी आपल्या मनाने पुष्कळ विचार करूनही माझे समाधान न झाल्यामुळे हे विद्वान् लोकहो, मी तुम्हाला विचारतो, की ह्या त्रिभुवनाचे धारण करीत असताना तो परमात्मा बसला होता तरी कोणत्या ठिकाणी? हे मला सांगा. १३ अखिल विश्व निर्माण करणाऱ्या हे परमेश्वरा, कनिष्ठ, मध्यम व उत्तम अशी जी तुझी निवासस्थाने असतील, ती सर्व स्थाने तुला हविर्द्रव्ये समर्पण करणाऱ्या आम्हास सोयीचे व्हावे म्हणून तुझे प्रेमी असलेल्या आम्हा यजमानांना तू कळवून ठेव. मजसारख्या यजमानाच्या शरीरात राहून 'स्वधा' असे म्हणून अर्पण केल्या जाणाऱ्या हविर्द्रव्याचे तू स्वत:च यजन कर. १४ आज आम्ही तयार केलेले हविर्द्रव्यरूपी अन्न सेवन करण्यासाठी, आणि आमचे संरक्षण करण्यासाठी, सर्व जगामध्ये सुख उत्पन्न करणारा, आम्हाला अनुकूल अशा सर्व गोष्टी उत्तम प्रकारे करणारा, मंत्ररूपी वाणीचा पालक आणि यज्ञकर्माच्या ठिकाणी आमच्या मनाला नियुक्त करणारा, अशा परमात्म्याला आम्ही बोलावीत आहो. कारण, तो परमात्मा आमच्या जवळ असलेली हविर्द्रव्ये आवडीने सेवन करतो. १५ हे विश्वकर्मन्, मी अर्पण केलेल्या हविर्द्रव्याने स्वत:चे शरीर वृध्दिंगत करणारा तू स्वत:च यजन कर. आमच्या खेरीज आमच्या भोवताली असणारे आमचे हितशत्रू ह्या यज्ञकर्माविषयी मोहित होऊन जावोत. अन्नसमृध्दीने युक्त व विद्वान् असा पुत्र आम्हाला प्राप्त होवो. १६ अखिल विश्व निर्माण करणाऱ्या हे परमात्मन्, मी अर्पण केलेल्या हविर्द्रव्याच्या सेवनाने होणाऱ्या हर्षाने वृध्दिंगत होणारा तू माझ्या ह्या यजमानाला परमऐश्वर्ययुक्त, इतरांचा संरक्षक आणि कोणाकडूनही अवध्य असा कर. त्याच्यापेक्षा वयोवृध्द, अर्थात् जुने असे सर्व लोक त्याला नमून असोत. जेणेकरून माझा हा यजमान तीक्ष्ण अशा शस्त्राने युक्त, कोणाकडूनही पराभूत न होणारा आणि अनेक याग करण्याला पात्र होईल असे कर. १७ नयनमनोहर, व सतत वाहत राहणाऱ्या सर्व नद्यांचा पती असलेल्या समुद्राच्या रूपाने अवतीर्ण झालेल्या विश्वकर्म्या परमेश्वराला माझा नमस्कार असो. हे ऋत्विग्यजमान हो, जगदुत्पादक अशा त्या परमेश्वराला संतुष्ट करण्यासाठी

तुम्ही अखंड टिकणाऱ्या हविर्द्रव्याचे निरंतर यजन करा. (अनुवाक २).

१ घृतरूपी हविर्द्रव्याने सर्वतोपरी तृप्त होणाऱ्या हे अग्निदेवा, ह्या यजमानाला भरपूर, धन, पुत्रपौत्रादि प्रजा आणि गाई, घोडे इत्यादि पशुसंपत्ती यांनी समृद्ध करून परमोच्च अशा ऐश्वर्यपदाला सत्त्वर प्राप्त कर. २ हे इंद्राप्रमाणे परमैश्वर्ययुक्त अशा अग्निदेवा, हा यजमान आपल्या बरोबरीच्या सर्व ज्ञातिबांधवांना वश करून त्यांचे नियंत्रण करण्यास समर्थ होईल, अशा प्रकारे तू त्याला अत्यंत प्रसिद्धीला आण. इतकेच नव्हे तर हा यजमान नेहमी यज्ञ करून देवांना भाग देत जाईल अशा बलाने त्याला संपन्न कर. ३ हे अग्निदेवा, ज्या यजमानाच्या यज्ञात आम्ही हवी तयार केले आहेत त्याला तू वाढीव. हा यजमान सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे, अशाप्रकारे देव त्याला अनुलक्षून सर्वत्र प्रशंसा करोत. हा यजमान सर्व प्रकारच्या वैदिक कर्मांचा पालक होवो. ४ माझे प्राणरूपी सर्व देव तुला उचलण्याचे कामी कुशल अशा इंद्रियवृत्तींच्या योगाने तुला उंच उचलून धरोत. आमच्याकरता अत्यंत शांत, सुमुख आणि प्रभुत्वाने आमची स्वगृही वसती करणारा हो. ५ इंद्र, यम इत्यादि देवांचे आधिपत्य असलेल्या ह्या पूर्व, दक्षिण इत्यादि पांच दिशा, माझ्या ठिकाणी असलेले बुध्दिमांद्य व पापबुद्धी यांचा नाश करणाऱ्या होऊन धनसमृध्दीच्या ठिकाणी स्थापन केलेल्या यजमानाची सेवा करीत असतांना ह्या यज्ञाचे रक्षण करोत. ६ धनसमृध्दीच्या ठिकाणी अवस्थित झालेला हा यज्ञ, उत्कृष्ट रीतीने प्रज्वलित केलेल्या अग्नीच्या सान्निध्यात वरचेवर पूजनीय होत्रकांकडून पठण केल्या जाणाऱ्या 'शस्त्ररूपी' वाहनावर आरुढ झालेला, सर्वांच्या कडून स्तवनीय आणि ऋत्विज व यजमानांच्या कडून स्वीकृत झालेला असतो. ते ऋत्विज व यजमान, प्रज्वलित केलेल्या अग्नीचा परिग्रह करून सर्वदा यजन करीत असतात. ७ यज्ञानुष्ठानात वावरणारे ऋत्विज व यजमान, देवांचा हितकर्ता, यागद्वारा जगाचे धारण करणारा, आम्ही दिलेले हविर्द्रव्य सेवन करणारा, अशा अग्निदेवाला हविर्द्रव्यरूपी अन्नाने जेव्हा संतुष्ट करतात, तेव्हा तो अग्नी देवांचा आश्रय करणारा, यजमानावर अनुग्रह करण्याकडे वृत्ती ठेवणारा, दुग्ध, आज्य इत्यादि शेकडो हविर्द्रव्यांनी संपन्न असा होतो. आणि त्या अग्नीला आपलासा करून घेऊन ऋत्विज आणि यजमान यज्ञाजवळ येऊन त्याचे अनुष्ठान करीत असतात. ८ दारिद्र्याचे हरण करणाऱ्या सुवर्णाप्रमाणे पीतवर्ण असे ज्वालारूपी केश असलेला अग्नी, सूर्यकिरणांशी समरस होऊन

सर्व प्राण्यांना त्यांच्या व्यवहारांच्या ठिकाणी प्रेरणा करणारा होऊन प्रत्येक दिवशी पूर्व दिशेस उदय पावत असतो. आणि अशा प्रकारे त्याचा उदय झाला असता लोकांचे रक्षण करणारा पूषा नामक देव, सूर्यरूपाने उदित झालेल्या त्या अग्नीला सर्व भुवनांचे अवलोकन करण्याची प्रेरणा करण्याकरता त्याच्या सन्निध येतो. ९ ऋत्विग्यजमानरूपी देव हविर्द्रव्याचा स्वीकार करणाऱ्या देवांच्यासाठी यज्ञ करण्याची इच्छा धारण करून पशूच्या उपाकरणापर्यंतच्या यज्ञानुष्ठानाचा पहिला भाग पार पाडतात. त्यानंतर यज्ञाच्या दुसऱ्या भागात पशुरूपी हविर्द्रव्याला शामित्रशाळेत नेऊन पोचवितात. पुढे तिसऱ्या भागात याग करण्यासाठी मृत पशूची अंगे नीटनेटक्या रीतीने काढून ठेवण्याचे कार्य करतात. आणि ज्या भागात देवतांना पश्वंगरूपी हविर्द्रव्य प्राप्त होते, तो यज्ञानुष्ठानाचा चौथा भाग होय. एवं च, चार विभागांनी पूर्ण होणाऱ्या यज्ञापासून संतुष्ट झालेले व सर्वांना पवित्र करणारे आहवनीयादि अग्नी आम्ही अपेक्षा करीत असलेले फल आमच्या करता संपादन करतात. १० द्युलोक, पृथ्वी व अंतरिक्ष यांना सर्वतोपरी व्यापून राहणारा हा पाषाण विविध अशा प्रकारचे जग निर्माण करीतच 'आग्नीध्रीय' मंडपरूपी आकाशात राहत असतो. तोच विश्वाला व्यापून राहणाऱ्या सर्व दिशांना सर्वतोपरी प्रकाशित करीत असतो. तसेच घृताची प्राप्ती करून देणाऱ्या गाईंना अवलोकन करतो आणि तोच ब्रह्मांडाच्या पूर्वेस व पश्चिमेस उदयास्त पावणाऱ्या सूर्याला व पूर्वपश्चिम दिशांनाही अवलोकन करीत असतो. ११ मेघाचे स्वरूप धारण करून यागद्वारा पर्जन्याची वृष्टी करणारा हा अश्मा अर्थात् पाषाण पुष्कळ फल देणारा असा जणू समुद्रच आहे. सर्वांना प्रकाशित करणाऱ्या सूर्यासमान असलेला हा अश्मा स्वर्गगामी असल्यामुळे गरुड पक्ष्यासारखा आहे. सर्वांचा पालक व पूर्वदिशेस अवस्थित होणाऱ्या आहवनीयाच्या जन्माला कारणभूत होणारा हा अश्मा आग्नीध्रीय मंडपात प्रविष्ट झालेला आहे. आग्नीध्रीय मंडपरूपी द्युलोकाच्या ठिकाणी स्थापन केलेला हा अश्मा रंजनीय अशा जगाच्या उत्पत्तिप्रलयरूपी दोन टोकांचे रक्षण करीत असतो. १२ समुद्राप्रमाणे व्यापक, रथामध्ये बसून युद्ध करणाऱ्या, वीरांमध्ये उत्कृष्ट रथयुद्धप्रवीण, अन्नांचा पालक आणि सज्जनांचा सरंक्षक अशा इंद्रदेवाला वेदांमधील सर्व स्तुतिवचने कीर्तिरूपाने वाढवीत असतात. १३ प्रजा व पशू यांच्या योगाने मिळणाऱ्या सुखांचा संपादक असा यज्ञ देवांना बोलावून आणो. आणि यज्ञप्रवर्तक असा अग्निदेवही

यज्ञासाठी देवांना बोलावून आणो. १४ इंद्राप्रमाणे परमऐश्वर्ययुक्त अशा अग्निदेवाचे हविर्द्रव्यरूपी अन्न निर्माण करण्यास. अवश्य अशा सामर्थ्याने मज यजमानाला उत्कर्षाला प्राप्त केले आहे. परमऐश्वर्ययुक्त असा हा अग्नी आपल्या निग्रहशक्तीने माझ्या शत्रूंना पायाखाली घालून तुडवो. १५ माझा उत्कर्ष आणि शत्रूंचा अपकर्ष करणाऱ्या वेदत्रयरूपी ब्रह्म्याला सर्व देव वृद्धिंगत करोत. आणि नंतर इंद्र व अग्नी हे दोघे माझ्या शत्रूंना जेणेकरून ते पुन्हा परत येणार नाहीत अशा प्रकारे त्यांचे हाल हाल करून दूर हाकून लावोत. (अनुवाक ३).

१ कोणतेही कार्य त्वरित करणारा, उग्र स्वभावाचा, झुंजार बैल दुसऱ्या बैलाशी झुंजतो त्याप्रमाणे शत्रूशी हिरीरीने झुंजणारा, शत्रूंच्यावर आपल्या आयुधांचा घणाघण मारा करून त्यांचा नाश करणारा, शत्रूंच्या सैनिकांना खवळून सोडणारा, शत्रूंच्या हृदयात धडकी भरेल अशा मोठ्या आवाजाने त्यांना हाका मारून त्यांच्यावर तुटून पडणारा, स्वत: अत्यंत सावध राहून एका निमिषाच्या आतच शत्रूंना चीत करणारा, आणि स्वत:च्या बळावर शत्रूंना जिंकणारा एकांडा वीर असा जो इंद्र त्याने शेकड्यांनी मोजता येणाऱ्या शत्रुसेनांच्याशी झुंज देऊन पहिल्या झडपेत त्यांना जिंकले आहे. २ युध्दासाठी उत्सुक झालेल्या हे मानव हो, शत्रूंना धडकी भरेल अशा आवाजात त्यांना हाका मारणारा, निमिषही लागू न देता शत्रूवर जय मिळविणारा, सर्वदा जयशील, युध्दाची सतत रग असलेला, काही झाले तरी आपली जागा न सोडणारा, निर्भय, हातांमध्ये नेहमी बाण सज्ज ठेवणारा आणि भक्तांच्यासाठी अभिमत फलांचा वर्षाव करणारा अशा देवराज इंद्राकडून अनुग्रह संपादन केल्यानंतर तुम्ही शत्रूसैन्यात फूट पाडून त्यांतील काहींना वश करून घ्या आणि जे वश होणार नाहीत त्यांना बेलाशक ठार करा. ३ हातात बाण घेतलेल्या सैनिकांच्यासह असलेला, हातात तलवार घेतलेल्या वीरांच्यासह चाललेला, शत्रूंच्या सैन्याला तेव्हाच आटोक्यात आणणारा, शत्रूंच्याशी एकदम लगट करून लढणारा, शत्रुसमुदायाशी एकटाच झुंजणारा, आपल्यावर जमावाने चाल करून येणाऱ्या शत्रूंना तत्काळ जिंकणारा, वीरश्री चढण्यासाठी मधून मधून सोमपान करणारा, बाहुबलसंपन्न, निरंतर धनुष्य उभारलेला, आणि त्याच धनुष्याने सोडलेल्या बाणांनी शत्रूंचा पुरा धुव्वा उडविणारा तो इंद्रदेव आमचे रक्षण करो. ४ वेदवाणीचे नियमन व पालन करणाऱ्या हे इंद्रदेवा, राक्षसांचा नाश करणारा,

शत्रू आपोआप पळ काढतील अशा प्रकारे त्यांना त्रास देणारा व आमच्या रथांचे सरंक्षण करणारा तू आपल्या रथात बैस. आणि शत्रूंचा चुराडा करीत करीत त्यांच्या सेनांचा धुव्वा उडवीत उडवीत व लढाई करून आमचा नाश करू इच्छिणाऱ्या शत्रूंना जिंकीत जिंकीत रणांगणावर सर्व बाजूंनी हिंडत रहा. ५ माझ्या बरोबरच जन्मलेल्या माझ्या ज्ञातिबांधवांनो, पर्वतांचे पंख उपटून त्यांचा भेद करणारा, भूमी संपादन करणारा, हातात वज्र घेतलेला, शत्रूंना या पृथ्वीवर कोठेही थारा राहणार नाही अशा प्रकारे शत्रूंवर जय मिळविणारा आणि आपल्या अचाट बलाने शत्रूंवर हल्ला करणारा अशा इंद्राला आपल्या पुढे घाला, आणि तुम्ही त्याचे अनुयायी होऊन त्याच्या मागे चालून, आपले शौर्य गाजवा. हे मित्रहो, इंद्राला अगोदर शत्रूंवर चाल करून जाऊ दे, आणि नंतर त्याच्या पिछाडीला राहून तुम्ही शत्रूंच्यावर मारा करा. ६ हे इंद्रदेवा, शत्रूंचे सामर्थ्य बिनचूक अजमावणारा, फार दिवसांपूर्वीपासून शौर्याविषयी प्रसिध्द, बलशाली, भरपूर रसद जवळ बाळगणारा, शत्रूंना पराभूत करणारा, युद्धामध्ये क्रौर्याने लढणारा, अत्यंत शूर अशा साहाय्यकर्त्यांनी वेष्टित असलेला, स्वामिनिष्ठ अशा सेवकांचा घेरा सभोवती असणारा, बलापासूनच जन्मलेला आणि भूमीचे संपादन करणारा असा तू आपल्या विजयी रथावर आरूढ हो. ७ सभोवतालच्या अनेक रणक्षेत्रांत एकदम शिरून शत्रूंचा संहार करणारा, शत्रूंच्याविषयी सदा निर्दय, अत्यंत लढवय्या, अतिशय संतापी, आपल्या स्थानापासून रेसभरही न चळणारा, परकीय सैन्याचा पराभव करणारा आणि कोणाकडूनही युद्ध करण्यास अशक्य असा हा इंद्र ऐन रणधुमाळीच्या वेळी आमच्या सेनेचे रक्षण करो. ८ आमच्याशी स्नेहभाव ठेवून आमच्या बाजूने शत्रूवर चाल करून जाणाऱ्या सेनांचा इंद्र नेता होवो. देवगुरू बृहस्पती, दक्षिणासंज्ञक देवी, यज्ञ आणि सोम या देवांच्यापैकी एक एक देव आमच्याकडील सेनेच्या आघाडीला चालो. शत्रूंना सर्वतोपरी जिंकणाऱ्या अशा ह्या बृहस्पतिइत्यादि देवांच्या सेनांच्या अग्रभागी 'मरुत्' जावोत. ९ इच्छित फलांची वृष्टी करणाऱ्या इंद्राचे व राजा वरुणाचे बल युद्धप्रसंगी अत्यंत तीव्र असो. स्थिर चित्ताने लढणाऱ्या, त्रिभुवनाला थरारून सोडणाऱ्या (शत्रूंना आपल्या स्थानातून पळ काढावयास लावणाऱ्या), विजय संपादन केलेल्या, आदित्य, मरुत् प्रभृति देवांचा प्रचंड जयघोष सर्वत्र दुमदुमून राहिला आहे. १० आमच्या सैनिकांचे ध्वज शत्रुपक्षातील सैनिकांच्या ध्वजाशी जाऊन भिडतील तेव्हा इंद्र आमच्या

सैनिकांचे रक्षण करणारा होवो. आमच्याकडील वीरांनी शत्रुसैन्यावर सोडलेले बाण शत्रूचा घात करून विजयी होवोत. आमच्याकडील वीर शत्रुपक्षातील वीरांच्याहून सरस ठरोत. हे देव हो, शत्रूंच्याशी लढत असलेल्या आमचे तुम्ही संरक्षण करा. ११ हे धनवान् इंद्रा, आमच्या सैनिकांची आयुधे शत्रुसैनिकांच्या आयुधांच्यापेक्षा उत्कृष्ट करून आम्हाला आनंदित कर. माझ्या सैन्यातील वीरांच्या ठिकाणी असणाऱ्या तेजांना अधिक उत्तेजित करून त्यांना हर्षित कर. हे शत्रुनाशका इंद्रदेवा, आमच्या सैन्यातील घोड्यांच्या शीघ्रगतीत वाढ करून त्यांना उल्हसित कर. विजयी झालेल्या आमच्याकडील वीरांच्या रथांचा मोठा घडघडाट सर्वांच्या कानी जाऊ दे. १२ हे वीर हो, शत्रूसैन्याच्या जवळ जाऊन भिडा व त्यावर जय मिळवा. तुमचे भुजदंड आपल्या ठिकाणची आयुधे शत्रुसैन्यावर आघात करण्यासाठी सदा उगारलेली असोत. तुम्ही शत्रूंच्या आक्रमणाने केव्हाही मागे हटणार नाही, अशा प्रकारे इंद्र तुम्हाला सुखी करो. १३ मंत्राने तीक्ष्ण केलेल्या हे बाणदेवते, आमच्याकडून फेकली गेलीस म्हणजे तू एकदम शत्रुसैन्यावर जाऊन पड आणि शत्रुसमुदायात घुसून जा. इतकेच नव्हे तर शत्रूंच्या शरीरात शिरून त्यांच्यापैकी एकालाही तू जिवंत ठेवू नकोस. १४ हे यजमान, तुझ्या शरीराची मर्मस्थाने मी दुर्भेद्य अशा कवचांनी झांकून टाकतो. सोमराजा मरणप्रतिबंधक अशा चिलखताने तुला सर्वतोपरी आच्छादित करो. तुझे युद्धसामर्थ्यरूपी धन परकीयांच्याहून अधिकापेक्षाही अधिक वाढो. विजय संपादन करणाऱ्या तुला देव अधिक प्रोत्साहन देवोत. १५ ज्यांच्या मस्तकावर जावळे वाढलेली आहेत अशी चपल बालके इतस्ततः धावत असतात, त्याप्रमाणे शत्रुसैन्याने सोडलेले बाण आमच्या सैन्यात इतस्ततः येऊन पडत असतात. अशा युद्धप्रसंगी सर्व शत्रूंचा घात करणारा इंद्र अखंड शक्तींनी युक्त होऊन आम्हाला विजयसुख मिळवून देवो. (अनुवाक ४).

१ आताच येथे आणलेल्या हे अग्निदेवा, 'पूर्व' नांवाच्या प्रशस्त अशा दिशेस जाणून तू तिच्याकडे जा. इष्टकांची मांडणी करून निष्पादित केलेल्या ह्या चितिरूपी अग्नीच्या पूर्वभागी राहणारा तू अग्नी हो. सर्व दिशांना प्रकाशित करून तू त्यांच्याहीपेक्षा अधिक प्रकाशित हो आणि आमच्या पुत्रपौत्रादिकांना व गाई इत्यादि पशूंना अन्न संपादन करून दे. २ हे ऋत्विग्यजमानहो, स्वर्गलोकप्राप्तीचे साधन अशा उखेमध्ये पूर्वी संपादित केलेल्या अग्नीला आपल्या हाती घ्या. आणि त्या अग्नीसह चितिरूपी अग्नीवर चढा. नंतर स्वर्गलोकी

जाऊन तेथे राहणाऱ्या देवांच्याशी मिळून मिसळून सुखाने रहा. ३ मी यजमान पृथ्वीवरून उडी मारून अंतरिक्षलोकात आरूढ झालो आहे. अंतरिक्षातून उड्डाण करून द्युलोकावर येऊन बसलो आहे. द्युलोकातील दु:खरहित अर्थात् सुखमय अशा प्रदेशावरूनही उडी मारून त्याच्या पृष्ठभागी असलेल्या स्वर्गलोकातील केवळ प्रकाशमय अशा आदित्यमंडळावर मी येऊन पोचलो आहे. ४ यज्ञकर्माचे उत्कृष्ट ज्ञान असणारे जे यजमान सर्व जगाच्या धारणाला कारणभूत अशा ज्या चितिरूपी अग्नीचे विस्ताराने अनुष्ठान करून यज्ञ करतात, ते यजमान अंतरिक्षावर आरोहण करतात, त्याचप्रमाणे द्युलोक व पृथ्वी यांच्यावरही आरोहण करतात. नंतर स्वर्गलोकात असणाऱ्या आदित्यमंडलावर ते एकदा जाऊन पोचले, म्हणजे तेथून दुसऱ्या कोणत्याही स्थानी जाण्याची अपेक्षा करीत नाहीत. ५ देवांची इच्छा करणारे जे यजमान आहेत, त्यांच्यावर उपकार करण्यासाठी हे अग्निदेवा, तूच पुढे चालू लाग. कारण देवांचा व मनुष्यांचा मार्गदर्शक असा तूच खरा नेत्र आहेस. भृगुगोत्रोत्पन्न अशा विद्वान् पुरुषांच्याशी सख्य असलेले व देवांना उद्देशून यजन करणारे यजमान सुखाने स्वर्गाला जावोत. ६ रंगारूपाने परस्परभिन्न असूनही एकमेकांशी अगदी बिलगून राहणारी व एकाच मनोवृत्तीची रात्र व दिवस ही उभयता पतिपत्नी ज्या एका अग्निरूपी बालकाला पाजीत असतात, तो हा अग्नी द्युलोक व पृथ्वी यांच्या मध्यभागी असलेल्या अंतरिक्षात सुवर्णाप्रमाणे चमकत असतो. यज्ञाच्या द्वारा धनरूपी फल यजमानाला प्राप्त करून देणाऱ्या देवांनी ह्या अग्नीला धारण केले आहे. ७ हजार नेत्र आणि शंभर मस्तके असलेल्या हे अग्निदेवा, तुझ्या शरीराचे ठिकाणी शंभर प्राणवायू व हजार अपान वायू आहेत. तू हजारांनी मोजता येणाऱ्या धनांचा स्वामी होतोस. आणि म्हणूनच अद्‌भुत चारित्र्याने संपन्न अशा तुज अग्नीला आम्हाला भरपूर अन्न मिळावे म्हणून हविर्द्रव्य समर्पण करतो. ही आहुती अग्नीकडून उत्तम प्रकारे स्वीकारली जावो. ८ हे चितिरूपी अग्निदेवा, तू जणू काय उत्कृष्ट पंख असलेला गरुडच आहेस. यास्तव तू या चितिरूपी पृथ्वीवर बैस. विशेषत: पृथ्वीच्या पृष्ठभागावर तू स्वस्थ बसून रहा. ९ हे अग्निदेवा, पृथ्वीच्या पृष्ठभागी बसलेला तू आपल्या उज्वल प्रकाशाने सर्व आकाश भरून टाक. स्वत:च्या सामर्थ्याने द्युलोकाला वरच्यावर थोपवून धर आणि स्वत:च्या तेजाने दश दिशांचा उत्कर्ष करून त्यांना स्थिर कर. १० हे अग्निदेवा, प्रामुख्याने आमंत्रण दिलेला व प्रसन्नमुख असा

तू पूर्व दिशेस असलेल्या आपल्या उत्कृष्ट स्थानावर येऊन बैस. हे विश्वेदेव हो, ह्या अत्युत्कृष्ट अशा उच्च स्थानावर तुम्ही आणि यजमान येऊन बसा. ११ अत्यंत तरुण अशा हे अग्निदेवा, पूर्वीच प्रज्वलित असलेला तू आमच्या पूर्व दिशेस सतत टिकणाऱ्या व ताव आलेल्या पोलादी मेखेप्रमाणे लालभडक अशा ज्वालेने युक्त होऊन तळपत रहा. कारण, शिजून तयार झालेली हविर्द्रव्यरूपी अन्ने नेहमी तुझ्याजवळ येत असतात. १२ हे अग्निदेवा, परमश्रेष्ठ अशा जन्मामध्ये द्युलोकाचे ठिकाणी आदित्यरूपाने राहणाऱ्या तुज अग्नीची आम्ही ज्ञानाने सेवा करतो. आमच्यासह तुला राहण्याला योग्य अशा ह्या द्युलोकाच्या खाली असलेल्या पृथ्वीवर राहणाऱ्या तुज अग्निदेवाची आम्ही स्तुतिमंत्रांनी सेवा करतो. ज्या चितिरूपी जन्मस्थानापासून तू प्रकट झाला आहेस, त्या स्थानाचेही मी पूजन करतो. समिधांच्या योगाने तू चांगला प्रज्वलित झालास म्हणजे तुझ्या ठिकाणी ऋत्विज आहुती देवोत. १३ हजारो दुग्धधारा ज्यामध्ये साठलेल्या आहेत अशा चार पुष्ट स्तनांनी युक्त अशा गाईची धार काढतात, त्याप्रमाणे प्राचीन काळी 'कण्व' नांवाच्या महर्षींनी ज्या ह्या अग्नीच्या अनुग्रहबुद्धिरूपी गाईची धार काढली, त्या सर्वांना सेवनीय, व सर्वप्रेरक अशा सवित्याला प्रेरणा करणाऱ्या अग्निदेवाच्या अभिमतफलदानसमर्थ अशा अनुग्रहबुद्धिरूपी गाईची मी सर्वतोपरी प्रार्थना करतो. १४ हे अग्निदेवा, तुझ्या ठिकाणी अर्पण करण्यात येणाऱ्या समिधा सात प्रकारच्या असून, काली, कराली, इत्यादि नांवाच्या तुझ्या सात ज्वालारूपी जिव्हा आहेत. मरीची, अत्री प्रभृति सात ऋषी तुझे द्रष्टे असून, आहवनीय इत्यादि नांवाची प्रसिद्ध अशी तुझी आवडती सात निवासस्थाने आहेत. होता, मैत्रावरुण, ब्राह्मणाच्छंसी, पोता, नेष्टा, आग्नीध्र व अच्छावाक हे सात होते, अग्निष्टोम इत्यादि सात सोमयागांनी तुझे यजन करीत असतात. यासाठी तुझी आहवनीयादि सात निवासस्थाने तुपाने सर्वतोपरी भरून काढ. १५ (१) ईदृङ्. (हाती घेतलेल्या वस्तूकडेच पाहत राहणारा) (२) अन्यादृङ्. (हाती घेतलेल्या वस्तूखेरीज इतर वस्तूवरही दृष्टी ठेवणारा (३) एतादृङ्. (हातातील वस्तू कशी आहे? हे पाहणारा) (४) प्रतिदृङ्. (प्रत्येकाकडे निरनिराळ्या दृष्टीने पाहणारा) (५) मित (लहानथोरांशी समभावनेने वागणारा) (६) संमित (लहानथोरांशी समरस होणारा) आणि (७) सभर (सर्व कार्याचा भार आपल्यावर घेणारा) या नांवाच्या सात मरुतांनो तुम्ही ह्या यज्ञात अवश्य या. १६ (१) शुक्र ज्योती

(शुक्राच्या चांदणीप्रमाणे प्रकाशमान) (२) चित्र ज्योती (दर्शनीय असा प्रकाश असलेला) (३) सत्य ज्योती (सत्यरूपी अशा ब्रह्मप्रकाशाने युक्त (४) ज्योतिष्मान् (तेजस्वी) (५) सत्य (सत्यस्वरूप) (६) ऋतपा (यज्ञसंरक्षक) व (७) अत्यंहा (सत्यसंरक्षक) ह्या नांवाच्या सात मरुतांनो, तुम्ही या यज्ञाला अगत्य या. १७ (१) ऋतजित् (यज्ञाचे सत्यस्वरूप आत्मसात केलेला) (२) सत्यजित् (कोणत्याही वस्तूचे यथार्थ स्वरूप आकलन करणारा) (३) सेनजित् (शत्रुसैन्यावर जय मिळविणारा) (४) सुषेण (उत्कृष्ट सैन्य बाळगणारा) (५). अंत्यमित्र (मित्रांना जवळ करणारा) (६) दूरे अमित्र (शत्रूंना दूर ठेवणारा) व (६) गण (अखिल वस्तूची मोजणी करणारा) ही नांवे धारण करणाऱ्या सात मरुतांनो, तुम्ही या यज्ञाला अवश्य या. १८ (१) ऋत (खरे बोलणारा) (२) सत्य (सत्याचा चाहता) (३) ध्रुव (अचल मनोवृत्तीचा) (४) धरुण (अनेक कार्यांचे ओझे वाहणारा) (५) धर्ता (धारणशक्तीने युक्त) (६) विधर्ता (विशिष्ट धारणशक्तीने संपन्न) आणि (७) 'विधारय' (विविध अशा धारणाशक्तीने युक्त) या नांवानी प्रसिद्ध असलेल्या हे मरुतांनो तुम्ही यज्ञामध्ये हविर्भाग घेण्यासाठी अवश्य या. १९ (१) इदृक्षास (कोणत्यातरी एखाद्या लक्षणाने युक्त असलेल्या वस्तूकडे पाहणारे) (२) एतादृक्षास (विशिष्ट अशा एखाद्या लक्षणाने युक्त असणाऱ्या वस्तूकडे पाहणारे) (३) सदृक्षास (सर्वांना समदृष्टीने पाहणारे) आणि (४) प्रतिसदृक्षास (प्रत्येकाकडे समान दृष्टीने पाहणारे) अशा नांवांनी प्रसिद्ध असलेल्या मरुतांनो, तुम्ही या यज्ञासाठी अवश्य या. पांच गणांमध्ये समुच्चयाने समाविष्ट झालेल्या हे मरुतांनो, तुम्ही सर्व एकत्र जमून या यज्ञाला या. साता सातांच्या चार गणांनी मोजले जाणारे आणि चौघांच्या एकाच गणांनी मोजता येणारे तुम्ही सारे जण आमच्या संरक्षणासाठी मोठ्या आदराने आमच्या या यज्ञात या. देवसमाजातील प्रजाजन असलेले हे मरुत् आपला स्वामी असलेल्या इंद्राच्या मनोवृत्तीला अनुसरून जसे वर्तन करतात, त्याचप्रमाणे देवसंबंधी व मनुष्यसंबंधी सर्व प्रजा ह्या यजमानाच्या मनोवृत्तीला अनुसरून वागणारे होवोत. (अनुवाक ५).

१ अंगावर चिलखत घातलेला राजा रणांगणावर प्रवेश करतो, व दोन्ही पक्षांतील सैन्यांच्या आघाड्या परस्परांच्या जवळ येऊन भिडतात, त्यावेळी हत्तीचे चीत्कार, घोड्यांचे खिंकाळणे, रथांचा गडगडाट, वीरांच्या आरोळ्या, रणवाद्यांचा गगनभेदी शब्द आणि निरनिराळ्या दिशांनी अंतराळात

वाहणारे बाणांचे प्रवाह यांच्या एकच गर्दीमुळे त्या रणांगणाचे स्वरूप वीज गर्जना, व पर्जन्यधारा इत्यादिकांनी खवळलेल्या मेघमंडलाप्रमाणे भेसूर व असह्य होत असते. हे कवचधारी राजा, शत्रूकडून कोठेही घाव न लागलेल्या शरीराने व शत्रूंचा फन्ना उडवून विजयी हो. तुझ्या अंगावर असलेल्या अभेद्य कवचाची महनीय संरक्षणशक्ती तुझे रक्षण करो. २ आम्ही आमच्या धनुष्याच्या अचाट सामर्थ्याने शत्रूंच्या सर्व गाई हरण करून आणू. धनुष्याच्या जोरावर आम्ही, शत्रूच्या हद्दीतील रस्ते काबीज करू. त्याचप्रमाणे धनुष्याच्या बळावर घनघोर अशा अनेक रणसंग्रामांत विजय मिळवू. आमच्या हातांतील धनुष्य शत्रूंच्या मनांत असलेले सर्व डावपेच हाणून पाडो. धनुष्यांच्या बळाने आम्ही सर्व दिशांना विजयी होऊ. ३ आणीबाणीच्या रणकंदनातून आम्हाला यशस्वीपणाने पार पाडणारी ही धनुष्याची प्रत्यंचा धनुष्याच्यावर चढविली गेल्यावर बाण सोडण्यासाठी जेव्हा खेचली जाते, तेव्हा एखादी नवयौवना स्त्री आपल्या पतीला आलिंगन करीत असतांना त्याच्या कानाशी गुजगोष्टी करते, त्याप्रमाणे ती योध्याच्या कानाशी येऊन अस्पष्ट असा शब्द करीत असते. ४ वरचेवर मागेपुढे होणारी व टणत्कार करणारी आणि एका पतीचे ठिकाणी सारख्याच प्रेमभावाने भाषण करणाऱ्या दोन स्त्रियांप्रमाणे भासणारी ह्या धनुष्याची दोन्ही टोके, माता आपल्या मुलाला मांडीवर घेते त्याप्रमाणे आपल्या मध्यभागी बाणाला धारण करून शत्रूंना ताडन करोत. ५ रणांगणावर येऊन पोचलेला व पुष्कळ बाणांचे पालन करीत असून ज्याच्या ठिकाणी त्याचे जणू पुत्रच अशा अनेक बाणांचा संघ समाविष्ट झालेला असतो, तो भाता त्यातून बाण काढून घेतेवेळी 'चिच्चा' असा शब्द करीत असतो. योध्याने आपल्या पाठीवर बांधलेला तो भाता योध्याचा इषारा होताच अनेक वीर ज्याच्यावर हिरीरीने बाण सोडीत आहेत, अशा शत्रूच्या सर्व सैन्यावर विजय मिळवितो. ६ सारथ्यकुशल असा सारथी स्वत: रथात उभा राहून जिकडे जिकडे त्याला जावेसे वाटेल तिकडे तिकडे पुढे चाललेल्या रथाचे घोडे हाकीत असतो. हे ऋत्विग्यजमानहो, रथाला जोडलेल्या घोड्यांचे जे लगाम सारथ्याचे मन जिकडे वळेल, तिकडे अनुसरून त्याच्या मागे चालतात आणि रथाला जोडलेल्या घोड्यांना आपल्या स्वाधीन ठेवतात त्या लगामांची तुम्ही प्रशंसा करा. ७ अपेक्षेइतकी मजल चालून जाण्यास समर्थ असे पाय असलेले, रथासह त्वरित गतीने धावणारे, आपल्या पायांच्या खुरांनी शत्रूंना तुडवीतच

पुढे जाणारे आणि मोठमोठ्याने खिंकाळणारे ते अश्व क्षणाचाही अपव्यय न करता निर्भय वृत्तीने शत्रूंचा नाश करीत असतात. ८ ज्या लहानशा गाड्यावर यजमानाचे कवच आणि धनुष्य इत्यादि आयुधे ठेवलेली असतात आणि रणांगणावरून परत आलेला रथ ज्या गाड्यावर ठेवला जातो, त्या 'रथवाहन' नामक गाड्याचे ठिकाणी त्याला हविर्द्रव्याप्रमाणे उपकारक वाटणारा आणि ज्या रथाच्या योगाने आम्ही प्रवासातील सर्व दिवस सुखाने काढले, असा हा रथ आम्ही व्यवस्थित ठेवीत आहो. ९ आमच्या ठिकाणी दीर्घायुष्याची स्थापना करणारे, संकटात सापडणाऱ्यांनी स्वत:च्या रक्षणासाठी आश्रय करण्याला योग्य, सामर्थ्यवंत, अगाधबुद्धीचे, हत्ती, घोडे इत्यादि वाहनांनी युक्त अशा अनेक सेना बाळगणारे, बाणयुद्धात अतीशय प्रबल, शत्रूकडून ज्यांच्यावर युद्धाची उठावणी होण्यास अशक्य, शूरांतले शूर, धन व सेना यांचा अफाट संग्रह जवळ ठेवणारे, आणि शत्रुपक्षाकडील वीरांचा पराभव करणारे असे जे आमचे पितर आहेत, ते आम्ही अर्पण केलेल्या स्वादिष्ट व रुचकर अशा अन्नाने तृप्त होत असतात. १० आमचे पितर वेदार्थज्ञ असे ब्राह्मण असून आमच्यावर अनुग्रह करणारे आहेत. द्युलोक व पृथ्वी ही दोघेही सर्वकाळ आमच्यावर अनुग्रह करणारी होवोत. यज्ञाचे संवर्धन करणारा पूषादेव पापापासून आमचे रक्षण करो. पातकी म्हणून सर्वत्रांच्या मुखाने गणले जाणारे निंदक लोक आमची निंदा करावयास समर्थ न होवोत. ११ बाणाचा पृष्ठभाग उत्कृष्ट अशा पक्ष्यांच्या पिसांनी आच्छादित केलेला असून त्या बाणाच्या अग्रभागी सिंहाच्या दाताप्रमाणे तीक्ष्ण असे फळ बसविलेले असते. जनावरांच्या स्नायूंनी जागजागी घट्ट आवळलेला बाण धनुष्यापासून सोडला गेला म्हणजे तो ज्या ठिकाणी योध्दे सावधपणाने किंवा बेसावधपणाने इतस्तत: वावरत असतात, त्या ठिकाणी एकदम जाऊन पडतो. रणांगणाचे ठिकाणी बाण आम्हाला सुख देवोत. १२ हे सरळ जाणाऱ्या बाणा, तू आपल्या तडाख्यातून आम्हाला वर्ज करून इतराच्यावर जाऊन पड. आमचे शरीर पाषाणाप्रमाणे दृढ होवो. 'हे मोठे मान्य आहेत' अशा प्रकारे सोम आमची चाहोकडे प्रशंसा करो. अदिती देवी आम्हाला सुख देवो. १३ हातात चाबूक घेतलेले सारथी रथाला जोडलेल्या अश्वाच्या, पर्वताच्या टेकडीप्रमाणे उन्नत अशा अवयवांच्या ठिकाणी आणि पुठ्ठ्यावर चोहोकडे चाबकाचे तडाखे मारीत असतात. अश्वांना जलद धावण्याची प्रेरणा करणाऱ्या हे चाबुका, शूर मनोवृत्तीच्या घोड्यांना

रणमैदानावर सत्वर धांवत जाण्याविषयी तू प्रेरणा कर. १४ धनुष्याच्या दोरीचे आघात स्वत:वर घेऊन योध्याला मनगटाचा बचाव करीत असताना जे सर्पाप्रमाणे आपल्या अवयवांनी योध्याच्या बाहूला विळखा घालून बसलेले असते, ते 'हस्तघ्न' म्हणजे योध्याच्या मनगटाचे संरक्षण करणारे विशिष्ट प्रकारचे चामडे, सर्व मार्गांची माहिती असलेला माणूस गैरमाहित अशा एखाद्या माणसाचे संरक्षण करतो, त्याप्रमाणे माझे सर्वतोपरी संरक्षण करो. १५ उत्कृष्ट जातीच्या वृक्षाचे लाकूड वापरून तयार केलेल्या हे रथा, आमच्या ठिकाणी मित्राप्रमाणे स्नेहभाव ठेवणारा, शत्रुसैन्याची फळी फोडून त्वरेने पलीकडे जाणारा व उत्कृष्ट पराक्रमी वीरांनी वेढलेला तू जनावरांच्या कातड्याच्या बनविलेल्या दोऱ्यांनी जागजागी घट्ट बांधलेला आहेस. यास्तव, तू स्वत: चांगला सुदृढ हो, तुझी सर्व अंगे बळकट असोत. तुझ्या ठिकाणी आरूढ झालेला वीर शत्रूपक्षाकडील जिंकावयास योग्य अशा ज्या वस्तू असतील त्या त्या सर्व जिंकून आणो. १६ हे यजमान, द्युलोक व पृथ्वी यांच्यापासून निवडून घेतलेले जणू सारभूत बल, त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या वृक्षांतून काढून आणलेले मूर्तिमंत तेज, उदकांच्या ठिकाणी असलेल्या तेजांचे जणू सार, जनावरांच्या कमावलेल्या कातड्यांनी चोहोकडून मढविलेला आणि इंद्राच्या वज्राप्रमाणे अत्यंत कणखर अशा ह्या रथाचे तू हविर्द्रव्याने पूजन कर. १७ हे देदीप्यमान रथा, इंद्राच्या वज्राप्रमाणे सुदृढ, मरुतांच्या तोडीच्या पराक्रमी वीरांनी वेष्टित, सूर्याच्या अनुग्रहाने सुरक्षित, आणि कोणाच्याही वेष्टून टाकणाऱ्या आवरणाला दाद न देण्याइतका खंबीर असलेला तू आमच्या ह्या हविर्द्रव्यरूपी देणगीचा स्वीकार करणारा हो आणि तिच्यातील प्रत्येक पदार्थाची वेगवेगळी चव घे. १८ हे दुंदुभे, तू आपल्या प्रचंड ध्वनीने सारी पृथ्वी व आकाश दणाणून टाक. द्युलोकापासून भूलोकापर्यंतच्या सर्व ठिकाणी राहणारे लोक तुझा शब्द ओळखोत. इंद्र आणि इतर देव यांच्याशी समानतेने प्रेम ठेवणारी तू अत्यंत दूर असलेल्या शत्रूला देखील मागे हटव. १९ हे दुंदुभे, शत्रूंच्या हृदयात भीतीने धडकी भरेल असा तू प्रचंड शब्दघोष कर. स्वपक्षातील सैनिकांना, तू अमक्यावर वार कर, तू अमक्याला ठार कर, अशा प्रकारच्या जणू तू सूचनाच करीत आहेस असा मोठमोठ्यांनी तू आक्रोश कर. आमच्या ठिकाणचे शरीरबल व मनोधैर्य प्रबलतेने उत्तेजित होईल अशी तू गर्जना कर. आमच्या ठिकाणच्या पातकांचे निरसन होऊन युद्धाविषयी आमचा उत्साह

वाढेल असा तू ध्वनी कर. दुष्ट मनोवृत्तीच्या लोकांना तू आमच्यापासून दूर कर. वज्रधारण करणाऱ्या इंद्राच्या मुठीसारखी तू कणखर आहेस. त्या अर्थी आम्हालाही तू आपल्याप्रमाणे कणखर कर. २० हे इंद्रा, आमच्या भोवताली असलेल्या ह्या शत्रूंच्या सैन्यांना तू पळ काढावयास लाव. आमच्याकडील रणदुंदुभी आमचा जय झाल्याचे सर्वांना ज्ञात होईल अशा प्रकारे अत्यंत प्रचंड ध्वनी करीत आहे, त्या अर्थी आमच्याकडील सर्व विजयी सैनिकांना आपल्या गोटाकडे परत आण. अश्वारूढ असे आमच्याकडील सर्व वीर विजयी मुद्रेने इतस्तत: संचार करोत. आणि रथात बसून लढणारे आमचे प्रमुख वीरही युद्धात पूर्णपणे जय मिळवोत. (अनुवाक ६).

१ हे वेगवान् अश्वा, तत्त्वदृष्टीने समुद्रोदकापासून आणि लौकिक दृष्टीने जातिवंत अशा उत्कृष्ट अश्वापासून जन्मलेला तू, 'अहो, अग्न्यादिकांचे साधन मीच आहे!' अशा अर्थाने प्रथमच जेव्हा अत्यंत मोठ्याने खिंकाळलास तेव्हाच अत्यंत शीघ्रगामी अशा ससाण्यांच्या पंखाप्रमाणे अथवा हरिणाच्या पुढच्या दोन पायांप्रमाणे तुझे माहात्म्य लोकांकडून प्रशंसेला पात्र झाले. २ 'यम' असे नांव धारण करणाऱ्या अग्नीने दिलेल्या ह्या अश्वाला त्रैलोक्यात पसरून राहणाऱ्या वायूने प्रथम रथाला जोडले आणि त्या रथात इंद्र पहिल्यानेच आरूढ झाला. विश्वावसु नांवाच्या कोणा गंधर्वानेच पहिल्या खेपेस ह्या अश्वाचा लगाम आपल्या हाती घेतला. आणि अष्टवसूंनी आदित्याच्या प्रकाशाने अखिल जगात तुला प्रकाशित केले. ३ हे वेगवान् अश्वा, 'यम' हे नांव धारण करणारा अग्नी तूच असून आदित्यरूपही तूच आहेस. अत्यंत गूढ अशा 'अश्वमेध' रूप कर्माशी व त्यातील सोमयागाशी अगदी योग्य वेळी विशेषतेने एकरूप होऊन गेला आहेस. यमादिकांची सायुज्यता मिळविलेल्या व द्युलोकाचे ठिकाणी आदित्यरूपाने प्रतिष्ठित झालेल्या तुज अश्वाची ऋक्. यजु व साम अशी तीन बंधनसाधने आहेत असे विद्वान् लोक म्हणत असतात। ४ हे वेगवान् अश्वा, 'उच्चै:श्रवा' ह्या नांवाने प्रसिद्ध असणाऱ्या तुज अश्वाची द्युलोकात जशी तीन बंधनसाधने आहेत तशीच उदकांच्या ठिकाणी तीन आणि समुद्राच्या अंतर्भागीही तीन बंधनसाधने आहेत, असे विद्वान् लोक बोलत असतात. शिवाय असे म्हणतात की, ज्या पितृवीर्याच्या ठिकाणी उत्कृष्ट असा तुझा जन्म झाला, ते पितृवीर्य किती परमोच्च आहे, हे जणू तू आपल्या कृतीनेच जगाला कथन करीत आहेत. ५ हे वेगवान् अश्वा,

दररोज सकाळी तुला पाण्यात घालून स्वच्छ करीत असतांना तुझे अंग चोळण्यासाठी योजण्यात येणारे हे लोखंडी पत्र्याचे खरारे येथे दिसत आहेत. तू खडकाळ जागेतून दौड करीत असतांना तुझ्या खुरांना ठेच लागून इजा न व्हावी म्हणून तुझ्या खुरांना ठोकण्यात येणारे पोलादी नाल येथे पडले आहेत. रूपगुणानी अत्यंत मौल्यवान अशा तुज अश्वाचे आणि तुझ्यावर बसणाऱ्या वीराचे संरक्षण करणाऱ्या ह्या सुवर्णखचित व रेशमी काढण्या व लगाम येथे पडलेला दिसत आहे. ६ हे अश्वा, आपल्यावर आरोहण केलेल्या वीराचे शत्रुसैन्याची फळी फोडून जातांना संरक्षण करणारे, आणि आकाशमार्गाने उडत चाललेल्या पक्ष्याप्रमाणे धावत जाणारे तुझे शरीर मी आपल्या मानस दृष्टीने अगदी जवळून न्याहाळिले आहे. त्याचप्रमाणे यत्किंचितही धुराळा नसलेल्या आणि म्हणूनच जाण्यायेण्याला सुखकर अशा मार्गांनी एकसारखे खाली वर होणारे व पाखराप्रमाणे अतीशय वेगाने धावत असलेले तुझे मस्तकही मी आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे. ७ हे अश्वा, तुझ्या तोंडी दिलेल्या तोबऱ्यातील हरबरा, उडीद इत्यादि धान्य जेव्हा तू खात असतोस त्याच वेळी तुझी चाकरी करणारा माणूसही तुला दिलेल्या धान्यातीलच अगोदर बाजूस करून ठेवलेला थोडासा भाग भक्षण करीत असतो. तुझ्या परिचारकाने तुझ्यापुढे गवताचा भारा टाकल्यानंतर चारा खाण्यासाठी अत्यंत आतुर झालेला तू त्या गवताचा जेव्हा घासामागे घास खाऊ लागतोस, त्यावेळी आपल्या धन्याला अन्न आणि विजय मिळवून देण्यासाठी संचार करणाऱ्या तुज अश्वाचे मी पाहिलेले स्वरूप नि:संशय सर्वोत्कृष्ट होते. ८ हे वेगवान् अश्वा, रथ तुझ्या मागोमाग चालतो. तुझा धनी तुझ्या जिवावरच आपले जीवन चालवितो. तुझ्या अनुरोधानेच गाई पोसल्या जातात. अविवाहित अशा मुलींचे सौभाग्य देखील तुझ्या अनुरोधानेच वाट चालत असते. सेवारूपाने असणारे मनुष्याचे अनेक संघ तुझ्या सख्यत्वाला प्राप्त होऊनच जय मिळवितात. किंबहुना, देवानी देखील तुझे अपार सामर्थ्य अजमावले आहे. ९ हा अश्व सुवर्णाप्रमाणे कांतिमान असून त्याच्या मस्तकावर सुवर्णाचा अलंकार घातलेला आहे. त्याचप्रमाणे हा अश्व शरीराने लोखंडासारखा सुदृढ असून त्याचे चारही पाय मनोवेगाने धावणारे आहेत. ह्या अश्वाच्या तुलनेने 'उच्चै:श्रवा' खेरीज करून इंद्र देखील निकृष्ट ठरला आहे. सर्वदेव ह्या अश्वाचे खावयास योग्य व रुचकर असे मांसरूपी हविर्द्रव्य सेवन करण्यासाठी आपण होऊन येथे आलेले आहेत.

ह्या वेगवान अश्वावर प्रथमत:च आरोहण करणाऱ्या प्रजापतीने देखील 'ह्या अश्वाचे मांसरूपी हविर्द्रव्यच आपणास सेवन करण्यास योग्य आहे', असे निश्चित केले आहे. १० ज्यांचे पुठ्ठे आणि छाती भरदार व पुष्ट असून ज्याची पाठ सखल आहे, असे अत्यंत तेजस्वी आणि सर्वकाळ दौडत राहणारे व हंस पक्ष्यांच्या थव्याप्रमाणे एका रांगेने उभे राहिलेले घोडे जेव्हा एकदम उसळी मारून रणांगणावर भरधाव चालून जातात, तेव्हा द्युलोकात असलेला गमनमार्ग ते व्यापून टाकतात. ११ हे वेगवान् अश्वा, तुझे शरीर स्वभावत: शीघ्रगामी असून तुझे चित्त वाऱ्याप्रमाणे वेगवान आहे. तुझ्यावर लादलेली बाणांचे भाते, तरवारी इत्यादि आयुधे जणू तुझी शिंगेच आहेत, असा भास होत असून ती तुझ्या बरोबरच निरनिराळ्या युद्धप्रदेशांच्या व अरण्यांच्या ठिकाणी इतस्तत: संचार करीत असतात. १२ यज्ञाच्या द्वारा अन्नाची प्राप्ती करून देणारा हा अश्व देवांच्या ठिकाणी आपणास आता जावयाचे आहे, अशा प्रकारे आपल्या मनाशी ध्यान करीतच त्याच्या शरीराची चीरफाड करण्याच्या जागी येऊन पोचला आहे. ह्या अश्वाच्या पुढच्या बाजूस एक बोकड चालविला जात असून याच्या नाभिस्थानाजवळही एक बोकड बांधून ठेवला जात असतो. आणि ह्या अश्वाच्या पाठीमागून विद्वान् ऋत्विज त्याची स्तुती करीत चाललेले असतात. १३ हा शीघ्रगामी अश्व स्वर्गलोकी देवांच्या जन्माला गेलेल्या आपल्या पित्याला व मातेला भेटावयास जाण्यासाठीच परमोत्कृष्ट अशा ह्या वधस्थानाच्या ठिकाणी येऊन पोचला आहे. हे अश्वा, आज तू अत्यंत आनंदित होऊन देवलोकी जाऊन पोच. तू देवलोकी गेलास म्हणजे देवांना हवी प्रदान कणाऱ्या यजमानाला उपभोग्य अशी फले प्राप्त होण्याविषयी ऋत्विजांचा संघ देवांची प्रार्थना करील. (अनुवाक ७).

१ ह्या अश्वमेध यज्ञात देवांच्यासाठीच उत्पन्न झालेल्या व यागद्वारा अन्नप्राप्तीचे साधनच असलेल्या ह्या अश्वाची जी पराक्रमविषयक चरित्रे आम्ही वर्णन करून सांगणार आहोत, त्याबद्दल दिवसाचा अधिपती मित्र, रात्रीचा अधिपती वरुण, अर्यमा, वायू, देवराज इंद्र, देवांचे आश्रयस्थान असलेला प्रजापती व मरुत् हे देव आमची निंदा न करोत, कारण, अश्वचरित्राचे वर्णन करणे, म्हणजे पर्यायाने त्या मित्रप्रभृति देवांचीच स्तुती करणे आहे. २ ज्यावेळी ऋत्विज अश्वाला स्नान घालून व त्याच्या आयाळीत आणि शेपटीत जागजागी सोन्याचे व काचेचे मणी बांधून त्याचा संस्कार करतात

आणि नंतर त्याच्या मुखाजवळ हुतशेष आज्य व इतर पेय पदार्थ यांचे दान दोन्ही हातांनी उचलून नेतात, तेव्हा तो वेगवान् अश्व परमश्रेष्ठ अशा देवांच्याकडे जाऊन पोचण्याच्या उत्सुकतेनेच जणू फुरफुरू लागतो. आणि इंद्र, पूषा प्रभृति देवांना अत्यंत प्रिय अशा विविध प्रकारच्या अन्नभावाला प्राप्त होतो. ३ ज्यावेळी देवांचे पोषण करणाऱ्या अग्नीला व सर्व देवांना सेवनीय असा हविर्भाग म्हणून ठरलेला हा बोकड वेगवान् अश्वाच्या पुढच्या बाजूस नेतात, त्यावेळी 'त्वष्टा' नांवाचा प्रजापतीच त्याची उत्तम कीर्ती व्हावी म्हणून देवांना सर्वतोपरी प्रिय, प्रथमच समर्पण करण्यास योग्य व अश्वासह असलेल्या त्या बोकडाला प्रोत्साहनपूर्वक संतोषवीत असतो. ४ यज्ञामध्ये निरनिराळ्या वेळी देवांना पोचविण्यास योग्य असा हा हविर्भाग म्हणून ठरलेल्या अश्वाला ऋत्विज अग्नीभोवती तीन वेळा फिरवितात, त्यावेळी 'पूषा' देवतेचा हविर्भाग म्हणून नियोजित झालेला एक बोकड अश्वाचा पुरोगामी होऊन मॆं, मॆं, अशा आपल्या शब्दाने सर्व देवांना यज्ञाचा प्रारंभ झाल्याची वार्ता जणू कळवीतच पुढे चालत जातो. ५ देवांना बोलावणारा होता, देवांना हविर्भाग अर्पण करणारा 'अध्वर्यू', अध्वर्यूचा साहाय्यक 'प्रतिप्रस्थाता', अग्नी प्रदीप्त करणारा 'आग्नीध्र', दगडी बत्त्यांनी सोम कुटते वेळी स्तवनमंत्र म्हणणारा 'ग्रावस्तोता', होत्याचा साहाय्यक 'मैत्रावरुण' व सर्व अनुष्ठानांवर दृष्टी ठेवणारा बुद्धिमान् 'ब्रह्मा' म्हणून नियोजित झालेल्या हे सात ऋत्विजांनो, तुम्ही सर्वतोपरी सुशोभित केलेल्या व उत्कृष्ट प्रकारे हवन केलेल्या ह्या अश्वमेध यज्ञाच्या योगाने हविर्द्रव्यांच्या नद्या तुडुंब भरून वाहावयास लावा. ६ 'यूप' नांवाचा स्तंभ तयार करण्यासाठी लाकूड तोडून आणणारे, त्याचप्रमाणे तो खांब यज्ञमंडपात उचलून आणणारे, तसेच यूपस्तंभाच्या शेंड्यावर बसविण्यासाठी यूपाच्याच लाकडापैकी थोडासा अंश वेगळा करून त्याचा मापट्याचे आकाराचा 'चषाल' नांवाचा एक भाग तासून तयार करणारे आणि अश्वाच्या शरीराचे भाग शिजविण्यासाठी लागणारी भांडीकुंडी इत्यादि साहित्य तयार करणारे जे जे लोक असतील त्या त्या लोकांचे ते ते उद्योग आम्हाला संतोषित करोत. ७ अत्यंत हर्षजनक असे जे फल देवांनी मजकरता संपादन केले आणि जे आपण होऊन मजकडे चालत आले, त्याचा मी स्वीकार केला. ज्याच्या पृष्ठभागी आरोहण करण्याची सर्वजण इच्छा करतात, असा हा अश्व देवांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी हविर्द्रव्यरूपाने त्यांच्याजवळ जावो. देवांच्या

पुष्टीसाठी आम्ही ज्याला उत्कृष्ट प्रकारच्या बंधनांनी यूपस्तंभाला बांधला त्या ह्या अश्वाला ब्राह्मण व मंत्रद्रष्टे ऋषी अनुमोदन देवोत. ८ वेगवान् अशा त्या मृत अश्वाच्या गळ्यात बांधले असलेले ते दावे, पायबंद, त्याचप्रमाणे त्याच्या डोक्याला बांधलेली दोरी, शिवाय त्याच्या शरीराच्या आणखी एखाद्या जागी बांधली असेल ती दोरी, अथवा त्या अश्वाच्या मुखात मरताना जे गवत तसेच शिल्लक राहिले असेल ते गवत, हे सर्व पदार्थ देवांच्या ठिकाणी जाऊन पोचणारे होवोत. ९ ह्या मृत अश्वाच्या शरीरातील जो मांसाचा भाग माशांनी खाऊन टाकला असेल, अथवा त्या अश्वाच्या निरनिराळ्या अवयवांना, ज्या 'स्वरु' नामक काष्ठशकलाने तूप लावले, त्या काष्ठशकलाला व त्याच्या शरीराची चीरफाड ज्या सुरीने केली, त्या सुरीला जे रक्त किंवा मांस चिकटले असेल, त्याचप्रमाणे त्याच्या शरीराची चीरफाड करणाऱ्या शमित्याच्या दोन्ही हातांना व नखांना जे रक्त किंवा मांस लागलेले असेल ते ते सारे देवांच्या ठिकाणी जाऊन पोहोचो. १० मृत अश्वाच्या उदरातील अर्धवट चिरलेल्या तृणादिकांचा जो दुर्गंधियुक्त अंश बाहेर पडला असेल, आणि कच्च्या मांसाचा जो दर्पयुक्त अंश शिल्लक राहिला असेल, तो सर्व अंश, अश्वाच्या शरीराची चीरफाड करणारे लोक स्वच्छ धुऊन काढून सुसंस्कृत करोत. आणि सेवनास योग्य असा सर्वभाग देवांना प्रिय होईल अशा प्रकारे चांगला शिजवून तयार करोत. ११ हे मृत अश्वा, अग्नीच्या आचीने शिजत असलेल्या तुझ्या शरीरावयवांतून जो मांसरस भांड्याबाहेर उतू जाऊन खाली वाहत येईल, अथवा पूर्णपणे मृत झालेल्या तुज अश्वाच्या शरीरातील मांसरस शिजत असतांना ढवळण्याच्या जाड काडीला लागून जो मांसरसाचा अंश खाली जमिनीवर सांडेल, तो भूमीचेच ठिकाणी जिरून न जाता, अथवा भूमीवर पसरलेल्या गवतालाही चिकटून न राहता, त्याची इच्छा करीत असलेल्या देवांनाच दान म्हणून दिला जातो. (अनुवाक ८).

१ जे लोक मृत अश्वाचे मांस पुरतेपणी शिजले आहे किंवा नाही, याबद्दल अगदी त्याच्या भोवती हिंडत राहून काळजीपूर्वक निरीक्षण करतात, तसेच जे लोक मांस पक्के शिजल्याची खूण पटविणारा सुगंध सुटताक्षणी 'अरे आता हे मांसाचे भांडे अग्नीवरून खाली उतरा', असे म्हणत असतात आणि जे काही लोक 'या अश्वाच्या शिजक्या मांसाची आम्हाला थोडीतरी भिक्षा घाला', अशी प्रार्थना करू लागतात, त्या सर्व लोकांच्या अंत:करणात

घोळत असलेले संकल्प आमच्या कल्याणाला कारणभूत होवोत. २ मांस शिजत असलेल्या हंड्याचे, त्यातील मांस शिजले किंवा नाही, हे पाहण्यासाठी जे आदरपूर्वक निरीक्षण केले जाते, त्याचप्रमाणे मांस शिजवून तयार झाल्यावर, त्या मांसाचा रस ओतून ठेवण्याची जी भांडी असतात, तसेच शिजलेले मांस भरून ठेवलेल्या पात्रांतील कढत वाफ बाहेर न जावी म्हणून त्याच्यावर जी झांकणे घातलेली असतात आणि निरनिराळ्या अंशांच्या ओळखीसाठी त्याच्या ठिकाणी करून ठेवलेल्या काही खुणा व त्या मृत अश्वाच्या चीरफाडीसाठी उपयोगात आणलेली सुरी इत्यादि साधने असतात, ती सर्व अश्वाला सर्वतोपरी अलंकृत करीत असतात. ३ मृत अशा तुज अश्वाचे दररोज दौड करण्याचे मंडलाकार स्थल, विसावा घेत स्वस्थ बसण्याचे ठिकाण आणि लीलेने इकडे तिकडे फिरत राहण्याची जागा, तसेच तुझा पायबंद , त्याचप्रमाणे तू जे काय पाणी प्याला असशील ते, आणि जे काही गवत वगैरे खाल्ले असशील ते, इतकेच नव्हे तर हे अश्वा, ज्या ज्या क्रिया तू करीत असशील, त्या तुझ्या सर्व क्रिया देखील देवांच्या ठिकाणी जाऊन रुजू होवोत. ४ हे अश्वा, चुलाणात क्वचित् उत्पन्न होणारी धूम्रमिश्र अग्नीची ज्वाला, शिजत असलेल्या तुझ्या मांसाच्या ठिकाणी कडवट असा धुरकट वास किंवा 'सिम् सिम्' असा ध्वनी उत्पन्न न करो. अतीशय तापल्यामुळे लाल झालेला हा चुलाण्यावरील हंडा तुझे मांस करपू न देवो. परिपक्व झालेले तुझे मांस सुगंधयुक्त होवो. 'प्रयाज' संज्ञक मंत्रांनी यजन केलेला, अत्यंत रमणीय, पर्यग्निकरण संस्कार केलेला, 'यजामहे' असा 'आगु' संज्ञक मंत्र उच्चारला गेलेला आणि 'वौषट्' ह्या वषट्कारसंज्ञक मंत्राने देवांना समर्पण केलेला, असा जो मांसाच्या अवस्थेला. प्राप्त झालेला अश्व, त्या अश्वाचा देव स्वीकार करोत. ५ अश्वाला मारावयाचे वेळी त्याच्या अंगाखाली जे वस्त्र वापरतात, व जे त्याच्या अंगावर पांघरूण घालतात, तसेच त्याच्या अंगाखाली जे सोन्याचे लहान लहान मणी पसरलेले असतात, शिवाय त्याच्या पायांना व डोक्याला जी दोरी बांधतात, त्या सर्व वस्तू देवांच्या ठिकाणी अत्यंत प्रिय होऊन जिकडल्या तिकडे जावोत. ६ हे अश्वा, जोराने खिंकाळत तू दौड करीत असतांना तुझ्यावर बसलेल्या स्वाराने तुझ्या कुशीत टांचा मारून किंवा तुझ्या अंगावर चाबकाचे तडाखे मारून तुला जो त्रास दिला असेल, अशा तुझ्या संबंधाने घडलेल्या सर्व गोष्टींची, यज्ञामध्ये हविर्द्रव्याची

स्रुचीने आहुती देतात त्याप्रमाणे मी अग्नीच्या ठिकाणी मंत्रपूर्वक आहुती देतो. ७ वेगवान् व देवांना बंधूप्रमाणे प्रिय, अश्वाच्या दोन्ही बरगड्यांतील चौतीस फासळ्या कापून काढल्या नंतर एकेका बरगडीला सत्रा सत्रा फांसळ्या व्यवस्थित रीतीने वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याचे काम ही सुरी चांगल्या प्रकारे करो. हे शमिते हो, ह्या अश्वाची हृदयादि सर्व अंगे छिन्नविच्छिन्न न होता सुरक्षित राहतील अशा प्रकारे समंजसपणाने कापून काढा. त्याचप्रमाणे ह्या अश्वाचा प्रत्येक अवयव ' हा अमुक, हा अमुक' असा नामनिर्देश करून बिनचूकपणे कापून काढा. देदीप्यमान अशा अश्वाच्या शरीराची चीरफाड करणारा एकच 'ऋतु' या संज्ञेने व्यक्त केला जाणारा कालात्मा प्रजापती आहे. त्याचप्रमाणे मारला जात असतांना अश्व यत्किंचितही धडपड न करील, अशा प्रकारे त्याचे नियंत्रण करणारे, 'अध्रिगु' व 'अपाप' ह्या नांवाचे देवगणांपैकी दोघे 'शमिते' आहेत. हे अश्वा, तुझ्या निरनिराळ्या गात्रांसंबंधी मांसपिंडाचे जे जे भाग कापून मी वेगळे करीन, ते ते, भाग योग्य वेळी आहुतीरूपाने मी अग्नीमध्ये समर्पण करीन. ९ हे अश्वा, देवलोकाला जाणाऱ्या तुला, तुझा आवडता देह विरहदुःख न देवो. त्याचप्रमाणे तुझ्या शरीराची चीरफाड करणारी ही सुरी तुझ्या शरीरातील हवनयोग्य अशी कोणतीही अंगे न कापता तशीच राहू न देवो. शास्त्रानुसार चीरफाड करण्याची माहिती नसलेला कोणी अडाणी 'शमिता' हवनयोग्य असे तुझे अवयव न कापता तसेच ठेवून सुरीने भलत्याच जागी तुझ्या शरीराची व्यर्थ चीरफाड न करो. १० हे अश्वा, शास्त्रीय दृष्टी नसणाऱ्यांना तू मरत आहेस असे वाटेल, पण तत्त्वदृष्टीने तू विचार करशील तर तुला समजून येईल की, तू ह्या यज्ञप्रसंगी इतर घोड्यांच्याप्रमाणे मरत नाहीस, किंवा कोणाकडून मारलाही जात नाहीस. इतकेच नव्हे तर सुगम अशा मार्गांनी तू देवांच्याजवळ जाऊन पोचत आहेस. हे अश्वा, तू देवलोकाला गेल्यावर इंद्राचे घोडे आणि ज्यांच्या अंगावर निरनिराळ्या रंगाचे ठिपके आहेत अशा मरुतांच्या घोड्या तुझ्या रथाला जोडल्या जातील. फार तर काय, अश्विनीकुमारांच्या वाहनाच्या धुरेला जो घोडा जोडला जातो, तो गर्दभाप्रमाणे भार वाहणाऱ्या तुज अश्वाजवळ येऊन तुझ्या सेवेसाठी उभा राहील. ११ देवरूपाला प्राप्त झालेला अश्व आम्हाला उत्कृष्ट अशा गाईंच्या कळपाने आणि उत्कृष्ट अशा घोडयांच्या समुदायाने युक्त करो. आमच्या पुत्रांना चारही पुरुषार्थ साधण्याला पात्र करो. त्याचप्रमाणे

आम्हाला आमच्या कुटुंबियांचे उत्कृष्ट पोषण होण्यास पुरेसे धन देवो. हे अश्वा, तू आम्हाला निष्पाप कर. देवांच्या हविर्द्रव्याचे स्वरूप प्राप्त झालेला आणि केव्हाही दीन नसणारा अश्व आमचे बल अधिक वाढवो. (अनुवाक ९).

प्रपाठक ७

हे अग्नाविष्णू हो, तुम्ही दोघे परस्परांवर सारखीच प्रीती करणारे व्हा. आम्ही उच्चारित असलेली तुमची स्तुतिवचने वृध्दिंगत होवोत. तुम्ही दोघेही अनेक प्रकारची धने व अन्ने आपल्या बरोबर घेऊनच येथे या.

मला भरपूर अन्न मिळावे व निरनिराळ्या अन्नाच्या स्वभावगुणांचे ज्ञानही मला असावे. अन्नसेवनाला अवश्य असलेली शुद्धता माझ्या ठिकाणी असावी आणि अन्नसेवनाविषयी मला उत्सुकताही असावी. माझ्या ठिकाणी अन्नाची धारणा व्हावी व अन्नप्राप्तीला कारण होणारा यज्ञही माझ्या हातून घडावा मंत्रामध्ये उदात्तादि स्वरांचे ज्ञान मला असावे आणि मंत्रामध्ये असलेल्या देवताविषयक स्तुतीचेही ज्ञान मला असावे. मला सदैव प्रकाश मिळावा आणि स्वर्गलोकही मला प्राप्त व्हावा. 'प्राण' संज्ञक वायू मला अनुकूल असावा आणि 'अपान' नांवाचा वायूही मला अनूकूल असावा. 'व्यान' वायू मला अनुकूल असावा आणि प्राणादिकांचा वृत्तिमान् असलेला वायूही मला अनुकूल असावा. मनोव्यापारापासून निष्पन्न होणारे ज्ञान मला असावे व त्या ज्ञानाने आपलीशी केलेल्या वस्तूचेही ज्ञान मला असावे. उत्कृष्ट वाणी मला प्राप्त व्हावी आणि मननशील असे मनही मला प्राप्त व्हावे. स्वकार्यक्षम असे नेत्र मला असावेत व उत्कृष्ट श्रवणशक्ती असलेले कानही मला असावेत. सर्व कार्याविषयी दक्षता मला असावी आणि निरनिराळ्या प्रकारची कार्ये पार पाडणारे बलही मला असावे. माझ्या शरीराचे ठिकाणी बलोत्पादक असे 'ओज' असावे व शत्रूचा पराभव करण्याचे सामर्थ्यही मला असावे. दीर्घायुष्य मला असावे आणि आयुष्याच्या उत्तरार्धात योग्य वेळी मला वार्धक्यही प्राप्त व्हावे. हृदयस्थ अशा परमात्म्याच्या स्वरूपाचा लाभ मला व्हावा आणि निकोप व सुरेख असे शरीरही मला प्राप्त व्हावे. सर्व प्रकारचे सुख मला मिळावे आणि शरीराचे संरक्षण करणारे चिलखतही मला मिळावे. शरीराच्या ठिकाणची कार्यक्षम अशी सर्व अंगे मला प्राप्त व्हावीत आणि माझ्या शरीरातील हाडपेरही

कणखर असावे. अंगुली वगैरेंच्या रूपांनी असणारी कार्यक्षम अशी पेरेही मला असावीत आणि अवश्य ते सर्व अवयवही मला असावेत. (अनुवाक १).

सर्व प्रकारे उच्च अशी स्थिती मला प्राप्त व्हावी आणि समाजाचे आधिपत्यही मला प्राप्त व्हावे. व्यवहारास अवश्य तितका मानसिक क्रोध मला असावा, त्याच प्रमाणे अवश्य तितका शारीरिक क्रोधही मला असावा. विरोधकांना केव्हाही अजमावता न येण्याइतकी सखोल विचारसरणी मला प्राप्त होवो आणि थंड व मधुर असे उदक मला सदैव प्यावयास मिळो. शत्रूंवर जय संपादन करण्याचे सामर्थ्य मला असो व विजयपूर्वक संपादन केलेल्या धनसंपत्तीमुळे योग्य ते महत्त्वही मला प्राप्त होवो. लोकांच्या ठिकाणी मजविषयी पूज्यबुद्धी उत्पन्न होवो आणि माझे घर, जमीन इत्यादिकांचा उत्तरोत्तर विस्तार होवो. पुत्रपौत्रादिरूप शरीराचा मला लाभ होवो व अविच्छिन्न अशी पुत्रपौत्रादिरूप दीर्घ संततीही मला प्राप्त होवो. धन आणि धान्य मला भरपूर मिळो, विद्यादि गुणांच्या योगाने माझा सदैव उत्कर्ष होवो. माझ्या मुखाने सर्वदा सत्य बोलले जावो आणि ईश्वरविषयक श्रध्दा माझ्या ठिकाणी असो. संसारास अवश्य अशा पश्वादि जंगम वस्तूंचा लाभ मला होवो आणि सुवर्णमौक्तिकादि मौल्यवान् वस्तूही मला प्राप्त होवोत. लोकसमुदाय मला वश होवो आणि माझ्या शरीराचे ठिकाणी उत्कृष्ट कांती निर्माण होवो. निरनिराळ्या प्रकारच्या करमणुकीच्या खेळांतील पटुत्व माझ्या ठिकाणी असो व त्या खेळात नेहमी जय मिळविल्याचा आनंद मला होवो. माझ्या ठिकाणी जन्म पावलेले माझे प्रत्येक अपत्य सुखी असो. त्याचप्रमाणे मला पुढे होणारेही प्रत्येक अपत्य सुखी असो. ऋग्मंत्रांच्या अनेक सूक्तांची मला प्राप्ती व्हावी आणि तज्जन्य अशा अपूर्व सुकृताचाही लाभ मला व्हावा. पूर्वी मिळविलेले माझे धन मजजवळ टिकून रहावे, त्याचप्रमाणे पुढे संपादन करण्यात येणारे धनही मजजवळ टिकून रहावे.

मी मिळविलेला जमीनजुमला मजपाशी टिकून रहावा, व पुढे मिळविण्यात येणाराही जमीनजुमला मजपाशी टिकून रहावा. कोणत्याही ग्रामांतरास माझे जाणे सुगम अशा मार्गाने व सुखाने व्हावे. तसेच चोरादिकांचा उपद्रव नसलेला सरळ मार्ग मला मिळत जावा. अनुष्ठित केलेल्या कर्माचे फल मला लाभावे आणि अनुष्ठित करावयाच्याही कर्माचे फल मला मिळावे. सर्व कार्यास पुरेसे

द्रव्य मजजवळ असावे व सर्व कार्य पार पाडण्यास अवश्य ते सामर्थ्य माझ्या ठिकाणी असावे. सर्वसामान्य कार्याविषयीची निर्णायक बुध्दी मला असावी व राजकारणासारख्या दुर्घट कार्याविषयीचीही निर्णायक बुध्दी मला असावी. (अनुवाक २).

ऐहिक सुखाचा मला होवो, त्याचप्रमाणे पारलौकिक सुखाचाही लाभ मला होवो. सर्व प्रकारच्या आवडत्या वस्तूंचा लाभ मला होवो व ज्याची अनुकूलता असावी अशी मला इच्छा होईल त्या पदार्थाचाही लाभ मला होवो. स्वर्गादिप्राप्तीविषयीची माझी कामना पूर्ण होवो आणि माझ्या मनाला स्वास्थ्य होईल अशा प्रकारच्या बंधुवर्गाचा लाभ मला होवो. इहलोकीचे रमणीय असे कल्याण मला प्राप्त होवो व परलोकप्राप्तीचे श्रेयही मला प्राप्त होवो. राहण्यास योग्य असे घरदार मला मिळो आणि यशस्वीपणाच्या कीर्तीचाही लाभ मला होवो. सर्व प्रकारचे भाग्य मला प्राप्त होवो आणि त्या भाग्यास साजेसे द्रव्यही मला मिळो. मला वेळोवेळी सदुपदेश करणाऱ्या गुरूचा लाभ मला होवो आणि माझे पोषण करणाऱ्या वडीलधाऱ्या माणसांचाही लाभ मला होवो. मिळविलेल्या धनाचे संरक्षण करण्याची शक्ती मला असो. आपत्काली निश्चल असे धैर्यही मला प्राप्त होवो. सर्व जनांचे मला आनुकूल्य असो आणि सर्व ठिकाणी मला पूज्यत्व प्राप्त होवो. वेदशास्त्रादिकांचे उत्कृष्ट ज्ञान मला प्राप्त होवो आणि माझे ज्ञान इतरांना पटवून देण्याचे सामर्थ्य मला असो. पुत्रादिकांना निरनिराळ्या कार्याविषयी प्रेरणा करण्याचे ज्ञान मला असो, त्याचप्रमाणे नोकराचाकरांनाही त्यांच्या कार्याविषयी योग्य ती प्रेरणा करण्याचे ज्ञान मला असो. शेतकीसाठी लागणारी नांगर इत्यादि सर्व प्रकारची सामग्री मजपाशी असो व त्या सामग्रीपैकी एखाद्या वस्तूत काही बिघाड होऊन त्याजकडून होणारे कार्य बंद पडण्याची वेळ आल्यास योग्य ती दुरुस्ती करून ती वस्तू योग्य काम देईल असे करण्याचे कौशल्यही मजजवळ असो. यज्ञादि कर्म माझे हातून घडो आणि त्याचे अविनाशी असे फळ मला प्राप्त होवो. राजयक्ष्म्यासारख्या प्रबल रोगाची बाधा मला कधीही न होवो आणि ज्वरासारख्या अल्प व्याधीदेखील मला केव्हाही उपद्रव न देवोत. प्रसंगविशेषी जीवनास आवश्यक व व्याधींचा परिहार करणाऱ्या औषधाचा लाभ मला होवो आणि अपमृत्युरहित असे दीर्घायुष्य मला प्राप्त होवो. मला कोणी शत्रू नसावा, त्याचप्रमाणे कोणापासूनही भय नसावे. लोकांना मान्य

होईल असेच माझे आचरण असावे आणि मला झोपण्यासाठी प्रशस्त असे आंथरूण पांघरूण असावे. माझा दररोजचा प्रातःकाल पुण्यप्रद अशा संध्या वंदनादि सत्कर्माचरणात जावा. त्याचप्रमाणे सर्व दिवस यज्ञ, दान अध्ययन इत्यादि सत्कर्मे करण्यात व्यतीत व्हावा. (अनुवाक ३).

भरपूर अन्न मला प्राप्त होवो. सुसंस्कृत अशी प्रियकर वाणी मला प्राप्त होवो. भरपूर दूध मला प्राप्त होवो. दही इत्यादि रस मला प्राप्त होवोत. उत्कृष्ट तूप मला प्राप्त होवो. उत्तम मध मला मिळो. बंधुवर्गांच्यासह मला भोजन मिळो. त्याचप्रमाणे बंधुवर्गांच्यासह मला उदक प्यावयास मिळो. शेतकी करण्याचे ज्ञान मला असो. शेतामध्ये पीक येण्यास अवश्य असणारी पर्जन्यवृष्टी मला प्राप्त होवो. कधीही ओसाड न होणारी अशी उत्कृष्ट जमीन मला मिळो. माझ्या शेताभोवती अनेक प्रकारचे वृक्ष व लता वाढलेल्या असोत. मला सुवर्णाचा लाभ होवो. मोती, हिरे इत्यादि रत्नेही मला प्राप्त होवोत. मजजवळ भरपूर सोन्याचा साठा असो. माझे शरीर सदैव पुष्ट असो. उंच वाढणाऱ्या धान्यांचे पीक मला पुष्कळ लाभो. ज्वारीसारखे धान्यही माझ्या शेतात पुष्कळ पिको. हरभरा वगैरे कडधान्यही माझ्या शेतात भरपूर पिको. माझ्या निर्वाहास पुरेसे धान्य मजजवळ असो. माझा निर्वाह होऊन उरेल इतके धान्य मजजवळ असो. माझ्या जवळचा धान्यसंग्रह अक्षय असो. हलक्या जातीच्या जवांचीही मला प्राप्ती होवो. सर्व प्रकारचे अन्न मला मिळो. क्षुधेची बाधा मला केव्हाही न होवो. साळीचे भात मला पुष्कळ मिळो. उत्कृष्ट जातीचे सातू मला भरपूर मिळोत. उडीद माझ्या शेतात पुष्कळ पिकोत. माझ्या शेतात तीळ पुष्कळ पिकोत आणि मूगही पुष्कळ पिकोत. मुगापेक्षा मोठा दाणा असलेले 'लाख' नांवाचे धान्य माझ्या शेतात पुष्कळ पिको. गहू माझ्या शेतात पुष्कळ पिकोत आणि मसुराही पुष्कळ पिकोत. माझ्या शेतात राळे भरपूर पिकोत आणि बारिक दाणा असलेल्या जातीचे साळीचे भातही माझ्या शेतात पुष्कळ पिको. सावे माझ्या शेतात पुष्कळ पिकोत आणि वऱ्याही माझ्या शेतात भरपूर पिकोत. (अनुवाक ४).

इमारतीच्या कामाला निरनिराळ्या जातीचा दगड मला मिळो. निरनिराळ्या कार्यास लागणारी निरनिराळ्या जातीची माती मला प्राप्त होवो. इमारती व जळाऊ लाकूड असणारे लहान डोंगर माझ्या स्वामित्वाखाली असोत व

निरनिराळ्या पदार्थांच्या खाणी असलेले मोठे पर्वतही माझ्या मालकीचे असोत. निरनिराळ्या कामासाठी लागणारी बारीक मोठी वाळू मला मिळो. निरनिराळ्या वनस्पती मला प्राप्त होवोत. सोने मला मिळो व लोखंडही मला मिळो. शिसे मला मिळो व कथिलही मला मिळो. पोलाद मिळो, कांसे, तांबे इत्यादि धातूही मला मिळोत. अग्निदेवाचा अनुग्रह मजवर असो व उदकदेवतेचीही कृपा मजवर असो. निरनिराळ्या लता माझ्या जमिनीत असोत आणि सर्व प्रकारच्या ओषधीही मला प्राप्त होवोत. नांगरट केलेल्या जमिनीत पिकणारे धान्य मला मिळो व नांगरट न केलेल्या जमिनीत पिकणारे धान्यही मला प्राप्त होवो. ग्राम्य पशू मला मिळोत आणि वन्य पशूही मला प्राप्त होवोत. मजजवळ असणारे ग्राम्य व वन्य पशू यज्ञाच्या निमित्ताने स्वकार्यसमर्थ होवोत. पूर्वी मिळविलेले धन मजजवळ टिकावे. पुढे मिळणारे धनही मजजवळ टिकावे. ऐश्वर्यसंपन्न पुत्र मला लाभावेत आणि मला स्वतःलाही ऐश्वर्य लाभावे. सुखाने वस्ती होण्यास साधनभूत असलेली गाई, बैल इत्यादि जनावरे मला मिळावीत आणि सुखाने राहण्यास योग्य असे प्रशस्त घर वगैरेही मला मिळावे. अग्निहोत्रादि कर्म माझ्या हातून घडावे आणि ते कर्म घडण्यास अवश्य ते सामर्थ्यही माझ्या ठिकाणी असावे. निरनिराळ्या कार्यांचे निमित्त मला प्राप्त व्हावे आणि मिळावयास पाहिजे असेल ते सुखही मला मिळावे. इष्टप्राप्तीचा उपाय मला कळावा व त्या उपायाने साध्य अशा इष्ट कार्याची सिद्धीही मला मिळावी. (अनुवाक ५).

अग्नीचा मजवर अनुग्रह असो. इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. सोमाचा मजवर अनुग्रह असो व इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. सविता देवाचा मजवर अनुग्रह असो. तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. सरस्वती देवीचा मजवर अनुग्रह असो, आणि इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. पूषादेवाचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. बृहस्पती देवाचा मजवर अनुग्रह असो तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. मित्रदेवाचा मजवर अनुग्रह असो, त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. वरुणदेवाचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. त्वष्टादेवाचा मजवर अनुग्रह असो, त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. धातादेवाचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. विष्णुदेवाचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. उभयता अश्विनीकुमारांचा

मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. मरुत्देवाचा मजवर अनुग्रह असो. त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. विश्वेदेवसंज्ञक देवांचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. पृथ्वीमातेचा मजवर अनुग्रह असो, त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. अंतरिक्ष देवतेचा मजवर अनुग्रह असो, त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. द्युलोकदेवतेचा मजवर अनुग्रह असो, त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. चारी दिशांचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. ऊर्ध्व दिशेचा मजवर अनुग्रह असो, तसाच इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. प्रजापतीदेवाचा मजवर अनुग्रह असो, त्याचप्रमाणे इंद्राचाही मजवर अनुग्रह असो. (अनुवाक ६).

'अंशु' या नांवाचा सोमग्रह मला प्राप्त होवो. सोमरसाने भरून घेतला जाणारा 'रश्मी' शब्दाने उपलक्षित असा ग्रह मला प्राप्त होवो. सोमरसाने भरून घेतला गेलेला 'अदाभ्य' ग्रह मला प्राप्त होवो. 'अधिपति' शब्दाने उपलक्षित असा 'दधिग्रह' मला प्राप्त होवो. 'उपांशु' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो, त्याचप्रमाणे 'अंतर्याम' नांवाचा ग्रहही मला प्राप्त होवो. 'ऐंद्रवायव्य' नांवाचा द्विदेवतात्मक सोमग्रह मला प्राप्त होवो, तसाच 'मैत्रावरुण' नांवाचा द्विदेवतात्मक सोमग्रहही मला प्राप्त होवो. 'आश्विन' नांवाचा द्विदेवतात्मक ग्रह मला प्राप्त होवो आणि प्रतिप्रस्थान म्हणजे द्विदेवतात्मक ग्रहाचा सहायभूत असलेला ग्रहही मला प्राप्त होवो. शुक्र नांवाचा सोमग्रह मला प्राप्त होवो आणि 'मंथी' नांवाचा ग्रहही मला प्राप्त होवो. 'आग्रयण' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो व प्रात:सवनात घेतला जाणारा वैश्वदेव नांवाचा ग्रहही मला प्राप्त होवो. 'ध्रुव' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो आणि 'वैश्वानर' ग्रहही मला प्राप्त होवो. ऋतुग्रहसंज्ञक सहा ग्रह मला प्राप्त होवोत व 'अतिग्राह्य' नांवाचे तीन ग्रहही मला प्राप्त होवोत. 'ऐंद्राग्र' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो आणि तृतीय सवनात घेतला जाणारा 'वैश्वदेव' ग्रहही मला प्राप्त होवो. 'मरुत्वतीय' नांवाचे सोमग्रह मला प्राप्त होवोत आणि 'महींद्र' नांवाचा सोमग्रहही मला प्राप्त होवो. 'आदित्य' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो आणि 'सावित्र' नांवाचा ग्रह देखील मला प्राप्त होवो. 'सारस्वत' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो आणि 'पौष्ण' या नांवाचाही ग्रह मला प्राप्त होवो. 'पात्नीवत' नांवाचा ग्रह मला प्राप्त होवो, आणि 'हरियोजन' नांवाचा सोमग्रहही मला प्राप्त होवो.

(अनुवाक ७).

अग्नी प्रदीप्त करण्याकरिता यज्ञीय काष्ठांचा बांधलेला 'इध्म' मला प्राप्त होवो आणि वेदीमध्ये पसरण्यात येत असलेले 'बर्हि' म्हणजे दर्भही मला प्राप्त होवोत. हविर्द्रव्ये जेथे मांडली जातात, ते 'वेदी' नांवाचे स्थळ मला प्राप्त होवो आणि अग्नीचे स्थापन करण्याकरता वर्तुळाकार किंवा चौकोनी घातलेले 'धिष्णिय' संज्ञक ओटेही मला प्राप्त होवोत. आहुती देण्याचे साधन असलेली 'स्रुक्' नांवाची पात्रे मला प्राप्त होवोत आणि सोमरसाची आहुती ज्यांनी दिली जाते ती 'चमस' नांवाची लाकडी पाळीही मला प्राप्त होवोत. सोमवल्ली कुटावयाचे दगडी बत्ते मला प्राप्त होवोत आणि 'स्वरु' नामक लाकडी सुऱ्याही मला प्राप्त होवोत. सोमवल्ली कुटावयाच्या जागी खणलेले 'उपरव' नांवाचे चार खळगे मला प्राप्त होवोत आणि त्या खळग्यांच्यावर झांकण घातलेल्या 'अधिषवण' नामक दोन फळ्याही मला प्राप्त होवोत. सोमरस ज्यात गाळला जातो, ते 'द्रोणकलश' नांवाचे द्रोणाकार व मोठे असलेले लाकडी पात्र मला प्राप्त होवो आणि सोमरस ज्यामध्ये भरून घेतला जातो, ती उखळाच्या आकाराची व टीचभर उंचीची 'वायव्य' संज्ञक ग्रहपात्रेही मला प्राप्त होवोत. गाळलेला सोमरस भरून ठेवण्याचा 'पूतभृत्' नामक डेरा मला प्राप्त होवो व 'आधवनीय' नांवाचा सोमरस साठविण्याचा डेराही मला प्राप्त होवो. 'आग्नीध्र' नांवाचे स्थळ मला प्राप्त होवो व सोमपात्रे जेथे ठेवली जातात, ते 'हविर्धान' संज्ञक स्थळही मला प्राप्त होवो. यज्ञभूमीत उभारलेली 'पत्नीशाला' इत्यादि गृहे मला प्राप्त होवोत आणि प्रमुख ऋत्विज जेथे बसतात ते 'सद' नांवाचे सभास्थानही मला प्राप्त होवो. हविर्द्रव्य म्हणून तयार करण्यात येणारे 'पुरोडाश' मला प्राप्त होवोत. आणि पशूंची अंगे जेथे शिजविली जातात ती 'शामित्र' इत्यादि स्थळेही मला प्राप्त होवोत. यज्ञाच्या शेवटी जलप्रवाहावर जाऊन करण्यात येत असलेला 'अवभृथ' संज्ञक विधी मला प्राप्त होवो आणि 'स्वगाकार' संज्ञक मंत्रांचे पठणही मला प्राप्त होवो. (अनुवाक ८).

निरनिराळ्या आकाराच्या दोन दोनशे विटांचे एकावर एक पांच थर मांडून त्यावर स्थापन केलेला अग्नी मला प्रसन्न होवो. विशिष्ट आकाराच्या मृन्मय पात्रात तूप कढवून व त्यात गाईचे व शेळीचे दूध मिसळून त्या

दुग्धमिश्र तुपाच्या आहुती ज्यामध्ये देण्यात येतात, ते 'प्रवर्ग्य' नांवाचे कर्म मला प्राप्त होवो. अर्कवान इंद्रासाठी केला जाणारा 'अर्क' नांवाचा याग मला प्राप्त होवो आणि सूर्यासाठी केला जाणारा सौर्य या नांवाचा यागही मला प्राप्त होवो. प्राणादि वायूंच्या प्रीत्यर्थ केला जाणारा होम मला प्राप्त होवो आणि 'अश्वमेध' यज्ञही मला प्राप्त होवो. पृथिवी देवता मला प्रसन्न होवो आणि अदिती नांवाची देवताही मजवर प्रसन्न होवो. दिती नांवाची देवता मजवर अनुग्रह करणारी होवो आणि द्युलोकदेवताही मला प्रसन्न होवो. शक्करी नांवाच्या देवता मला प्रसन्न होवोत आणि विराट् पुरुषाच्या अंगुलीही मजवर अनुग्रह करोत. दिशा व उपदिशा माझ्या यज्ञाच्या योगाने सुप्रसन्न होऊन आपआपली कार्ये करण्यास समर्थ होवोत. छंदोबध्द असे ऋङ्.मंत्र मला प्राप्त होवोत आणि गानरूप असलेले 'साम' मंत्रही मला प्राप्त होवोत. सामाच्या विशिष्ट आवृत्तींनी गाइले जाणारे 'स्तोत्र' मला प्राप्त होवो व गद्यरूप असलेले यजुर्मंत्रवाङ्.मयही मला प्राप्त होवो. दीक्षा नांवाचा संस्कार मला प्राप्त होवो आणि अनशनादिरूप तपही मला प्राप्त होवो. यज्ञाला योग्य असा ऋतू मला प्राप्त होवो आणि विशिष्ट नियमरूप व्रतही मला प्राप्त होवो. अहोरात्रांच्याकडून होणाऱ्या पर्जन्यवृष्टीमुळे माझे शेत भरपूर पिको आणि बृहत् आणि रथंतर ही दोन्ही सामे माझ्या हातून घडणाऱ्या यज्ञाच्या योगाने स्वकार्यक्षम होवोत. (अनुवाक ९).

गाभण्या गाई माझ्या गोठ्यात असोत, नुकतीच जन्मलेली वासरे माझ्या गोठ्यात असोत, दीड वर्षाचा खोंड माझ्या गोठ्यात असो व तितक्याच वयाची कालवडही माझ्या गोठ्यात असो. दोन वर्षांचा खोंड माझ्या गोठ्यात असो आणि तितक्याच वयाची कालवडही माझ्या गोठ्यात असो. अडीच वर्षांचा खोंड माझ्या गोठ्यात असो आणि तितक्याच वयाची कालवडही माझ्या गोठ्यात असो. तीन वर्षांचा खोंड माझ्या गोठ्यात असो आणि तितक्याच वयाची कालवडही माझ्या गोठ्यात असो. साडेतीन वर्षांचा खोंड माझ्या गोठ्यात असो आणि तितक्याच वयाची कालवडही माझ्या गोठ्यात असो. चार वर्षांचा खोंड माझ्या गोठ्यात असो आणि तितक्याच वयाची कालवडही माझ्या गोठ्यात असो. अंडिल बैल माझ्या गोठ्यात असो, व वांझ गायही माझ्या गोठ्यात असो. प्रौढ वयाचा बैल माझ्या गोठ्यात असो आणि गर्भस्रावाची खोड असणारी गायही माझ्या गोठ्यात असो. गाडी ओढणारा

बैल माझ्या गोठ्यात असो आणि नुकतीच व्यालेली गायही माझ्या गोठ्यात असो. मी केलेल्या यज्ञाच्या योगाने माझे आयुष्य कर्तव्यक्षम होवो. मी केलेल्या यज्ञाने माझा प्राणवायू स्वकार्यक्षम होवो. माझा अपानवायू मी केलेल्या यज्ञाने स्वकार्यक्षम होवो. तसेच माझ्या यज्ञाने माझा व्यानवायू देखील स्वकार्यक्षम होवो. माझ्या हातून घडलेल्या यज्ञाच्या योगाने माझे नेत्र स्वकार्यक्षम होवोत आणि माझ्याकडून घडलेल्या यज्ञाने माझे कानही स्वकार्यक्षम होवोत. माझे मन माझ्या यज्ञाच्या योगाने स्वकार्यक्षम होवो आणि माझी वाणी देखील मी केलेल्या यज्ञाच्या योगाने स्वकार्यसमर्थ होवो. माझे शरीर मी केलेल्या यज्ञामुळे स्वकार्यक्षम होवो आणि मी आज अनुष्ठित करीत असलेल्या यज्ञाच्या योगाने भविष्यकाळी मला करावयाचा असलेला यज्ञही स्वकार्यक्षम होवो. (अनुवाक १०).

एक ही संख्या मला प्राप्त होवो आणि तीन ही संख्याही मला प्राप्त होवो. पांच ही संख्या मला प्राप्त होवो आणि सात ही संख्याही मला प्राप्त होवो. नऊ ही संख्या मला प्राप्त होवो, तसेच अकरा ही संख्या देखील मला प्राप्त होवो. तेरा ही संख्या मला प्राप्त होवो व पंधरा ही संख्याही मला प्राप्त होवो. सत्रा ही संख्या मला प्राप्त होवो व एकोणीस ही संख्याही मला प्राप्त होवो. एकवीस ही संख्या मला प्राप्त होवो, तसेच तेवीस ही संख्याही मला प्राप्त होवो. पंचवीस ही संख्या मला प्राप्त होवो आणि सत्तावीस ही संख्याही मला प्राप्त होवो. एकोणतीस ही संख्या मला प्राप्त होवो व एकतीस ही संख्याही मला प्राप्त होवो. त्याचप्रमाणे तेहतीस ही संख्या मला प्राप्त होवो.

चार ही संख्या मला प्राप्त होवो आणि आठ ही संख्या मला प्राप्त होवो. बारा ही संख्या मला प्राप्त होवो अणि सोळा ही संख्या देखील मला प्राप्त होवो. वीस ही संख्या मला प्राप्त होवो आणि चोवीस ही संख्याही मला प्राप्त होवो. अठ्ठावीस ही संख्या मला प्राप्त होवो व बत्तीस ही संख्या देखील मला प्राप्त होवो. छत्तीस ही संख्या मला प्राप्त होवो. तसेच चाळीस ही संख्या मला प्राप्त होवो. चव्वेचाळीस ही संख्या मला प्राप्त होवो, त्याचप्रमाणे अठ्ठेचाळीस ही संख्याही मला प्राप्त होवो.

एका संवत्सरामध्ये येणारे वाज, प्रसव, आविज, क्रतु, सुव, मूर्धा,

व्यश्रिय, आन्त्यायन, अन्त्य, भौवन, भुवन व अधिपती हे बारा महिने हे सर्व मला सुख देवोत. (अनुवाक ११).

१ पूर्व, दक्षिण इत्यादि चार व ऊर्ध्व, मध्य आणि अधर या तीन मिळून होणाऱ्या सात प्रशस्त दिशा आणि अत्यंत दूर असल्याप्रमाणे भासणाऱ्या आग्नेय इत्यादि चार विदिशा आम्हाला अन्नप्रद होवोत. धनसंपन्न अशा ह्या यज्ञप्रदेशाचे ठिकाणी सर्व देवांनी प्रेरित केलेले अन्न आमचे संरक्षण करो. २ आज सर्व मरुत् आणि इतर सर्व देव आमचे रक्षण करण्याला प्रवृत्त होवोत. ह्या यज्ञमंडपातील सर्व अग्नी प्रज्वलित होवोत. सर्व देव आमचे संरक्षण करण्याच्या निमित्ताने येथे येवोत. त्याचप्रमाणे सर्व प्रकारचे धन आम्हास प्राप्त होवो. ३ हे देव हो, आम्हाला अन्न संपादन करून देण्याच्या उद्देशाने आणि आमच्या ह्या यज्ञात सोमपान करण्यासाठी तुम्ही येथे या. अग्नी, इंद्र, बृहस्पती व मरुत् हे देव आपआपल्या सुवर्णखचित रथात बसून ह्या यज्ञभूमीचे ठिकाणी प्राप्त होवोत. ४ अन्न संपादन करून देणाऱ्या हे देव हो, जेव्हा जेव्हा आम्हाला अन्न प्राप्त होण्याची व धन मिळण्याची संधी येईल, तेव्हा तेव्हा तुम्ही आमचे रक्षण करा. ब्राह्मणाप्रमाणे शुचिर्भूत, मरणरहित व सत्य जाणणाऱ्या हे देव हो, ह्या यज्ञामध्ये तुम्हाला समर्पण करण्यात येणाऱ्या हविर्द्रव्यरूपी मधुर अन्नाचे भोजन करून आनंदित व्हा आणि यथेच्छ भोजन करून तृप्त झालेले तुम्ही देवांचे जाण्यायेण्याचे जे मार्ग आहेत, त्या त्या मार्गांनी आपआपल्या स्थानी जाऊन पोहचा. ५ आमच्या पूर्व वयात, मधल्या तारुण्यावस्थेत आणि उतार वयात आम्हाला भरपूर अन्न मिळो. कारण, आम्हाला नेहमी मिळत राहिलेले अन्न त्या त्या विशिष्ट काली आमच्याकडून यज्ञयोग्य अशा देवांना प्राप्त होत असते. अन्नांची समृध्दी आमच्याजवळ असली, म्हणजे सर्व दिशांच्या ठिकाणी राहणारे लोक आमच्याशी नमून वागत असतात. आणि म्हणूनच देवांच्या अनुग्रहाने मी अन्नाचा अधिपती होईन. ६ अन्नाची समृध्दी व्हावी म्हणून मी ह्या पृथ्वीवर उदकाची स्थापना करतो. औषधींच्या ठिकाणी उदकाची स्थापना करतो. द्युलोकाचे ठिकाणी उदक स्थापन करतो. अंतरिक्षलोकामध्येही उदक स्थापन करतो. प्रशस्त अशा सर्व दिशा माझ्यासाठी उदकाने परिपूर्ण होवोत. ७ हे अग्निदेवा, तुझ्या अनुग्रहाने मी आपल्याला दुधाशी संयोजित करीत आहे, घृताशी संयोज़ित करीत आहे. उदके आणि औषधी यांच्याशीही मी स्वत:ला

संयोजित करीत आहे. दुग्धादिकांच्याशी संयोजित झालेला मी तू दिलेल्या अन्नाचा उपभोग करीन. ८ कृष्णवर्ण असणारी रात्र व शुक्लवर्ण असणारा दिवस ही उभयता परस्परविलक्षण स्वरूपाची असतांनाही एकमेकांना अनुकूल होऊन अग्निरूपी एका बालकाला पाजीत असतात. द्युलोक व पृथ्वी यांच्यामध्ये असणाऱ्या अंतरिक्षाचे ठिकाणी अग्नी सुवर्णाप्रमाणे चमकत असतो. यजमानाच्या शरीराचे ठिकाणी संचार करीत असणाऱ्या व यजमानाला यागद्वारा धनरूपी फळ मिळवून देणाऱ्या त्याचे पंचप्राणांनी अग्नीला धारण केले आहे. ९ हे वायो, तू स्वतःच्या संचारासाठी विस्तीर्ण अशा आकाशाचे संपादन करणारा, पर्जन्यवृष्टीचे सर्वांना दान देणारा, उपासकाला ऐहिक आणि पारमार्थिक सुखाचा लाभ करून देणारा व सर्व देवांमध्ये समुद्राप्रमाणे विशाल आहेस. माझ्याभोवती सर्व प्रदेशात वाहत राहून शीतलता निर्माण कर. ही आहुती तुला समर्पण असो. १० हे वायो, तू 'मारुत' या शब्दाने व्यक्त केला जाणारा जणू मरुतांचा गणच आहेस. उपासकाला ऐहिक व पारमार्थिक सुखाचा लाभ करून देणारा तू माझ्याभोवती शीतलतेने वाहत रहा. ही आहुती तुला समर्पण असो. ११ हे वायो, तू आमचे संरक्षण करण्याची इच्छा करणारा असून आमच्याकडून केल्या जाणाऱ्या सेवेने युक्त आहेस. ऐहिक व पारमार्थिक सुखाचा लाभ करून देणारा तू माझ्याभोवती शीतलपणे वाहत रहा. ही आहुती तुला समर्पण असो. (अनुवाक १२).

१ देदीप्यमान, श्येन पक्ष्यासारख्या आकाराचा आणि वयाने अत्यंत मोठा अशा ह्या चितिरूपी अग्नीला, रथाशी अश्व जोडावा त्याप्रमाणे बल आणि घृतादि द्रव्ययुक्त अशा कर्माशी नियोजित करतो. अत्युत्कृष्ट अशा स्वर्गलोकाचे ठिकाणी असणाऱ्या सुखप्रद प्रदेशावर आरोहण करू इच्छिणारे आम्ही त्या चितिरूपी अग्नीच्या योगाने सूर्याच्या तापरहित अशा स्थानाला जाऊन पोहचू. २ हे अग्निदेवा, ज्या पंखांच्या तडाख्याने तू राक्षसांना ठार करतोस, त्या तुज पक्ष्याकार अग्नीच्या कधीही जीर्ण न होणाऱ्या दोन पंखांच्या योगाने ज्या ठिकाणी सृष्टीच्या प्रारंभी उत्पन्न झालेले व पुरातन असे महर्षी राहतात, त्या पुण्यकर्म करणाऱ्या पुरुषांनीच राहण्याला योग्य अशा स्थानाला जाऊन पोहचू. ३ हे चितिरूपी अग्ने, तू जगाला चेतना देणारा, सर्व ऋतूंच्या समावेशाचे समुद्राप्रमाणे विशाल असे स्थान, परम ऐश्वर्याने युक्त, 'ससाणा' नामक पक्ष्याप्रमाणे आकार असलेला, सत्ययुक्त, सुवर्णमय पंखांनी युक्त, कामनाभेदास

अनुसरून 'कंक' इत्यादि पक्ष्यांचा आकार धारण करणारा, अत्यंत प्रौढ आणि आदित्यासह एकत्र राहण्यास योग्य अशा ठिकाणी सर्वतोपरी स्थिर होऊन बसला आहेस. ४ हे अग्निदेवा, तुझ्या संबंधी यज्ञ करणाऱ्या मज यजमानाचा तू नाश करू नको. तू अखिल जगाचा जणू शिरोभागच अशा अत्युत्कृष्ट चितिप्रदेशाचा आश्रय करून राहिला आहेस. व अधिकत्वाने संवर्धित झाला आहेस. तुझे हृदय समुद्राचे ठिकाणी अधिष्ठित झालेले असून तुझ्या चित्ताच्या अंतर्भागी सर्व प्राण्यांचे आयुष्य समाविष्ट झालेले आहे. सर्व प्राण्यांचे रक्षण करण्यासाठीच वर द्युलोक व खाली पृथ्वी ह्या दोघांची स्थापना तू केली आहेस. ५ हे अग्नी हो, तुम्ही द्युलोक, अंतरिक्ष व पृथ्वी यांच्या ठिकाणी राहणाऱ्यांच्या स्वास्थ्यासाठी मेघाचे विदारण करून उदकांचे दान करा. मेघाचे विदारण केल्यानंतर पर्जन्यवृष्टीपासून प्राप्त होणाऱ्या उदकांनी तुम्ही आमचे संरक्षण करा. हे अग्निदेवा, तू द्युलोकाचे जणू मस्तकच असा आदित्यरूप आहेस. पृथ्वीच्या नाभिस्थानी अर्थात् मध्य प्रदेशाच्या ठिकाणी तू राहणारा आहेस. उदके व औषधी यांच्या ठिकाणचा तू जणू सारभूत रसच आहेस. सर्व जगाला तूच आयुष्य देतोस. तू सर्व प्राण्यांचे मूर्तिमंत सुखच आहेस. त्याचप्रमाणे तू विस्तारयुक्त आहेस. पुण्यलोकाचा जणू राजमार्गच अशा तुज अग्निदेवाला माझा नमस्कार असो. ६ यज्ञकार्यासाठी अग्नीला प्रज्वलित करणाऱ्या व स्वर्गलोकाला आपलासा करून घेणाऱ्या महर्षींनी ज्या चित्तैकाग्र्यरूप उग्र तपाच्या सामर्थ्याने फार दिवस चालू राहणारे 'सत्र' नांवाचे अनुष्ठान केले, त्या स्वर्गलोकप्रापक व दुःखरहित अशा तपाच्या ठिकाणीच ज्याला मननशील विद्वान 'यज्ञाचा प्रसार करणारा' असे म्हणतात त्या अग्नीला मी ठेवीत आहे. ७ हे देव हो, प्रकाशाचे केवळ अधिष्ठानच व पुण्यकर्मानेच प्राप्त होणारे परमोच्चस्थान म्हणून गणल्या जाणाऱ्या आणि या पृथ्वीपासून तिसऱ्या टप्प्यावर असलेल्या द्युलोकाच्या पठारावर दुःखरहित असे स्थल संपादन करून घेऊ इच्छिणारे आम्ही आमच्या स्त्रिया, आमचे पुत्र आणि बंधू, इतकेच काय, पण सुवर्णादि मौल्यवान् वस्तू आपल्या बरोबर घेऊन त्या अग्नीच्या मागोमाग जाऊ आणि इच्छित फलाला प्राप्त होऊ. ८ सर्व जगाचे भरणपोषण करणारा, सज्जनांचा पालक, सर्व कार्याचा अभिज्ञ, आणि पृथ्वीच्या पाठीवर स्थापन केलेला हा देदीप्यमान अग्नी त्याच्या स्तुतिरूपी मंत्रवाणीचे ठिकाणी वर्णिलेल्या गुणांनी युक्त होऊन या चयनस्थानाच्या मध्यभागी

आरूढ झाला आहे. तो आमच्याशी युद्ध करू इच्छिणाऱ्या दुष्टांना आपल्या पायांखाली तुडवो. ९ अत्यंत शूर, सर्व प्राण्यांच्या ठिकाणी आयुष्य स्थापन करणारा, हजार विटांची विशिष्ट तऱ्हेने रचना करून निर्माण केलेला, यज्ञकर्मामध्ये प्रमाद न होऊ देणारा, व विद्युद्रूपाने उदकाच्या ठिकाणी प्रकाशित होणारा हा अग्नी प्रज्वलित होवो. आणि हे ऋत्विजांनो व हे यजमान हो, त्या अग्नीच्या प्रसादाने स्वर्गलोकातील दिव्य अशा स्थानांच्या सन्निध तुम्ही जाऊन पोहचा. १० हे अग्निदेवा, तू आणि सर्व देव व यजमान नीट रीतीने सावध रहा आणि आपल्या कार्याच्या आड येणाऱ्या विघ्नांना दूर करा व आपल्या कर्माची सिद्धी प्राप्त करून घ्या. त्यानंतर देवलोकाला जाणाऱ्या मार्गावर पावले टाका आणि देवांच्या सहवासात राहण्याला योग्य अशा कर्तव्यात अधिकतेने गढून रहा. ११ हे अग्निदेवा, देवांची प्राप्ती करून देणारा व उत्तम असा तू ज्या सामर्थ्याने हजार गाईंची दक्षिणा देऊन अनुष्ठित केला जाणारा यज्ञ तडीस नेतोस, इतकेच नव्हे, तर ज्यामध्ये यजमानाने आपले 'सर्वस्व' दक्षिणा म्हणून दान करणे अवश्य असते, अशा महान् यज्ञाचाही भार वाहतोस. त्याच सामर्थ्याने आमचा हा यज्ञ देवांच्या जवळ जाऊन पोचण्यासाठी स्वर्गलोकापर्यंत नेऊन पोचीव. १२ हे अग्निदेवा, तू माझ्याविषयी सदैव सावधानचित्त रहा आणि यजमानालाही प्रत्येक दिवशी सावध ठेव. हा यजमान आणि तू दोघे मिळून श्रौत व स्मार्त अशी दोन्ही प्रकारची कर्मे पार पाडा. हे यजमान, तुला पुत्रादिकांचा पालक आणि पुन्हा पुन्हा तरुणाप्रमाणे कार्यक्षम करीत असलेला हा अग्नी तुझ्या निमित्ताने ह्या यज्ञरूपी तंतूचा अनुक्रमाने विस्तार करो. १३ हे अग्निदेवा, निरनिराळ्या आकारांच्या विटांची रचना करून निर्मिलेला हा चितिरूप प्रदेश तुझी जन्मभूमी आहे. ज्या इष्टका चितिरूप प्रदेशात उत्पन्न होऊन तू प्रज्वलित होत असतोस त्याला नीट जाणून हे अग्ने, त्याच्या ठिकाणी तू आरोहण कर आणि आमच्यासाठी धनाची अभिवृध्दी कर. (अनुवाक १३).

१ हे अग्निदेवा, यज्ञांच्या संबंधी जे फल असेल ते मला प्राप्त होवो. आम्ही ऋत्विज व यजमान तुज अग्नीला प्रज्वलित करून तुझे शरीर पुष्ट करतो. प्रशस्त अशा पूर्व इत्यादि चार दिशा मला वश होवोत. अर्थात् चारही दिशांना राहणारे लोक माझ्या आधीन होवोत. आमचा अध्यक्ष असलेल्या तुज अग्नीसह असणारे आम्ही शत्रूंच्या सेना जिंकू. २ इंद्रयुक्त मरुत्गण,

विष्णू व अग्नी इत्यादि सर्व देव माझ्या यज्ञाचे ठिकाणी उपस्थित होवोत. अत्यंत विस्तीर्ण असे आकाश माझे संरक्षक होवो. ह्या यज्ञापासून मी इच्छित असलेले फल मला प्राप्त व्हावयासाठी वायू मला अनुकूल होऊन संचार करो. ३ इंद्रादि सर्व देव मज यजमानाच्या ठिकाणी चोहोकडून धन संपादन करोत. मी इच्छित असलेले फल मला प्राप्त होवो. देवांना मजकडून केलेले आह्वान मजविषयी सफल होवो. प्राचीन कालापासून असलेले देवांचे ऋत्विज माझ्या यज्ञाचा मन:पूर्वक स्वीकार करोत. हिंसारहित अशा शरीराने युक्त असलेले आम्ही पराक्रमी अशा पुत्राने युक्त होऊ. ४ माझ्या यज्ञामध्ये जी जी हविर्द्रव्ये तयार केलेली आहेत, ती ती सर्व हविर्द्रव्ये देवांचे ऋत्विज माझ्या करताच देवांना अर्पण करोत. मी आपल्या मनात केलेला संकल्प सत्य होवो. मी कोणतेही पातक करण्यास केव्हाही प्रवृत्त होणार नाही. हे विश्वेदेव हो, देवाच्याजवळ तुम्ही माझ्याविषयी इतर यजमानांच्याहून अधिक प्रशंसा करा. ५ 'उर्वी' हे नांव धारण करणाऱ्या द्युलोक, पृथ्वी, उदके, ओषधी, ऊर्क, सूनृता ह्या सहा देवींनो, आमच्या यज्ञाचा तुम्ही सर्वत्र विस्तार करा. हे विश्वेदेव हो, आमच्या ह्या यज्ञामध्ये तुम्ही वीरवृत्ती धारण करून सर्व विघ्नांचा परिहार करा. आम्ही आपल्या पुत्रपौत्रादि प्रजेकडून केव्हाही परित्यक्त होणार नाही. त्याचप्रमाणे पुष्ट अशा आमच्या शरीरांच्या कडूनही आम्ही परित्यक्त होणार नाही. हे सोमराजा, माझ्या वैऱ्याला तो करीत असलेल्या कार्याची सिद्धी मी करू देणार नाही. ६ हा अग्नी आमच्या शत्रूंचा आमच्यावर असलेला कोप नष्ट करीतच आमच्या पुरोभागी चालत राहो. हे अग्निदेवा, कोणाकडूनही दबला न जाणारा तू आमचा संरक्षक होऊन आमचे सर्वतोपरी रक्षण कर. तुझ्या संरक्षणाखाली आम्ही असलेले पाहताच आमचे शत्रू आमच्याकडे पाठ फिरवून वेगाने पळ काढोत. आणि कोठल्याही प्रदेशात चालते होवोत. आमच्या शत्रूंची मनोवृत्ती विवेकभ्रष्ट होवो. ७ दक्ष, प्रजापती इत्यादि जगत्स्रष्ट्यांचेही धारण करणारा व त्रिभुवनपालक असा तो परमात्मा, उभयता अश्विनीकुमार आणि बृहस्पती हे देव, त्या त्या मंत्राच्या व्यवहाराने युक्त, महान् फल उत्पन्न करणारा आणि पापरूपी शत्रूचा पराभव करणारा अशा आमच्या ह्या यज्ञाचे व यजमानाचे फलवैगुण्यरूपी वैयर्थ्यापासून रक्षण करोत. ८ अत्यंत विस्तीर्ण अशा अनेक देशांचा अधिपती, महनीय अशा शौर्यादि गुणांनी युक्त, अनेक मंत्रांच्या ठिकाणी प्रतिपादित

असलेला आणि अनेक यजमानांच्या कडून बोलाविला गेलेला इंद्र ह्या यज्ञामध्ये आम्हाला सुख देवो. 'हरी' नांवाचे घोडे आपल्या रथाला जोडणाऱ्या हे इंद्रदेवा, पुत्रपौत्रादि प्रजेची आम्हास सिद्धी व्हावी म्हणून तू आम्हास सुखी कर. आम्हास पीडा देऊ नको. आणि आमचा केव्हाही तिरस्कार करू नकोस. ९ आमचे जे कोणी शत्रू असतील, ते सर्व आमच्यापासून दूर चालते होवोत. इंद्र व अग्नी ह्या देवांचा अनुग्रह संपादन केलेले आम्ही आमच्या ह्या शत्रूंना सर्वतोपरी त्रास देत राहू. वसू, रुद्र व आदित्य हे देव मला स्वर्गलोकाला स्पर्श करणारा, शत्रूंचा पराभव करण्याइतका उग्र, सर्व कार्याविषयी अभिज्ञ व सर्वांचा अधिपती करोत. १० परकीयांच्या गाई जिंकून आणणारा, व परकीयांचे धनही लूटून आणणारा आणि परकीयांचे घोडेही जिंकून आणणारा जो इंद्र, त्याला ह्या यज्ञाच्या निमित्ताने आमच्या संमुख आम्ही बोलावीत आहो. हे इंद्रा, तुला अनेक ठिकाणची निमंत्रणे असली तरी आमच्या ह्या यज्ञाला तू मान्य करून घे. 'हरी' नांवाचे घोडे आपल्या रथाला जोडणाऱ्या हे इंद्रा, तुला मी ह्या यजमानाचा स्नेही करीत आहे. (अनुवाक १४).

१ निषादांसह पांचही वर्णाचे उपास्य दैवत म्हणून गणल्या जाणाऱ्या ज्या अग्निदेवाला अनेक यजमान प्रज्वलित करीत असतात, त्या सृष्टीच्या प्रारंभी उत्पन्न झालेल्या व उत्कृष्ट ज्ञानवान् अशा अग्निदेवाच्या मूर्तीचे मी मनात चिंतन करीत आहे. सर्व प्रजांच्या उदरात जठराग्निरूपाने प्रविष्ट होऊन राहिलेल्या त्या अग्निदेवाजवळ आम्ही येऊन पोचलो आहो. तो आम्हाला पापापासून मुक्त करो. २ श्वासोच्छ्वास व डोळ्यांची उघडझाप करणाऱ्या प्राण्यांनी भरलेले हे सारे आज दिसत असलेले, पूर्वी होऊन गेलेले आणि भविष्यकाळात निर्माण होणारे जग केवळ ज्या एका अग्निदेवाच्या आधीन आहे, त्या अग्नीचे मी स्तवन करतो. इच्छित फलाची याचना करणारा होऊन त्या अग्निदेवाचे मी वारंवार यजन करीत आहे. तो अग्निदेव आम्हाला पापापासून मुक्त करो. ३ सृष्टीच्या प्रारंभी उत्पन्न झालेल्या अत्यंत ज्ञानसंपन्न अशा इंद्रदेवाच्या मूर्तीचे मी आपल्या मनाने ध्यान करीत आहे. शत्रूंचा नि:पात करणाऱ्या त्या इंद्राजवळ जाऊन पोचलेली वैदिक स्तोत्रे माझ्या जिव्हाग्री खेळत आहेत. उत्कृष्ट प्रकारे हवि:प्रदान करून यज्ञानुष्ठान करणाऱ्या यजमानाचे निमंत्रण जो स्वीकारतो, व त्याच्या यज्ञाला जातो तो इंद्र आम्हाला

पातकापासून मुक्त करो. ४ जो इंद्र आपल्या सैन्यादि सर्व परिवाराला वश करून घेऊनच रणांगणावर नेत असतो व जो गाई, घोडे आणि पुरुष ह्या तिघांनाही यजमानाशी परिपूर्ण अशा अनुकूलतेने नियुक्त करतो, त्या इंद्राचे मी स्तवन करतो. इच्छित फलाची याचना करणारा होऊन मी त्या इंद्राचे पुन्हा पुन्हा यजन करीत आहे. तो आम्हाला पापापासून मुक्त करो. ५ हे मित्रावरुण हो, तुम्हा उभयतांच्या मूर्तीचे मी आपल्या मनाने ध्यान करीत आहे. अकृत्रिम बलाने युक्त आणि शत्रूंना स्तंभित करणारे तुम्ही ज्या माझ्या वैऱ्याला मजपासून दूर केलेत, त्या वैऱ्याच्या मनातला मजविषयीचा दुष्टपणा तुम्ही ओळखला आहे. अत्यंत देदीप्यमान व रथासह असणाऱ्या आदित्याजवळ लोकांच्यावर उपकार करण्याच्या बुध्दीने तुम्ही उभयता पर्जन्यवृष्टी निर्माण करण्यासाठी येत असता, ते अनिष्ट निवारण करण्याच्या कामी अत्यंत कणखर असणारे तुम्ही दोघे आम्हाला पापासून मुक्त करा. ६ हे मित्रावरुणहो, घोड्यांना आवरण्यासाठी सारथ्याला आपल्या हाती धरावयास लागणाऱ्या काढण्या ज्याच्यावर सरळ पसरलेल्या आहेत आणि जो सत्य अशा मार्गानेच चालत असतो, तो तुम्हा उभयतांचा रथ अन्याय करणाऱ्या शत्रूंना शासन करण्यासाठीच त्यांच्याजवळ जात असतो. श्रेष्ठ अशा त्या मित्रावरुणांचे मी स्तवन करीत आहे व इच्छित फलाची याचना करणारा होऊन मी त्यांचे वारंवार यजन करीत आहे. ते दोघे आम्हाला पापापासून मुक्त करोत. ७ वायू आणि सविता ह्या दोघाही देवांच्या मनातील विशिष्ट अभिप्राय आम्ही जाणतो. ज्या वायू व सविता ह्या दोघांनी स्वतःच्या शरीराप्रमाणेच सर्व जगाचे धारण केले, ज्या दोघा देवांनी या सर्व जगाचे पालन केले, किंबहुना जे वायू व सविता हे दोघे देव सर्व जगाला व्यापक झालेले आहेत, ते आम्हाला पापापासून मुक्त करोत. ८ आम्ही इच्छित असलेली अत्यंत श्रेष्ठ अशी फले ज्या वायू आणि सविता ह्या दोघांच्या संबंधी होणाऱ्या यज्ञकर्माच्या सान्निध्यात राहतात म्हणजे जी फळे देणे या दोघा देवांच्या स्वाधीन असते, त्या वायूला आणि सवित्याला मी स्तवीत आहे आणि इच्छित फलाची याचना करणारा होऊन मी त्यांचे पुनः पुनः पूजन करीत आहे. ते दोघे देव आम्हाला पापापासून मुक्त करोत. ९ रथामध्ये बसून संचार करणाऱ्या देवांमध्ये अत्यंत श्रेष्ठ रथी म्हणून गणले जाणारे उभयता अश्विनीकुमार आपल्याला नियंत्रण करण्यास अत्यंत सुलभ अशा उत्कृष्ट अश्वांनी सज्ज केलेल्या रथात

बसून अत्यंत रमणीय अशा प्रदेशात त्वरेने संचार करीत असतात. हे अश्विनीकुमार हो, सर्व देवांच्यामध्ये ज्या तुम्हा दोघांचे बल कोणत्याही अन्य उपायांनी तीक्ष्ण केलेले नसून स्वभावत:च अत्यंत तीक्ष्ण आहे, ते तुम्ही उभयता आम्हाला पातकापासून मुक्त करा. १० हे अश्विनीकुमार हो, आपली माता असलेल्या सूर्यपत्नीला अत्यंत मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी तीन चाकी रथात तिला बसवून नेण्याच्या इच्छेने ज्या अर्थी तुम्ही रथावर चढलात त्या अर्थी तुम्हा दोघा देवांचे मी स्तवन करीत आहे आणि इच्छित फलाची याचना करणारा होऊन तुम्हा दोघांचे मी वारंवार यजन करीत आहे. तुम्ही दोघे आम्हाला पापापासून मुक्त करा. ११ 'मरुत्' नांवाच्या देवांच्या मूर्तीचे मी एकाग्र चित्ताने ध्यान करीत आहे. 'इतरांच्याहून तुह्मी आमची अधिक भक्ती करता', असे ते मरुत् आम्हाला म्हणोत. ते सर्व मरुत् मी केलेली प्रार्थना पूर्णपणे आपल्या ध्यानांत ठेवोत. अत्यंत शीघ्रगामी व उत्कृष्ट नियामक अशा त्या मरुतांना आमच्या रक्षणासाठी मी बोलावीत आहे. ते आम्हाला पातकापासून मुक्त करोत. १२ 'मरुत्' नामक देवांचे आयुध अत्यंत तीक्ष्ण व कणखर असते. त्याचप्रमाणे त्या मरुतांचे बल देखील शत्रूंचा पराभव करणारे, यथोचित व्यवहाराला योग्य आणि परकीयांच्या सैन्यावर जय संपादन करणारे असते. ते मरुत् आम्हाला पापापासून मुक्त करोत. १३ देवांच्या मूर्तीचे मी मनाने ध्यान करींत आहे. 'इतरांच्याहून तुम्ही आम्हाला अधिक प्रिय आहा', असे ते देव आम्हाला म्हणोत. ते सर्व देव माझी सर्व प्रार्थना नीट ध्यानात ठेवोत. शीघ्रगामी व उत्कृष्ट नियामक अशा त्या देवांना आमच्या संरक्षणासाठी मी बोलावीत आहे. ते आम्हाला पातकापासून मुक्त करोत. १४ मनुष्यांच्या व देवांच्या प्रसन्नतेविषयी नाना प्रकारचे कष्ट करून मी जे दु:ख संपादन केले, ते मला सर्वतोपरी क्लेश देत आहे. त्या दु:खाचा परिहार होण्यासाठी मी सर्व देवांचे स्तवन करीत आहे व इच्छित फलाची याचना करणारा होऊन मी त्यांचे वारंवार पूजन करीत आहे. ते सर्व देव आम्हाला पापापासून मुक्त करोत. १५ अनुमती नांवाची ही देवता आज आमच्या या यज्ञाची देवांच्यापुढे प्रशंसा करो. यजमानाने अर्पिलेली हविर्द्रव्ये देवांच्याकडे वाहून नेणारा अग्नीदेवही हविप्रदान करणाऱ्या यजमानाला सुखी करो. १६ हे अनुमते, माझ्या यज्ञाला तू सर्वस्वी अनुमती दे आणि आम्हाला सुखी कर आणि समृध्द अशा या आमच्या यज्ञाच्या ठिकाणी प्रीती करणारी

हो आणि आम्हाला चिरकाळ सुखाने जाणारे आयुष्ये संपादन करून दे. १७ सर्व मनुष्यांवर उपकार करणारा अग्निदेव आमच्या रक्षणाच्या साधनांसह लांबच्या प्रदेशातून सुद्धा एकदम आमच्याजवळ येऊन पोचण्याइतके उड्डाण करून आमच्याजवळ सत्वर येऊन पोहोचो. १८ हा अग्नी आदित्यरूपाने द्युलोकाला स्पर्श करून राहिला असून दाह, पाक व प्रकाश इत्यादि कार्य करणारा होऊन पृथ्वीला स्पर्श करून राहिला आहे. त्याचप्रमाणे फळांना परिपक्व करणारा होऊन सर्व ओषधी व वनस्पतींनाही तो स्पर्श करून राहिला आहे. अशा प्रकारे जो वैश्वानरनामक अग्नी स्वतःच्या बलाने सर्वत्र स्पर्श करून राहिला आहे तो आमचे दिवसा व रात्री देखील आमच्या पापापासून रक्षण करो. १९ अपरिमित अशा आपल्या बलांनी जे द्यावापृथिवी जगात प्रख्यात झाले, आणि जे नाना प्रकारच्या धनांचे आश्रयस्थान होऊन बसले, त्या द्यावापृथिवींचे मी स्तवन करीत आहे व इच्छित फलाची याचना करून वरचेवर त्यांची पूजा करीत आहे. ते द्यावापृथिवी आम्हाला पातकापासून मुक्त करोत. २० अत्यंत विस्तीर्ण अशा हे द्यावापृथिवी हो, तुम्ही आमच्यासाठी धन संपादन करा. क्षेत्राचे पालन करणाऱ्या हे द्यावापृथिवी हो, तुम्ही इतरांपेक्षा आम्हाला अधिक प्रिय आहात, असे तुम्ही आमच्याशी बोलून व्यक्त करा. परमपूज्य अशा द्यावापृथिवींचे मी स्तवन करीत आहे व इच्छित फलाची याचना करणारा होऊन मी त्यांचे वारंवार यजन करीत आहे. ते द्यावापृथिवी आम्हाला पापापासून मुक्त करोत. २१ अत्यंत तरुण असणाऱ्या हे अग्निदेवा, आम्ही अज्ञानी असल्यामुळे आमच्या हातून तुमच्या कृपेतील पुरुषाच्या विषयी जे काही अपराध घडले असतील, त्याचप्रमाणे अखंडनीय अशा तुझ्याविषयी जे प्रमाद आम्ही केले असतील त्या सर्वांपासून तू आम्हाला चांगल्या रीतीने मुक्त कर. हे अग्निदेवा, माझ्या हातून जी पातके घडली असतील ती सर्वतोपरी शिथिल कर. २२ यजन करण्याला योग्य व अखिल जगाचा सुखाने निवास होण्यास कारणभूत अशा हे अग्निसहित देवांनो, तुम्ही आपल्या फांसाची दोरी जिच्या एका पायाला बांधून तिला खुंट्याला जखडून ठेवलीत, त्या एका गौरवर्ण गाईला तुम्हीच बंधनापासून मोकळी केलीत. हे अग्निदेवा, त्या गाईचा फांस जसा तिच्यापासून मोकळा केलास त्याचप्रमाणे आम्हाला जखडून टाकणारे पापही आमच्यापासून पूर्णपणे मुक्त कर आणि आमच्या आयुष्याचा शक्य तितका विस्तार कर. (अनुवाक १५).